# A STUDY OF INTER-RELATIONSHIP BETWEEN LAND, CAST AND POWER WITH SPECIAL REFERENCE TO RAIGADH DISTRICT.

## [''रायगड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात जात, भूधारणा व सत्ता यांच्या अंतर्गत संबंधाचा अभ्यास'']

**A THESIS SUBMITTED TO THE**

TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH, PUNE
FOR THE AWARD OF DEGREE OF
PH. D. (VIDYAVACHASPATI) in
POLITICAL SCIENCE

FACULTY OF MORAL AND SOCIAL SCIENCE

Submitted By
**SANDIP VILASRAO GHODKE**

Under the Guidance of
**DR. ASHOK V. JAIN**

**JUNE 2011**

## DECLARATIONS

I here by declare that the thesis entitled "**INTER RELATIONSHIP BETWEEN LAND, CAST AND POWER WITH SPECIAL REFERENCE TO RAIGADH DISTRICT**" (''रायगड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात जात, भूधारणा व सत्ता यांच्या अंतर्गत संबंधाचा अभ्यास'') completed and written by me has not previously formed the basis for the award of any Degree or other similar title of this or any other University or examining body.

**Place : Panvel** **SANDIP VILASRAO GHODKE**

**Date :** **Research Student**

## CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled " **A STUDY OF INTER RELATIONSHIP BETWEEN LAND, CAST AND POWER WITH SPECIAL REFERENCE TO RAIGADH DISTRICT**" (''रायगड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात जात, भूधारणा व सत्ता यांच्या अंतर्गत संबंधाचा अभ्यास'') which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph. D.) in SOCIAL SCIENCES of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by SHRI GHODKE SANDIP VILASRAO under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in this thesis has not formed the basis for the award of My Degree or similar title of this or any other University or examining body.

**Place : THANE** **(DR. ASHOK V. JAIN)**
**Date :** **Research Guide**

## ऋणनिर्देश

''रायगड जिल्ह्याच्या विशेष संदर्भात जात, भूधारणा व सत्ता यांच्या अंतर्गत संबंधाचा अभ्यास'' या विषयाचे संशोधन काय पूर्ण करण्याकरिता अनेक मित्र, हितचिंतक, संस्था व त्यांचे पदाधिकारी या सर्वांचे अमूल्या सहकार्य लाभले. त्यांचे ऋण मानने माझे कर्तव्य मानतो.

हा संशोधन प्रबंध पूर्णत्वास नेण्याकरिता माझे मार्गदर्शक डॉ. अशोक व्ही. जैन, संशोधक मार्गदर्शक किर्ती महाविद्यालय, दादर, मुंबई यांनी सदर विषयाच्या निवडीपासून ते संशोधन कार्य पूर्ण होईपर्यंत सतत बहुमोल मार्गदर्शन करून योग्य त्या सूचना केल्या, सतत प्रोत्साहन दिले त्यामुळेच हा प्रबंध पूर्णत्वास जात आहे. त्यानिमित्त मी डॉ. अशोक व्ही जैन यांचे अंत:करणातून ऋण व्यक्त करतो.

हे संशोधन कार्य करीत असताना बरीच माहिती संकलित करावी लागली, त्याकामी मला श्री तेलंग (कर्जत तलाठी), श्री समीर भोईटे (पनवेल तलाठी कार्यालय), प्रा. बी. डी, शिंदे, श्री भरत दळवी (अलिबाग), सौ. म्हात्रे (खालापूर), श्री प्रशांत सुर्वे (सहकार अधिकारी, पेण) यांनी व इतर अनेक स्नेह्यांनी मला संबंधित माहिती उपलब्ध करून दिली त्यामुळेच हे संशोधन कार्य पूर्ण करता आले. प्रा. सुनिल देशपांडे सह सर्वांचा मी आभारी आहे.

सखोल विस्तृत लेखन साहित्य संशोधनासाठी गरजेचे असते. ते मला अनेक ग्रंथालयातून प्राप्त झाले. त्यामध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे, यशदा, मुंबई विद्यापीठ ग्रंथालय कालिना महात्मा फुले ए. एस. सी. कॉलेज, पनवेल ग्रंथालय व ग्रंथपाल, अलिबाग नगर वाचनालय, लिमये वाचनालय, पनवेल, वीर वाजेकर ए. एस. सी. कॉलेज, फुंडे ग्रंथालय व ग्रंथपाल या सर्वांनी मला ग्रंथालय खुले करून दिल्यामुळषच मी मुक्त व दिर्घकाळ विविध ग्रंथांच्या सहाय्याने संशोधक कार्य पूर्णत्वास नेऊ शकलो. त्यानिमित्त त्यांचे मन:पूर्वक आभार.

रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन आणि ज्येष्ठ विचारवंत डॉ. प्रा. एन. डी पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मो. रामशेठ ठाकूर, मध्य विभागाचे चेअरमन मा. यशवंतभाऊ पाटील यांनी दिलेल्या प्रेरक आर्शिवादाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार.

माझे मित्र व मार्गदर्शक डॉ. नितीन बिरमल, माझे गुरुवर्य डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जगदाळे, डॉ. भारती पाटील, डॉ. विजय पाटील, डॉ. ए. बी. जगदाळे आणि डॉ अरुणा पेंडसे यांनी संशोधन कार्यानिमित्त केलेल्या सखोल चर्चेबद्दल व बहुमुल्य मार्गदर्शनानिमित्त त्यांचे अंत:करणातून आभार.

माझ्या संशोधन कार्यावर माझे लक्ष केंद्रीत करणारे व सतत प्रोत्साहन देणारे माझे मित्र डॉ. अरविंद बुरुंगले (प्राचार्य के. बी. पी. कॉलेज, वाशी), डॉ. मोहन राजमाने (प्राचार्य, गाडगे महाराज कॉलेज, कराड), डॉ. राजीव बावधनकर (प्राचार्य, वीर वाजेकर कॉलेज, फुंडे), डॉ. गणेश ठाकूर (प्राचार्य, महात्मा फुले ए. एस. सी. कॉलेज, पनवेल) व बंधूसम माया लावणारे डॉ. एस. टी. गडदे (प्राचार्य, सी. के. टी. कॉलेज, पनवेल) आणि प्रा. सी. आर. सदाशिवन (अध्यक्ष एम फुक्टो) यांचे मन:पूर्वक आभार.

सदर संशोधन पूर्णत्वास नेण्यासाठी प्रेरक ठरलेले माझे पिताश्री कै. विलासराव बाबुराव घाोडके, सासरे श्री. वसंतराव राऊत, रयत परिवार, माझा नातेवाईक, मानस बंधू श्री. व्ही. एल. थिटे व प्रा. आर. झेड. रणदिवे, प्रबंधाची मांडणी व संगणकिय कार्य करणारे श्री.

माझे जेष्ठ बंधू डॉ. प्रदीप घोडके (संशोधक, वसंतदादा शुगर इन्स्टिीट्यूट, पुणे) माझी धर्मपत्नी सौ. संजीवनी, कन्या श्रुती व चिरंजीव अथर्व यांच्या अमुल्य सहकार्याचाही मी अंत:करणपूर्वक उल्लेख करतो.

**प्रा. संदीप विलासराव घोडके**
**संशोधक**

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | विषय प्रवेश आणि संशोधनाचा आकृतिबंध | १ |
| २ | सूक्ष्मस्तरीय समाजकारण, अर्थकारण व राजकारण आणि त्यांचे आंतरसंबंध | २४ |
| ३ | सुक्ष्मस्तरीय राजकीय प्रक्रिया | १०१ |
| ४ | रायगड जिल्ह्याचा संक्षिप्त परिचय | १४५ |
| ५ | रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–१ (पनवेल तालुका) | ११० |
| ६ | रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–२ (कर्जत तालुका) | १९९ |
| ७ | संशोधनाची निरिक्षणे आणि निष्कर्ष | २३७ |

# तक्ता सूची


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४ | **रायगड जिल्ह्याचा संक्षिप्त परिचय** | १४५ |
| | तक्ता क्र. ४.१ रायगड जिल्ह्यातील तालुक्यांचे भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्या | १५६ |
| | तक्ता क्र. ४.२ कारखानदारी आणि त्यातील कामगारांची संख्या | १५९ |
| | तक्ता क्र. ४.३ रायगड जिल्ह्यातील रोजगार | १५९ |
| | तक्ता क्र. ४.४ संरचनात्मक सुविधांची उपलब्धता | १६० |
| | तक्ता क्र. ४.५ दृष्टिक्षेपात रायगड जिल्हा | १६३ |
| ५ | **रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू-धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास-१ (पनवेल तालुका)** | १६४ |
| | तक्ता क्र. ५.१ पनवेल तालुक्याती पिकानुसार जमिनीची विभागणी | १६५ |
| | तक्ता क्र. ५.२ पनवेल तालुक्यातील रस्त्यांचे प्रकार व लांबी | १६७ |
| | तक्ता क्र. ५.३ वाकडी गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | १७० |
| | तक्ता क्र. ५.४ वाकडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी | १७१ |
| | तक्ता क्र. ५.५ वाकडी गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण | १७२ |
| | तक्ता क्र. ५.६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण | १७४ |
| | तक्ता क्र. ५.७ वाकडी गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) | १७५ |
| | तक्ता क्र. ५.८ खानव गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | १७७ |
| | तक्ता क्र. ५.९ खानव गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी | १७८ |
| | तक्ता क्र. ५.१० खानव गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण | १७९ |
| | तक्ता क्र. ५.११ खानव ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण | १८० |
| | तक्ता क्र. ५.१२ खानव गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) | १८१ |
| | तक्ता क्र. ५.१३ खैरवाडी गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | १८२ |

तक्ता क्र. ५.१४ खैरवाडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी १८३

तक्ता क्र. ५.१५ खैरवाडी गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण १८३

तक्ता क्र. ५.१६ खैरवाडी ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण १८४

तक्ता क्र. ५.१७ खैरवाडी गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) १८५

तक्ता क्र. ५.१८ चिंचवली गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण १८६

तक्ता क्र. ५.१९ चिंचवली गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी १८६

तक्ता क्र. ५.२० चिंचवली गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण १८७

तक्ता क्र. ५.२१ चिंचवली ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण १८८

तक्ता क्र. ५.२२ चिंचवली गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) १८९

तक्ता क्र. ५.२३ कांदले गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण १९०

तक्ता क्र. ५.२४ कांदले गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी १९१

तक्ता क्र. ५.२५ कंदले गावातील वैयक्तिक भूधारकांच्या जातीनिहाय भूधारणा १९१

तक्ता क्र. ५.२६ कांदले गावातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण १९२

तक्ता क्र. ५.२७ कांदले गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) १९३

तक्ता क्र. ५.२८ लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण १९४

तक्ता क्र. ५.२९ जातीनिहाय भूधारणा १९५

तक्ता क्र. ५.३० ग्रुप ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या सदस्यांचे जातीनिहाय विवरण १९६

तक्ता क्र. ५.३१ खैरवाडी, चिंचवली आणि कांदले ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भूधारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंध १९७

तक्ता क्र. ५.३२ सरपंच आणि उपसरपंचाच्या निवडीचे विश्लेषण १९८

| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ६ | **रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू-धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास-१ (पनवेल तालुका)** | १९९ |
| | तक्ता क्र. ६.१ कर्जत तालुक्यातील नागरी सुविधांचा तपशील | २०० |
| | तक्ता क्र. ६.२ चोची गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | २०३ |
| | तक्ता क्र. ६.३ चोची गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी | २०४ |
| | तक्ता क्र. ६.४ चोची गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण | २०५ |
| | तक्ता क्र. ६.५ चोची ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण | २०६ |
| | तक्ता क्र. ६.६ चोची गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) | २०७ |
| | तक्ता क्र. ६.७ मुगवे गावातील लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | २०८ |
| | तक्ता क्र. ६.८ मुगवे गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी | २०९ |
| | तक्ता क्र. ६.९ मुगवे गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण | २१० |
| | तक्ता क्र. ६.१० मुगवे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण | २११ |
| | तक्ता क्र. ६.११ मुगवे गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) | २१२ |
| | तक्ता क्र. ६.१२ कोंदीवडे गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण | २१३ |
| | तक्ता क्र. ६.१३ कोंदीवडे गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी | २१४ |
| | तक्ता क्र. ६.१४ कोंदीवडे गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण | २१५ |
| | तक्ता क्र. ६.१५ कोंदीवडे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण | २१६ |
| | तक्ता क्र. ६.१६ कोंदीवडे गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५) | २१७ |
| | तक्ता क्र. ६.१७ कोंदीवडे गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००५) | २१८ |
| | तक्ता क्र. ६.१८ सरपंच आणि उपसरपंच निवडीचे विश्लेषण | २१९ |

तक्ता क्र. ६.१९ खरवंडी गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण २२०

तक्ता क्र. ६.२० खरवंडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी २२१

तक्ता क्र. ६.२१ खरवंडी गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण २२२

तक्ता क्र. ६.२२ खरवंडी ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण २२३

तक्ता क्र. ६.२३ खरवंडी गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००५) २२४

तक्ता क्र. ६.२४ कोंढाणे गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण २२५

तक्ता क्र. ६.२५ कोंढाणे गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी २२६

तक्ता क्र. ६.२६ खरवंडी गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण २२७

तक्ता क्र. ६.२७ कोंढाणे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण २२८

तक्ता क्र. ६.२८ कोंढाणे गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००८) २२९

तक्ता क्र. ६.२९ बीड गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण २३०

तक्ता क्र. ६.३० बीड गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी २३१

तक्ता क्र. ६.३१ बीड गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण २३२

तक्ता क्र. ६.३२ बीड ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण २३३

तक्ता क्र. ६.३३ बीड गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००८) २३४

तक्ता क्र. ६.३४ बीड ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भूधारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००८) २३५

# नकाशा सूची


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४ | **रायगड जिल्ह्याचा संक्षिप्त परिचय** | १४५ |
| | नकाशाा क्र. ४.१ रायगड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान | १५० |
| | नकाशा क्र. ४.२ कोकण विभागात रायगड जिल्ह्याचे स्थान | १५१ |
| | नकाशाा क्र. ४.३ रायगड जिल्हा | १५२ |
| | नकाशा क्र. ४.४ रायगड जिल्हा प्रमुख रस्ते व लोहमार्ग | १५३ |
| | नकाशाा क्र. ४.५ रायगड जिल्हा उद्योगधंदे | १५८ |
| | नकाशाा क्र. ४.६ रायगड जिल्हा–प्रशासकीय विभाग | १६१ |
| ५ | **रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–१ (पनवेल तालुका)** | १६४ |
| | नकाशा पनवेल तालुका | १६८ |
| ६ | **रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–२ (कर्जत तालुका)** | १९९ |
| | नकाशा कर्जत तालुका | २०१ |

# १. विषयप्रवेश आणि संशोधनाचा आकृतिबंध

## १.१ प्रास्ताविक

राज्यघटनेच्या कलम एकमध्ये "India that is Bharat, shall be a Jnion of States", ''भारत राज्यांचा संघ आहे'', अशी स्पष्ट तरतूद करण्यात आली आहे. भारत राज्यांचा संघ असणे ही 'समग्र वस्तुस्थिती' (Macro Reality) आहे. भारत राज्यांचा संघ असला तरी त्याचे स्वरूप एकजिनसी (homogenous) नाही. राजकीयदृष्ट्या काही भाग पुढारलेले तर काही भाग मागास आहेत. आर्थिकदृष्ट्या काही भाग विकसित तर काही भाग अविकसित आहेत. पश्चिम बंगाल राज्यातील राजकीय प्रक्रिया त्याच्याच शेजारी असलेल्या बिहार आणि ओरिसा राज्यांपेक्षा भिन्न आहे. म्हणजेच संपूर्ण देशाचा राजकीय व्यवहाराचा एकच साचा (Pattern) नाही. खंडप्राय असलेल्या भारत देशात राजकीय प्रक्रियेचे स्वरूप राज्य–परत्वे भिन्न आहे. अशा परिस्थितीत जरी आपण केवळ भारतीय राजकीय प्रक्रियेचा अखिल भारतीय स्वरूपाचा अभ्यास केला, तर तो देशात अस्तित्वात असलेल्या राजकीय वस्तुस्थितीशी विसंगत ठरण्याची शक्यता आहे. काही बाबतीत सर्वसामान्य निष्कर्ष उपयुक्त ठरत असले तरी राजकीय प्रक्रियेचे वास्तव आकलन व्हावे याकरिता देशातील विविध राज्यात प्रचलित असलेल्या राजकीय प्रक्रियेचा (Regional Politics) अभ्यास करणे आवश्यक असते. तांत्रिक परिभाषेत भारतीय राजकीय व्यवस्था ही व्यापक संकल्पना (Macro Concept) किंवा समग्र व्यवस्था (System) आहे, तर राज्यपातळीवरचे राजकारण सूक्ष्म वास्तविकता (Micro Reality) 'किंवा उपव्यवस्था (Sub-system) आहे.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य ही समग्र व्यवस्था आहे, असे गृहीत धरल्यास, विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात घडणारी राजकीय प्रक्रिया, ही उपव्यवस्था समजली जाते. महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेचे वास्तववादी आकलन व्हावे यासाठी प्रादेशिक स्तरावरील आणि त्याच्या पलीकडे जाऊन स्थानिक स्तरावरील राजकारणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. सुक्ष्म स्तरीय राजकारण हे समग्र स्तरीय राजकारणाची प्रतिकृती असली तरी त्याची स्वत:ची काही वैशिष्ट्ये असतात. राज्य स्तरावरील आणि स्थानिक स्तरावरील राजकारणात साम्यस्थळे असली तरी स्थानिक परिस्थितीनिहाय भेदही असतात. या अर्थाने स्थानिक म्हणजेच सुक्ष्म स्तरावरील राजकीय प्रक्रियेचा

अभ्यास, राज्य स्तरावरील राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाला पूरक ठरतो आणि त्यातून राजकीय वास्तव्याचे समग्र दर्शन घडून येते. या मुळेच अलिकडच्या काळात महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रियेचे अभ्यासक स्थानिक स्तरावरील राजकीय प्रक्रियेचा अधिक गांभिर्याने अभ्यास करू लागले आहेत. सदर संशोधक या विचारप्रवाहाशी सहमत असल्याने, रायगड जिल्ह्यातील राजकीय प्रक्रियेचे सुक्ष्मस्तरीय विश्लेषण करण्याच्या उद्देशाने हा संशोधन उपक्रम हाती घेतला आहे.

स्थानिक पातळीवरील राजकीय प्रक्रिया नागरी आणि ग्रामीण अशा दोन भौगोलिक क्षेत्रात घडत असते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या प्रक्रियांना चालना मिळावी आणि ज्या भौगोलिक क्षेत्रात एकेकाळी ग्रामीण भाग म्हटले जायचे, त्या क्षेत्रात शहरीकरणाचा प्रसार झाला. सदर संशोधनात रायगड जिल्ह्याचा अभ्यास करण्यात आला आहे. मुंबई महानगराशी सानिध्य असलेल्या या जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील ४२ गावे नवी मुंबईमध्ये समाविष्ट करण्यात आली. याच जिल्ह्यातील उरण तालुक्यात जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टची स्थापना करण्यात आली. याच तालुक्यात नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ सथापन करन्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. म्हणजेच मूलत: ग्रामीण भाग असलेल्या पनवेल तालुक्याच्या राजकारणात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. याउलट जिलह्यातील कर्जत तालुक्यात कोणतीही महत्त्वपूर्ण स्थित्यंतरे घडून आली नाहीत. म्हणजेच त्या तालुक्यातील राजकीय प्रक्रिया ''जैसे थे'' या अवस्थेत आहे. स्थानिक स्तरावरील राजकीय प्रक्रियेत घडून येणाऱ्या स्थित्यंतराचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. याच उद्देशाने सदर संशोधन प्रबंधात रायगड जिल्ह्यातील सर्वांत प्रगत पनवेल तालुक्यातील आणि तौलनिकदृष्ट्या अविकसित असलेल्या कर्जत तालुक्यातील सुक्ष्मस्तरीय राजकीय प्रक्रियेचा अभ्यास करण्यात आला आहे.

सप्टेंबर २०१० मध्ये भारत सरकारने लोकसंख्येची जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे. १९३१ च्या जनगणनेनंतर सात दशके भारतीय राजकारणाच्या या सामाजिक वास्तव्याची राज्यकर्त्यांकडून दखल घेतली जात नव्हती. जनगणना जातीविषयक निकष समाविष्ट करण्यात न आल्यामुळे विविध जातीसमूहांनी आपल्या संख्याविषयी अतिशयोक्ती पूर्ण दावे केले आहेत. भारताचे राजकारण आणि विशेषत: स्थानिक स्तरावरील राजकारण जातीसंस्थांनी व्यापले आहे. सर्वच राजकीय पक्ष आणि संघटना जातीवर आधारित राजकारण करतात. या जातीनिष्ठ राजकारणात ज्या जाती गटांकडे जातियक बळ असते, त्या जाती स्थानिक राजकारणातील प्रभावी जातीसमूह समजले जातात. जाती आणि स्थानिक पातळीवरील राजकारणाच्या संबंधाचे विश्लेषण सदर संशोधकामध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात साधनसंपत्तीची उपलब्धता, म्हणजेच उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण राष्ट्रीय स्तरांपासून ते स्थानिक स्तरावरील राजकारणाचा निर्णायक घटक झाल्याचे दिसून येते. ग्रामीण राजकारणात १९७० च्या दशकात सहकारी चळवळ आणि हरित क्रांतीच्या प्रसारामुळे जन्मास आलेला बागायतदार–श्रीमंत शेतकरी वर्गाकडे ग्रामीण अर्थकारण आणि राजकारणाची सुत्रे केंद्रीत झाल्याचे दिसून येते. असा आर्थिकदृष्ट्या संपन्न वर्ग प्रभावी जाती समूहाचे घुटीणत्व करत असल्याचे दिसून येते. स्थानिक स्तरावरील राजकारणात त्यांच्या वर्चस्वाचे विश्लेषण सदर संशोधनाने समाविष्ट करण्यात आले आहे.

७३ व्या घटनादुरूस्तीने ग्रामीण राजकारणात प्रचलित असलेल्या सत्ता समीकरणांना मोठे आव्हान उभे केले आहे. १९९२ सालच्या या घटनादुरूस्ती द्वारा ग्रामीण भागातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांना, म्हणजेच महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि इतर मागास वर्गीयांसाठी जागा व अधिकारपदांच्या आरक्षणाची तरतूद करण्यात आली. ग्रामीण राजकारणावर या घटनात्मक तरतुदीच्या परिणामांचे विश्लेषण सदर संशोधनात समाविष्ठ करण्यात आले आहे.

अशा प्रकारे सुक्ष्मस्तरीय राजकारणाच्या विविध पैलूंचे विश्लेषण सदर संशोधनात करण्यात आले आहे.

ग्रामीण राजकारण भारतीय आणि महाराष्ट्रातील राजकारणाचा पाया आहे, कारण २००१ सालच्या जनगणनेनुसार भारतातील ७२.२२ टक्के आणि महाराष्ट्रातील ५८.४० टक्के लोकसंख्येचे वास्तव 'ग्रामीण' क्षेत्रात आहे.[१] भारताच्या आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे वास्तव स्वरूप समजण्याकरिता ग्रामस्तरीय राजकारणाचा, म्हणजेच सूक्ष्मस्तरीय राजकारणाचा (Micro level Ploitics) अभ्यास करणे अपरिहार्य ठरते, असे प्रतिपादन डॉ. अशोक जैन यांनी केले आहे.[२] महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून राज्यस्तरीय राजकारणावर ग्रामीण अभिजन वर्गाचे वर्चस्व राहिले आहे, म्हणजेच ग्रामीण राजकारण आणि ग्रामीण अभिजन वर्गाचे वर्चस्व आबाधित राहिल्याने ग्रामीण राजकीय प्रक्रियेचा अभ्यास महत्त्वपूर्ण ठरतो.

ग्रामीण राजकारण हे राजकीय अभ्यासकांच्या मते सूक्ष्मस्तरीय राजकारण (Micro level Ploitics) आहे. हे राजकारण देशातील ५.५० लाखाहून अधिक गावांमध्ये घडत असते. हे सूक्ष्मस्तरीय राजकारण समग्र राजकारणाचे (Micro level Ploitics) प्रतिबिंब असते. तरी त्याची स्वत:ची काही वैशिष्ट्ये आहेत. हे राजकारण स्थानिक स्तरावर म्हणजेच गाव, तालुका आणि जिल्हास्तरावर होणारे राजकारण असते. त्रिस्तरीय

पंचायतराज संस्था आणि विशिष्ट सहकारी संस्थाच्या माध्यमातून हे राजकारण घडून येत असते.

ग्रामीण अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने सर्वाधिक भू–धारणा असलेली व्यक्ती या राजकारणाचा केंद्रबिंदू बनते. प्रभावी व्यक्ती आणि प्रभावशून्य व्यक्ती यांच्यातील संबंध आश्रयदाता आणि आश्रित (Patron and client) या स्वरूपाचे असतात. कोणत्याही गावात संख्येने अधिक असलेले भूमिहीन शेतमजूर आणि अल्प भू–धारक आपल्या उपजीविकेसाठी अशा सधन शेतकऱ्यांवर अवलंबून असतात. त्यामुळे त्यांच्या निष्ठा त्या प्रभावी व्यक्ती किंवा कुटुंबाशी निगडीत असतात. असंख्य गावामध्ये वंशपरंपरेने विशिष्ट घराण्याची सत्ता आबाधित राहण्याचे कारण व्यक्तिगत संबंधावर आधारित असणारे व्यक्तिनिष्ठ राजकारण हे असते.

ग्रामीण राजकारण हे जातीनिष्ठ असते. पारंपारिक जातीव्यवस्थेचा पगडा ग्रामीण समुदायावर आजही कायम आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मध्यस्तरावरील शेतकरी जातीसमुदायातील नेतृत्वाचा उदय झाला. मात्र असे असतानाही गावापरत्वे भू–धारणेचा आकृतिबंध भिन्न असल्याने, ज्या जातीसमूहाकडे जमिनीची सर्वाधिक मालकी असते, त्या शेतीव्यवसाय करणाऱ्या जातीसमूहाचे ग्रामस्तरीय राजकारणावर वर्चस्व असते. ग्रामस्तरावरील राजकारणात जातीपेक्षाही त्या जातीतील प्रभावी घराणे कुल (Clan) महत्वपूर्ण ठरत असल्याचे आढळून येत आहे. त्या प्रभावी घराण्याचे नेतृत्व त्याचे जातीबांधव आणि त्यावर आर्थिकदृष्ट्या संपन्न घराणी असतात, त्यांच्यात सत्तास्पर्धा उद्‌भवते. अशी दोन किंवा अधिक घराणी ग्रामस्तरीय राजकारणाचा केंद्रबिंदू बनतात आणि त्यांच्या भोवताली त्यांच्या समर्थकांचा गट तयार होत असतो. या व्यतिरिक्त गावात जर तुल्यबळ असलेल्या दोन जातींची आर्थिकदृष्ट्या प्रभावी घराणी असली तर त्या गटबाजीस जातीय स्वरूप प्राप्त होत असते. अशा प्रकारे सत्ता संपादनाच्या स्पर्धेत दोन किंवा अधिक गटांचा सहभाग असल्यास ग्रामस्तरीय राजकारणात व्यक्ती जाती–गटबाजीचे स्वरूप प्राप्त होत असते.

**१.२ संशोधन विषयाचे स्पष्टीकरण :**

रायगड जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात जमीन, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास हा सदर संशोधनाचा विषय आहे. त्या अंतर्गत जमीन म्हणजे

उत्पादनाच्या साधनाची मालकी व नियंत्रण, तर जात म्हणजे सामाजिक उतरंडीत विशिष्ट व्यक्तिसमूहाचा दर्जा आणि लोकशाहीकरणाच्या प्रक्रिये अंतर्गत ज्या जातीसमूहाची संख्या सर्वाधिक असते त्याचे स्थानिक–ग्रामीण राजकारणावर वर्चस्व असतो. अशा प्रकारे ग्रामीण राजकारणाचे निर्धारक असलेल्या आर्थिक आणि सामाजिक घटकांपैकी कोणता घटक अधिक प्रभावी आहे, त्याचे विश्लेषण सदर संशोधनाचा विषय आहे.

**२.१ जात आणि राजकारण यांचे आंतरसंबंध :**

सामाजिक स्तरीकरणाची (Social Stratification) प्रक्रिया समाजाच्या विशिष्ट गरजानुसार होत असते. भारतीय सामाजिक स्तरीकरण जातीनिष्ट स्वरूपाचे आहे. वैदिक काळात समाजाची ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा कार्यात्मक स्वरूपाच्या चार वर्गात विभागणी करण्यात आली होती. काळाच्या ओघात चार वर्णाची असंख्य जाती आणि उपजातीत विभागणी झाली. त्यामुळे जाती समूहाचे अस्तित्व भारतीय राजकारणाची सामाजिक वस्तुस्थिती आहे. पारंपारिक वर्णव्यवस्थेच्या परिभाषेत महाराष्ट्रातील उच्च जाती ब्राम्हण वर्णाच्या आहेत. मराठा जाती स्वत:ला क्षत्रिय समजते. कनिष्ठ जातीसमूह वैश्य आणि शूद्र या वर्गात समाविष्ठ केल्या जातात. तर अनुसूचित जाती–जमाती महाशुद्र वर्णातल्या आहेत. चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या अस्तित्वात आलेल्या विकृत स्वरूपात जातीची सवर्ण आणि अस्पृश्य अशीही विभागणी करण्यात येते.[३]

वर्ण–जातीच्या उतरंडीत विविध जातींचे स्थान, प्रतिष्ठा व महत्त्व उतरत्या क्रमाने निर्धारित केले जात असे. पारंपारिक समाज व्यवस्थेत उच्चवर्णीय जाती सर्वात श्रेष्ठ तर अस्पृश्य सर्वात कनिष्ठ जाती समुदाय समजला जातो. १९ व्या आणि २० व्या शतकात मध्य, कनिष्ठ आणि दलित जातीतील समाजधुरीणांची या अन्यायकारक समाजव्यवस्थेविरूद्ध संघर्ष केल्याने जातीय राजकारण विकसित होत गेले असे असले तरीही विविध जातीसमूहात तात्पुरते किंवा कायम स्वरूपाचे समझोते होतात. ''महाराष्ट्र धर्म''च्या संकल्पनेत ब्राम्हण आणि मराठा (क्षत्रिय) जातीचे धुरीणत्व आणि इतर जातींचे गौणत्व प्रतिपादिले जाते. छत्रपती शिवाजी महाराज यांना ''गोब्राम्हण प्रतिपालक'' म्हणून त्यांचे उद्दात्तीकरण उच्चवर्णीयांकडून केले जाते. महाराष्ट्र धर्माचे आधुनिक समर्पक महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राम्हण आणि मराठ्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही जातीचे योगदान नाही, असे मत व्यक्त करतात. औपचारिक अर्थाने उच्चवर्णीय नेतृत्वाची जागा मराठा नेतृत्वाने घेतली असली तरीही प्रशासन, उद्योगव्यवसाय आणि शिक्षण क्षेत्रावर उच्चवणियांचे वर्चस्व आहे, सत्तेच्या या भागीदारीस महाराष्ट्राच्या राजकारणाचे अभ्यासक ब्राम्हण मराठा युती (Brahmin-Maratha Alliance) असे म्हणतात.[४]

लोकशाही व्यवस्थेत संख्यासामर्थ्य राजकीय प्रभावीपणाचा निकष आहे. महाराष्ट्रात

एकूण लोकसंख्येच्या २२.०५ टक्के असलेल्या अनुसूचित जाती व जमाती आणि जवळपास तेवढीच लोकसंख्या असलेल्या कनिष्ठ जातींना सत्ता वाटपात आपण दुर्लक्षित राहिलो असे वाटते. त्यांच्या न्याय्य हक्काकरिता या जाती जमातींना एकसंघ करण्याचे प्रयत्न १९८९च्या दशकांपासून करण्यात आले आहेत. कनिष्ठ जाती, दलित व अल्पसंख्य यांची युती निर्माण झाली तर त्यांचे संख्याबल मराठ्यांपेक्षाही अधिक असेल. म्हणजेच १९६० साली पहिले सत्ता संक्रमण होऊन ''मराठेशाही'' प्रस्थापित झाली आणि दुसरे संक्रमण झाले तर मध्यस्तरातील जातीचे प्रभुत्व संपुष्टात येऊन, कनिष्ठ दलित जातीच्या युतीचे प्रभुत्व प्रस्थापित होण्याची सैद्धांतिक शक्यता आहे. अशाप्रकारे विविध जातीसमूहातील सत्तास्पर्धेची परिणती जातीय राजकारणात होत असते. असे राजकारण इष्ट किंवा अनिष्ट हा प्रश्न आपल्या अभ्यासाच्या संदर्भात गैरलागू ठरतो. जातीय राजकारण महाराष्ट्राच्या राजकारणाची वास्तविकता आहे.[५]

१९ व्या शतकातील मॅक्स वेबर या समाजशास्त्रज्ञाच्या मते भारतासारख्या परंपरानिष्ठ समाजात जातीव्यवस्थेची उतरंड आहे. जाती व्यवस्थेचा प्रभाव असलेल्या भारतीय समाजव्यवस्थेत व्यक्तिचे सामाजिक स्थान व प्रभाव त्याच्या जातीच्या आधारे निर्धारित होते. म्हणजेच वरिष्ठ जाती अधिक प्रभावी आणि कनिष्ठ जाती कमी प्रभावी किंवा प्रभावहीन असतात. वेबरचे हे विचार १९ व्या शतकात भारत आणि महाराष्ट्राबाबत संयुक्तिक आहेत. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रातिनिधिक लोकशाही आणि निवडणुकांच्या राजकारणात ज्या जातीसमुदायाकडे संख्याबळ असेल तोच जातीसमुदाय प्रभावी ठरतो, ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रात उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राम्हण जातीसमुदायाचे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या ३ टक्क्याहून कमी आहे आणि त्याचे वास्तव्य बहुतांशी शहरी भागात असल्याने ग्रामीण राजकारणात धार्मिक स्थान (Ritual statys) हा घटक नगण्य ठरतो. मात्र राजकारणावर जातीव्यवस्थेचा पगडा असल्याने, संख्याबळ अधिक असलेल्या मध्यस्तरावरील जाती महाराष्ट्रात प्रभावी असल्याचे दिसून येते.

मराठा जातीचे प्रभुत्व किंवा धुरीणत्व हे राज्यस्तरावरील राजकारणाची वस्तुस्थिती असली तरी महाराष्ट्रातील सर्व ३०,००० ग्रामपंचायती या जातीसमूहाच्या नियंत्रणाखाली आहेत, असा समज चुकीचा ठरेल. कारण प्रत्येक गावात ज्या विशिष्ट जातीसमुदायाकडे संख्याबळ असेल तोच गावस्तरावरील सत्ताधारी वर्ग म्हणजेच अभिजन असतो.

**२.२ भू–धारणा आणि राजकारण यांचे आंतरसंबंध :**

१९ व्या शतकातील कार्ल मार्क्स हा राजकीय विचारवंत मॅक्स वेबरचा समकालीन

होता. त्यांच्या मते सत्ता आणि प्रभाव निर्धारित करणारा निर्णायक घटक सामाजिक प्रतिष्ठा नसून उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण हा आहे. याचा अर्थ ग्रामीण अर्थव्यवस्थेत जमिनीची मालकी हा निर्णायक घटक असल्याने ज्या व्यक्ती समुदायाकडे सर्वाधिक भू–धारणा असेल तो व्यक्ती समुदाय किंवा व्यक्ती गावस्तरावरील सत्ताधारी वर्ग अभिजन असेल. मार्क्सचे विचार ग्रामीण राजकीय वस्तुस्थितीशी सुसंगत असले तरीही अधिक खोलात जाऊन त्याचे विश्लेषण केल्यास असे आढळून येते की, ज्या गावात ज्या जातीचा लोकसमुदाय बहुसंख्य असताना, त्या गावातील बहुतांशी जमीन त्या जातीच्या लोकांची असते.

विशिष्ट जातीकडे बहुतांशी जमीन असणे याचा अर्थ त्या जातीतील सर्व व्यक्तिकडे समप्रमाणात भू–धारणा असते असे नाही. त्यांच्यापैकी बहुतांश लोकांशी भू–धारणा अल्प असते. तर विशिष्ट कुल किंवा घराणे यांच्याकडे सर्वाधिक भू–धारणा असते. त्या विशिष्ट कुटुंबाकडे त्या गावाच्या नेतृत्वाची सूत्रे जातात. कारण बहुतांशी लोक त्यांचे नेतृत्व स्वीकारतात. गांवापरत्वे प्रभावी जाती भिन्न असतात. आज संपूर्ण भारतभर जातीचे राजकारण होऊ लागले आहे. भारतीय लोकशाही राजकारणात जातींना आधुनिक स्वरूपाच्या दबावगटाचे स्वरूप येऊ लागले आहे, असे रूडाल्फ यांनी सूचित केले आहे. ते असे म्हणतात की, ''जात आणि राजकारण यांचे परस्परसंबंध हे परंपरा आणि आधुनिकता यातील संबंध आहेत.''

श्री. एम्. एन्. श्रीनिवास यांच्या मते स्थानिक पातळीवर बहुसंख्य आणि वरचा दर्जा असलेली जात शिक्षण, आधुनिक व्यवसाय यात प्रगती साधून स्थानिक राजकारणात वर्चस्वशाली बनते. श्री. श्रीनिवास यांनी ''वर्चस्वशाली व प्रभावी'' जातीची संकल्पना मांडून सांख्यिक सामर्थ्य, उद्दिष्टावरील निष्ठेची तीव्रता, संगठनात्मक बांधणी, प्रचार कौशल्य, दबाव तंत्र, लोकमत अनुकूल करून घेण्याची क्षमता आणि नेतृत्वाची कुवत ही वैशिष्ट्ये विशद केली आहेत. त्यावरून जात आणि राजकारणाचे गहन संबंध प्रस्थापित होतात हे स्पष्ट होते.

रजनी कोठारी यांनी मात्र ''प्रस्थापित जात'' असा शब्द प्रयोग करून त्या जातीच्या राजकीय वर्चस्वाचे मूळ तिचा वरिष्ठ दर्जा आणि त्यातून येणाऱ्या आर्थिक बळात आहे, असे म्हटले आहे. प्रस्थापित जात संख्येने मोठी असण्याची गरज नसते असे ही रजनी कोठारी सूचित करतात. थोडक्यात श्रीनिवास, रूडाल्फ आणि रजनी कोठारी यांच्या विश्लेषणातून 'जात' ही भारताच्या राजकीय वास्तवाचे अविभाज्य अंग असल्याचे स्पष्ट होते.

**स्थानिक राजकीय प्रक्रिया**

ग्रामस्तरीय, तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय राजकारण हे स्थानिक राजकारणाचे प्रमुख स्तर आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय घडामोडीविषयी जे लेखन झाले आहे ते बहुतेक सर्व प्रामुख्याने राज्यपातळीवरच्या राजकारणाचे स्थानिक संदर्भ क्वचितच उलघडले जातात. याचे एक कारण म्हणजे महाराष्ट्राचे राजकारण समजण्या–सांगण्यासाठी यशवंत चव्हाणांचे नेतृत्व, काँग्रेसची, कार्यकर्त्यांची यंत्रणा, मराठा वर्चस्व यांचा आधार घेऊन बहुतेक अभ्यास मांडले जातात. चव्हाण यांचे नेतृत्व आणि बहुजन समाजाचे वर्चस्व (वास्तव अर्थाने मराठ्यांचे वर्चस्व) या प्रतिमानाच्या आधारे महाराष्ट्रातील राजकीय, प्रक्रियेचे विश्लेषण अभ्यासक करत आले. १९७७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर महाराष्ट्रातील काँग्रेसच्या वर्चस्वाला तडे जाऊ लागले. १९९४ साली काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी संपुष्टात आली आणि शिवसेना–भाजपा युतीने सत्ता संपादन केली. १९९९ साली काँग्रेसने सत्ता फेर संपादित केली. त्यातून महाराष्ट्रात काँग्रेस का टिकून राहिली या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केला. त्यातून राज्यस्तरावरील राजकारणाचे धागेदोरे स्थानिक राजकारणात असतात, असे प्रतिपादन डॉ. सुहास पळशीकरांनी केले.[६]

वास्तविक पाहता, चव्हाणप्रणीत राजकारणाचे प्रारूप आणि त्यातून साकारलेले महाराष्ट्रातील काँग्रेस वर्चस्व यांच्या आकलनासाठी राज्य–विभाग–जिल्हा या तीन पातळ्यांवर राजकीय आधारांची बांधणी तपासणे अत्यंत उपयुक्त ठरू शकते. स्थानिक पातळीवर उभा राहणारा पाठिंबा व त्यातून आकाराला येणाऱ्या संधी यांच्यामुळेच जिल्हा व प्रादेशिक पातळीवरील नेतृत्वाची साखळी विस्कळीत होऊ लागली. तरीही स्थानिक पातळीवरील राजकारणाचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. उलटपक्षी, काँग्रेसच्या पडझडीमागेही स्थानिक संदर्भ आहेतच. महाराष्ट्रात काँग्रेसची जी पीछेहाट झाली ती केवळ राष्ट्रीय पातळीवरच्या ऱ्हासामुळे झालेली नाही. जिल्हा पातळीवर व विभागीय पातळीवर काँग्रेसच्या राजकीय ताकदीची जी 'शक्तिस्थाने' होती त्यांच्यामध्ये आलेल्या विस्कळीतपणातून महाराष्ट्राच्या राजकीय स्थित्यंतराला दिशा मिळाली.[७]

**१.४ जमीन, जात आणि सत्ता यांचा आंतरसंबंध :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आपल्या देशात सरंजामी व्यवस्था होती. ही व्यवस्था जात आणि उत्पादन साधन यावर आधारलेली होती. गावातील शेती प्रधान अर्थव्यवस्थेवर जातीचा प्रभाव होता. व गावातील समाजावर नियंत्रण असणारा वर्ग हाच शोषणकर्ता

वर्ग होता. वतनदार गावातील अर्थव्यवस्थेचे व राजकीय सत्तेचे नियंत्रण करत असे. या काळात उत्पादन व्यवस्थेतील शेतकरी, कारागीर व मजूर यांचे जमीनमालकीचे हक्क वेगवेगळ्या स्वरूपात होते. गावातील वतनदाराकडील जमिनीवर शेतकरी व कारागीर जातीचे लोक कुळे म्हणून काम करीत असत. गावातील सरंजामी वर्गाचे स्वरूप हे ज्या उत्पादन संबंधावर आधारित होते. त्यावर जातीचा प्रभाव होता.

समाजातील दलित व भूमिहीन वर्गाचे जमीनदारांकडून मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक शोषण होत आले आहे. समाजातील कित्येकांना भूदास म्हणून जगावे लागते आहे. त्यातून भारतीय समाजात 'आश्रयदाता' व 'आश्रित' हे दोन वर्ग पडल्याचे दिसते. गावात जमीन मालकीवर नियंत्रण असणारे 'आश्रयदाता' एका बाजूस, तर त्यांच्या जमिनीवर कष्ट करून उत्पादन काढणाऱ्या कुणबी जाती व बारा बलुतेदार आणि अलुतेदार हे 'आश्रित' म्हणून दुसऱ्या बाजूस जगत आहेत. म्हणजेच कष्ट करून शेतीवर राबणाऱ्या शेतकरी जाती किंवा कुळांनी कष्ट करून उत्पादन उत्पादित करावयाचे परंतु त्या उत्पादनावर मात्र त्यांची मालकी नाही.

थोडक्यात समाज नियंत्रणाचे प्रमुख साधन 'जमीन' ही होती, आणि ही जमीन मोठ्या प्रमाणात उच्च जातीकडे होती. त्यामुळे शोषण करणाऱ्या जाती ह्या उच्च जाती होत्या व जे शोषित होते त्या कनिष्ठ जाती होत्या. यावरून हे स्पष्ट होते की, भू–धारणा, जात आणि सत्ता हे तीनही घटक भारतीय समाजव्यवस्थेमध्ये मुख्यत्वे ग्रामीण विकास प्रक्रियेच्या आणि ग्रामीण राजकारणाच्या अभ्यासाच्या दृष्टिने महत्त्वाचे आहेत. या तीनही मुद्द्यांचा अभ्यास गाव, तालुका व जिल्हा पातळीवर आजही महत्त्वाचा आहे. किंबहुना विकासाच्या प्रक्रियेत या तीनही घटकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

संशोधक 'ग्रामीण विकास' या विषयाचे अध्यापन करत असल्याने, ग्रामीण राजकारणाचा आणि नेतृत्वाचा अभ्यास करत असताना ग्रामीण विकास प्रक्रियेतील त्याचा प्रभाव अभ्यासण्याचा संशोधकाचा मानस आहे. आपण लोकशाही पद्धतीचा स्वीकार केल्यानंतर विकास प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. ग्रामीण राजकारण जर विधायक स्वरूपाचे असेल तर विकासाला मोठ्या प्रमाणात चालना मिळते. मात्र केवळ सत्तेसाठी राजकारणाची चढाओढ सुरू झाल्यास बऱ्याच वेळा विकास घडविण्याऐवजी राजकारण करणाऱ्यावर व विरोधाला विरोध करणाऱ्यावर सर्व ताकद संपून जाते व ग्रामीण विकासाला खीळ बसते. या सकारात्मक व नकारात्मक बाबींची प्रचिती महाराष्ट्रात आली आहे.

इ.स. १९७२ पर्यंत पंचायतराज संस्था आणि ग्रामीण राजकारण विकासाचे एक प्रभावी माध्यम होते. इ.स. १९७८ नंतर सत्तेसाठी राजकारण या विचाराचा प्रभाव वाढत गेल्याने ग्रामीण राजकारण दूषित होत गेले. ग्रामीण राजकारणामध्ये पंचायतीराज संस्था व विविध कार्यकारी सह. सोसायट्या ही आज खऱ्या अर्थाने विकासाची केंद्रे बनणे आवश्यक होते. परंतु ही सत्ता केंद्रे आज राजकारणाचे अड्डे म्हणून ओळखले जाऊ लागले आहेत. त्यामुळे या सत्ता प्राप्त करण्यासाठी गटबाजीचे राजकारण करणाऱ्या ग्रामीण नेतृत्वाचे ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष झाले. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना बसला आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीद्वारे या दुर्बल घटकांना अधिक प्रतिनिधित्व आणि अधिकारस्थाने प्राप्त झाली असल्याने ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेला नव्याने चालना मिळेल असा आशावाद व्यक्त केला जातो. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याचा अभ्यास या शोधप्रबंधात करण्यात आला आहे. त्यासाठी अध्ययनाची पुढील उद्दिष्ट्ये समोर ठेवली आहेत.

**१.५ अध्ययनाची उद्दिष्ट्ये : सदर अध्ययाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :**

(१) गांव स्तरावर भू–धारणा व जात याचा परस्पर संबंध अभ्यासणे.

(२) गांव स्तरावर भू–धारणा व राजकारण यांचे परस्पर संबंध तपासणे.

(३) सत्ता आणि राजकारण यात जात व भू–धारणा यांच्या सहसंबंधाचे विश्लेषण करणे.

(४) ग्रामीण राजकारणात विशिष्ट जातींचे वर्चस्व प्रस्थापित होण्यात भू–धारणा व जात यांच्या कार्यभागाचा अभ्यास करणे.

(५) ७३ व्या घटना दुरूस्तीतील अधिकारपद आरक्षण विषयक तरतुदी आणि त्यांच्या ग्रामीण राजकारणावरील परिणाम अभ्यासणे.

(६) ग्रामीण नेतृत्व आकृतिबंधामधील बदलांचा अभ्यास करणे.

**१.६ अध्ययनाची गृहीतत्वे : सदर अध्ययन खालील गृहीतत्वांवर आधारित आहे :**

(१) समग्र वस्तुस्थिती आणि गावपातळीवरील सुक्ष्म वस्तुस्थिती यात साम्य आणि भेद असतात.

(२) स्वातंत्र्योत्तर ग्रामीण राजकारणावर मध्यस्तरावरील शेतकरी जातीचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते.

(३) ग्रामीण राजकारणात कुल घराणे, भावकी ही जातीपेक्षा अधिक महत्वपूर्ण असते.

(४) गावपातळीवरील गटबाजीचे राजकारण भाऊबंदकीचे आणि जात आकृतिबंधाचे प्रतिबिंब असते.

(५) भू–धारणा म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील नियंत्रण हा सत्तेचा पाया आहे.

(६) 'आर्थिक दर्जा' हा प्राथमिक घटक असून सामाजिक दर्जा आणि राजकीय सत्ता हे घटक यावर अवलंबून आहेत.

(७) आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सत्ता हे तीनही घटक परस्परांना पूरक आहेत.

(८) ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर महिला, अनुसूचित जाती–जमाती, इतर मागास जाती या दुर्बल घटकांचे सक्षमीकरण घडून आले आहे.

**१.७ संशोधन पद्धती :**

सूक्ष्मस्तरीय राजकारणात भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे संशोधन करण्याकरिता कोकण विभागातील रायगड जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. या जिल्ह्यातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या व सर्वात पुढारलेल्या पनवेल तालुक्याची आणि तौलनात्मक दृष्ट्या कमी विकसित असणाऱ्या, म्हणजेच मागास कर्जत तालुक्याची निवड करण्यात आली. या दोन तालुक्यातील प्रत्येकी पाच आणि सहा गावांचा अभ्यास करण्यात आला आहे. भू–धारणा, जात आणि सत्ता या तीन मध्यवर्ती घटकांबाबतची सर्वांगिण पाहणी करण्यात आली आहे.

**७.२ माहिती संकलन :**

भू–धारणा, जात आणि सत्ता या विषयाला अनुसरून प्राथमिक व दुय्यम माहिती मिळविणे आवश्यक होते. ही सर्व माहिती गावातील बुजूर्ग मंडळी, सरकारी कार्यालये, पेपर कटींग व आवश्यक तेथे मुलाखती घेऊन अधिकृतरीत्या मिळविली आहे.

**(अ) प्राथमिक साधने**

(१) या गावातील सर्व भू–धारकांची भू–धारणे संबंधित माहिती ही त्या त्या गावातील तलाठी कार्यालयातील '८ अ' या उताऱ्यावरून मिळविली आहे.

(२) या गावातील ग्रामपंचायत सदस्यांची माहिती ही ग्रामपंचायतीच्या ग्रामसचिवांकडून मिळविली आहे.

(३) या गावातील भू–धारकांच्या जातीविषयाची माहिती बुजुर्ग मंडळी व गटांशी चर्चा करून मिळविली आहे.

**(ब) दुय्यम साधने**

महाराष्ट्रातील ग्रामीण राजकारण, जातीव्यवस्था, भू–धारणा विषयक कायदे, पंचायती राज व्यवस्था संबंधाच्या वैधानिक तरतुदी दुर्बल घटकांचे सक्षमीकरण इत्यादी संशोधनाच्या विषयाशी निगडित बाबीसंबंधी उपलब्ध असलेल्या प्रकाशीत व अप्रकाशित संशोधन साहित्याचा अभ्यास करून माहिती संकलित केली आहे. त्यातिल राजकारणासंबंधीचे वृत्तपत्रीय लिखाण आणि अन्य उपलब्ध साहित्याचा वापर केला आहे. रायगड जिल्ह्याच्या समाजव्यवस्था, अर्थकारण, भौगोलिक स्थान व वैशिष्ट्ये या संबंधीच्या माहितीचे संकलन शासकीय अहवाल व कागदपत्रांतून करण्यात आले आहे. जिल्ह्याच्या राजकारणात सक्रियरीत्या सहभागी असणाऱ्या आणि त्यातून निवृत्त झालेल्या कार्यकर्त्यांच्या बरोबर केलेल्या अनौपचारिक चर्चेतून स्थानिक राजकारणासंबंधीच्या माहितीचे पडताळणी करण्यात आली आहे.

**७.३ माहितीचे विश्लेषण :**

प्रत्येक गावातील भू–धारक, त्यांच्या जाती, भू–धारणा आणि ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी यांच्या जाती व भू–धारणा ह्या सर्व माहितीचे विश्लेषण केले आहे. प्रत्येक गावातील भू–धारकांचे जाती गटानुसार वर्गीकरण केले आहे. या जातीगटात वरिष्ठ जाती, मध्यस्तर जाती, कनिष्ठ जाती व इतर मागास व विशेष मागास जाती, अनुसूचित जाती जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, अत्यल्प व इतर असे गट पाडण्यात आले आहेत. या जातीगटानुसार त्या त्या जातींचे व त्यांच्या भू–धारणेचे वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. भू–धारकांचे कृषी गणनेनुसार अत्यल्प भू–धारक, अल्प भू–धारक, मध्यम भू–धारक या नुसार जातवार वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. ग्रामपंचायतीवर निवडून आलेले सदस्य व पदाधिकारी यांची भू–धारणा, जात यांचे वर्गीकरण करून विश्लेषण केले आहे. वरील सर्व वर्गीकरण कोष्टके तयार करून त्यांचे विश्लेषण करून त्यांच्या आधारे अभ्यासाच्या गृहीतत्वांची चिकित्सा करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**१.८ प्रकाशित व अप्रकाशित ग्रथांचा संशोधनाचा आढावा :**

महाराष्ट्राचे राजकारण, स्थानिक पातळीवरील राजकारण, पंचायती राज व्यवस्था,

राजकारणातील जाती संस्थेचा कार्यभाग, दुर्बल घटकांचे सक्षमीकरण इत्यादी सदर संशोधनाशी निगडित विषयांवर १९८० च्या दशकापासून मोठ्या प्रमाणात संशोधन व त्यावर आधारित लेखन अभ्यासकांना उपलब्ध झाले आहे. पुणे विद्यापिठातील कै. प्रा. प. मं. सिरसीकर, कै. डॉ. राजेंद्र व्होरा, प्रा. सुहास पळशीकर, प्रा. नितीन बिरमल यांनी या क्षेत्रात पायाभूत स्वरूपाचे काम केले आहे. किंबहुना डॉ. राजेंद्र व्होरा यांच्या पुढाकाराने भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे सूक्ष्मस्तरीय संशोधन करण्याची प्रेरणा अनेक संशोधकांना मिळाली आहे. डॉ. व्होरांच्या प्रेरणेनेच प्रा. विजय कालजे आणि प्रा. सुभाष सावंत यांनी दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील राजकीय प्रक्रियेचा अभ्यास केला. उत्तर कोकण विभागात कार्यरत असणाऱ्या प्रक्रियेचा अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा डॉ. व्होरा यांनी २००५ साली मणीभवन येथे पंचायती राजविषयक परिसंवादात व्यक्त केली होती. म्हणजेच सदर संशोधन कार्यास संशोधकांचा समृद्ध संशोधन कार्याची समृद्ध पार्श्वभूमी लागली आहे. त्यांचा आढावा या भागात घेण्यात आला आहे :

**८.१ प्रकाशित ग्रंथ संपदा :**

**(१)** एलिट पॉलिटिक्स इन रूरल इंडिया–पॉलिटिकल स्ट्रेटिफिकेशन ॲण्ड पॉलिटिकल अलायन्सेस इन वेस्टर्न महाराष्ट्र–कार्टर ॲथोनी–१९७५[८]

ॲथोनी कार्टर यांनी महाराष्ट्रातील राजकीय सत्ता व जात यांचा अभ्यास सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील गिरवी गावात केला. हाच संशोधन प्रबंध त्यांनी पुस्तक रूपाने १९७५ मध्ये प्रकाशित केला गेला.

पश्चिम महाराष्ट्रात मिरासदार यांना वंशपरंपरेने जमिनीवर हक्क होते. या मि रासदारांमधून आलेल्या वतनदारांना गावात वतने होती. या वतन जमिनीवरील मालकी त्यांच्याकडे वंशपरंपरेने होती. मिरासदारांना त्याच्या जमिनीवरील सर्व कर भरावा लागत होता, मात्र वतनदारांना कर माफ होता, त्या जमिनीवरील उत्पादनही करमुक्त असते. त्या बदल्यात त्यांना गावात महसूल गोळा करणे व कायदा सुव्यवस्था राखणे ही कामे करावी लागत.

पश्चिम महाराष्ट्रातील या वतनदारांचा दुसरा वर्ग म्हणजे वतनदार नसणारा शेतकरी होय. त्याला जमिनीवरील कर भरावा लागत असे. वतनदारांना गावात पाटील या नावाने ओळखले जात असे. पाटील आपल्याकडील जमीन शेतकऱ्यांना कसायला देत असत.

या शेतकऱ्यांना 'उपरे' असे म्हणत. पश्चिम महाराष्ट्रात वतनदार, प्रामुख्याने मराठा जातीमधील असत. वतनदार नसलेले जमीनमालक प्रामुख्याने कमी दर्जाचे मराठा, माळी व धनगर जातीमधील असत. वतनदार नसलेल्या या जातींना विशेषत: 'कुणबी' असे म्हणत.

ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर गावातील पाटलांचे महसूल अधिकार संपले. रयतवारी पद्धती ब्रिटिशांनी सुरू केल्यानंतर जमिनीवर कायदेशीर हक्क प्रस्थापित झाले. वतनदारांना देखील जमिनीवर कर लागू करण्यात आला या बदलामुळे वतनदार मराठ्यांचे काही अधिकार कमी केले असले तरी तो गावातील श्रीमंत राजकीय वर्ग म्हणून तसाच राहिला. गावातील त्यांचा प्रभाव कायम राहिला, कारण त्यांचे जमिनीवर नियंत्रण असल्याने त्यांचा गावातील सामाजिक दर्जा कायम राहिला.

गिरवी गावातील लोकसंख्येपैकी सन १९६६ नुसार मराठा जातीची लोकसंख्या ५७ टक्के होती. त्यामध्ये वतनदार मराठे ४४ टक्के तर इतर मराठा ५६ टक्के होते. मराठा जातीमध्ये कदम भावकी ही गावातील वतनदार होती. या कदम भावकीमध्ये दोन पाटील होते. महसूल गोळा करणारे पाटील, कायदा व सुव्यवस्था पाहणारे पोलीस पाटील. गावातील एकूण बागायती क्षेत्रापैकी ५७.४ टक्के क्षेत्र कदम भावकीकडे होते. वतनदार नसलेल्या मराठ्यांकडे १७.०१ टक्के बागायत क्षेत्र होते. गावातील एकूण जमिनीपैकी मराठा जातीकडे ७२.७२ टक्के जमिनीची मालकी होती, तर मराठा जातीमधील एकूण जमिनीपैकी ४६.३१ टक्के जमिनीची मालकी कदम भावकीकडे होती. १९६६ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत तेरा सभासदांपैकी सहा कदम भावकीमधील होते. म्हणजेच गिरवी गावातील लोकसंख्येने जास्त असलेल्या मराठा जातीचा प्रभाव जमीन मालकी व ग्रामपंचायतीवर होता. मराठा जातीअंतर्गत वतनदार मराठा हा श्रीमंत गट होता. वतनदार असलेल्या कदम भावकीकडे जमीनमालकी अधिक होती. त्यामुळे त्यांचा ग्रामपंचायतीवर प्रभाव होता.

वतनदार मराठे प्रभावाची कारणे कार्टर हे पुढील प्रमाणे सांगतात, वतनदार मराठ्यांकडे सर्वाधिक जमीन होती. त्यामुळे गावातील मराठा नसलेल्या जाती कदम भावकीवर रोजगारासाठी अवलंबून असत, कदम भावकीचा प्रभाव सहकारी पतसंस्थेवर असल्याने कर्ज पुरवठा करण्याच्या अधिकारातून ते इतर शेतकरी जाती व लहान मराठा

शेतकरी यांच्यावर प्रभाव टाकतात. यातून गावातील अभिजन व सामान्य जनता यांच्यात राजकीय संबंध निर्माण होतात. राजकीय श्रेष्ठजनांचे नियंत्रण उत्पादन साधनांवर असते. राजकीय पदाचा वापर करून त्यांना पाठींबा देणाऱ्या घटकांमध्ये साधनांचे थोडेफार वाटप केले जात असे. थोडक्यात राजकीय संबंध हे आर्थिक संबंधावर अवलंबून असत.

वतनदार मराठे व इतर मराठे यांच्यातील संबंध हे सामाजिक असत. त्यांना जोडणारा दुवा म्हणजे मराठा ही जात असे. लग्नसंबंधातून या दर्जाचे वेगळेपण ते ठेवीत. राजकीय पाठिब्यांच्या बदल्यात त्यांना उच्च जातीचा दर्जा दिला जात असे. त्यांच्याशी भाऊबंदकीचे संबंध असत. थोडक्यात राजकीय संबंधाचा पाया 'जात' असे. राजकीय श्रेष्ठजन आपली अविभाज्यता गावाच्या राजकीय संबंधातून मिळवतो व वरच्या पातळीवर राजकीय सत्तेचा लाभ घेतो.

**(२)** महाराष्ट्रातील राजकीय सत्ता व जातीचा प्रभाव यांचा एक पथदर्शक अभ्यास – डॉ. जयंत लेले १९८२[९]

या प्रकाशित प्रबंधासाठी महाराष्ट्रातील अकोला, औरंगाबाद, नाशिक, सातारा आणि रायगड या पाच जिल्ह्यांतील जिल्हास्तर, तालुकास्तर व या जिल्ह्यांतील ५० गावांतील मतदार नमूना पद्धतीने निवडून राजकीय, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रातील सर्व पदधिकाऱ्यांचा अभ्यास डॉ. जयंत लेले यांनी केला. या अभ्यासातून असे दिसून येते की, मराठा जातीकडे जमीनमालकी आहे म्हणून सत्ता आहे. अभिजन मराठे व गरीब मराठे असा भेद आहे. इतर जातींना मराठ्यांबरोबर युती करावी लागते. उच्च जाती राजकारणात तटस्थ असतात किंवा मराठ्यांबरोबर असतात. अस्पृश्य जाती आणि अनुसूचित जमाती यांना मराठ्यांचे नेतृत्व मान्य करावे लागते.

महाराष्ट्रात सत्तेच्या विकेंद्रीकरणातून निर्माण झालेल्या राजकीय स्तर व आर्थिक विकासाकरिता निर्माण झालेले सहकार क्षेत्र राजकारणात महत्त्वाचे आहे. या सत्ता केंद्रावर नियंत्रण करण्याकरिता जाती–जाती मधील असलेली स्पर्धा व जाती अंतर्गत असलेली स्पर्धा ही महाराष्ट्राच्या राजकारणाची वैशिष्ट्ये आहेत. डॉ. जयंत लेले यांच्या संशोधनातून पुढील निष्कर्ष हाती आले आहेत. १) गावातील अभिजन मराठा इतर मराठ्यांना सामावून घेतात. अभिजन मराठा आपले लग्नसंबंध फक्त अभिजन मराठ्यांच्या सोबत किंवा बरोबर ठेवतात. मराठा जातीमध्ये आंतरगत एकी ठेवणारी संघटना नाही. त्यांच्या जातीच्या जाणिवा लवचिक आहेत. परंतु त्याचा अर्थ त्यांच्यात एकवाक्यता नाही असा होत नाही. राजकीय युती करताना ते उदार असतात. २) मराठेतर शेतकरी

जातींना मराठा होण्याची आकांक्षा असते अभिजन मराठ्यांच्या प्रयत्नांमधून कुणबी जातीला मराठा दर्जा मिळाला परंतु मराठ्यांनी कुणब्यांना नाते संबंधात सामावून घेतले नाही. ३) गावातील अभिजन मराठा, देशमुख किंवा पाटील या नावाने ओळखले जातात. मराठ्यांनी आपल्या जातीच्या सीमा लवचिक ठेवल्यामुळे त्यांच्याकडे नेतृत्व आहे. कुणबी, माळी व धनगर श्रीमंत असले तरी मराठ्यांनी त्यांना बरोबरीचे मानले नाही. ४) सरपंच ते आमदार ६५.०५ टक्के नेते मराठा होते यातील ६५ टक्के देशमुख व पाटील होते. ५) मराठा मतदारापेक्षा मराठा नेतृत्वाचे उत्पन्न जास्त होते. मतदारांपैकी ५० टक्के मतदार मराठा होते. मराठा जातीमध्ये दोन गट होते. अभिजन मराठ्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण जास्त होते. अभिजन नसलेल्या मराठ्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण कमी होते. श्रीमंत मराठा व गरीब मराठा हा भेद अभिजन व नागरिक असा होता. ६) कनिष्ठ मराठा हे अभिजन मराठ्यांबरोबर सांस्कृतिक प्रभावाच्या जाणिवेचे भागीदार होते. कनिष्ठ मराठा हे वरिष्ठ मराठ्यांबरोबर फक्त मराठा जात म्हणून एकत्र असतात. कनिष्ठ मराठा मराठ्यांमधील गाभ्याचा भाग म्हणून कधीच एकत्र नसतात. मराठा जाती अंतर्गत विषमता आहे. श्रीमंत सुशिक्षित व वतनदार मराठा हाच राजकीय सत्तेच्या जवळ आहे. महाराष्ट्रात मराठा संख्येने जास्त असलेले तरी अभिजन मराठ्यांचा गरीब मराठ्यांवर सांस्कृतिक प्रभाव आहे व त्यातून ते राजकीय प्रभाव सिद्ध करतात.

अभिजन मराठ्यांचे नियंत्रण विकास यंत्रणेबरोबर असते. त्यामुळे अभिजन मराठा व सामान्य जनता यांच्यात असमानता असते. अशा वेळेस बहुजन समाज, शेतकरी समाज या विचार श्रेणीचा वापर करून मराठा आपल्या प्रभुत्वाचे समर्थन करतात. गाव हा राजकीय अर्थव्यवस्थेचा पायाभूत घटक आहे. मतदार आर्थिक प्रश्न कौटुंबिक प्रश्न, व्यवसायाचे प्रश्न व मतदान या संदर्भात अभिजन मराठ्यांचा सल्ला घेतात असे सर्वेक्षणातून दिसून आले आहे. अभिजन मराठ्यांवर सामान्य जनतेचे अवलंबत्व दिसून आले आहे.

अभिजन मराठ्यांच्या राजकीय सहभागाचे व राजकीय माहितीचे प्रमाण सामान्य जनतेपेक्षा अधिक आहे, असे आढळून आले आहे. मराठा नेतृत्वाचा ग्रामपंचायत हा शेवटचा पायाभूत घटक आहे. गावातून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त नफ्यावर ते नियंत्रण ठेवतात. त्यांचे फेरवाटप करतात हे करतांना मराठ्यांना सर्व पातळीवरील सत्तेवर नियंत्रण लागते. ग्रामपंचायतीच्या साधनांद्वारे त्यांचे नियंत्रण अधिक प्रभावी होते. कारण त्याचा वापर त्यांना वैयक्तिक हिताकरिता व प्रभाव वाढविण्याकरिता करता येतो. ग्राम पंचायतीमधील प्रभावी घटक गावातील सहकारी कृषी पतसंस्थेत प्रभावी असतो. सहकारी

कृषी पतसंस्थेतील साधन संपत्तीचे फायदे हा गट मिळवितो. गावात ग्रामपंचायत व सहकारी संस्थेत प्रभावी असणारा हा गट तालुका पातळवरील गटाच्या नेत्याला पाठिंबा देतो. तालुका पातळीवरील नेते आपल्या अधिकाराचा वापर करून गाव पातळीवरील नेत्यांना फायदे मिळवून देतात. उदा. शिक्षकांच्या बदल्या, शेती क्षेत्रातील अनुदान इत्यादी. जिल्हा पातळीवरील, नेते तालुका पातळीवरील नेत्यांचा पाठिंबा मिळवितांना जिल्हा परिषदा, सहकारी बँका यांचा वापर करून आपल्याला पाठिंबा देणाऱ्या गटाचे फायदे करून देतात. पंचायत समिती मधील पदे, सहकारी संस्थेमधील पदे यांचा वापर पाठिंबा मिळविण्याकरिता केला जातो.

पंचायत राजसंस्थांची, शैक्षणिक संस्थांची अनुदाने राज्यसरकारच्या नियंत्रणात असतात. गावापासून ते जिल्हा पातळीवरील नियंत्रण टिकविण्यासाठी या स्तरावरील गट, राज्यसरकारला पाठिंबा देतात. श्रेष्ठजन मराठा ज्या सत्ता केंद्रात फायदा आहे ती केंद्रे स्वत:च्या नियंत्रणाखाली आणण्याचे प्रयत्न करतात. फायदा नसलेली केंद्रे इतरांकरिता सोडलेली असतात. परंतु इतर क्षेत्राचे महत्त्व वाढले तर मराठा त्यावर आपले पुन्हा सर्व लक्ष केंद्रीत करतात.

**८.२ अप्रकाशित शोधप्रबंध एक आढावा**

**(१)** जमीन मालीक, जात व राजकीय सत्ता यांचा अभ्यास–डॉ. नितीन बीरमल, पीएच. डी. साठीचा प्रबंध.[१०]

डॉ. नितीन बीरमल यांनी पीएच. डी. प्रबंधाकरिता औरंगाबाद व लातूर या दोन जिल्ह्यांचा अभ्यास केला आहे. वरील जिल्ह्यांतील चार तालुक्यांतील आठ गावांचा अभ्यास केला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील चार गावातील जमीनमालकी, जात व राजकीय सत्ता यांचा अभ्यास केला आहे. चारही गावात मराठा जातीचा प्रभाव जमीन मालकीवर होता. तसेच राजकीय सत्तेवरही होता. जिल्ह्यातील दोन तालुक्यातील चार गावात पुढील निष्कर्ष आले आहेत. गंगापूर गावात ५० टक्के पेक्षा जास्त जमीन मालकीवर मराठा जातीचा प्रभाव होता. सिलोड तालुक्यात मराठा जात वगळता माळी व धनगर जातीचा प्रभाव जमीन मालकीवर होता. माळी, धनगर जातीमध्ये चारपेक्षा अधिक भावकीमध्ये जमिनीचे केंद्रीकरण झाले आहे.

चारही गावात जमीन मालकीवर प्रभाव असणाऱ्या जातीअंतर्गत भावकीच्या सरासरी जमीनधारणा क्षेत्राचे प्रमाण तिच्या जातीपेक्षा अधिक आहे. खरेदी–विक्री व्यवहारात १९८२ ते १९९२ या कालावधीत जमीनमालकीवर प्रभाव असणाऱ्या जातीच्या प्रभावाला

धक्का पोहचलेला नाही. जमीन विक्री व्यवहार हे आपापल्या जातीत होताना दिसतात. ग्रामपंचायतीवर मराठा जातीचा प्रभाव निरंकुश होता. सिलोड तालुक्यात मराठा जातीचा प्रभाव कमी असला तरी तो धनगर, माळी, मुस्लिम यांच्या तुलनेत अधिक आहे. भराडी गावात मुस्लिमांचा प्रभाव मराठा जात वगळता जास्त होता. त्यांचेकडे जमीनमालकी प्रभावी असणाऱ्या जातीअंतर्गत भावकीतून ग्रामपंचायत सभासद निवडले गेले. कृषी पतसंस्थेवर मराठा जातीचा प्रभाव होता. एकंदरीत जमीनमालकी, जात आणि राजकीय सत्ता यांचा संबंध आहे हे वरील अभ्यासातून स्पष्ट झाले आहे.

(२) जात, जमीनमालकी व राजकीय स्थान इंदापूर तालुका : एक अभ्यास–१९९४ चव्हाण अशोक एम. फिल. साठीचा प्रबंध [११]

पुणे विद्यापीठामधील एम. फिल. च्या प्रबंधात अशोक चव्हाण यांनी पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील कळंब, कळस व निमगाव–केतकी या तीन गावांचा अभ्यास केला आहे. १९९४ मधील संशोधनातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

कळंब या गावात मराठा व धनगर या प्रमुख जाती होत्या. मराठा जातीची लोकसंख्या ३४.१७ टक्के तर धनगर जातीची लोकसंख्या २९.२९ टक्के होती. जमीनमालकीचा विचार करता मराठा जातीकडे ५०.६० टक्के, धनगर जातीकडे ३१.८३ टक्के होती, ग्रामपंचायतीवर १९९२ पर्यंत मराठा २१.५५ टक्के सभासद होते, तर धनगर १९.८२ टक्के सभासद होते. गावातील सहकारी संस्थेवर १९९२ पर्यंत ५६.२९ टक्के मराठा जातीचे संचालक होते, तर १९.२५ टक्के धनगर जातीचे संचालक होते.

कळस या गावातील लोकसंख्येपैकी धनगर जातीची लोकसंख्या ३६.२३ टक्के होती. गावातील जमिनीपैकी धनगर जातीकडे ४४.७२ टक्के जमीन होती. तर मराठा जातीकडे १९.२४ टक्के जमीन होती. बागायत जमिनीवर धनगर जातीचा प्रभाव होता. ग्रामपंचायतीवरील १९९२ पर्यंत प्रभाव विचारात घेता धनगर जातीचे ६२.०५ टक्के सभासद व मराठा जातीचे ९.०३ टक्के सभासद निवडून आले. गावातील सहकारी संस्थेवर १९९२ पर्यंत धनगर जातीचे ५० टक्के संचालक होते.

निमगाव केतकी गावातील प्रमुख तीन जातींची लोकसंख्या विचारात घेता माळी जातीची २९.८५ टक्के, धनगर जातीची १४.२७ टक्के व मराठा जातीची लोकसंख्या ११.६८ टक्के होती. गावातील जमीनमालकी माळी जातीकडे ६०.८३ टक्के, धनगर जातीकडे १७.८२ टक्के व मराठा जातीकडे ५.८० टक्के होती. बागायत जमिनीवर माळी जातीचा प्रभाव होता. सन १९९२ पर्यंत ग्रामपंचायतीवर ६१.५३ टक्के सभासद

माळी जातीचे, धनगर व मराठा जातीचे प्रत्येकी १०.९८ टक्के सभासद होते. सहकारी संस्थेतील संचालकांमध्ये १९९२ पर्यंत ६१.३७ टक्के संचालक माळी जातीचे होते.

**(३)** जात, जमीनमालकी व राजकीय स्थान–बारामती तालुका एक अभ्यास– अविनाश सावळकर, एम. फिल. साठीचा प्रबंध.[१२]

अविनाा सावळकर यांनी पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यातील कटफळ, कऱ्हावागस, निबुंत या तीन गावांचा अभ्यास केला आहे. ह्या संशोधनातील निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत. कटफळ गावातील लोकसंख्येचा विचार करता माळी जातीची लोकसंख्या २५.२२ टक्के, धनगर जातीची २३.११ टक्के व मराठा जातीची २१.९० टक्के लोकसंख्या होती. गावातील एकूण जमिनीपैकी माळी जातीकडे ३४.८९ टक्के, धनगर जातीकडे २९.६४ टक्के, मराठा जातीकडे ८.४० टक्के जमीनमालकी होती. बागायती क्षेत्रापैकी माळीजातीकडे ४०.१८ टक्के क्षेत्र, धनगर जातीकडे ३९.३९ टक्के व मराठा जातीकडे ९.६५ टक्के क्षेत्र होते. ग्रामपंचायतीवर १९९१ पर्यंत एकूण ६६ सदस्य निवडून आले. त्यामध्ये धनगर जातीचे १८, मराठा जातीचे १७ व माळी जातीचे १४ सभासद होते. गावातील सह. संस्थेवर १९९१ पर्यंत १४ संचालक निवडून आले. त्यामध्ये धनगर जातीचे १०, माळी जातीचे २ संचालक होते. गावात जमीनमालकी व लोकसंख्येत प्रभावी असलेल्या माळी, धनगर व मराठा या जातींकडे गावातील जमीनमालकी होती व त्यांच्याकडे गावातील राजकीय व सहकारी सत्ता होती.

कऱ्हावागस या गावातील लोकसंख्येपैकी धनगर जातीची लोकसंख्या २५.६६ टक्के, मराठा जातीची २० टक्के व माळी जातीची १८.६३ टक्के होती. गावातील एकूण जमीनमालकी पैकी धनगर जातीकडे ४७.१६ टक्के क्षेत्र होते. मराठा जातीकडे १४.०४ टक्के, माळी जातीकडे १३.२३ टक्के जमीन मालकी होती. एकूण बागायत क्षेत्रामध्ये धनगर जातीकडे ४४.४३ टक्के, मराठा जातीकडे १६.८० टक्के, माळी जातीकडे २४.९८ टक्के बागायत क्षेत्र होते. सत्तेचा विचार करता ग्रामपंचायतीवर निवडून गेलेल्या १९९१ पर्यंतच्या सभासदांमध्ये धनगर जातीचे ३८.३९ टक्के, मराठा जातीचे १५.२८ टक्के तर माळी जातीकडे १५.२२ टक्के सभासद होते. गावातील सहकारी संस्थेवर १९९१ पर्यंत निवडून गेलेल्या संचालकांपैकी ६८.५१ टक्के धनगर जातीचे संचालक होते. मराठा जातीचे १२.९६ टक्के व माळी जातीचे ७.४० टक्के संचालक होते. गावात लोकसंख्येने जास्त जमीनमालकी जास्त, असलेल्या धनगर जातीचा ग्रामपंचायत व सहकारी संस्थेवर प्रभाव होता.

निंबूत या गावातील लोकसंख्येमध्ये मराठा जातीची लोकसंख्या ३७ टक्के, धनगर जातीची १७.३८ टक्के व माळी जातीची १७.३९ टक्के लोकसंख्या होती. एकूण जमिनीपैकी मराठा जातीकडे ४६.८२ टक्के, धनगर जातीकडे ३७.७१ टक्के व माळी जातीकडे ६.७९ टक्के जमीनमालकी होती. बागायत क्षेत्रामध्ये मराठा जातीकडे ५६.७३ टक्के क्षेत्र, धनगर जातीकडे ३१.५४ टक्के क्षेत्र, माळी जातीकडे ५.६६ टक्के क्षेत्र होते. ग्रामपंचायतीवर १९९१ पर्यंत निवडून गेलेल्या सभासदांमध्ये मराठा जातीचे ४३.५६ टक्के, धनगर जातीचे २४.७५ टक्के व माळी जातीचे १५.८४ टक्के सभासद होते. सहकारी संस्थेवर १९९१ पर्यंत निवडून गेलेल्या संचालकापैकी ७५ टक्के मराठा व धनगर जातीचे १३.३३ टक्के संचालक होते.

**(४)** जमीन, जात, आणि राजकीय सत्ता–जळगाव जिल्ह्याचा एक अभ्यास– जगताप हर्ष एम. फिल. साठीचा प्रबंध.[१३]

श्री. जगताप हर्ष यांनी जळगाव जिल्ह्यातील भडगाव व जळगाव या दोन तालुक्यांतील चार गावांचा अभ्यास केला आहे. जळगाव तालुक्यातील तरसोद गावातील एकूण जमीनमालकीपैकी लेवा पाटील जातीकडे ५८ टक्के जमीन होती. मराठा जातीकडे १७.९६ टक्के जमीनमालकी होती. एकूण बागायत क्षेत्रापैकी लेवा पाटील जातीकडे ५६.४४ टक्के व मराठा जातीकडे २७.२२ टक्के बागायत क्षेत्र होते. १९९३ पर्यंत ग्रामपंचायतीवर निवडून गेलेल्या सभासदापैकी मराठा जातीचे सभासद ३८.४६ टक्के होते. तर लेवा पाटील जातीचे २७.६९ टक्के सभासद होते. सहकारी संस्थेत १९९३ पर्यंत निवडून गेलेल्या संचालकापैकी मराठा जातीचे संचालक ५३.५० टक्के व माळी जातीचे २३.९० टक्के संचालक होते. तरसोद गावात लेवा पाटील जातीकडे जमीनमालकी जास्त असली तरी त्यांचा राजकीय सत्ता व सहकारी संस्थेवर प्रभाव नव्हता. कारण गावपातळीवर लेवा पाटील जातीच्या विरोधात मराठा व अन्य जातीची आघाडी असावी असे वाटते.

**(५)** भोर तालुक्यातील नटंबी गावाचा अभ्यास–कृषी खाते, महाराष्ट्र शासन १९६४ मध्ये गावातील एकूण लोकसंख्येपैकी मराठा जातीची ८२.०२ टक्के लोकसंख्या होती. ५२ टक्के लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. गावातील जमीन ही जेथे भावकीची पूर्वी वतन होती. ग्रामपंचायत ही तीन गावांची मिळून बनलेली होती. ग्रामपंचायतीवर नटंबी गावातील तीन सदस्य होते, हे तीनही सदस्य मराठा जातीचे होते व ह्या तीनही सभासदांची जमीन २५ हेक्टर पेक्षा जास्त होती. गावातील सहकारी संस्थेतील २८ सभासदापैकी २६ सभासद मराठा होते. गावातील सर्वात जास्त लोकसंख्या असणाऱ्या

मराठा जातीचे जमीनमालकीवर प्रभाव असलेल्या मराठा जातीचा ग्रामपंचायत व सहकारी संस्थेवर प्रभाव होता.

**(६)** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचा अभ्यास – विजय काजळे

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणाचा अभ्यास करण्याकरिता संशोधकांनी कणकवली व देवगड या दोन तालुक्यांची निवड केली आहे. कणकवली तालुक्यातील नरडवे, जानवली, फोंडा आणि वागदे तर देवगड तालुक्यातील शिरगाव, पडेल, पडवने आणि तांबळडेग अशा एकूण आठ गावांची निवड केली. या आठ गावांचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत :

**१.** कणकवली तालुक्यातील नरडवे गावामध्य मराठा जातीचे भू–धारक ८१.०८ टक्के असून त्यांच्याकडे भू–धारणा ७७.८६ टक्के हेक्टर एवढी आहे. इतर जातीच्या १९ टक्के भू–धारकांकडे फक्त २२.१४ टक्के भू–धारणा आहे. १९७६ ते १९९७ या कालावधीत ग्रामपंचायतीच्या एकूण ४० सदस्यांपैकी ७० टक्के सदस्य हे मराठी जातीचे आहेत. तर १९८१ ते १९९७ या कालावधीत नरडवे विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या एकूण ३६ सदस्यांपैकी ७५ टक्के सदस्य हे मराठा जातीचे होते. याचा अर्थ नरडवे गावामध्ये मराठा जात ही बहुसंख्येने असून याच जातीकडे सर्वाधिख भू–धारणा आहे आणि त्यामुळेच गावातील राजकारणावर मराठा जात प्रभुत्वशाली असल्याचे दिसून येते.

**२**. कणकवली तालुक्यातील जाणवली या गावामध्ये मराठा जातीचे ७४ टक्के भू–धारक असून त्यांच्याकडे ७४.७९ टक्के भू–धारणा आहे. जाणवली ग्रामपंचायतीच्या १९७६ ते १९९७ पर्यंतच्या कालावधीतील ४५ सदस्यांपैकी मराठा जातीचे ९१.११ टक्के सदस्य आहेत. तर सहकारी सोसायटीच्या एकूण ४५ सदस्यांपैकी ८८.८८ टक्के सदस्य मराठा जातीचे आहेत. याचाच अर्थ जाणवली गावामध्ये मराठा जात ही संख्येने मोठ्या प्रमाणात असून सर्वाधिक भू–धारणा या जातीकडेच आहे आणि त्यामुळेच जाणवली गावातील राजकारणावर मराठा जात प्रभुत्वशाली आहे.

**३.** देवगड तालुक्यातील पडवने गावातील भंडारी जातीचे भू–धारक ७६.९२ टक्के आहेत. त्यांच्याकडील भू–धारणा ८४.४४ टक्के आहे. पडवणे ग्रामपंचायतीमध्ये १९९५ व २००० या दोन्ही निवडणुकीमध्ये १०० टक्के भंडारी सदस्य निवडले गेले आहे. तर सहकारी सोसायटीच्या एकूण १४ सदस्यांपैकी सर्व सदस्य भंडारी जातीचे आहे. म्हणजेच

पडवणे या गावात भंडारी जातीची लोकसंख्या सर्वाधिक असून बहुतांश भू–धारणा भंडारी जातीच्या मालकीची आहे व गावाच्या राजकारणावर भंडारी जातीचे संपूर्ण वर्चस्व आहे.

**४.** देवगड तालुक्यातील तांबळडेग गावातील एकूण भू–धारकांपैकी ९०.९० टक्के भू–धारक गाबीत जातीचे असून त्यांच्याकडे भू–धारणा ७७.८४ टक्के आहे. तांबळडेग ग्रामपंचायतीच्या दोन भू–धारकांमध्ये एकूण १४ ही सदस्य गाबीत जातीचेच आहेत. तर तांबळडेग गावातील मत्स्यमारी सेवा सहकारी सोसायटीवर सर्वच्या सर्व म्हणजेच ३५ सदस्य गाबीत जातीचे आहेत. म्हणजेच तांबळडेग गावातील गाबीत जात हे सर्वाधिक लोकसंख्येने असून सर्वाधिक भू–धारणा याच जातीकडे आहे. गावाच्या राजकारणावर गाबीत जातीचे संपूर्ण वर्चस्व असल्याचे दिसून येते. ज्या गावामध्ये ज्या जातीची लोकसंख्या सर्वाधिक असते, त्या गावातील भू–धारणा बहुतांशी त्या जाती सभूहाच्या मालकीची असते आणि संख्याबळ आणि उत्पादक साधनांची मालकी व नियंत्रण असलेल्या विशिष्ट जातीतील सर्वात प्रभावी कुल घराण्याचे ग्रामस्तरीय राजकारणावर प्रभुत्व असते, तसेच गावातील राजकीय सत्ता त्या विशिष्ट कुल घराण्यातील व्यक्तिंतकडे किंवा त्यांचा पाठिंबा असलेल्या व्यक्तिंतकडे, व्यक्तिसमूहांकडे असते.

• • •

## संदर्भसूची


१. **दास्ताने संतोष, महाराष्ट्र २००४,**– दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे–२००५, पृ. क्र. ३४

२. **डॉ. अशोक जैन, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,**– शेठ पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई, १९९८ पृ.१९१

३. कित्ता पृ. २३३

४. कित्ता पृ. २३३, २३४

५. कित्ता पृ. २३४

६. **संपादक–सुहास पळशीकर, नितीन बीरमल, महाराष्ट्राचे राजकारण राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ.** – प्रतिमा प्रकाशन, पुणे–३०, प्रा. आ. २००४ पृ. ५,६

७. कित्ता पृ. ६,७

८. Carter Anthony– Elite Politics in Rural India, Political stratification and political alliances in western Maharashtra. Vikas Publishing House Pvt. Ltd. Delhi 1975.

९. Lele Jayant– Elite Politics and class Rural, Political Development in Maharashtra. Popular Prakashan Mumbay-1982.

१०. **बीरमल नितीन–जमीन मालकी, जात, राजकीय स्थान, 'मराठवाडा' विभागाचा अभ्यास –** एक अप्रकाशित पीएच. डी. शोधप्रबंध

११. **चव्हाण अशोक–पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका**–एक अभ्यास एम्. फिल्. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.

१२. **सावळकर अविनाश–पुणे जिल्ह्यातील बारामती तालुका**–एक अभ्यास एम्. फिल्. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.

१३. **जगझाप हर्ष–जलगाव जिल्हा**–एक अभ्यास एम्.फिल्. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.

१४. **विजय काजळे–सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जमीन जात आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास**–पीएच. डी. शोधप्रबंध, मुंबई विद्यापीठ.


* * *

# २. सूक्ष्मस्तरीय समाजकारण, अर्थकारण व राजकारण आणि त्यांचे आंतरसंबंध

**२.१ प्रास्ताविक :**

राजकीय प्रक्रिया, म्हणजेच सत्ता संपादनासाठी केले जाणारे राजकारण आणि त्याचे सामाजिक पर्यावरण यांच्यातील संबंध अन्योन्य असतात. राजकीय प्रक्रियेचा वास्तववादी अभ्यास त्याच्या सामाजिक पर्यावरणाच्या संदर्भातच करता येतो, असे प्रतिपादन विसाव्या शतकातील वर्तनवादी अभ्यासकांनी केले आहे. नामवंत राज्यशास्त्रज्ञ मॉरिस जॉन्स यांच्या मते, ''प्रत्येक देशाच्या राजकीय जीवनाच्या अंतर्गत एक वेगळे कथानक असते आणि हे कथानक त्या देशातील समाजाची स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती असते.[१] लासवेलने म्हटल्याप्रमाणे, ''सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक वास्तवाची दखल न घेता करण्यात आलेले राजकीय विश्लेषण हे वरवरचे आणि अपूर्ण असल्याचा धोका उद्‌भवतो अशा अपूर्ण विश्लेषणाच्या आधारे करण्यात आलेल्या विश्लेषणातून काढण्यात आलेले निष्कर्ष चूकीचे असू शकतात.''[२] या वास्तववादी दृष्टिकोनातून विसाव्या शतकात राजकीय समाजशास्त्र (Political Sociology) या आंतरशास्त्रीय सामाजिक शास्त्राचा विकास झाला आहे. या सामाजिक शास्त्रात राजकारण आणि त्याच्या सामाजिक पर्यावरणाचा संयुक्तरीत्या अभ्यास करण्यात येतो. राजकीय समाजशास्त्रज्ञांच्या मते सामाजिक पर्यावरण राजकीय प्रक्रिया प्रभावित करतात आणि राजकारणाने समाजकारण प्रभावित होत असते. हे समाजशास्त्रज्ञ समाजकारण आणि राजकारण यांच्यात होणाऱ्या क्रिया–प्रतिक्रियांचा अभ्यास करते. लिपसेट यांच्या मते, ''राजकीय समाजशास्त्राची सुरूवात समाजाच्या अभ्यासाने होत असते आणि समाजव्यवस्थेचे राजकीय व्यवस्थेवरील परिणामांचे अंतिमत: विश्लेषण करतात.[३]

महाराष्ट्रातील सुक्ष्मस्तरीय राजकारणाचा, म्हणजेच ग्रामीण राजकारणाचा पाया ग्रामीण समाजव्यवस्था असते. जाती व्यवस्था ग्रामीण समाजाचा सर्वात महत्वपूर्ण घटक आहे. ग्रामीण राजकारण हे जातिनिष्ठ आहे, असे म्हटले जाते कारण जनसामान्यांच्या सहभागावर आधारित राजकारण भारतात बिटिश राजवटीत आणि त्यानंतरच्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात विकसित झाले. या लोकशाहीवादी राजकारणात संख्या सामर्थ्य राजकीय

प्रभावीपणाचा निकष आहे. म्हणूनच ज्या जातिसमूहांकडे संख्याबल आहे, ते जातिसमूह राजकारणात प्रभावी ठरतात. महाराष्ट्राच्या राजकारणात मराठा–कुणबी जातिसमूहाने प्रदीर्घ काळ वर्चस्व गाजवले, कारण राज्यातील तो सर्वाधिक संख्याबळ असलेले जातिसमूह होता. याचीच प्रचिती स्थानिक स्तरावरती येते. मात्र सर्व गावांवर मराठा–कुणबी जातिसमूहाचे वर्चस्व दिसून येत नाही, तर ज्या गावात ज्या जातीच्या लोकांची संख्या सर्वाधिक असते, त्या गावात त्या जातीच्या लोकांचे व त्यांच्या नेत्यांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. म्हणूनच रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात आगरी जातीची सर्वाधिक लोकसंख्या असल्याने, त्या तालुक्याच्या राजकारणावर आगरी जातीचे वर्चस्व असल्याचे दिसून येते.

ज्याप्रमाणे जातिव्यवस्था हा ग्रामीण राजकारणाचा सामाजिक पाया आहे, त्याचप्रमाणे जमीन–मालकी किंवा भूधारणा त्याचा आर्थिक पाया आहे. भूधारणेचा अर्थ उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण असणे, असा होतो. जमीन–मालकीचे विश्लेषण करताना असे दिसून येते की गावामध्ये ज्या जातीकडे सर्वाधिक संख्याबल असते, त्या जातीच्या लोकांकडे गावातील सर्वाधिक जमिनीची मालकी असते. त्याच्याच आधारे एम्. एन. श्रीनिवास या समाजशास्त्रज्ञाने 'प्रभावशाली जात' (Dominant Caste) ही संकल्पना मांडली आहे.[४] ''रजनी कोठारी प्रभावशाली जातीसाठी 'प्रस्थापित जात' या शब्दप्रयोगाचा वापर करतात.

या प्रकरणात ग्रामीण राजकारणावर वर्चस्व गाजवणाऱ्या जाती आणि भूधारणा किंवा जमीन मालकी या सामाजिक व आर्थिक घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे. जाती आणि भूधारणेचा गुणोत्तर म्हणजे सत्तासंपादन करणे आणि सत्ता संपादन करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या अभिजन वर्गाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**२.२ जाती व्यवस्था :** जातीव्यवस्था हा सुक्ष्मस्तरीय, म्हणजेच ग्रामीण राजकारणाचा सामाजिक पाया आहे. भारतीय सामाजिक स्तरीकरण जातिनिष्ठ स्वरूपाचे असून, गावातील वतनदार वर्ग स्वातंत्र्यपूर्ण कालखंडात उत्पादन साधनांवरील नियंत्रणाद्वारा गावावर नियंत्रण गाजवत असत. या काळात उत्पादन व्यवस्थेतील शेतकरी, कारागीर व मजूर यांचे जमीनमालकीचे हक्क वेगवेगळ्या स्वरूपाचे होते. गावातील वतनदाराकडील जमिनीवर शेतकरी व कारागीर जातीचे लोक कुळे म्हणून काम करीत असत. लोकशाही राजकारणात जातींना आधुनिक स्वरूपाच्या दबाव गटांचे स्वरूप येऊ लागले आहे असे रूडॉल्फ यांनी सूचित केले. त्याही आधी एम्. एन्. श्रीनिवास या समाजशास्त्रज्ञांनी 'वर्चस्वशाली

जात' ही संकल्पना मांडून जात आणि राजकारण यांतील परस्परसंबंधाची चर्चा सुरू केली होती. श्रीनिवास यांच्या मते स्थानिक पातळीवर बहुसंख्य असलेली आणि वरचा दर्जा असलेली जात, शिक्षण, आधुनिक व्यवसाय यांत प्रगती साधने आणि स्थानिक राजकारणावर वर्चस्व गाजवत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारताने स्वीकारलेल्या प्रातिनिधीक लोकशाहीच्या संदर्भात जातीव्यवस्थेला नवीन राजकीय संदर्भ प्राप्त झाला आहे. हा संदर्भ म्हणजेच जातीगटाचे सांख्यिक बळ सामर्थ्य होय. धार्मिक स्थानापेक्षा सांख्यिकबळ राजकीय प्रक्रियेतील निर्णायक घटक ठरत असल्याने कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जाती राजकीय प्रक्रियेत प्रभावी ठरतात. प्रा. सिरसीकर यांनी म्हटल्याप्रमाणे ''स्वातंत्र्योत्तर कालखंडात उच्चवर्णीय–वर्गीय शहरी पांढरपेशा नेतृत्वाची जागा ग्रामीण भागातील कनिष्ठ जातीच्या आणि मध्यस्तरीय शेतकरी समुदायाने घेतली आहे. त्याचे विवरण प्रा. एम. एन. श्रीनिवास यांनी प्रभावी जातीसमूह असे केले आहे. त्याच्यापुढे जाऊन, डॉ. जयंत लेले, डॉ. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सुहास पळशीकर या विचारवंतांनी प्रभावी जातीसमूहाच्या अंतर्गत प्रभावी कुल घराणे ही संकल्पना विकसित केली आहे.[५] या संकल्पनेत त्यांनी विशिष्ट जातीतील जे घराणे घराणी आर्थिकदृष्ट्या संपन्न, म्हणजेच सर्वाधिक भू–धारणा असणारी असतील त्यांचे ग्रामस्तरावर निर्विवाद प्रभुत्व असते असे प्रतिपादित केले.

**२.२.२ 'जात' या संकल्पनेचे स्पष्टीकरण :**

हिंदू समाजातील जातीचा पहिला उल्लेख आर्यांच्या (इंडो–आर्यन) ग्रंथामधून सापडतो. ऋग्वेदातील पुरूषसुक्तात समाज विभाजन चार जातींमध्ये केलेले सापडते. आर्य प्रथम गंगेच्या खोऱ्यात आले आणि राहिले. तेथे त्यांचा त्यांच्याहून भिन्न असलेल्या काळ्या रंगाच्या 'दास' किंवा 'दस्यू' या आदिवासीशी संबंध आला. आर्य गोरे, सरळ नाकाचे व उंच. 'दास' त्यांना शत्रू वाटत. त्यांच्यात संघर्ष झाले व कालांतराने संगमही झाला. एकमेकांशी सामंजस्य साधले गेले. आर्य येथे आले तेच मुळात त्यांचा वैदिक धर्म घेऊन. धार्मिक विधी, धार्मिक पवित्रता त्यांच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य होते. गुलामाबरोबर अन्न सेवन केल्यास व त्यांना स्पर्श केल्यास त्या व्यक्तिला शुद्धीकरणाशिवाय गती नसे. भिन्न भिन्न गटांतील व्यक्तिंना भिन्न भिन्न धार्मिक सवलती व धार्मिक पवित्रतेच्या बाबतीत भेद अशा कल्पना उराशी बाळगून आलेल्या आर्यांनी 'दास', 'दस्यू' या शत्रूसमान लोकांना कनिष्ठ, हलके, नीच लेखण्यास सुरूवात केली यातूनच पुढे 'जात' ही संकल्पना उदयास आली असावी.[६]

**२.२.३ जातीचा उदय :** जातिसंस्थेच्या उगमाबाबत समाजशास्त्रज्ञांनी केलेले प्रतिपादन खालीलप्रमाणे आहे.

डॉ. जे. एच. हटन यांनी 'कास्ट इन् इंडिया' या ग्रंथात जातिव्यवस्था हिंदू समाज जीवनाचा अंगीभूत घटक आहे, असे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते जातिव्यवस्था हिंदूच्या मनात आणि व्यवहारात खोलवर रूजलेली आहे. जातिव्यवस्था तात्पुरती आणि कृत्रिम व्यवस्था म्हणून निर्माण झालेली नसावी तर ती हिंदू समाज पुरूषाचे 'अंग' बनून राहिली'' असे वाटते. सुरूवातीच्या युरोपीय निरीक्षकांनी जातिव्यवस्था बुद्धिप्रामाण्यवादी ब्राम्हण पुरोहितांनी सामान्य जनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि ब्राम्हणांचे वर्चस्व ठेवण्यासाठी कायम स्वरूपाची एक व्यवस्था निर्माण केली व त्या दृष्टीने ती बाह्य स्वरूपाचीच आहे, असे प्रतिपादन केले.[७]

नेस्फील्ड यांनी व्यवसायनिष्ठ जातिव्यवस्थेबद्दलची उत्पती मांडली त्यांच्या मते भिन्न भिन्न व्यवसाय करणाऱ्यांचे गट पडले आणि 'व्यवसाय' हे भेददर्शक लक्षण मानले तर व्यवसायिकांचे गट हेच पुढे जाती झाल्या असाव्यात आणि समाजाच्या भौतिक प्रगतीनुरूप त्या त्या जातींना महत्व येत गेले असावे. उदा. धातूंचा शोध लागल्यामुळे धातूंना प्राधान्य आले व त्यामुळे दुरड्या-टोपल्या विणणाऱ्यांपेक्षा धातुकाम करणारे अधिक प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. जातींची विभागणी ही व्यवसायनुरूप आपोआप या नैसर्गिकरीत्या झाली असावी असे यांचे मत असून जातिव्यवस्थेच्या निर्मितीत धर्माचा प्रभाव पडलेला नसावा.[८]

डालमन यांच्या मते जातिव्यवस्थेची सुरूवात हिंदूसमाजात अस्तित्वात असलेल्या तीन वर्गापासून झाली असावी. हे तीन वर्ग म्हणजे १) पुरोहित (धार्मिक) २) सरदार (राजकीय) ३) पूंजीवादी (आर्थिक) यांचे होते. प्रत्येक गावात या वर्गाभोवती समुदाय एकत्रित झाले आणि त्यांचे जीवन एखाद्या महामंडळाप्रमाणे किंवा एखाद्या संघाप्रमाणे एकजिनसी बनले. वर्गनिष्ठ संघावरून जातिनिष्ठ संघ निर्माण झाले. या उत्पतीप्रमाणे जाती या वर्गावरून निर्माण झाल्या आणि जातींचे जीवन हे अधिक एकजिनसी झाले.[९]

ब्लंट यांची उत्पती डालमन यांच्या विचारांशी जुळतीमिळती आहे. त्यांच्यामते जातीचा उगम वर्ण आणि व्यवसाय संघ या दोन्हींशी निगडीत आहे. 'जाती म्हणजे समाजाचे वर्गामध्ये आणि वर्गाचे व्यापारी-संघामध्ये झालेले उभे-आडवे विभाजन' होय. प्रथम वर्गामध्ये सामूहिक जीवन होते, कालांतराने त्यांच्यात वर्णसंकर होत राहिला व परिणामत: संमिश्र वर्णव्यवस्था अस्तित्वात आली.[१०]

वंशभेदावर आणि व्यवसायभिन्नतेवर जातीचे मूलस्थान अवलंबून आहे असे चंदा यांनी प्रतिपादिले आहे. ''वर्ण व वांशिक लक्षणे भिन्न असलेल्या आणि वंशपरंपरेने आलेले व्यवसाय करणाऱ्या गटामुळे जातिव्यवस्था निर्माण झाली.'' कालांतराने जे जे नवीन आले व आर्यावर्तात स्थायिक झाले त्यांनी आर्यामध्येच सामावून घेण्याचा प्रयत्न केला त्यामुळे वर्णसंकर झाला व मिश्र जाती निर्माण झाल्या. जातींची निर्मिती वंशश्रेष्ठतेच्या कल्पनेतून झाली.''[११]

जाती या केवळ आर्य अनार्य अशा भेदांतून निर्माण झाल्या नसून जातीच्या निर्मितीला आर्य लोकच जबाबदार आहेत असे सेनार्ट यांचे मत दिसते. त्यांच्या मते आर्यांच्या स्वाऱ्यांबरोबरच येथे असलेल्या जनतेबद्दल त्यांनी व्यवसायिक आणि वांशिक शुद्धतेची शंका घेतली आणि त्यामुळे शुद्ध व संमिश्र असे समूह अस्तित्वात आले. त्यापैकी पुरोहित वर्गाने आपली वांशिक व व्यवसायिक शुद्धता टिकवण्यासाठी नैतिक शक्ती वापरली व स्वत:चे स्थान अधिक उंचावून घेतले व इतरांना कनिष्ठ लेखले.[१२]

वंशशुद्धता आणि उच्च–नीच जातीतील विवाह संबंध यांचा आधार जातींच्या उगमाचे स्पष्टीकरण देण्याकरिता सर हर्बर्ट रिस्ले यांनी घेतलेला दिसतो. आर्य लोकांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या आणि येथील काळ्या रंगाच्या आदिम समाजातील स्त्रियांशी गोऱ्या रंगाच्या सरदारांचे संबंध येऊ लागले. आता वांशिक शुद्धता नष्ट होईल या भितीने वंशांना जाती बद्ध करून टाकले गोरे व काळे, आर्य व अनार्य यांच्यातील विवाह संबंधावर कडक बंधने घातली. वधु वरिष्ठ व वर कनिष्ठ जातीतील असतील तर अशा विवाह नंतर होणारी संतती चांडाळ व शूद्र मानण्यात आली आणि नीच जाती निर्माण झाल्या.[१३]

जातींचा उगम वांशिक व रंग–भेदांतून झाला असावा व या भेदाचा फायदा ब्राम्हणवर्गीयांनी आपले वर्चस्व टिकविण्यासाठी केला असावा, डॉ. धुर्वे यांच्या मते, प्रामुख्याने पुरोहितांनी स्वत:च्या पौरोहित्याच्या व्यवसायाला सर्वश्रेष्ठ मानून होम आदि धार्मिक कृत्यांना महत्व दिले आणि धार्मिक पवित्रता व आर्य वंशाची शुद्धता राखण्याकरिता इतरांना गौण लेखले व त्यातूनच जाती निर्माण झाल्या.[१४] सुरूवातील जरी ब्राम्हण, क्षत्रिय व वैश्य अशा तीनच वर्णांचे लोक होते तरी वर्णसंकरामुळे व धार्मिक शुद्धी बिघडविल्यामुळे ज्यांचे अध:पतन झाले अशांच्या कनिष्ठ म्हणजेच शुद्र जाती निर्माण झाले. जातीव्यवस्था ही आर्यलोक आल्यानंतर झाली की आधीपासून होती असाही प्रश्न उभा राहतो. डॉ. धुर्वे यांचे मत ग्राह्य धरले तर मग वांशिक भेदामुळे 'दोनच जाती

निर्माण व्हावयास हव्या होत्या आर्य व अनार्य, म्हणजेच ज्याअर्थी दोनांपेक्षा अधिक जाती निर्माण झाल्या त्याअर्थी आर्यामध्येच पूर्वीपासून जाती असल्या पाहिजेत वा अनार्यांमध्ये तरी जाती समान गट असले पाहिजेत.[१५]

**२.२.४ जातीमीमांसा :** महाराष्ट्रातील प्रबोधनकालीन जातिविषयक विचार हा मुख्यत्वे ब्राम्हणी आणि अब्राम्हणी परंपरेच्या परस्परविरोधी वैचारिक छावण्यांत विकसित होत गेल्याचे सहजच ध्यानात येते. खरेतर भारतीय विचारदर्शनातील पारंपारिक संघर्ष हा ब्राम्हणीवाद विरूद्ध अब्राम्हणीवाद असा असल्याचे आता पुरेसे स्पष्ट झाले आहे. काही विचारवंत त्यालाच वैदिक आणि अवैदिक परंपरेतील संघर्ष असे संबोधतात. भारतातील एकूण तत्वविचारच या दोन पारंपारिक छावण्यांमधील आंतरक्रियेमुळेच उदयास आल्याचे दिसते. किंबहुना मार्क्सवाद भारतात आल्यानंतरही या पारंपारिक संघर्षाचा निरास झाला आहे असे नसून, भारतातील मार्क्सवाद छावणीलाही या पारंपारिक संघर्षाने ग्रासले आहे हे विसरून चालणार नाही. या पारंपारिक संघर्षाचे भान न ठेवता केली जाणारी भारतीय इतिहास व समाजाची चिकित्सा अपुरी, तोकडी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच महाराष्ट्रातील जातीविषयक विचारांची दखल या संदर्भातच घेणे अधिक अर्थपूर्ण ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर ब्राम्हणी, अब्राम्हणी आणि मार्क्सवादी संप्रदायाची जातिमीमांसा पुढील प्रमाणे आहे.

**(१) ब्राम्हणी परंपरेतील जातिमीमांसा :**

अर्वाचीन महाराष्ट्रातील वैचारिक प्रबोधनाचे नेतृत्व हे मुख्यत्वे येथील ब्राम्हण वर्गाकडेच असल्यामुळे प्रबोधनकालीन समाज चिकित्सेवर ब्राम्हणी संस्कृतिचा ठसा उमटणे अपरिहार्यच होते. जातिविषयक प्रश्नासंबंधी, जाती संस्थेच्या इष्टनिष्ठतेसंबंधी सुरू झालेल्या चर्चेत पहिल्यापासून हा ब्राम्हण वर्ग आघाडीवर होता. ''वर्ण जातीचा उद्गम व व्यवस्थेबाबत दैवी संकल्पनांचा आधार घेतला जातो. चार वर्ण हे मुळ पुरूषाच्या (प्रजापतीच्या) मुख, बाहु, मांड्या व पाय यापासून निर्माण झाले''[१६] असे म्हटले आहे. याच आशयाचे विवेचन नंतरच्या अथर्व वेदात, ब्राम्हण ग्रंथात, महाभारतात व पुराणात आले आहे. वैदिक परंपरेतील हे विश्लेषण सातत्याने मांडण्याचा आणि समाज मनावर ठसविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक करण्यात आला आहे. 'निष्काम कर्मयोग'' सिद्धांत सांगून माणूस कर्माप्रमाणेच श्रृतींनी बांधला गेला आहे. त्यांनी वेदादी ग्रंथ प्रमाण मानून वागले पाहिजे. वेद हे सर्व लोकांचे ऐहिक व पारलौकिक कल्याण साधणारे आहे, असे लोकांना सांगत असताना प्रत्यक्ष आपलेच हितसंबंध साधायचे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी सूत्रबद्ध केलेल्या मांडणीनुसार जातीची पाच लक्षणे १) कुल परंपरा

२) बेटी बंधन ३) रोटी बंधन ४) व्यवसाय बंधन ५) पवित्र अपवित्रता ही होय.[१७] या आधारे समाजाची जातीमध्ये विभागणी केली होती. ब्राम्हणी परंपरेतील विचारांचा आढावा घेतांना सुधारणावादी, हिंदू राष्ट्रवादी, समाजशास्त्रीय आणि सनातनी अशा चार प्रवाहांची दखल घ्यावी लागते.

**अ–सुधारणावादी :**

दादोबा पांडूरंग, लोकहितवादी, राजारामशास्त्री, भागवतप्रभूतींच्या विचारांपासून जाती मीमांसेचा सुधारणावादी संप्रदाय विकसित होताना दिसतो. या लोकांनी जाती संस्थेकडे केवळ डोळसपणेच पाहिले नाही, तर त्यावर प्रहारही केले. अशा सुधारणावाद्यांमध्ये लोकहितवादी आणि राजारामशास्त्री भागवत यांचा विचार विशेष महत्वाचा असल्याचे दिसून येईल. लोकहितवार्दीनी आपल्या शतपत्रांतून ब्राम्हणवर्गावर टीका केली. मनुष्य मात्रास तुच्छ लेखू नये. जाती अभिमान नसावा, गुणेवरून व योग्यतेवरून जातीभेद मानावा, कुले करून मानू नये.[१८] अशा प्रकारचे विचार प्रतिपादिले जातीसुधारण्याच्या संदर्भात जातीअभिमान नसावा, गुणेकरून जातीभेद मानावा इथपर्यंतच लोकहितवार्दीची उडी जाते ''ब्राम्हणांनी रामोशाची सोयरीक करावी'' हे मात्र त्यांना प्रशस्त वाटत नाही. चार वर्णांची व्यवस्था प्रत्येक समाजासाठी आवश्यक आहे असेही ते सांगतात. जातीभेदासारख्या प्रश्नांवरचा लोकहितवादीचा तोडगा काय तर ''ब्राम्हणांनी सुधारले पाहिजे'' ब्राम्हणांची सुधारणा झाली की सर्व हिंदूची सुधारणा झाली असे ते सांगतात.[१९] म्हणजेच हिंदू समाजाची प्रगती वा अधोगती मोजण्याचा त्यांचा मानदंड हा अजूनही ब्राम्हणवर्गच आहे. या गोष्टी पाहिल्यावर लोकहितवार्दीची प्रज्ञा ही ब्राम्हणी अस्मितेमध्येच कशी अडकून पडली होती हे सहजच स्पष्ट होते.

वर्णव्यवस्थेविषयीचे राजारामशास्त्री भागवतांचे विचारही काहीसे वेगळे आहेत. वंशशुद्धीसाठी वर्ण वा जाती व्यवस्था अस्तित्वात आली हे त्यांना मान्य नाही. चारही वर्णात पूर्वीच्या काळी लग्न व्यवहार नि:संशय होत असे, असे ते सांगतात. कोणालाही ब्राम्हण वर्णात समाविष्ठ होणे शक्य होते असेही ते प्रतिपादितात. त्यांच्या मते हा मुळ ब्राम्हण धर्मच खरा रसरशीत, जिंवत असा होता. तत्कालीन हिंदू धर्म (अस्पृश्यता वगैरे पाळणारा) आणि ब्राम्हण धर्म यात राजारामशास्त्री भागवतांनी भेद केल्याचे दिसते. मुळ ब्राम्हण धर्म हा चांगला होता असे ते म्हणतात. 'मी ब्राम्हण आहे, हिंदू नव्हे' या त्यांच्या विधानाचा अर्थही हाच होय. पण तत्कालीन समाजातील ब्राम्हणांचे इतर जातीपासून

फटकून वागणे, स्वत:ला श्रेष्ठ समजणे हे मात्र त्यांना 'शहाणपणाचे' वाटत नाही. ब्राम्हणांचा खोटा अभिमान हा त्यांना आत्मघातही वाटतो.[२०] राजारामशास्त्री भागवतांच्या या विचारांमुळे त्यांना तत्कालीन ब्राम्हणेतर चळवळीच्या विस्फोटाची जाणीव झाल्याचे स्पष्ट दिसते. म्हणूनच वेदोक्त प्रकरणी ते क्षत्रियांची बाजू उचलून धरतात व यातून त्यांची काळाबरोबर बदलण्याची सुधारकी वृत्ती स्पष्ट होते. दादोबा पांडूरंग यांनी तर जाती भेद मोडण्याच्या उद्देशाने १८४० साली 'परमहंस सभा' नावाची एक गुप्त संस्थाही काढली होती. जातीव्यवस्थेमुळे सामाजिक ऐक्यास बाधा पोहचते, सामाजिक तणाव वाढतात ह्या पलीकडे जाऊन ती व्यवस्था ही एक प्रचंड शोषण करणारी व्यवस्था आहे व तिच्या शोषण प्रधान स्वरूपाचा वेध घेतला पाहिजे. असे ब्राम्हणी परंपरेतील सुधारणावाद्यांनी केलेली जाती मीमांसा त्या काळाच्या संदर्भात पुरोगामी असली तरी ती क्रांतिकारी नव्हती असे म्हणावे लागते.

**ब–हिंदुराष्ट्रवादी :**

जाती संस्था व तिच्याशी निगडीत असलेल्या प्रश्नांचा विचार राजवाडे, केतकर, सावरकर, श्री. म. माटे हे विचारवंत मुख्यत्वे हिंदुराष्ट्रवादाच्या संदर्भात करतात. सावरकर व माटे यांचा जाती विषयक विचार तर प्रामुख्याने अस्पृश्यतेच्या कक्षेत व हिंदुहितसंवर्धनाच्या संदर्भातच झाल्याचे दिसते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या मते जात ही जन्माधिष्ठित नव्हती ती कर्माधिष्ठित होती. व्यक्तिला गुण प्राप्त करता येतात व त्या त्या गुणानुसार ती ती जात प्राप्त होते. त्यांच्या दृष्टिने जातिव्यवस्था गुणधिष्ठित असली तरी आता ती कालबाह्य ठरली आहे. एके काळी गुणाधिष्ठित जातिव्यवस्थेने मोठी कामगिरी केली आहे. जाती व्यवस्थेची रचनाही हिंदुच्या पूर्वजांनी केलेली चूक नव्हे. जातीव्यवस्था हिंदू समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. अशा प्रकारच्या व्यवच्छेदक लक्षणामुळे समाजाचे राष्ट्रस्वरूप व्यक्त होते. सावरकरांच्या मते हिंदू समाज राष्ट्रस्वरूप होता. स्वातंत्र्यवीर सावरकर एका बाजूला जाती भेद नष्ट होण्यासाठी साफ बेड्या तोडण्याचा कार्यक्रम हाती घेत असतानाच दुसऱ्या बाजूला ब्राम्हणांनीही आपापल्या उत्कर्षासाठी जातीय संघटना बांधण्यात काहीच गैर नाही असे सांगतात.[२१] अस्पृश्यतेची प्रथा आर्यपूर्व आहे आणि ती द्रविडांनी आदिद्रिविडांच्या बाबतीत आंगेकारली होती असे माटे यांचे मत होते. म्हणून आर्य येथे आले तेव्हा वंश शुद्धीसाठी त्यांनी हीच प्रथा कायम ठेवली. या प्रथेला धार्मिक अधिष्ठान मिळाले. त्रिवर्णांनी शूद्रांसह एक प्रचंड संघटना निर्माण केली आणि अतिशूद्र भावकीत आणि शेतीत आधिच प्रविष्ठ होते, म्हणून त्यांना सरहद्दीवर ठेवले, असा इतिहास माटे मांडतात.[२२] अस्पृश्यता हा घोर अन्याय आहे. असे माटे पुन्हा

पुन्हा मांडतात पण अस्पृश्यता घालविणे म्हणजे अस्पृश्यांना चातुर्वर्ण्य चौकटीत पाचवा वर्ण म्हणून सामावून घेणे एवढेच त्यांना अभिप्रेत आहे असे दिसते.

भारतीय राष्ट्रवादाची उभारणी करतांना परकीय सत्तेच्या संदर्भात हिंदू समाज रचनेचे अनन्यत्व स्पष्ट करण्यासाठी पश्चिमेची संस्कृती, जडवादी, इहवादी, भोगप्रधान, एकसुरी आहे. ती वर्गीय म्हणून अधिक शोषक आहे. तर आमची संस्कृती चैतन्यवादी, धर्मप्रवण त्यागप्रधान आणि वैविध्यपूर्ण एकता असलेली, जाती संस्थात्मक म्हणून कमी शोषक आहे. अशी मांडणी करून जातीबद्ध समाज रचनेची वास्तवता झाकण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात राष्ट्रवादी विचारसरणी निश्चितच प्रागतिक होती पण परंपरागत जातीबद्ध समाज रचनेच्या संदर्भात ती प्रतिगामी ठरली. परिणामत: मध्यम व कनिष्ठ जातीच्या विमोचनाच्या संदर्भात तिने कोणतीच महत्त्वाची भूमिका बजावली नाही. म्हणजेच सावरकर किंवा माटे यांचा जातिविषयक विचार प्रामुख्याने अस्पृश्यतेच्या प्रश्नांच्या कक्षेत व हिंदू हितसंवर्धनाच्या संदर्भात झाल्याचे दिसते.

**क – समाजशास्त्रीय :**

ऐतिहासिक व समाजशास्त्रीय संशोधनाच्या अधिष्ठानावर भारतीय जातिविषयक विचारांची मांडणी प्रामुख्याने राजवाडे आणि केतकर यांनी केली. राजवाडे 'राधाम ाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेत लिहितात, जाती अनादी नाहीत. बौद्ध काळात त्यांचे रूपांतर जाती संस्थेत झाले. सर्व जातींना एकच सावळारंग असल्यामुळे वर्णभेदाचे कारण उरले नाही. बहुतेक जाती अन्योन्य वृत्तीचे उल्लंघन करू लागल्यामुळे जाती भेदाचीही मातब्बरी निर्वाह दृष्ट्या फारशी राहिली नाही. याचबरोबर पुढे लगेचच ते लिहितात 'परंतु पिडीजात म्हणजे पिढिका जात वांशिक गुणांच्या दृष्टिने जाती संस्था एकाएकी रासभ्याने मोडणे इष्ट होणार नाही. गुण पिढ्यानपिढ्या संक्रमण होत होत उपजत होतात. असले अनेक उपजत गुण हिंदू जातींनी पैदा केले आहेत ते जाती मोहाने फुकट घालणे राष्ट्रहिताचे नाही.[२३] यावरून राजवाड्यांसारख्या प्रत्यक्षवादी निर्भीड इतिहास संशोधकास ब्राम्हण जातीयतेच्या मर्यादा ओलांडता आल्या नाहीत हे त्यांच्या विचारातून स्पष्ट होते पण हे सर्व मान्य करूनही केतकर, राजवाडे यांसारख्या विद्वानांनी इतिहास, समाजशास्त्राच्या क्षेत्रात जी एक व्यापक संशोधनाची शिस्त घालून दिली त्यामुळेच पुढे श्री. गो. स. धुर्वे किंवा श्रीमती इरावती कर्वे यांसारखे उच्च प्रतीचे समाजशास्त्रज्ञ निर्माण होऊ शकले याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. श्री. गो. स. धुर्वे यांच्या लिखाणातून राष्ट्रीय अभिनिवेशनापासून काहीसा मुक्त झालेला जातीविषयक

विचार आधुनिक समाजशास्त्राच्या परिभाषेत व्यक्त होताना दिसतो. श्रीमती कर्वे यांच्या ग्रंथातूनही जातिविषयक विचारांना एक व्यापक समाजशास्त्रीय व विशेषत: मानववंश शास्त्रीय बैठक प्राप्त झाल्याचे दिसते.[२४]

**ड – सनातनी :**

गंगाधर शास्त्री फडक्यांसारख्या व्यक्तिंतनी जाती संस्थेचे समर्थनच केले. १८५२ साली प्रसिद्ध केलेल्या हिंदू धर्म तत्व या आपल्या पुस्तकामध्ये जातीभेद हे ईश्वरी संकेतानुसार निर्माण झाले असून ते पाळण्यात कोणताच वाईटपणा नाही असे गंगाधर शास्त्री फडके सांगतात. जातीभेद मोडले तर त्यात समाजाचे अहितच आहे. खालच्या जातीच्या लोकांनी शिक्षण घेवून उच्च व्यवसाय प्रतिष्ठा स्वीकारली तर हलकी सलकी कामे कोण करणार असा प्रश्न गंगाधर शास्त्री फडक्यांना पडतो व म्हणूनच जातीभेद असणे इष्ट होय असे ते म्हणतात. किंबहुना जातीभेदामुळेच हिंदुधर्म टिकून राहिला आहे आणि जर जातीभेद नष्ट झाला तर हिंदू धर्म ही बुडेल अशी भिती त्यांना वाटते.[२५] विष्णुबुवा ब्रम्हचारी हे देखील 'वेदोक्त धर्म प्रकाश' या आपल्या पुस्तकात जन्मजात श्रेष्ठतेऐवजी सत्व–रज–तमोगुणानुभावे निर्माण होणाऱ्या कर्मानुसार श्रेष्ठ कनिष्ठता ठरवावी, असा काहीसा वरवर पाहता सुधारणावादी विचार सांगत असले तरी जिथे कर्मच जन्मसिद्ध आहे तिथे कर्मानुसार जेष्ठ–कनिष्ठता कशी ठरवावयाची या मुळ प्रश्नाला बगल देताना दिसतात.[२६] जाती मीमांसेच्या या ब्राम्हणी परंपरेतील हे विचार पाहिल्यानंतर जाती विषयक चिंतणाच्या मर्यादा आणि वैशिष्ट्ये सहजच ध्यानात येतात. साररूपाने ती पुढीलप्रमाणे सांगता येतील. १) या परंपरेने संपूर्ण वर्ण–जातीनिर्मूलनाचा विचार कधीच मांडला नाही. अस्पृश्यता नष्ट व्हावी, जाती द्वेष नसावा या पलीकडे या परंपरेचा सुधारणा वाद गेला नाही. २) वर्ण–जाती व्यवस्था सामाजिक ऐक्यास बाधा आणते हे जरी या परंपरेच्या ध्यानी आले असले तरी तिचे शोषण प्रधान स्वरूप या परंपरेस कधीच आकळले नाही. ३) या परंपरेतील काही विचारवंतांनी जाती भेदावर टीका केली असली व ते नष्ट व्हावे म्हणून प्रयत्न केले असले तरी त्यामागील प्रेरणा ही समतेची नसून व्यावहारिक उपयुक्ततेची किंवा हिंदू राष्ट्राच्या उत्कर्षाची आहे हे निर्विवाद. ४) जाती भेदासंबंधी टीकात्मक भूमिका घेतानाच या परंपरेतील काही मंडळी तर तथाकथित श्रम विभागणीच्या तत्वावर व गुणतत्वावर आधारित वर्णव्यवस्थेचे गुणगाण गातात, इतकेच नव्हे तर त्या व्यवस्थेचे पुनरूज्जीवन व्हावे असेही म्हणतात.[२७]

**(२) अब्राम्हणी परंपरेतील जाती विषयक विचार :**

एकोणिसाव्या शतकातील प्रबोधनाचे नेतृत्व हे मुख्यत्वे ब्राम्हण वर्गाकडे गेले असले तरी आधुनिक शिक्षणाची संधी सर्व जातींना इंग्रजी राजवटीत प्रथमच उपलब्ध झाली असल्याने महाराष्ट्रातील ब्राम्हणेतर जातीतून एक नवशिक्षित पिढीही तयार झाली होती. पारंपारिक अब्राम्हणी परंपरेमध्ये उदारमतवाद, व्यक्तिवाद, नागरीहक्क इ. आधुनिक विचार–कल्पनांचा अंतर्भाव करून अर्वाचीन काळास सामोरे जाण्याची क्षमता निर्माण केली ती या नवशिक्षित मध्यम व दलित जातीतील वर्गानीच. अब्राम्हणी परंपरेचा उद्‌गाता म्हणून या वर्गाकडे पाहिले पाहिजे. प्रबोधन काळामध्ये अर्वाचीन महाराष्ट्रात जाती संस्थेविषयी जे विचार मंथन झाले त्यात ब्राम्हणी विचारवंतांबरोबरच या अब्राम्हणी विचारवंतांनीही आपले जातिसंस्था विरोधी विचार सातत्याने प्रतिपादिले. तुकाराम तात्या पडवळ यांनी १८६१ साली 'एक हिंदू' या टोपण नावाने 'जातीभेदविवेकसार' हे पुस्तक प्रसिद्‌ध केले व त्यात हिंदुस्थान सर्व प्रकारचे निचावस्थेस येण्याचे कारण हा जातिभेद आहे, असा विचार स्पष्ट शब्दात मांडला. इतकेच नव्हे, तर जातिभेदाचा प्रकार हा सृष्टी क्रमाविरूद्‌ध असून त्यामुळे माणसां–माणसांत भेद निर्माण होतात असे त्यांनी स्पष्ट बजावले. १८७० साली सिदोबा बापूजी मिसाळ यांनी प्रसिद्‌ध केलेल 'जातीभेदावर संभाषण' हे पुस्तकही या संदर्भातील महत्वाचे पुस्तक होते.[२४]

**अ – महात्मा ज्योतिराव फुले :**

पण अर्वाचीन महाराष्ट्रातील अब्राम्हणी विचार परंपरा आत्मनिर्भर झाली ती ज्योतिबा फुल्यांच्या क्रांतिकारक विचारांनीच. 'ब्राम्हणाचे कसब' (१८६६), 'गुलामगिरी' (१८७३) यांसारख्या पुस्तकातून ज्योतिबा फुल्यांनी महाराष्ट्रातील जातीविषयक प्रश्नांच्या गाभ्यालाच हात घातला. वर्ण–जाती संस्थेचे शोषण प्रधान स्वरूप ज्योतिबा फुल्यांनी प्रथम उघडकीस आणले. पुरूषसूक्तातील व मनुस्मृतितील वर्ण–जाती व्यवस्थेच्या निर्मिती बाबतचा ईश्वरी सिद्‌धांत ज्योतिबा फुल्यांनी नाकारला व ऐतिहासिक विकास क्रमात उच्च वर्णीय–जातीय लोकांनी आपले राजकीय व आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी वर्ण–जातिव्यवस्था ब्राम्हणांच्या कसबातून कशी निर्माण झाली हे त्यांनी भारतीय इतिहासाचा आलेख रेखाटून स्पष्ट केले. ज्योतिबा फुल्यांच्या लिखाणात वस्तुनिष्ठ ऐतिहासिक पुराव्यांचा अभाव दिसून येत असला तरी इतिहासाकडे पाहण्याची त्यांची दृष्टिही ऐतिहासिक भौतिकवादी अन्वेशन पद्‌धतीच्या खूपच जवळ जाणारे आहे. वर्ण–जातीबद्‌ध समाजाचा इतिहास हा शूद्रातीशूद्रांच्या शोषणाचाच इतिहास आहे व

वर्ण संस्था आणि जाती संस्था या शोषणाच्या यंत्रणा असून त्यांचा संपूर्ण बीमोड झाल्याशिवाय न्यायधिष्ठित, समताधिष्ठित समाजाची निर्मिती असंभवणीय आहे असे ज्योतिबा फुल्यांनी स्पष्टपणे सांगितले.[२९]

ज्योतिरावांना केवळ कर्ता सुधारक म्हणून भागणार नाही तर या देशात क्रांतिचे पहिले स्वप्न ज्याला पडले असा हा पहिला द्रष्टा क्रांतीकारक होता.[३०] अन्य सुधारकांनी समाज सुधारणेचा पुरस्कार केवळ तात्विक वैचारिक पातळीवरून केला मात्र प्रत्यक्षात कृतीची वेळ आली असता मात्र त्यांनी माघार घेतली. ज्योतिरावांनी स्त्री शिक्षणाचा नुसता पुरस्कार करून थांबले नाहीत तर त्यांनी मुलींची पहिली शाळा काढली अन्य सुधारक व ज्योतिराव फुले यांच्या चळवळीतील मूलभूत फरक लक्षात घेतला तर ज्योतिराव हेच क्रांतिकारक होते व अन्य सगळे सुधारक होते.[३१] ब्राम्हणशाहीला विरोध हा ज्योतिरावांचा सत्यशोधक चळवळीचा फक्त एक भाग होता. त्यांचा विरोध केवळ ब्राम्हण जातीला नव्हता तर जन्मसिद्ध उच्चनीचतेच्या पायावर उभ्या असलेल्या संपूर्ण जाती व्यवस्थेचे उच्चाटन त्यांना अभिप्रेत होते. त्यांनी आक्षेप घेतला होता तो केवळ ब्राम्हण पुरोहित धर्मविधीत सहभागी असण्याला नव्हता, तर पुरोहित नामसंस्थेलाच त्यांचा नकार होता.[३२] 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ज्योतिरावांचा ग्रंथ म्हणजे मानव मुक्तिचा महान संदेश देणारा ज्ञान कोशच आहे. यातील फुल्यांचा धर्म वैदिक धर्माप्रमाणे मोजक्या लोकांपुरता मर्यादित नसून तो सर्व लोकांना उपलब्ध आहे. तो वैदिक धर्माप्रमाणे विषमता, शोषण, कृत्रिमता इ. असत्य मूल्यांवर आधारलेला नसून सत्य स्वरूपी आहे. महात्मा फुल्यांच्या आंदोलनाचा आधार शुद्रातीशुद्र होता. हा देश मूठभर ब्राम्हणांचा नि उच्च वर्णियांचा का स्त्री शुद्रातीशूद्रांचा ? येथे ९५ टक्के स्त्री शूद्रातीशूद्र आहेत. मग कोणाचा देश समजावा, हा प्रश्न एकट्या फुल्यांनी उपस्थित केला होता.[३३] महात्मा फुले यांना अभिप्रेत असलेल्या नवी समाज व्यवस्था ही समानता व विवेक मान्य तत्वावर आधारलेली असेल सर्व मानव एक जात. तसेच स्त्री पुरूष यामध्येही पूर्ण समानता. या व्यवस्थेत जसे जातीपातीस स्थान नाही, तसेच स्त्री वरील अन्यायासही नाही. सती सक्ती, वैधव्य, केशवपन, स्त्री–शिक्षणावरील बंदी, बहुपत्नीत्व या सर्व गोष्टी नव्या व्यवस्थेत एका फटक्यात नष्ट होतात. परिवर्तनाची ही रूपरेषा अत्यंत व्यापक आणि मुलगामी आहे यासाठी कनिष्ठ जातीगटात जागृती निर्माण करण्याकरिता महात्मा फुल्यांनी प्रचंड परिश्रम केले.

**ब – महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :**

महात्मा फुल्यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाची चळवळ काही काळ थंडावली. अस्पृश्योद्धाराची चळवळ ब्राम्हण पुढाऱ्यांच्या कह्यात गेली. आणि अस्पृश्यांची स्थिती आंबेडकरांचे कार्य सुरू होईपर्यंत तरी दयनीयच राहिली. याच वेळी वि. रा. शिंदे यांनी १९०६ मध्ये 'निरक्षित सहाय्यकारी मंडळी' या नावाची संस्था स्थापन करून अस्पृश्यांच्या सर्वांगीण विकासाचा, प्रगतीचा अधिक संघटितपणे प्रयत्न केला. शिक्षण प्रसाराबरोबरच अस्पृश्यांना नोकऱ्या मिळवून देणे, त्यांच्या सामाजिक अडचणींचे निवारण करणे, त्यांच्यामध्ये सार्वत्रिक धर्म, व्यक्तिगत शील आणि नागरिकता इ. गुणांचा प्रसार करणे इ. कार्य या मंडळाच्या माध्यमातून केले.[३४] भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न या ग्रंथात महर्षी शिंदे यांनी ''आर्यांचा हिंदुस्थानात कायमचा जम बसल्यानंतर त्यांनी तेथील दस्यू उर्फ शूद्र लोकांना आपल्या वस्तीजवळच, पण बाहेर राहण्यास लावले. ज्याअर्थी हैय व हिना नावाच्या अस्पृश्य जाती अद्यापि आहेत त्याअर्थी अस्पृश्य जात ही संस्था आर्यांनीच निर्माण केली असून तिचा प्रादूर्भाव पूर्वी मोघल लोकांतही होता.''[३५] तेव्हा दीर्घकाळ ही अस्पृश्यता आपल्या समाजात भिनलेली आहे. ती दूर करण्याचा, समाजाला निकोप बनविण्याचा ध्यास त्यांनी घेतला होता. महर्षी शिंदे यांनी 'अस्पृश्यता निवारक संघ' सथापन करून अनेक उपक्रम हाती घेतले. सतत दहा वर्षे पाठपुरावा करून त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करण्याचा ठराव करणे काँग्रेसला भाग पाडले. ब्राम्हणेतर चळवळ जर केवळ ब्राम्हण विरोधाच्या नकारात्मक राजकारणात अडकून पडली तर समाज परिवर्तनाच्या चक्राची गती रूद्ध होईल व पर्यायाने दलितांचा प्रश्न पुढे ढकलला जाण्याची रास्त भिती महर्षी वि. रा. शिंदेंना वाटत होती. विनाकारण अस्पृश्य मानलेल्या या समाज घटकास ब्राम्हण काय, ब्राम्हणेतर काय, मजूर काय, भांडवलदार काय, कोणीही प्रामाणिकपणे ह्या राजकारणाच्या खेळात घेण्यास तयार नाही, ही महर्षी वि. रा. शिंद्यांची खंत होती आणि म्हणूनच एरवी जातवार प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाच्या विरोधी असणाऱ्या शिंदेनी दलितांसाठी मात्र राखीव जागांचा आग्रह धरला होता.[३६]

**क – डॉ. बाबासाहेब आंबेडकर :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिसंस्थेसंबंधी केलेले विवेचन थोडक्यात असे सांगता येईल. ''जगातील इतर सर्व समाजाप्रमाणे भारतीय समाजही कालौघात वर्गीय समाज बनला. त्या काळात त्यात (१) ब्राम्हण किंवा पुरोहित (२) क्षत्रिय किंवा सैनिक

(३) वैश्य किंवा व्यापारी (४) शुद्र किंवा शेतकरी, मजूर आणि कलावंत एवढे वर्ग होते. सुरुवातीला हे वर्ग परिवर्तनीय होते. त्यांच्या व्यक्तिगत गुणावगुणांमुळे वर्गातील व्यक्ती बदलत राहत होत्या. परंतु पुढे कधीतरी हिंदूंच्या इतिहासात पुरोहितवर्गाने इतर जनतेपासून स्वत:ला वेगळे तोडून घेतले आणि आपल्या वर्गात इतरांना प्रवेश नाकारून स्वत:च्या वर्गाचे जातीत रूपांतर करून घेण्यात हा वर्ग यशस्वी झाला. पुढे श्रमविभागणीच्या तत्त्वानुसार बाकीच्या जनतेची विभागणी झाली. क्षत्रिय वर्गाची तर राज्यकर्ते आणि सैनिक अशी पोट विभागणी झाली. ही पोट विभागणी नैसर्गिक होती हे खरे. परंतु वर्ग पद्धतीतील मुक्त प्रवेशपद्धती बंद करणे ही अनैसर्गिक बाब होती. त्यामुळे वर्ग बंदिस्त झाले व जाती उदयास आल्या.'' जातीभेदाला मौर्यकाळात ओहोटी लागली व शूद्र लोक सत्ताधारी बनले. परंतु ब्राम्हण धर्माने प्रतिक्रांती केली आणि पुन्हा चातुर्वर्ण्य सुरू झाले. बहुसंख्य भारत दास झाला आणि परकीयांच्या आक्रमणास बळी पडला. आज स्वातंत्र्यानंतर पुन्हा वर्णव्यवस्थेच्या समर्थकांनी उचल खाल्ली आहे. रामराज्याचे समर्थक धर्माच्या नावाखाली चातुर्वर्ण्य व्यवस्थेचे पुनरूज्जीवन करीत आहेत. बाबासाहेबांनी ४० वर्षापूर्वी सांगितले की, ''हा प्रतिक्रांतीचा काळ आहे'' ते आज खरे ठरत आहे.[३७]

जाती व्यवस्था ही शोषणाची यंत्रणा आहे. तिच्या दृढीकरणास येथील हिंदूधर्म कारणीभूत आहे. भारतातील अर्थिक विषमतेस व सामाजिक शोषणास इथली जाती व्यवस्थाच जबाबदार असल्याने जाती व्यवस्थेचे निर्मूलन झाल्याशिवाय भारतात लोकशाही क्रांती होणार नाही, असे डॉ. आंबेडकरांना वाटते.[३८] डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य–समता–बंधुभाव ही आदर्श तत्त्वे मानली. 'ॲनिटिलेशन ऑफ कास्ट' या ग्रंथात ते म्हणतात, मला विचाराल तर माझा आदर्श समाज म्हणजे स्वातंत्र्य समताशाही बंधुभावावर आधारित समाज असेल. पुढे ते म्हणतात, माझे सामाजिक तत्त्वज्ञान हे निश्चितपणे तीन शब्दात गुंफले जाण्याचा संभव आहे, ते म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुभाव.[३९] जातीव्यवस्थेचे वर्णन बाबासाहेब आंबेडकरांनी 'प्रत्येक मार्गावर तुमच्या वाटेत उभा असलेला भस्मासूर' अशा शब्दात केलेला आहे. चातुर्वर्ण्य समाजरचनेत धार्मिक सामाजिक रचनेतील सत्ताधारी व प्रतिष्ठित ब्राम्हण गट राजकीय रचनेतील निर्णय वा प्रक्रियेवर सतत प्रभाव गाजवित आला आहे. ती समाज रचना टिकविण्यासाठी व आपल्या हितासाठी तीत बदल करण्यासाठी तो राजकीय सत्तेवर प्रभाव टाकीत असे. ज्या सत्तेवर ब्राम्हणांचा दावा होता, त्यालाच सर्वप्रथम तथागत

बुद्धाने आव्हान दिले. ज्यांचे वर्ण जाती व्यवस्थेत स्थान सुरक्षित असते आणि ज्यांना परंपरेने सर्वोच्च अधिकार ज्या व्यवस्थेने दिलेले आहे, ती व्यवस्था कायम राहवी म्हणून त्यांनी धडपड चाललेली आहे. त्यांना समता, न्याय, मानवता या मूल्याधिष्ठित असलेला आधुनिक समाज नको आहे. त्यांना सामाजिक विषमतेला दैवी अधिष्ठान देणारा सनातन धर्म हवा आहे. आधुनिक काळात धर्माची विज्ञानाशी टक्कर होऊन सुद्धा सैद्धांतिक पातळीवर पराभूत झालेले धर्म व्यावसायिक पातळीवर विजयी झालेले दिसतात. त्यामुळे अगोदरच जातीयतेने परिपूर्ण असलेला समाज अधिकच जातीयवादी झाला. भारतात सांप्रदायिक वा मूलतत्त्ववादी घटनाविरोधी शक्तिने लोकशाहीच्या मार्गाने जातीयता दृढमूळे केली बाबासाहेब स्पष्ट म्हणतात की, लोक जात पाळतात ही त्यांची चूक नाही. चूक आहे त्यांच्या धर्माची. धर्मानेच त्यांच्या मनावर जातीची कल्पना बिंबवली आहे. पुढे ते असेही म्हणतात की, जातिव्यवस्थेची संघटना सामाजिक मानसिकता निर्माण करण्यास जबाबदार आहे. तिने वरच्या जातिबद्दल द्वेषाची व खालच्या जातिबद्दल तिरस्काराची भावना निर्माण केली.[४०]

आंबेडकरांच्या मते ब्राम्हण हा धर्म सुधारक होऊ शकत नाही व ही गोष्ट गेल्या शंभर वर्षाच्या इतिहासाने सिद्ध केली आहे. या धर्माची सुधारणा करण्याकरिता फुल्यांसारख्या माळ्याला व आंबेडकरांसारख्या 'अस्पृश्याला' झिजावे लागेल. म्हणून तर आंबेडकर अतिशय त्वेषाने म्हणतात, ''ब्राम्हण्यवाद हे विष असून त्याने हिंदू धर्म बिघडवून टाकला आहे. तुम्ही जर ब्राम्हण्यवादाला ठार केले तरच तुम्ही हिंदू धर्म वाचवण्यास यशस्वी व्हाल.'' म्हणूनच डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या प्रथेवर प्रहार चढविला. अस्पृश्यताविरोधी परिषदेत त्यांनी मनुस्मृतीचे जाहीरपणे दहन केले. महाड येथील चवदार तळ्यावर सामुदायिक सत्याग्रह केला. सन १९२४ मध्येच आंबेडकरांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या नावाची संस्था स्थापन करून संस्थेचे मुखपत्र 'बहिष्कृत भारत' साप्ताहिक काढले. यातून हिंदू धर्मशाळावर कडाडून हल्ला चढविला. तसेच अस्पृश्यांच्या व्यथा वेदना त्यांच्यावर होणारा अन्याय अत्याचार यांना वाचा फोडून त्यांची बाजू सरकार दरबारी मांडता यावी यासाठी डॉ. आंबेडकरांनी सन १९२० रोजी 'मुकनायक' या पाक्षिकाची सुरुवात केली.

**ड – छत्रपती महर्षी शाहू महाराज :**

शाहू महाराजांच्या क्रांतिचे स्वरूप दुहेरी होते, परकीय आणि स्वकीय अशी ही रूपे होती. परकीयांशी लढाई त्यांच्यामधील चांगले स्वीकारण्याबाबत होती, त्याचबरोबर त्यांनी हिरावून घेतलेले हिंदुस्थान देशाचे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी होती. तर स्वकीयांशी केलेला

लढा. सर्वच अर्थांनी विराट होता. समाजाच्या सर्वकष पारतंत्र्यापासून मुक्तता हा ह्या लढ्याचा होतू होता. त्यामध्ये आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक अशा अनेक गुलामगिरीतून या दीन-दलित वर्गाची सोडवणूक करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.[४१]

जातिभेद मोडून केवळ जन्माच्या सबबीवर दुसऱ्यास हीन मानण्याचे नाहीसे होईल. या रीतीने जातिद्वेषाचा नायनाट होईल तो सुदिन असे मी समजेन असे एका भाषणप्रसंगी महाराज म्हणतात. त्यासाठी त्यांनी जपानमधील सामुराई लोकांनी आपला जन्माने प्राप्त झालेला उच्च दर्जा सोडून दिला म्हणून जपान मध्ये ऐक्य होऊन त्या देशाची उन्नती झाली. त्याचप्रमाणे ब्राम्हणांनी जातिमत्सर सोडल्याशिवाय आमच्या लोकांची उन्नती होणार नाही. शाहू महाराजांनी भटा-भिक्षुकांविरुद्ध आणि पुरोहितशाहीविरुद्ध दंड थोपटून बंड केले. परंतु ब्राम्हणांच्या पुरोहितशाहीऐवजी ब्राम्हणेतरांच्या पुरोहितशाहीचा पुरस्कार केला. आता विज्ञानाची खूपच प्रगती झाली आहे. आता आपण केवळ ब्रह्मणांची पुरोहितशाही नको असे म्हणून थांबू नये तर कसलीच आणि कुणाचीच पुरोहितशाही नको यासाठी जागृती केली पाहिजे.[४२] शाहू महाराजांनी समाजातल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या विकासासाठी २६ जुलै १९०२ रोजी आपल्या संस्थानात ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा केला. सन १९१९ च्या वटहुकुमाने करवीर इलाख्यात, जहागिरी वगळता अस्पृश्यांच्या मुलांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळा बंद करण्यात आल्या. संमिश्र शाळांना प्रोत्साहन देण्यात आले. मुलकी परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी देण्याचे आश्वासन देण्यात आले व ते पाळण्यातही आले. यावरून जातीयता नष्ट करून निकोप शिक्षण मिळावे म्हणून शाहू महाराजांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केलेले दिसतात.[४३]

जातिमीमांसेची ही अब्राम्हणी परंपरा ब्राम्हणी परंपरेहून सर्वार्थाने भिन्न असल्याचे दिसते. जातिमीमांसेला परिवर्तनवादी, संघर्षवादी बनविले ते याच परंपरेने. ब्राम्हणी परंपरेच्या संदर्भात या परंपरेची सारभूत वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील : (१) अब्राम्हणी जातिमीमांसेने जातिसंस्थेचे शोषणप्रधान स्वरूप प्रथम स्पष्ट करून ते ऐतिहासिक विकासाच्या संदर्भात मांडले. (२) जातिव्यवस्था ही एक शोषणव्यवस्था असल्याने तिच्या समूळ उच्चाटनाशिवाय सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना होणे अशक्य आहे हे या मीमांसेने नि:संदिग्धपणे सांगितले. (३) जातिसंस्थेचे मूळ हे वर्णसस्थेमध्येच आहे हे निश्चित ध्यानात घेऊन वर्ण व जातींचा एकसमयावच्छेदकरून अंत केल्याशिवाय समताधिष्ठित समाज निर्माण होणार

नाही हे ओळखून जातिभेदावर उपाय म्हणून गुणकर्माधिष्ठित वर्णव्यवस्थेचा पुरस्कार या मीमांसेने बिलकूल केला नाही. (४) राष्ट्रोन्नतीसाठी जातिभेदनिर्मूलन ही प्रेरणा अब्राम्हणी परंपरेची कधीच नव्हती. उलट, व्यक्तिची माणूस म्हणून प्रतिष्ठा कशी आबाधित राहील हे तिने पाहिले. (५) जातिव्यवस्थेच्या संदर्भात भारतीय इतिहासाचे अन्वेषण करताना या परंपरेने केवळ उच्चवर्णीय जातीय अभिजात संस्कृत वाङ्मयाचा आधार न घेता बौद्ध, जैन लिंगायत व तत्सम भक्तिमार्गी प्राकृत वाङ्मयाचा, लोकपरंपरेचा, आधुनिक भाषाविज्ञानाचा, शोषकशासित संबंधातील कार्यकारणाभावाचा समग्र विचार करून जातिव्युत्पत्ती, विकास व ते निर्मूलनाची दिशा दिने दाखविले म्हणूनच ब्राम्हणी विचारपरंपरेहून ती खऱ्या अर्थाने प्रागतिक, पुरोगामी अशी ठरते.

**(३) मार्क्सवादी मीमांसा :**

अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसेला सर्वात शास्त्रशुद्ध बैठक देण्याचा प्रयत्न झाला तो मार्क्सवादी विचारवंत आणि अभ्यासकांकडून. पहिल्या महायुद्धाच्या सुमारास आणि विशेषत: १९१७ मधील रशियन राज्यक्रांतीनंतर मार्क्सवादी विचारसरणीने भारतात मूळ धरावयास सुरूवात केली. साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. मार्क्सवादी अन्वेषणपद्धत वापरून भारतीय इतिहासाचा वेध घेण्याचा प्रयत्न सुरू झाले. त्या निमित्ताने भारतातील परंपरागत वर्ण व जातिव्यवस्थेची चिकित्सा सुरू झाली. महाराष्ट्रात वर्ण–जातिव्यवस्थेचा मार्क्सवादी दृष्टिकोनातून पहिला वेध घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न झाला तो श्री. श्रीपाद अमृत डांगे यांच्याकडून वर्गीय अन्वेषणपद्धतीचा अवलंब करून श्री. डांग्यांनी प्राचीन भारतीय इतिहासातील वर्गसंघर्षाचा आढावा घेतला.[४४] अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसेचा मार्क्सवादी विचारप्रवाह येथील साम्यवादयांपासून सुरू झाला व पुढे या प्रवाहाने अनेक वळणे घेत चालू शतकाच्या या दशकामध्ये जातिसंस्थेचे मार्क्सवादी आकलन अधिक प्रगल्भ केले. अर्वाचीन महाराष्ट्रातील जातिमीमांसकांच्या या मार्क्सवादी संप्रदायामध्ये मुख्यत्वे तीन विचारप्रवाह दिसून येतात : (१) पारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाह (२) अपारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाह (३) मार्क्सवादी–फुले–आंबेडकरवादी (माफुआ) विचारप्रवाह या तिन्ही प्रवाहांची येथे ओळख करून घेणे अगत्याचे आहे.

**अ – प्रारंपरिक मार्क्सवाद:**

पारंपरिक मार्क्सवादी विचारप्रवाहानुसार जात ही सरंजामी किंवा सामंतप्रथाक वर्गसमाजाची ऊर्ध्ववास्तू आहे. जातिसंस्थेबद्धलचा हा दृष्टिकोन सर्वसामान्यपणे पारंपरिक

साम्यवादी चळवळीकडून सातत्याने मांडला गेला आहे. या प्रतिपादनात असे गृहीत धरले आहे की जात ही समाजाची पायाभूत वास्तू किंवा भौतिक चौथरा नसून ती ऊर्ध्ववास्तू किंवा इमला असल्याने वर्गीय समाजामध्ये उत्पादनव्यवस्थेत आमूलाग्र बदल होताच वर्गीय क्रांती होईल व या क्रांतिमध्ये जुन्या उत्पादनसंबंधांवर आधारित ऊर्ध्ववास्तू आपोआपच नष्ट होईल. थोडक्यात म्हणजे भारतातील सामंतप्रथाक व्यवस्थेला शह देणारी भांडवलशाही क्रांती झाली की जातिव्यवस्थेची ऊर्ध्ववास्तू आपोआपच ढासळेल.[४५] परंतु आजवरचा अनुभव लक्षात घेता ही मीमांसा तोकडी पडल्याचे दिसते. पारंपरिक मार्क्सवादी विचारसरणीतील या मर्मावर पहिले बोट ठेवले ते श्रीमती नलिनी पंडित यांनी १९६५ साली प्रसिद्ध झालेल्या 'जातिवाद आणि वर्गवा' या आपल्या पुस्तकामध्ये प्रा. नलिनी पंडित यांनी जात व वर्ग या संस्थांच्या द्वंद्वाची सुस्पष्ट मार्क्सवादी मीमांसा केली आहे. त्यांच्या मते भारतातील सामाजिक घडामोडींचा अन्वयार्थ लावताना अनेकदा युरोपातील वर्गवादी विचारसरणी येथील विशिष्ट परिस्थितीचे भान न राखता वापरली जाते. त्यामुळे प्रत्येक जात म्हणजे एक वर्गच होय, अशा भावनेने जातीय संघर्ष आणि वर्गविरोध यांची गल्लत करण्यात येते वस्तुत: जात आणि वर्ग या दोन अगदी स्वतंत्र कल्पना आहेत. नलिनीताईच्या मते महाराष्ट्रातील कोणतीही जात आज वर्गदृष्ट्या एकत्र राहिलेली नाही. शेकडो वर्षाच्या परंपरेमुळे जातीय जाणीव प्रत्येक व्यक्तिमध्ये स्वाभाविकपणेच निर्माण होते. उलट, सतत वर्गलढे देऊनही वर्गीय जाणीव आर्थिक क्षेत्राच्या पलीकडे पसरत नाही.[४६] नलिनीताईंनी युरोपीय वर्गवादी भूमिकेतून जातिसंस्थेकडे पाहताना काय अडचणी येतात यावर नेमके बोट ठेवले आहे.

**ब –अपारंपरिक मार्क्सवाद :**

अपारंपारिक मार्क्सवादी दृष्टिकोनातून श्रीमती गेल ओमव्हेट यांनी जातिसंबंधीचे एक नवे विश्लेषण मांडले. त्यांच्या मते जात ही नातेगोतेसंबंध हा गाभा असलेली विशिष्टभूत अशी समाजिक संस्था आहे. नातेगोतेसंबंध व कुटुंब हे ऊर्ध्ववास्तूचा भाग असल्याने जात ही एक ऊर्ध्ववास्तू ठरते. त्या हेही बजावतात की ऊर्ध्ववास्तू हीएकजिनसी वास्तू नसून ती एक व्यापक कल्पना आहे. त्यात शासनसंस्था, धर्म, विचारसरणी यांचाही अंतभाव होतो. या कल्पनेप्रमाणे ऊर्ध्ववास्तू ही विविध उत्पादनपद्धतीत विविध रूपांमध्ये व विविध वैशिष्ट्याद्वारे अस्तित्वात असू शकते. म्हणूनच जात ही सरंजामीवर्गाची ऊर्ध्ववास्तू आहे असे म्हणून चालणार नाही. त्यांच्या मते ऊर्ध्ववास्तू ही नुसतीच दुय्यम नसते. तसेच ती केवळ आर्थिक पायाला प्रतिबिंबित करते असेही नाही. ऊर्ध्ववास्तूचे भाग आर्थिक पायावर परिणाम करतात, त्यात

फेरबदल करतात व ही प्रक्रिया विविध उत्पादनपद्धतींत विविध मार्गानी होत असते. भारताच्या सरंजामी कालखंडात जातिव्यवस्था उत्पादनसंबंधांची इतक्या परिपूर्णपणे रचना करीत होती की, ती त्यांच्यात गुंफली गेली असे म्हणता येईल. असे त्यांचे मत होते.[४७]

**क –मार्क्स – फुले – आंबेडकरवाद :**

अपारंपरिक मार्क्सवादी संप्रदायामध्ये या वर्गवादी अन्वेषणपद्धतीबरोबरच फुले – आंबेडकरप्रणित जातिवादी अन्वेषणपद्धतीचा वापर करून जातिसंस्थेची वर्ग – जातिवादी किंवा मार्क्स – फुले – आंबेडकरवादी बहुप्रवाहवादी मीमांसा श्री. शरद पाटलांनी केली आहे. श्री. शरद पाटलांनी आपल्या 'दासशूद्रांची गुलामगिरी' या दोन खंडांत प्रसिद्ध आलेल्या ग्रंथामध्ये भारतीय समाजविकासाचा आलेख रेखाटून त्यात वर्ण–जातिव्यवस्थेच्या उदय–विकासाची सखोल चर्चा केली आहे. भारतीय विचारपरंपरेतील ब्राम्हणी व अब्राम्हणी या पारंपरिक संघर्षाचे भान ठेवून शरद पाटील येथील जातिव्यवस्थेचा वेध घेतात. त्यांच्या मते प्राचीन काळापासूनच्या भारतीय इतिहासाचे परिशीलन करता येथील जातिव्यवस्था ही उत्पादन संबंधांच्या विकसनातील एक महत्त्वाचा टप्पा होता. आद्य भारतीय समाज हा स्त्री सत्तावादी होता. या स्त्री सत्तेच्या पोटी आद्य द्वैवर्ण्यव्यवस्था, पुढे मातृवंशिकतेवर उभी असलेली त्रैवर्ण्यव्यवस्था, पितृवंशकतेच्यापोटी आलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था व या वर्णव्यवस्थेतून पुढे जाती व्यवस्था, अशा क्रमाने भारतातील वर्ण–जातीव्यवस्थेचा विकास झाल्याने श्री. शरद पाटील सांगतात.[४८] त्यांच्या मते,बिटिश वसाहतवाद येण्यापूर्वी भारतात 'वर्ग' ही संस्थाच नव्हती. वासाहतिक काळात येथे वर्गाचा उदय झाला.

**२.३ समकालीन भारतीय राजकारण आणि जातिव्यवस्था :**

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ते 'सगळ्या' भारतीयांना मिळाले असे मानले जाणे स्वाभाविक होते. पण स्वतंत्र भारतात सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा यांचे वाटप संकुचित सामाजिक आधारावरच होत राहिले. म्हणजेच लोकशाही चौकटीच्या रेट्याने भारतीय समाजव्यवस्थेत किरकोळ फेरबदल झाले पण भारतीय समाजव्यवस्थेने आपली वैशिष्ट्ये लोकशाही चौकटीवर बेमालूमपणे लादली. त्यामुळे राजकीय व्यवहारांना अपरिहार्यपणे जातीय परिमाण लाभले. मागास जातींना मताधिकारापासून वंचित ठेवणे, सत्तासंपादनामध्ये नाममात्र वाटा दिला जाणे, हे त्याचे प्रत्यक्ष परिणाम होते. उच्च (आणि काही प्रमाणात मध्यम) जातींकडे राजकारणाची सूत्रे बव्हंशी राहिली. ही परिस्थिती लोकशाहीच्या तर्कशास्त्राशी विसंगत होती. इतकेच नव्हे तर मागास–कनिष्ठ जातींच्या सत्ता–सहभागाचा प्रश्न १९६० च्या दशकात उपस्थित

होऊनही तो १९८० पर्यंत दुर्लक्षितच राहिला. आजही तो पूर्णपणे मान्यता पावलेला नाही. मागास–कनिष्ठ जातींच्या नेत्यांना सत्ता मिळून त्यांच्या 'व्होट बँका' तयार झाल्या, या नेत्यांनी जातीच्या प्रश्नावर ठोस भूमिका घेतली नाही, अशी टीका केली जाते. त्यामधील तथ्यांश गृहीत धरूनही सत्तेच्या वाटपात कनिष्ठ जातींना स्थान मि ळालयला हवे ही वस्तुस्थिती शिल्लक राहतेच. हे सत्तापरिवर्तन परिणामकारकपणे घडून न आल्यामुळे आपल्या सर्व राजकीय संस्था 'उच्च जातीय' बनल्या. त्याची प्रतिक्रिया म्हणून जातीच्या जातीसमूहांच्या आधारावर राजकारणाचे संघटन केले जाऊ लागले.[४९]

सत्तेतील वाट्याबरोबरच साधनसंपत्ती आणि प्रतिष्ठेतील कनिष्ठ जातीच्या वाट्याचा प्रश्नही शिल्लक राहतो. स्वातंत्र्योत्तर काळात काही मध्यम जातींना साधनसंपत्तीत वाटा मिळाला. वासाहतिक काळात ज्याप्रमाणे वासाहतिक हितसंबंधांना पूरक अशा सुधारणांना वाव मिळाला तसेच स्वातंत्र्योतर काळात घडत राहिले.बिटिश राजवटीत उच्च जातींचे 'आधुनिकीकरण' आणि मध्यम जातींचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व या सुधारणा घडून येऊ शकल्या. स्वातंत्र्योतर काळात भांडवली विकासासाठी आवश्यक तेवढ्या प्रमाणात जमीनसुधारणा होऊन मध्यम जातींना आधुनिक उत्पादन प्रक्रियेच्या कक्षेत येऊ दिले गेले. पण त्या पलिकडे भरीव सुधारणा जातीच्या प्रश्नाच्या संदर्भात झाल्या नाहीत. (राखीव जागा या येथे सुधारणामध्ये धरलेल्या नाहीत. जातीच्या प्रश्नांची सोडवणूक न करता आणि होत नसल्यामुळे केलेली उपाययोजना असे त्यांचे स्वरूप आहे.) आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी, स्वच्छता, पौष्टिक आहार, सुरक्षित निवारा आणि सामाजिक अवहेलनेपासून सुटका या किमान मुद्द्यावर भारताच्या अनेक भागांत विविध जातीची परिस्थिती वंचिततेची आहे. या वंचिततेचे दोन परिणाम झालेले दिसतात. एक म्हणजे निवडणुकीचे राजकारण हे लोकशाहीमध्ये सामाजिक विवादांचे मुख्य व्यासपीठ बनत असल्यामुळे राजकारणात जातीच्या मुद्द्याला अतोनात महत्त्व प्राप्त होत असल्याचे दिसते. दुसरीकडे सामाजिक विश्लेषणात जात या घटकाला वैचारिक पातळीवर मान्यता मिळत असल्याचे आढळते. भारतीय संदर्भात समता न्याय यांची चर्चा जातलक्ष्यी वर्गवारी करून जास्त वास्तव आणि अर्थपूर्ण होऊ शकते याचे भान आता येऊ लागले आहे. ही घडामोडी स्वागतार्ह मानायला हवी.[५०]

आरक्षणाच्या मुद्द्याच्या निमित्ताने राजकीय पातळीवर उच्च जातींच्या विरोधात मध्यम

व कनिष्ठ मागासजातींची फळी उभी करण्याचे प्रयत्न झाले, सर्व मागास जातींचा एक मोठा समूह बनू शकतो असे वातावरण निर्माण झाले. संविधानातील अन्य मागासवर्गाविषयीच्या तरतुदी आधारे या जातींना राखीव जागा मिळणार असल्याने त्या सर्व जातींसाठी मिळून इतर मागास जाती किंवा अदर बॅकवर्ड क्लासेस म्हणजे ओबीसी असे नामाभिधान दिले जाऊ लागले. या ओबीसीचे एकच राजकीय हत्यार असावे, एकाच राजकीय आघाडीच्या माध्यमातून त्यांचे राजकारण चालावे असे प्रयत्न १९८० नंतरच्या काळात होत राहिले. राजकीयदृष्ट्या 'ओबीसी' हा एकसंध समूह आहे असा दावा केला जावू लागला. मात्र राज्यपातळीवरील त्यांचे संघटन व्हावे आणि प्रत्येकराज्यातील ओबीसींच्या पक्षाने इतर राज्यांतील अशाच पक्षाशी संधान ठेवून राजकारणावर ओबीसीचा प्रभाव निर्माण करावा अशी मांडणी केली जाऊ लागली. ही मांडणी मागास जातींचे राजकारण या नावाने ओळखली जाऊ लागली.

या मांडणीतून तीन मुद्दे पुढे आले. पहिला मुद्दा होता मागास आणि परंपरेने कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींतील सत्तेच्या वाट्याचा. लोकशाहीत या जातींना सत्तेत पर्याप्त सहभाग मिळाला पाहिजे, फक्त त्यांच्या वतीने किंवा नावाने सत्ता राबवून चालणार नाही असा हा मुद्दा होता. भारतीय लोकशाही अर्थपूर्ण बनण्याच्या दृष्टिने हा महत्त्वाचा मुद्दा होता. दुसरा प्रश्न पुढे आला तो 'कनिष्ठ' जातींच्यामागासलेपणाचा. काँग्रेस व्यवस्थेअंतर्गत जे चर्चाविश्व भारतात साकारले त्यात विकास आणि कल्याणकारी राज्य यांच्या आधारे सर्वांचे हित साधले जाईल असे गृहीत होते. दलित आणि अन्य मागास जाती यांच्या सामाजिक व भौतिक अभ्युदयाचा वेगळा विचार झालेला नव्हता. प्रौढ मताधिकार आणि व्यक्तिस्वातंत्र्य (म्हणजे व्यवसायस्वातंत्र्य वगैरे) यांच्यामुळे जातींचा अडसर विकासात राहणार नाही असे या चर्चाविश्वाचे गृहीतक होते. सर्व आधुनिक व्यवसाय सर्व जातीयांना खुले झाल्यावर विकासाचा मार्गही खुला होईल असे समजून चालण्याची रीत होती. १९६७ – विशेषत: १९७७ – नंतरच्या राजकारणामुळे मागास जातींच्या मागासलेपणाकडे लक्ष वेधले गेले. या मागासलेपणाची दखल स्वतंत्रपणे घ्यायला हवी याची थोडीफार जाणीव १९७७ नंतर राजकीय व्यवस्थेवर निर्माण झाली.[५१]

तिसरी आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जात हे अन्यायाचे प्रतीक आणि शोषणाची यंत्रणा आहे म्हणून तिला प्रतिकार करायला हवा हा मुद्दा स्वतंत्र्यानंतर प्रथमच जोरकसपणे पुढे आला. निवडणुकीच्या राजकारणाबरोबर जातविरोधी लढा ही दिला पाहिजे, तो लोकशाही प्रक्रियेचा भागच असला पाहिजे याची जाणीव जातवादामुळे पुन्हा झाली. जातवादी

राजकारणामुळे जातविरोधी चर्चाविश्वाचा राजकारणात पुर्नप्रवेश झाला. त्यामुळेच मागासलेपणाच्या प्रश्नाच्या विचाराला गती प्राप्त झाली. केवळ चतुर्थ श्रेणीत दलितांची किंवा तृतीय श्रेणीत अन्य मागासांची भरती करून भागणार नाही, तसेच व्यवसायाचे स्वातंत्र्य बहाल करून जात आणि व्यवसाय यांची साखळी तुटणार नाही याच भान आले तेही या जातविरोधी जाणिवेमुळेच.[५२] म्हणजेच जातीच्या प्रश्नाची जाण प्रगल्भ होण्यास जातवादामुळे हातभार लागला.

प्रत्यक्ष राजकारणाच्या पातळीवर या काळात विधानसभांच्या सामाजिक जडणघडणीत स्थित्यंतर घडून आले. उत्तर भारतातील मंत्र्यांची सामाजिक पार्श्वभूमी ठळकपणे बदलली. ओरिसा आणि बंगालसह पूर्वेची राज्ये वगळता सर्वत्रच जातीचा मुद्दा महत्त्वाचा बनल्याने सर्व देशाच्याराजकारणाचा नवा टप्पा जातवादी चौकटीचा टप्पा आला आहे असे चित्र १९७७ ते १९९० या काळात उभे राहिले. जनता दल, लोकदलाचे गट, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता पक्ष, राष्ट्रीय जनता दल, बहुजन समाजपक्ष, बहुजन महासंघ अशा सर्वच पक्षोपक्षांनी 'ओबीसी' ना अनुकूल भूमिका घेण्यावर भर दिला. या पक्षांचे नेते, उमेदवार, प्रचार मुद्दे या सर्वांमुळे 'मागास जातींचे राजकारण सुरू झाले आहे, या म्हणण्याला पुष्टी मिळत राहिली. मग हे मागास जातींचे राजकारण प्रत्यक्षात का अवतरले नाही ? भारतीय राजकारण या चौकटीच्या दारापर्यंत पोचले, पण त्या चौकटीत सामावून गेले नाही, असे का झाले ?

भारतीय समाजात अनेक कनिष्ठ आणि दुय्यम मानले गेलेले जातीगट आहेत. पण त्या सर्वांचा मिळून मागास जाती नावाचा एकसंघ समूह अस्तित्वात नाही मागास जातींचे राजकारण करणाऱ्यांचा असा समूह घडविण्याचा प्रयत्न जरूर आहे पण जाती व्यवस्थेचे एक वैशिष्ट्येच हे आहे की प्रत्येक जातीचे इतर समाजाबद्दलचे भान तकलादू आणि वरवरचे असते. अलगपणे स्वत:च्या अस्तित्वात मग्न होणे हे प्रत्येक जातीच्या बाबतीत घडते. त्या जागी समकक्ष जातींबरोबर संयुक्त राजकीय भान घेणे ही प्रक्रिया फार दूरवरची तर आहेच पण त्या प्रक्रियेतच जातीव्यवस्था खिळखिळी होणे ही सुद्धा एक शर्त आहे. दुसरी महत्वाची बाब म्हणजे वर्ण व्यवस्थेतील स्थानाप्रमाणे समकक्ष असणाऱ्या उदा. शुद्र जातींच्या भौतिक अस्तित्वाच्या पातळ्या मात्र विभिन्न असतात. सर्व मागास जातींचे राजकारण करू पाहणारे गट असे गृहीत धरतात की, त्या सर्वांच्या मागासलेपणाची पातळी एकच आहे. पण एकाच राज्यातील मागास जातींची भौतिक स्थिती वेगवेगळी असते. महाराष्ट्रातील माळी किंवा तेली आणि न्हावी किंवा कोष्टी जातींच्या भौतिक

स्थानात बरेच अंतर असू शकते–असते. तिच गोष्ट उत्तरेतील यादव आणि लोथ वगैरे जातींच्या बाबतीत दाखविता येते. शिवाय जातीचे नाव अथवा दर्जा सारखाच असला तरी वेगवेगळ्या राज्यात त्याच जातींचे भौतिक स्थान वेगवेगळे असते. महाराष्ट्रातील कुणबी आणि गुजरात येथील पाटीवर आणि बिहार मधील कुर्मी हे काही सगळे एकाच भौतिक स्थानावर नाहीत. याचा अर्थ असा होतो की, एकाच जाती नामाचे समूह भिन्न जीवनानुभवांना सामोरे जात असल्यामुळे त्यांचे संघटन करण्यात व त्यांना 'ओबीसी' म्हणून स्थान प्राप्त करून देण्यात अडचणी उत्पन्न होणे स्वाभाविक आहे.[५३]

अनेक समाजशास्त्रीय अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहेकी, जाती–जातींमधील उच्च–कनिष्ठ भाव हा स्थानिक संदर्भातच अर्थपूर्ण ठरतो जाती व्यवस्था ही श्रेणीबद्ध समाजरचना असली, तरी विशिष्ठ प्रदेशात कोणती जात कोणापेक्षा श्रेष्ठ मानली जाते, यावर जातीचे स्थान त्या प्रदेशापुरते ठरते. जातींचे सामाजिक संबंध आणि सांस्कृतिक विश्व हे प्रादेशिक चौकटीत आकाराला येतात. बहुतेक जाती एका राज्यातच नव्हे तर राज्यातील एका विभागातच अस्तित्वात असतात. अशाप्रकारे एकाच भागात एकवटल्यामुळे एकेका जातीची एकेका भागातील लोकसंख्या ही खूप मोठी असते. इरावती कर्वे व दांडेकर यांच्या १९५१ साली प्रसिद्ध झालेल्या मानव शास्त्रीय अभ्यासात त्यांनी महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागांत कोणत्या प्रमुख जाती मोठ्या संख्येने आढळतात याचा तपशील दिला आहे. रायगड जिल्ह्यातील आग्री किंवा जलगाव जिल्ह्यातील लेवापाटील ही जातींच्या स्थानकीकरणाची ठळक उदाहरणे होत. काहीवेळा जातींचे वास्तव्य एका पट्ट्यात असते. उदा. नाशिक, नगर, बीड या पट्ट्यात वंजारी समाजाचे वास्तव्य आढळते. श्वार्टझ्बर्ग यांनी उत्तर भारताच्या त्यांच्या अभ्यासात अशी अनेक उदाहरणे दाखविली आहेत. लुधियानातील निम्मी लोकसंख्या जाट आहे, पंजाबातील चर्मकार आणि मजहबी हे दलित समाज वेगवेगळ्या भागात वास्तव्य करतात. उत्तर प्रदेशात जाट बहुसंख्याक गावामध्ये इतर शेतकरी जाती सहसा नसतात, इ. अशाच पद्धतीने तामिळनाडूतील वण्णियार हे दक्षिण व उत्तर आर्कोट, सालेम, चिंगलपूट या जिल्ह्यात आहेत कर्नाटकात म्हैसूर विभागात वोक्कालिंगाचे प्रमाण सुमारे २९ टक्के आहे. तर राजस्थानात जोधपूर विभागात माळी मोठ्या संख्येने आहेत. श्रीनिवास यांनी म्हटल्याप्रमाणे जात व प्रदेश यांचा हा संबंध देशभर सर्वत्र आढळतो. [५४]

जातीचे असे बालेकिल्ले तयार झाल्यामुळे स्थानिक वर्चस्वशाली जाती तयार झाल्या एखाद्या गावात किंवा तालुक्यात ज्या जातींचे संख्याबळ सर्वात जास्त तिची वाटचाल स्थानिक पातळीवर वर्चस्वशाली बनण्याच्या दिशेने होते. संख्याबळाने त्या जातीला साधन

सामुग्रीवर कब्जा करणे शक्य होते निवडणूकीच्या राजकारणात याचा असा अर्थ होतो की, ठराविक भागातून ठराविक जातीचेच उमेदवार यशस्वी होतात. महाराष्ट्रात असे किमान ५० मतदार संघ आहेत की जेथून १९७८ पासून नेहमी मराठा उमेदवारच निवडून आले. याचपद्धतीने रायगड जिल्ह्यातून आग्री तर जळगावातून लेवापाटील उमेदवारच निवडून येतात वर्धा–भंडारा येथून तेली आणि सोलापूर–कोल्हापूर मधून लिंगायत निवडून येतात. (थिटे, १९९६, तसेच राज्यशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ यांनी गोळा केलेली माहिती, प्रा. व्होरा यांचा महाराष्ट्रातील आमदारांच्या सामाजिक जडणघडणीविषयीच्या शोधनिबंधाचा मसुदा) छोट्या–छोट्या जातींना यांच्या स्थानिक संख्याबळामुळेच निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप करता येतो. कधी एखादा उमेदवार निवडून आणता येतो किंवा कधी बहुसंख्याक जातीला अडचणीत आणता येते.[५५] एकंदरीत पाहता, स्थानिकीकरणामुळे छोट्या जातींना त्या त्या भागातील मोठ्या जातीच्या वर्चस्वाला तोंड द्यावे लागते. म्हणजे काही जाती वर्चस्वशाली बनण्याच्या प्रक्रियेतच इतर छोट्या जातींचे दुय्यमीकरण अंतर्भूत असते. स्थानिक परिसरात अडकून पडून त्यांना राजकीय–आर्थिक व्यवहारात दुय्यम भूमिका स्वीकारावी लागते.

**२.४ जाती समूह आणि राजकारण यांच्या संबंधाविषयक विविध दृष्टिकोण :**

असंख्य जातीसमूह भारतीय राजकारणाची वस्तुस्थिती आहे. राजकीय व्यवस्था आणि त्यांच्या पर्यावरणाच्या परस्परावलंबित्वाची आपण त्या विभागाच्या प्रस्तावनेत चर्चा केली आहे. मात्र कोणाचा प्रभाव अधिक असतो हा विवादय विषय आहे. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते जाती संस्थेने भारतीय राजकारण पूर्णपणे व्यापून टाकले आहे. तर इतरांच्या मते आर्थिक व राजकीय शक्तिप्रवाहांच्या प्रभावामुळे जातीसंस्थेत मूलगामी स्वरूपाचे बदल घडून आले आहेत. हे दोन्ही दृष्टिकोण एकांगी स्वरूपाचे आहेत. या दोन्ही एकांगी दृष्टिकोणात समन्वय साधणारा दृष्टिकोण प्रा. रजनी कोठारी यांचा आहे त्यांच्या मते जाती संस्थेमुळे राजकारणाला सामाजिक पाया प्राप्त होतो, तर जाती संस्थेचे राजकीयरण होत असते. जाती समूह आणि राजकारणाच्या संबंधविषयक विविध दृष्टिकोणाचा थोडक्यात आढावा घेऊ या.

**(अ) जातिसंस्थेचे राजकारणातील प्रभुत्व :** श्रीनिवास आणि अन्य सम ाजशास्त्रज्ञांच्या मते जाती संस्था या पारंपरिक संरचनेत प्रातिनिधिक लोकशाहीच्या प्रक्रियेमुळे कोणतेही बदल घडून आले नाहीत. जातीचे जातीय स्वरूप बदलले नाही. प्रातिनिधिक लोकशाहीकरणामुळे जातीसंस्था कमकुवत होण्याऐवजी अधिक प्रबल झाली

आहे. भारतीय समाजात जातीव्यवस्थेची चौकट अजूनही भक्कम आहे. व्यक्तिचे जीवन बहुतांशही जातिबंधानेच बांधलेले आहे. व्यक्तिचा व्यवसाय, दर्जा, सामाजिक संधी या जातिप्रमाणेच ठरतात. निवडणुकांचे वेळी जातिचाच विचार केला जातो. निवडणुका जिंकण्याच्या तंत्रात प्रथम आवश्यक तंत्र म्हणजे जातीचा आधार घेणे हेच असते. जातीच्या भावनिक आवाहनावरच आपल्याकडे उमेदवार मतांचा प्रवाह वळवून घेण्याचा प्रयत्न करातो. सत्तारूढ किंवा विरोधी पक्षाचे दोन्हीही लोक जातीच्या आधारानेच निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न करीत असतात. भारतीय समाजात जातिसंस्थेने इतके पक्के स्थान प्राप्त केले आहे की अजूनही जातिबाह्य विचार करणे सत्तारूढ पक्ष व शासन यांनाही शक्य होत नाही.

**(ब) राजकीय व आर्थिक शक्तिप्रवाहांमुळे जातिसंस्थेत आमूलाग्र परिवर्तन :**

आंद्रे बेती, योगेंद्रसिंग इत्यादी राजकीय समाजशास्त्रज्ञांच्या मते सध्याचे युग परिवर्तन व प्रगतीचे आहे. पारंपरिक भारतीय समाजात प्रतिनिधिक लोकशाही, भूमीसुधारणा कायदे, आर्थिक नियोजन, शिक्षण प्रसार इत्यादी आधुनिक शक्तिप्रवाहांनी मूलगामी स्वरूपाचे बदल घडवून आणले आहेत. खानपानासंबंधीचे निर्बंध, व्यवसायासंबंधीचे निर्बंध आणि स्पृश्यास्पृश्यतेसंबंधीचे निर्बंध बहुतांशी शिथील झाले आहेत. आधुनिकीकरणाचा वेग वाढत आहे आणि ग्रामीण भागही त्यापासून अलिप्त नाही. भारतीय राजकारण, अर्थकारण आणि राजकारणात पारंपरिक प्रतिष्ठा व श्रेष्ठत्वाचे निकष मागे पडले असून कृषी व्यवसायातील आणि मध्यस्तरावरील जातिसमूह अधिकाधिक प्रभावी होत चालली आहे. महाराष्ट्रात मराठा, आंध्रप्रदेशामध्ये कम्मा व रेड्डी, हरियाना, राजस्थान व पश्चिम उत्तर प्रदेशामध्ये जाट जमातीचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. पारंपरिक उच्चवर्णीय नेतृत्वाची जागा मध्यस्तरावरील ग्रामीण भागातील आणि कृषी व्यवसायातील नेतृत्वाने घेतली आहे. शिक्षण केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी राहिली नसून, अन्य जाती जमातीत शिक्षणाचा प्रसार झाला आहे. प्रचलित भारतीय समाजात वर्णव्यवस्थेवर आधारित सामाजिक प्रतिष्ठा व प्रभुत्वाच्या जागी आर्थिक व राजकीयदृष्ट्या सक्षम जातींचे प्रभुत्व प्रस्थापित झाले आहे, अनेक जाती मुक्त (Caste free) व्यवसाय व व्यावसायिक वर्ग अस्तित्वात आले आहेत. आर्थिकदृष्ट्या समान दर्जा असणाऱ्या वर्गाचे जातिभेद विसरून लोक एकत्र येतात. कामगार वर्गाचे लढे किंवा पांढरपेशा वर्गाचे संघर्ष वर्गीय, जातीय नव्हे, दृष्टिकोनाच्या स्वीकृतीचे निदर्शक आहेत. समाजातील उच्चभ्रू वर्गाची 'नवीन जात' (New Caset) अस्तित्वात आली आहे. म्हणजेच आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे पारंपरिक संरचना कमकुवत झाली आहे.

**(क) राजकारणाचे संस्थीकरण आणि जातीचे राजकीयकरण :**

प्रा. रजनी कोठारी व इतर राज्यशास्त्रज्ञ क्रिया–प्रतिक्रिया या प्रक्रियेत राजकारण व जातिसंस्था या उभयतात घडून आलेले बदल विशद करतात. त्यांच्या मते स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रतिनिधिक लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतून भारतातील विविध सामाजिक समूहांना त्यांच्या राजकीय आकांक्षाची पूर्तता करण्याची संधी प्राप्त झाली आणि जातींचे राजकीयकरण घडून आले. जाती समूहांच्या राजकीय प्रक्रियेतील सहभागामुळे राजकारणाचे संस्थीकरण (institutionalization) घडून आले व भारतीय राजकारणाला सामाजिक पाया व आशय प्राप्त झाला. ज्याला आपण जातीय राजकारण म्हणतो, ते लोकशाही पद्धतीत अपरिहार्य आहे. कारण विविध सामाजिक गट आपापल्या राजकीय आकांक्षांची पूर्तता करण्याकरिता व हितसंबंधाची जोपासना करण्याकरिता राजकीय पक्षांशी देवाण–घेवाण करणे व राजकीय पक्ष व त्यांचा अभिजन वर्ग आपल्या समर्थकांची संख्या वाढविण्याबाबत उत्सुक असणे नैसर्गिक आहे. या आदान–प्रदानाच्या प्रक्रियेत जातिसंस्थेच्या स्वरूप व कार्यभागात बदल घडून येतात आणि राज्यकर्त्यावर्गाला समाजाच्या विविध गटांच्या हितसंबंधांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारावी लागते. त्याकरिता रोजगाराची उपलब्धता वाढविणे, कामगार व शेतकरी वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारे कायदे करणे, इत्यादी लोककल्याणकारी उपक्रम शासनाला हाती घ्यावे लागतात. म्हणजेच 'जातीय राजकारण' अपरिहार्य आहे. परंतु काळाच्या ओघात जातीय संघर्षाची तीव्रता कमी होऊन समाजातील सर्व समूहांच्या हितसंबंधाकरिता शासनव्यवस्था कार्यान्वित होणे, हे देखील अटळ आहे.[५६]

**(ड) निवडणुकीचे राजकारण :**

डॉनाल्ड स्मिथ या पाश्चात्य राज्यशास्त्रज्ञाने जातीसमूहांचा निवडणुकीच्या राजकारणातील कार्यभाग विशद करताना असे मत व्यक्त केले आहे की, ''प्रतिनिधिक लोकशाहीच्या भारतातील प्रारंभामुळे जातीसमूहांना मुदतवाढ मिळाली आहे... सार्वत्रिक प्रौढ मताधिकारामुळे जातीसमूहांचे महत्त्व कमी होण्याऐवजी वाढले आहे. निवडणुका जातीनिष्ठांची अभिव्यक्ती करण्याचे माध्यम बनल्या आहेत. विभिन्न जातीसमूहात सांख्यिक सामर्थ्य वाढवून, सत्ता संपादन करण्याकरिता, वाढविण्याकरिता समझोते करून संयुक्त आघाडी (Alliance) स्थापन करण्याची प्रवृत्ती दिसून येते आहे''... स्मिथच्या या विधानाची प्रचिती महाराष्ट्रात ब्राम्हणेतर जातीसमूहांच्या 'बहुजन समाज' किंवा दलित दिसून येत आहे. सत्ताप्राप्तीच्या उद्देश्याने विभिन्न जाती जमार्तीची

स्थापना करण्यात आलेली राजकीय आघाडीच्या ऐक्याच्या प्रयत्नात असे भारतातील राजकीय पक्षांचे टीकाकारांकडून वर्णन केले जाते. तात्पर्य म्हणजे राजकीय पक्ष आपल्या सत्तेच्या राजकारणाकरिता जाती समूहांचा वापर करतात, तर सत्ताकेंद्रात शिरकाव करण्याकरिता जातिगटांचे नेतृत्व राजकीय पक्षाचा वापर करतात. परस्पर सोयीच्या या व्यवहाराची प्रचिती निवडणुकीच्या राजकारणात येते.[५७]

**२.५ महाराष्ट्रातील जातीय राजकारणाच स्वरूप :**

महाराष्ट्र हे राज्य जरी १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले असले तरी येथील राजकारण आणि जातीसमाज यांच्या परस्परसंबंधांची पायाभरणी त्यापूर्वीच झाली आहे. ब्रिटिश राजवटीच्या काळात ब्राम्हण व तत्सम उच्च जाती आपले सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्व टिकविण्याचे प्रयत्न करीत असतानाच मुख्यत: मराठा कुणबी समाजात विसाव्या शतकाच्या आरंभी राजकीय सत्तेबद्दल जागरूकता निर्माण झाली. वसाहती–अंतर्गत जे अधिकार ब्रिटिश सरकार देऊ करीत होते त्यातील अधिकाधिक वाटा मिळविण्याचे प्रयत्न ब्राम्हण, मराठा–कुणबी इत्यादी जातीगटांनी केले. त्यातूनच महाराष्ट्रात जातीच्या राजकारणाने आकार घेतला.

१९३५ च्या कायद्यामुळे निवडणुकांचे राजकारण मध्यवर्ती बनले. तेव्हापासून महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये काँग्रेस हा पक्ष महत्त्वाचे सत्ताकेंद्र बनला. १९५६ मध्ये भारत सरकारने मराठी व गुजराती जनतेचा रोष पत्करून या दोन्ही भाषा बोलणारे सर्व प्रदेश द्विभाषिक मुंबई राज्यात एकत्र आणले. त्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी चालू असलेल्या चळवळीला आणखी जोर चढला. काँग्रेसच्या सर्व विरोधकांनी या मागणीसाठी एकत्र येऊन संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली. या एकजुटीमुळे १९५७ च्या निवडणुकीत मराठी भाषिक प्रदेशात काँग्रेसला अपयशाला सामोरे जावे लागते. याच दरम्यान यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व उदयाला आले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर चव्हाणांनी काँग्रेसचे स्वरूप समावेशक करण्यावर भर दिला. त्यामुळे १९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घ काळपर्यंत काँग्रेसची पकड राहिली. १९७७ नंतर महाराष्ट्रातील काँग्रेसमध्ये फाटाफूट होत गेली. तसेच प्रादेशिक पक्षसंघटना आणि केंद्रीय पक्षनेतृत्व यांचे संबंधही फार सौहार्दाचे राहिले नाहीत. १९९० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला काठावरचे यश मिळाले. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीखेरीज गेल्या चाळीस वर्षात महाराष्ट्रात भूमिहीनांच्या चळवळी

(१९६६-६७), मराठवाडा विकासाचे आंदोलन (१९७४), मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर करावे आणि करू नये या भूमिकांवरून आंदोलने झाली. त्यांचा राजकारणावर तात्पुरता प्रभाव पडला. मात्र १९७७ पासून पुढची दहा वर्षे शेतकरी संघटनेने जी आंदोलने केली त्यांनी मात्र महाराष्ट्राच्या राजकारणावर खोलवर परिणाम घडवला.[५८]

महाराष्ट्रातील जातींचे राजकारण आकार घेते ते राज्याच्या एकूण राजकीय व सामाजिक वैशिष्ट्यांच्या संदर्भात. काही जाती राजकारणात वरचढ ठरतात तर काही बाजूला पडतात याचे कारण केवळ त्या जातींच्या संख्येत सापडत नाही. जातीचे भौगोलिक स्थान, पारंपरिक जातीव्यवस्थेतील दर्जा, आधुनिक काळातील राजकीय संघटन व जागृतीची पार्श्वभूमी, साधनसामग्रीशी असलेले नाते आणि उपजीविकेचे स्वरूप या घटकांवर जातींचे राजकारणातील स्थान ठरते. महाराष्ट्र ज्या जाती सलग भौगोलिक पट्ट्यात पसरल्या आहेत त्या जातींना राजकीय सत्तेत वाटा मिळविणे थोडे सोपे जाते. कारण त्या भौगोलिक पट्ट्यात किमान स्थानिक पातळीवर अशी जात राजकारणात क्रियाशील असते. उदाहरणार्थ, आगरी ही जात फक्त रायगडमध्ये आहे. पण त्या जिल्ह्याच्या राजकारणावर पकड बसवून त्याद्वारे काही प्रमाणात तरी राज्याच्या राजकारणात आगरी जात हस्तक्षेप करू शकते. ज्या जाती सलग दोन-तीन जिल्ह्यांत आहेत त्यांना या भौगोलिक स्थानाचा जास्त फायदा होतो. त्यातच जर परंपरेने ती जात उच्च किंवा मध्यम दर्जाची मानली गेली असेल तर तिची सामाजिक प्रतिष्ठा हे राजकारणाचे एक महत्त्वाचे साधन बनते.[५९] पूर्वापार कनिष्ठ मानलेल्या जातीला राजकीय हस्तक्षेप करणे अवघड असते. कारण त्या जातीच्या कनिष्ठत्वामुळे तिच्या सत्ताप्राप्तीच्या प्रयत्नांना मान्यता मिळत नाही. मात्र जातीचे राजकारणातील स्थान ठरवणारे मुख्य घटक म्हणजे राजकीय जागृती आणि साधनसामग्रीवरील नियंत्रण. या दोन घटकांची अनुकूलता असलेल्या जातीच राजकारणात वर्चस्व गाजवू शकतात हे महाराष्ट्राच्या उदाहरणावरून दिसून येते.

**५.१ ब्राम्हण जातीचे राजकारण :**

महाराष्ट्राच्या ब्रिटिशपूर्व इतिहासात राजकीय नियंत्रण ब्राम्हणांच्या हाती असल्याचे दिसते. पारंपारिक उच्च स्थान, ज्ञानक्षेत्रावरील वर्चस्व, प्रशासनावरील ताबा, त्यामुळे पेशवाईत ब्राम्हण वर्चस्व अस्तित्वात आले.ब्रिटिशांच्या आगमनानंतर ब्राम्हणांचे राजकीय प्रशासनिक वर्चस्व ओसरले. पण अल्पावधीत ब्राह्मणसमाजाने नव्या ज्ञानयंत्रणेशी जुळवून घेतले आणि इंग्रजी शिक्षण घेऊन आधुनिक प्रशासनात जम बसविला. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय संघटनाचे जे प्रयत्न सुरू झाले त्यांत

ब्राम्हण नेत्यांचा पुढाकार होता. विसाव्या शतकाच्या आरंभी ज्या काँग्रेस चळवळीने आकार घेतला तिची महाराष्ट्रातील सूत्रे बव्हंशी ब्राम्हण नेतृत्वाकडेच राहिली. शिवाय ज्या विविध मवाळ, उदारमतवादी, जहाल, क्रांतिकारक गटांचा उदय झाला त्यांचेही नेतृत्व ब्राम्हणच होते. महाराष्ट्रातील समाजवादी आणि कम्युनिस्ट गटही ब्राम्हण नेतृत्वाखालीच होते. म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात येथील राजकारणाची सारी सूत्रे ब्राम्हण समाजाकडे होती असे म्हणता येईल. शिक्षण, राजकीय जागृती आणि उच्च पारंपारिक स्थान यांच्या जोडीनेच प्रशासन व अर्थव्यवहारांवरील पकड हे त्या राजकीय परिस्थितीला कारणीभूत घटक होते. कारण महाराष्ट्रातील ब्राम्हण वर्गाकडे सावकारी व जमीनदारीमुळे आर्थिक सत्ता बऱ्यापैकी होती. या साऱ्याचा परिणाम म्हणून स्वातंत्र्यपूर्व महाराष्ट्राच्या राजकारणावर ब्राम्हण जातीची छाप होती असे दिसते.[६०] ब्रिटिश सत्तेच्या काळातच ब्राम्हण जातीला राजकीय स्पर्धा निर्माण होऊ लागली. तरीही राजकारणावरील ब्राम्हणवर्चस्व लगेच नाहीसे झाले नाही. ब्राम्हणवर्चस्वाचा वैचारिक प्रतिवाद सर्वप्रथम एकोणिसाव्या शतकात महात्मा फुले यांनी केला. त्यांच्या सत्यशोधक समाजापासून संघटनात्मक पातळीवर ब्राम्हणवर्चस्वाचा प्रतिवाद केला जाऊ लागला. पुढे ब्राम्हणेतर चळवळीने या प्रक्रियेला गती दिली. स्वातंत्र्यानंतरच्या काळात महात्मा गांधींच्या खुनानंतर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात ब्राम्हणविरोधी दंगली झाल्या. या घटनेनंतर ब्राम्हणांचा राजकारणातील सहभाग एकदम कमी झाला. एक समूह म्हणून ब्राम्हण समाजाने निवडणुकीच्या राजकारणातून अंग काढून घेतले. याचा अर्थ ब्राम्हण नेतृत्व संपुष्टात आले असा नाही. १९५० च्या दशकात महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी जे संयुक्त महाराष्ट्र आंदोलन झाले त्याचे नेतृत्व ब्राम्हण नेते मंडळींकडे होते. आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, कॉ. डांगे हे या चळवळीचे प्रमुख पुढारी होते. १९६० नंतर मात्र काँग्रेस पक्ष आणि महाराष्ट्राचे राज्यस्तरीय राजकारण यांचे नियंत्रण ब्राम्हण नेतृत्व किंवा ब्राम्हण समाज यांच्याकडे राहिले नाही. राजकारणापासून दूर व्हावे लागलेल्या या समाजाने पुढील काळात प्रशासन, शिक्षण, संस्कृती, पत्रकारिता ही क्षेत्रे आपल्या ताब्यात ठेवून जोडीला आर्थिक व्यावसायिक उन्नती करून घेतली. त्यामुळे औपचारिक राजकीय सत्ता नसूनही आपले हितसंबंध राखणे या समाजाला शक्य झाले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेसमधील ब्राम्हण समाजाची भूमिका उत्तरोत्तर दुय्यम बनत गेली तरी समाजवादी पक्षाचे नेतृत्व बराच काळपर्यंत ब्राम्हण पुढाऱ्यांकडेच राहिले. तीच गत कम्युनिस्ट पक्षाचीही होती. मात्र आम ब्राम्हण समाजाचा या पक्षांना अजिबातच पाठिंबा नव्हता. कारण ब्राम्हण नेतृत्व असूनही

या पक्षांनी ब्राम्हण अनुकूल भूमिका मात्र घेतली नाही. उलटपक्षी ब्राम्हणवर्गाचा विरोध असलेल्या आर्थिक भूमिकांचा या पक्षांनी पाठपुरावा केला. या अर्थाने समाजवादी व कम्युनिस्ट हे काही ब्राम्हणांचे पक्ष नव्हते भारतीय जनसंघ ह्या पक्षाच्या हिंदू राष्ट्रवादी भूमिकेमुळे त्याला मात्र ब्राम्हण समाजाची सहानुभूती मोठ्या प्रमाणावर मिळाली. शिवसेनेवर मुख्यत: कायस्थ व पाठारे प्रभू नेत्यांचे वर्चस्व होते आणि मुंबईतील ब्राम्हण समाजाला, थोडे अंतर राखून का होईना, पण शिवसनेबद्दल ममत्व होते. १९८० नंतरच्या काळात भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांचे सामाजिक स्वरूप बदलले तरीही महाराष्ट्रातील ब्राम्हण समाजाला हेच दोन पक्ष वर्तमानकाळात जवळचे वाटतात.[६१] शिवसेना व भाजप यांनी कधीच ब्राम्हणविरोधी किंवा ब्राम्हण हितसंबंधांच्या विरोधी भूमिका घेतलेली नाही व ते तशी भूमिका घेणे यापुढेही संभवत नाही. याउलट इतर पक्षांच्या भूमिकेत कमीअधिक प्रमाण ब्राम्हणवर्चस्वाला विरोध आहे. काही पक्षांनी स्पष्ट ब्राम्हणविरोधी किंवा ब्राम्हणांना बाजूला ठेवण्याची भूमिका यापूर्वी घेतली आहे. हा फरक लक्षात घेतला तर आजच्या महाराष्ट्रात ब्राम्हणांना फक्त शिवसेना व भारतीय जनता पक्ष हेच नेमके जवळचे का वाटतात याचा उलगडा होऊ शकतो. १९९५ च्या विधानसभेत जे १२ ब्राम्हण व प्रभू आमदार निवडून आले त्यापैकी १० भाजप व शिवसेनेचे उमेदवार होते. तसेच २१ अमराठी आमदारापैकी (त्यातले बहुसंख्य ब्राम्हण व वैश्य आहेत) १३ भाजपचे तर २ शिवसेनेचे उमेदवार होते हे या संदर्भात लक्षात घेण्यासारखे आहे.

**५.२ ब्राम्हण–ब्राम्हणेतर वाद :**

ब्राम्हणी नेतृत्वाने नव्याने प्रस्थापित होऊ पाहणारे वर्चस्व महात्मा फुले व इतर नव शिक्षित कनिष्ठ जातींच्या नेतृत्वाला अमान्य होते. ब्रिटिश–ब्राम्हण संगनमताने बहुसंख्य असलेल्या कनिष्ठ जातींना डावलले जाईल या संशयामुळे ब्राम्हणांचे धार्मिक वर्चस्व आणि जातीव्यवस्थेतून येणारी उतरंडची मूल्यव्यवस्था धिक्कारण्याचा कार्यक्रम फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी हाती घेतला त्यातूनच ब्राम्हणेतर चळवळ उदयास आली. ब्राम्हणेतर समाज अनेक जाती–उपजातीत विभालेला होता. त्यांना एकसंघ करण्याकरिता ''बहुजन समाज'' ही संकल्पना फुल्यांनी मांडली. त्याद्वारे कनिष्ठ जातीत स्वत्वाची जाणीव निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य फुल्यांनी केले. त्यामुळे महाराष्ट्राच्या इतिहासाला वेगळे वळण लागले.

फुल्यांच्या मते पारंपरिक हिंदूधर्माने विशिष्ट प्रकारच्या विचार प्रणालीच्या साहय्याने कनिष्ठ जातींना दडपून टाकले. ब्रिटिश राजवटीमुळे कनिष्ठ जातींची

समस्या अधिक बिकट झाली. कारण शिक्षण आणि साक्षरतेमुळेच ब्राम्हणांची भरती, नव्या देशी शाळा, सरकारी इंग्रजी शाळा, प्रशासन, न्याय्य, रेव्हेन्यू अशा खात्यात होते. ह्यामुळे बिटिश सरकार आणि हिंदू समाजातील बहुसंख्य माणसे ह्यांमधील प्रशासकीय मध्यस्थाचे काम ब्राम्हणाकडे आले. ह्यातून त्यांचे मूळचे पारंपरिक धार्मिक वर्चस्व अधिकच पक्के झाले. ब्राम्हणामध्ये एक सामाजिक गट म्हणून सामाजिक हितसंबंधांचे ऐक्य असते. सामाजिक गट म्हणून सामाजिक, व्यवसायिक, धार्मिक क्षेत्रात एकमेकांना साह्य करणारे ब्राम्हण, हिंदूधर्म आपल्या ताब्यात ठेवून धार्मिक अधिकार आणि प्रशासकीय सत्ता हातात ठेवतात. भारतीय समाजान्तर्गत राजकीय संबंध समजून घेण्याची क्षमताही ह्या वर्गात असते. म्हणून ब्राम्हणेतरांनी जर हा हिंदूधर्म आहे तसा स्वीकारला तर ती त्यांच्या दृष्टिने मिथ्या जाणीव असेल. अजाणता ते ब्राम्हणांची गुलामगिरीच स्वीकारतील असे जोतिरावांचे मत होते. 'तृतीय रत्न' नाटकात जोतिरावांनी कनिष्ठ जातींच्या मागासपणामागे त्यांच्यातल्या अज्ञानाचा भाग आहे. तसेच ब्राम्हणांना धार्मिक वर्चस्वापासून दूर केल्याशिवाय कनिष्ठ जातीतल्या स्त्रिया व पुरुष आपल्या भोवतीच्या जगात सत्ता आणि अधिकार कसे मिळविले जातात ह्याविषयी विचार करू शकणार नाहीत. ''ब्राम्हणांनी तर शुद्रातिशूद्र जातींवर केलेली विद्द्याबंदी उठवून त्यांना शिकवून शहाणे करण्याकरिता ईश्वराने या देशावर इंग्रजांना पाठविले आहे. शुद्रादीअतिशुद्र शिकून शहाणे झाल्यावर ते इंग्रजांचे उपकार विसरणार नाहीत व मग पेशवाईपेक्षा शंभरपटीने इंग्रजी राज्य पसंत करतील. पण पुढे जर मुगलांप्रमाणे इंग्रज लोक या देशातील प्रजेला छळतील तर विद्द्या शिकून शहाणे झालेले शुद्रातिशूद्र लोक पूर्वी शुद्रात झालेल्या जहॉ मर्द शिवाजीप्रमाणे आपले शुद्रादी अतिशुद्रांचे राज्य स्थापून अमेरिकेतील लोकांप्रमाणे आपला राज्य कारभार आपण पाहतील पण भटांची पेशवाई आता पुढे या देशावर कधीच येणार नाही...'' असे परखड मत जोतिरावांनी मांडले.

**५.३ ब्राम्हणेतर एकजूट :**

महात्मा फुले, माळी, कुणबी, महार, मांग, इत्यादींकरता शुद्रातिशुद्र असे समुच्चयात्मक शब्द वापरतात. कारण त्यांना महाराष्ट्रातील या सर्वांची एकजूट करायची होती. दडपलेल्यांचा समाज, शोषणविरहीत समाजाचे स्वप्न बाळगणारा असेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली म्हणून स्पृश्य ब्राम्हणेतर जातींना फुले कौशल्याने अस्पृश्याच्या बाजूने वळवित होते. ग्रामीण क्षेत्रातले जमिनीवर राबणारे सर्व एकत्र यावे हा प्रयत्न होता. शूद्र हा शब्द दडपलेल्यांचा समाज या अर्थी जोतिराव वापरतात. आणि त्याचा अर्थ

ज्यांनी हिंदूधर्मातील सामाजिक भेद भाव ओळखून नाकारले आहेत, ज्यांनी ब्राम्हणी वर्चस्व नाकारले आहे असा समाज होता. ह्यात महार, मांग इत्यादी अस्पृश्य जातींना सामावून घेण्याचा प्रयत्न महत्त्वाचा होता.[६२]

१८६९ ते १८७३ या कालखंडात ब्राम्हणेतर चळवळ अधिक प्रखर झाली. ह्या काळात फुले एकीकडे अधिकाधिक परखड भाषेत ब्राम्हणी सत्तेवर आघात करीत होते आणि आपले विचार कृतीत उतरवित होते. उदा., विधवा पुनर्विवाह, राजा बळी, शिवाजी, बुद्ध, ख्रिस्त हे सर्वजन संकटकाळी गरिबांसाठी जन्म घेतात अशी मांडणी जोतिरावांनी केली. अशा तऱ्हेने ज्ञात इतिहासाला नवा अर्थ देताना जोतिराव दोन आघाड्यावर लढत होते. एकतर प्रशासकीय अभिजन म्हणून ब्राम्हणांपाशी जी धर्मातीत सत्ता होती तिला शह देण्यासाठी ते ब्रिटिश शासनाला प्रशासनाची घडीच बदला, असा सल्ला देत होते. न्यायी, उदार बिटिश प्रशासकांनी कनिष्ठ जातीतील दुबळ्या माणसांना वर आणावे असा त्यांचा प्रयत्न होता. ह्यासाठी ब्राम्हणी प्रशासकांच्या हातून सत्ता काढून घ्यावी असे सूचवित होते. जोतिरावांचा दुसरा प्रयत्न असा होता की पारंपरिक हिंदू धर्माने दिलेली धार्मिक उतरंड नाकारण्याचे सामर्थ्य लोकांमध्ये येण्यासाठी लोकांच्या मनात असलेल्या प्रतिकांना नवा अर्थ द्यावा त्यामुळे त्यांनी सर्व कनिष्ठ जातींचा क्षत्रिय वर्ण असल्याचा दावा करता येईल अशी मांडणी केली. महाराष्ट्रातील समाजाचा गाभा सैनिक आणि शेतकरी जातींनी घडला आहे, असे प्रतिपादन करून बिटिशांना ह्या बहुसंख्य गटाच्या अस्तित्वाची जाणीव जोतिरावांनी करून दिली. जोतिरावांनी 'मराठा' ह्या शब्दाच्या वापराबाबत काही काळजी घेतली. 'मराठा' गट क्षत्रियत्वाचा दावा करताना ब्राम्हणी होईल ह्याची जाणीव जोतिरावांना होती. त्यामुळे कुणबी आणि अन्य कनिष्ठ जातींना एकत्र करण्याच्या ध्येयापासून दूर जाण्याची शक्यता निर्माण होईल असे वाटून जोतिरावांनी 'शूद्र' समाजाची आपली कल्पना कधी सोडली नाही. ब्राम्हणेतर चळवळीने मात्र जोतिरावांनंतर मराठा ह्या अस्मितेचा वापर मोठ्या प्रमाणात केला. ह्यातून मराठा अभिजन अस्मिता निर्माण झाली.

**५.४ सत्यशोधक समाज :**

ब्राम्हणी सत्ता ज्या धर्माच्या आधारे उभारली जाते त्याला शह देण्यासाठी नव्या स्वतंत्र धर्माची स्थापना करावी लागणार हे जोतिरावांना जाणवले होते. तसेच बिटिश शासनाच्या धोरणांवर परिणाम करायचा तर व्यापक पायावर उभारलेली संघटना आवश्यक आहे हे ही त्यांना जाणवले. पुण्यात पर्वती देवस्थानच्या योग्य देखभालीच्या निमित्ताने सार्वजनिक सभा उभी राहिली होती. त्यांनी स्वदेशीची चळवळ, शेतीचा भाव,

जंगलविषयक कायद्याची अंमलबजावणी इत्यादी प्रयत्ही हातात घेतले. सार्वजनिक सभेचा दृष्टिकोन आपल्या विरोधात आहे हे फुल्यांच्या लक्षात आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यातून फुले याला शह देऊ पाहत होते. फुल्यांच्या काळात ब्राम्हणी अधिकार नाकारणे तसे कठीण होते. धार्मिक, आर्थिक क्षेत्रात ब्राम्हणांचे वर्चस्व होते. नव्या राजकीय व्यवस्थेत त्यांना स्थान होते. तसेच सुधारणावादी चळवळीत त्यांचे स्थान होते. त्यामुळे जोतिरावांनी ब्राम्हणांना कनिष्ठ जातीशी एक छूपे युद्ध पुकारले आहे हे ओळखले. ब्राम्हण आणि सावकार ह्या दोघांना एकत्र आणून कनिष्ठ जातींचे शत्रू अशी प्रतिमा निर्माण करण्याचे ऐतिहासिक काम जोतिरावांनी केले. कनिष्ठ जातींनी शिक्षण घ्यावे, आत्मनिर्भर व्हावे आणि आपल्या जातीत सुधारणा कराव्या असे सत्यशोधक समाजाला वाटत होते.

सत्यशोधक समाजातील एका गटाला मराठ्यांचा उच्च कुलीनत्वाचे वेध लागले होते, तर दुसऱ्या गटाला ब्राम्हणी सत्तेवर हल्ला करण्यात रस वाटत होता. सत्यशोधक समाजातल्या ब्राम्हणविरोधाला माळी, मराठा आणि कुणबी जातीतूनच विरोध होऊ लागला. फुल्यांचा शूद्रांच्या शिक्षणाचा ध्यास श्रीमंत शूद्रांना पचेनासा झाला. तरी ब्राम्हणेतरांना संघटित करण्याचा पहिला प्रयत्न केल्याचे श्रेय फुल्यांना दिलेच पाहिजे. तडजोड न करणारे फुले शेवटी एकाकीच राहिले. शुद्रातिशूद्र ऐक्य हे फुल्यांचे स्वप्न अपुरेच राहिले. मराठा अस्मितेची निर्मिती आणि त्या अस्मितेचा अस्पृश्यांच्या अस्मितेशी नाते जोडण्याचा फुल्यांचा प्रयत्न फलद्रूप ठरला नाही कारण ते त्यांच्या सवर्ण जातीतील सहकाऱ्यांना मान्य नव्हते.

**५.५ ब्राम्हणेत्तर चळवळीतील सरंजामदारी नेतृत्व :**

शिक्षणाचा मंद गतीने होणारा प्रसार आणि नोकऱ्यांची कमतरता यामुळे बहुजन सम ाजातील हा सुशिक्षित मध्यमवर्ग दुर्बल राहिला होता. साहजिकच शाहू महाराजांसारख्या संस्थानिकाने मदतीचा हात पुढे करताच त्याला आश्वासन मिळाले. आणि बहुजन समाजाच्या चळवळीचे नेतृत्व शाहू महाराजांकडे आले. शाहू छत्रपतींनी ब्राम्हण श्रेष्ठत्वाच्या कल्पनेवर आघात केले. निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे काढून त्यांनी शिक्षणाला उत्तेजन दिले, आणि ब्राम्हणेतर सुशिक्षितांसाठी आपल्या संस्थानातील नोकरीत जागाही राखून ठेवल्या. अस्पृश्यता निवारण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. तरीही शाहू छत्रपतींच्या कारकिर्दीत ब्राम्हणेतर चळवळीत मध्ययुगीन मूल्यांचे पुनरूज्जीवन झाले. फ ुले यांचा वैदिक परंपरेला विरोध होता. शाहू महाराजांनी मराठे क्षत्रिय आहेत असा आग्रह धरल्यामुळे चातुर्वर्णाला मान्यता मिळाली.

शाहू महाराज स्वत: संस्थानिक होते. आपले पद सुरक्षित राखण्यासाठी त्यांना राजनिष्ठेची गवाही द्यावी लागली. ब्राम्हणेतर पक्षाच्या स्थापनेला उत्तेजन देऊन महाराजांनी बहुजन समाजाला काँग्रेसपासून दूर राखले. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर ब्राम्हणेतर चळवळीचे नेतृत्व पुन्हा मध्यमवर्गाकडे आले. तोपर्यंत इंग्रजांचे साम्राज्य भारतातील सर्वच लोकांच्या दारिद्र्याला व दुर्दशेला कारणीभूत ठरत आहे आणि इंग्रजी सत्तेला विरोध करून स्वातंत्र्य मिळविल्याशिवाय कुठल्याही वर्गाची उन्नती होणे शक्य नाही अशी बहुजन समाजातील शेतकरी व मध्यमवर्ग या दोघांचीही खात्री पटली होती. महात्मा गांधींनी बुद्धिऐवजी कृतीला महत्त्व देऊन, मध्यमवर्गीय सुशिक्षितांचे महत्त्व कमी केले होते. लोकशाही राजव्यवस्थेत संख्याबळाच्या जोरावर आपण सत्ता काबीज करू याची बहुजन समाजातील नेत्यांना जाणीव होऊ लागली होती. म्हणून १९३० नंतर जेथे यांच्या नेतृत्वाखाली ब्राम्हणेतर चळवळीतील कार्यकर्ते स्वातंत्र्याच्या चळवळीत सामील झाले.

**५.६ काँग्रेसांतर्गत ब्राम्हण – ब्राम्हणेतर संघर्ष :**

बहुजन समाजाच्या नेतृत्वाने राष्ट्रीय महासभेच्या कामकाजात सक्रिय भाग घेतला आणि खेड्यापाड्यापर्यंत राष्ट्रीय चळवळीचे लोण पोहचवले. १९३७ या निवडणुकीत मुंबई प्रांताच्या विधिमंडळात बहुजन समाजाचे अनेक जेष्ठ नेते व कार्यकर्ते निवडून आले. पक्ष श्रेष्ठींनी बहुजन समाजाच्या ब्राम्हणेतर नेतृत्वाच्या मागणीला डावलून श्री. बाळासाहेब खेरांचे नेतृत्व लादल्याने बहुजन समाजात असंतोष निर्माण झाला. १९४६ साली खेरांचे नेतृत्व पुन्हा लादल्याने हा असंतोष अधिक तीव्र झाला. त्यातून ब्राम्हण ब्राम्हणेतर वादाला पुन्हा एकदा चालना मिळाली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात बहुजन समाजाचे प्रस्थापित नेतृत्व श्री. केशवराव जेध्यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसपक्षातून बाहेर पडले. आणि त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची १९४८ साली स्थापना केली. मुंबई राज्यात मराठी भाषिक बहुजन समाजाच्या अवहेलनेचे प्रमुख कारण म्हणजे अमराठी–भाषिकांची एकजूट होय. मराठी भाषिक संख्येने सर्वाधिक असले तरी त्यांच्याकडे निर्णायक बहुमत नव्हते. याचाच अर्थ असा होईल की जोपर्यंत मराठी भाषिक राज्य स्थापन होत नाही, तोपर्यंत बहुजन समाजातील नेतृत्वाला आपल्या राजकीय आकांक्षा फलद्रुप करता येणार नाही. याच कारणात्सव बहुजन समाजाने संयुक्त महाराष्ट्राला एकमुखी पाठिंबा दिला. संयुक्त महाराष्ट्रात आपले नेतृत्व संपुष्टात येईल, या कारणात्सव सुरूवातीच्या काळात उच्चवर्णीय नेतृत्व संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल नव्हते. संयुक्त महाराष्ट्रात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित होऊन, दलितांवर अन्याय

होतील या कारणात्सव डॉ. आंबेडकरांचा संयुक्त महाराष्ट्राला विरोध होता. द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाल्यानंतर १९५६ च्या नेतृत्व स्पर्धेत मराठ्यांचे प्रस्थापित नेते श्री. भाऊसाहेब हिरे यांचा मराठा समाजातील (तत्कालीन संदर्भात फुटीर) नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी गुजराती भाषिकांच्या सहकार्याने पराभव केला. म्हणजेच ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद उत्तरोत्तर तीव्र होत गेला.[६३] आणि त्याचेच पर्यावसान म्हणजे १९५७ च्या निवडणुकीत बहुजनसमाजाच्या वर्चस्वाखालील पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात काँग्रेसचा दारूण पराभव होय. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबाबत जातिभेद विसरून सर्व मराठी भाषिक नेत्यांनी व जनतेने आपली एकजूट दाखवली होती ही विशेष उल्लेखनीय आहे. म्हणजेच १८६० ते १९६० या कालखंडात महाराष्ट्रातील जातीय राजकारणाचा केंद्रबिंदू ब्राम्हण ब्राम्हणेतर वाद होता. १९६० नंतरच्या कालखंडात या वादाची तीव्रता कमी झाली असली तरी तो अद्याप संपुष्टात आला नाही.

**५.७ मराठा – मराठेतर वाद :**

१९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ''मराठ्यांचे राज्य'' प्रस्थापित झाले असले तरी तत्कालीन नेते श्री. यशवंतराव चव्हाण यांनी दूरदृष्टी दाखवून ''बेरजेच्या राजकारणा'' द्वारा बहुजन समाजातील मराठेतर नेतृत्वास सामावून घेण्याचा कसोशीने प्रयत्न केला होता. मराठ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाले असले तरीही इतर कनिष्ठ जातींना नेतृत्वाची पुरेशी संधी उपलब्ध असल्याने, बहुजन समाजाचे ऐक्य निदान पहिले दशक (१९६० ते १९७०) कायम राहिले. या कालखंडात पंचायती राज व सहकारी संस्था मराठ्यांनी ''काबिज'' केल्याने, आपण दुर्लक्षित आहोत आणि आपणास आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणात अधिकार स्थाने प्राप्त होत नाही, असा समज कनिष्ठ जातीच्या नेतृत्वात निर्माण होण्याची सुरूवात झाली. १९७२ नंतर मराठा नेतृत्वाचे खच्चीकरण करण्याकरिता पक्षश्रेष्ठींनी मराठा–मराठेतर वादाला खतपारी दिले. त्यातूनच इतर मागास जाती, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याच्या युतीची संकल्पना साकार झाली. १९७८ साली मराठा नेतृत्व यशवंतराव चव्हाणांच्या काँग्रेस (स्व) बरोबर, तर मराठेतर नेतृत्व इंदिरा काँग्रेसमध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली. १९८० ते १९८८ या कालखंडात मराठा व मराठेतर नेतृत्वातील दरी अधिक रूंद झाली. मंडल आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी करावी अशी कनिष्ठ (इतर मागास) जातींच्या नेतृत्वाची मागणी होती तर मराठा महासंघाचा त्यास प्रखर विरोध होता. १९९० साली तत्कालीन राष्ट्रीय आघाडी सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी करण्याची घोषणा

केल्याने राजकीय समिकरणे पूर्णत: बदलली. परिस्थितीच्या दबावाखाली काँग्रेससह सर्वच राजकीय पक्षांना इतर मागास जातींच्या राजकीय आकांक्षांच्या पूर्ततेबाबत कमी अधिक कार्यवाही करावी लागली. या बदललेल्या राजकीय संदर्भात १९९१ च्या लोकसभेच्या निवडणुका झाल्या. त्यात सर्वच राजकीय पक्षांनी इतर मागासवर्गीय जातीय उमेदवारांना आधीच्या सर्व निवडणुकांपेक्षा कितीतरी अधिक जागा बहाल केल्या.

**५.८ सवर्ण दलित वाद :**

सवर्ण–दलित वाद हा भारतीय समाजव्यवस्थेत रूजलेल्या अस्पृश्यतापालन आणि अतिशूद्रांना दिल्या जाणाऱ्या अन्यायकारक वागणुकीवर आधारित आहे. दलितांची सामाजिक सुधारणेची चळवळ १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली. फुल्यांच्या ब्राम्हणेतर चळवळीत शूद्रांबरोबरच अतिशूद्रांचाही समावेश होता. परंतु अस्पृश्य जातींची फुल्यांची तरफदारी बहुजन समाजातील अन्य नेत्यांना अमान्य होती. त्यामुळेच कालांतराने अस्पृश्य जाती जमाती बहुजन समाजापासून दुरावल्या. २० व्या शतकात अस्पृश्यांची अस्मिता जागृत करण्याची ऐतिहासिक कामगिरी महार जातीत जन्माला आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दलित नेत्यांनी केली. आंबेडकरांच्या पश्चात आंबेडकरवादी चळवळ क्षीण झाली आहे. त्याचे पुनर्जीवन करण्याचा दलित पॅथरचा प्रयत्नही अयशस्व ठरला आहे. त्यामुळेच अनुसूचित जाती जमाती व नवबौद्धांची संख्या एकूण लोकसंख्येच्या २२.५ टक्के असली तरी त्यांच्या राजकीय आकांक्षा अद्याप पल्लवित होऊ शकल्या नाहीत. त्यातून निर्माण झालेल्या वैफल्यामुळे सवर्ण दलित संघर्ष उत्तरोत्र तीव्र होत चालला आहे आणि त्यात दलित जाती–जमातीचे लोक भरडले जातात.

**२.६ मराठ्यांचे धुरीणत्व :**

''कास्ट इन मॉडर्न इंडिया अॅन्ड अदर अेसेस'' या आपल्या ग्रंथात सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी जातिनिष्ठ भारतीय राजकारणाचे विश्लेषण करताना प्रभुत्व किंवा वर्चस्व असलेल्या जातीसमूहाची संकल्पना विशद केली. त्यांच्या मते स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रातिनिधिक लोकशाही आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचा स्वीकार करण्यात आल्याने जातीसमूहांच्या संख्या सामर्थ्याला विशेष महत्व प्राप्त झाले. जातीसमूहांचे संख्या सामर्थ्य आणि राजकारणावरील त्यांचा प्रभाव यांतील संबंध विशद करण्याकरिता एम. एन. श्रीनिवास यांनी ''डॅमिनन्ट कास्ट'' या शब्द प्रयोगाची रचना केली. योगेंद्रसिंग यांनी श्रीनिवास यांच्या संकल्पनेचे विस्तृतीकरण करताना ''जातीसमूहांच्या उतरंडीत धार्मिक क्रियाकर्माच्या आधारे असलेले पारंपारिक स्थान, संख्यासामर्थ्य,

शैक्षणिक प्रगती, आर्थिक समृद्धी या सर्व किंवा त्यातील काही निकषांच्या आधारे इतर जातीसमूहांपेक्षा अधिक प्रभावी असलेल्या जातीसमूह'' अशी व्याख्या केली आहे. या क्रियेला श्रीनिवास ''संस्कृतिकरण'' असे म्हणतात. महाराष्ट्राच्या संदर्भात मराठा कुणबी जाती समूहाला प्रभावी जातीसमूह असे म्हणता येईल. कनिष्ठ मराठे (कुणबी) ''खानदानी'' (वतनदार) मराठ्यांचे अनुकरण करतात. आणि त्या प्रवृत्तीचा प्रसार कनिष्ठ जातीसमूहात झाला आहे. मराठा अभिजनांच्या ताब्यात सहकारी साखर कारखाने असल्याने, इतर मागासवर्गीय अभिजनांना देखील आपले सहकारी साखर कारखाने असावे असे वाटते.

**६.१ मराठा–कुणबी जातीसमूह :**

मराठा कुणबी जातीची रचना, विचारप्रणाली आणि अस्मिता कशी घडली हे पाहतांना कुणबी आणि मराठा हे शब्दप्रयोग विविध अर्थ धारण करतात. शेतीवर राबणाऱ्या माणसाला इतर विशिष्ट जातीचा नसेल तर कुणबी मानले जात होते. म्हणजे बंदिस्त जातीव्यवस्थेच्या चौकटीपेक्षा कुणबी गट हा खुला, मोकळा होता. मासेमारी करणारे कोळी शेती करू लागले की कुणबी होत. मराठा हा शब्दप्रयोगही गुंतागुंतीचा, अनेकार्थी आहे. एकीकडे सर्व मराठी बोलणारे ते मराठा तर दुसरीकडे फक्त शहाण्णव कुळांमध्येच जन्म घेणारे ते मराठा अशी दोन टोके दिसतात. मराठा राजवटीच्या काळात सर्व मराठी बोलणारे, सर्वांनाच मराठा मानले जाई. शिवाजीच्या काळात मराठा हा शब्द जेव्हा सैनिकी कौशल्य ह्या अर्थी येत असे. तेव्हा तो जातिवाचक नसे. परंतु हीच शब्दसंहिता मराठा कुटुंबाचे वर्णन करताना विशिष्ट जातीच्या संदर्भात येई. म्हणजेच ह्या शिवकालात शब्दाच्या वापराला जी एक प्रकारची सहजता आणि लवचिकता होती ती १९ व्या शतकात गेली. मराठा घराण्यांनी मुसलमानांशी संगनमत केल्याने त्यांच्यातील शुद्धता नाहीशी झाली आहे. म्हणून मराठा घराण्यांना क्षत्रियत्व देता येणार नाही असा ब्राम्हणांचा निर्वाळा होता. मराठा आणि चित्पावनंमधल्या वादात धार्मिक संस्कारांचा वापर शस्त्रासारखा झाला. ह्याच काळात अनेक शेतकरी कुटुंबांना मराठा म्हणवून घेण्यास उत्तेजन मिळाले. मराठा ह्या शब्दाला वेगळी झळाळी, स्वतंत्र अस्मिता, प्राप्त झाली.''[६४]

१९३१ च्या जनगणनेनुसार मराठी भाषिक प्रदेशात मराठा–कुणबी जाती समूहाची संख्या एकूण लोकसंख्येच्या ४० टक्केहून अधिक होती. पश्चिम महाराष्ट्रात आणि कोकणात त्यांची टक्केवारी ४१ टक्के, मराठवाड्यात ३७ टक्के आणि विदर्भात २६ टक्के आहे. यापैकी ''९६ कुळी'' वतनदार मराठे स्वत:ला क्षत्रिय समजतात, तर इतर 'मराठे'

कुणबी सदरात मोडतात. विदर्भात वतनदार मराठे म्हणजेच 'देशमुख' आणि कुणबी 'पाटील' यांच्यातील वैमनस्य सर्वश्रृत आहे. कोकणात मराठ्यांपेक्षा कुणब्यांचे प्राबल्य आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या सूचीत 'कुणबी' जातीचा समावेश करण्यात आला आहे. सामाजिक आणि आर्थिक स्तरावर जरी मराठा आणि कुणबी जातीसमूह वेगळे असले तरी राजकारणात सत्ताप्राप्तीच्या क्रियेत त्यांची युती असल्याने, त्या जातीसमूहांला ''मराठा–कुणबी जातीसमूह'' असे एकत्रितरीत्या ओळखले जाते.

**६.२ मराठ्यांच्या धुरीणत्वाचे विश्लेषण :**

मराठा जातीत ''अभिजन'' (elite) 'आणि ''जन'' (masses) असले तरी मराठा कुणबी जातीसमूह एकसंघ असल्याचे वरकरणी दिसते. मराठ्यांतर्गत उच्चनीच, वतनदार मराठे व इतर सर्वसामान्य मराठे असे भेद असतानाही त्यांच्या वर्गसंघर्ष झाला नाही. त्याचे स्पष्टीकरण महाराष्ट्राच्या राजकारणाचे नामवंत अभ्यासक जयंत लेले यांनी त्यांच्या ''इलीट प्लूरॅलिझम ॲण्ड क्लास रूल'' या ग्रंथात केले आहे. लेलेंच्या मते मराठा जातीत वर्गकलह झाला नाही. त्याची कारणे पुढील प्रमाणे आहेत. :

१) जातीच्या लवचिक मर्यादा.

२) जातीच्या गाभ्याशी असलेले पितृप्राधान्य कुटुंब व्यवस्था. (Patriarchialism)

३) इतर जातींच्या संबंधात पूर्वापार चालत आलेली यजमानी परंपरा आणि या तीन गुणधर्मांचा हवा तेव्हा वर्चस्वांच्या समर्थनासाठी केला जाणारा उपयोग.

मराठा अभिजनांच्या संस्कृती व अर्थव्यवस्थेने जोपासलेल्या या परंपरागत शासकप्रवृतीचा वारसा महाराष्ट्रात काँग्रेसला मिळाला. ब्रिटिश साम्राज्य काळात पेरलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर जोमाने वाढीस लागलेल्या, भारतीय भांडवलशाहीच्या संदर्भात ह्या अभिजन मरांठ्यांच्या धुरीणत्वाचा एक नवा अविष्कार झाला.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर ''मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा'', या तत्त्वाचा उद्घोष करण्यात आला आणि चव्हाणांच्या नेतृत्वाखाली मराठा नेतृत्व (१९६० नंतर) एकसंघ बनले. ग्रामीण भागात भांडवलशाहीचा प्रभाव रोखण्याकरिता चव्हाणांनी सहकारी तत्त्वावर या कृषी तत्वावर कृषि उद्योगांच्या उभारणीस प्रोत्साहन दिले. १९६२ साली पंचायतीराज संस्थांची स्थापना करण्यात आली. सहकारी संस्था

व पंचायती राज यंत्रणाद्वारे ग्रामीण जनतेच्या समस्यांचे निवारण करण्याचा प्रमाणिक प्रयत्न मराठा अभिजनांकडून करण्यात आले. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांच्या नेतृत्वाखाली १९६० ते १९७० या दशकात मराठ्यांचे धुरीणत्व प्रस्थापित झाले.

**दलित राजकारण :**

जातीव्यवस्थेची सगळ्यात तीव्र झळ नेहमीच अस्पृश्य समजल्या गेलेल्या जातींना बसत आली आहे. त्यामुळेच दलित जातींच्या राजकारणात जातविरोध, आपले सामाजिक स्थान उंचावण्याचा प्रयत्न आणि उच्च जातींचा प्रतिकार या घटकांचे स्थान मध्यवर्ती असल्याचे दिसते. १८९० नंतरच्या काळात दलित समाजातील काही व्यक्तिंनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडून उन्नती साधण्यासाठी संघटन करण्याचे प्रयत्न सुरू केले. गोपाळबाबा वलंगकर आणि शिवराम जानबा कांबळे या व्यक्तींनी आपल्या समाजाच्या उन्नतीसाठींच्या प्रयत्नांचा अभ्यास केला. त्याही आधी महात्मा फुले यांनी आपल्या लिखाणातून आणि सामाजिक कार्याद्वारे अस्पृश्यतेच्या प्रश्नाला हात घातला होताच. छत्रपती शाहू आणि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या विचार आणि कार्यामुळेच अस्पृश्यतेचा प्रश्न समाजकारणात महत्वाचा बनण्यास मदत झाली. मानवतावाद आणि समता विचार ही फुले–शाहू शिंदे यांच्या भूमिकेमागील सुस्पष्टपणा होता. त्यामुळे केवळ अस्पृश्यता निवारणापलीकडे जाऊन जातीनिर्मूलनाच्या प्रश्नाला त्यांनी हात घातला. भारतीय राजकारणात जातीच्या प्रश्नाची उकल करावी लागेल असा आग्रह विठ्ठल रामजी शिंदेनी धरला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातच प्रथम श्री. म. माटे आणि नंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीही अस्पृश्यतेच्या प्रथेच्या विरूद्ध भूमिका घेतली. परंतु फ ुले–शाहू–शिंदे यांच्या आणि माटे–सावरकर यांच्या भूमिकेत फरक आहे. फुले–शाहू–शिंदे यांच्या आणि माटे–सावरकरांनी मात्र तसे मानले म्हणूनच फुले–शाहू–शिंदे यांनी अस्पृश्यताविरोध आणि जातीचा प्रश्न हे राजकारणाचे भाग मानले व दलित समाजाच्या राजकारणाची पायाभरणी केली. याउलट माटे–सावरकरांनी मात्र अशा राजकारणास हातभार लावला नाही. कारण त्यांच्या दृष्टिने हिंदू समाज सुधारण्यापुरताच हा प्रश्न मर्यादित होता.[६५]

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेविरूद्ध लढा देऊन दलित समाजाचे संघटन घडविले, राजकीय सत्तेतील दलितांच्या वाट्यासाठी आग्रह धरला. तरीही केवळ अस्पृश्यता आणि दलित समाज एवढ्यापुरते त्यांचे तत्वज्ञान आणि राजकारण मर्यादित नव्हते. जातीचा प्रश्न सोडविण्याचा त्यांनी सर्वांगीण विचार केला आणि समता व बंधुत्व या तत्वांचा

पाठपुरावा करण्यासाठी गौतम बुद्धाचा विचार स्वीकारावा या निष्कर्षाप्रत ते येऊन पोहचले. त्यांच्या मृत्यूपूर्वी काही महिने आधी त्यांनी औपचारिकपणे बुद्धविचार आणि धम्म यांचा अंगीकार केला त्यांची ही कृती केवळ व्यक्तिगत नव्हती बुद्धविचाराचा प्रसार करून त्यांनी लाखो अनुयायांना धम्मदीक्षा घेण्यास प्रवृत्त केले. राजकीय पातळीवर प्रथम डॉ. आंबेडकरांनी 'स्वतंत्र मजूर पक्ष' या पक्षाची स्थापना केली. दलित, शेतमजूर आणि कष्टकरी यांचा राजकीय पक्ष उभारणे हा त्यामागील हेतू होता. १९४२ नंतर स्वातंत्र्यासाठीच्या वाटाघाटीमध्ये धर्म, जातीसमूह यांना महत्व प्राप्त झाल्यामुळे दलित समाजाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आंबेडकरांनी 'शेड्यूल्ड कास्टस् फेडरेशन' ची स्थापना केली. मात्र स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी राजकारणाची दिशा बदलली. राजकीय पक्ष हा सर्वसामान्य जनतेचा पक्ष असावा आणि त्याद्वारे समता, लोकशाही आणि लोककल्याणाचा पाठपुरावा करता यावा अशी आंबेडकरांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी आपल्या मृत्यूपूर्वी 'रिपब्लिकन' पक्षाच्या निर्मितीचा आराखडा तयार केला होता.''[६६]

आंबेडकरांच्या चळवळीचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील दलित समाजात मोठ्या प्रमाणावर जागृती निर्माण झाली, तसेच ऐक्यभावना वाढीला लागली. दलित समाजात राजकीय महत्वाकांक्षा निर्माण झाली. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात दलित राजकारण हा एक महत्वाचा घटक बनला. दलितांविषयी दलितेतर समाजाची अनास्था, स्वातंत्र्यचळवळीचे वातावरण आणि वसाहतवादाच्या संदर्भात आंबेडकरांना घ्यावा लागलेल्या भूमिका यांच्यामुळे आंबेडकरी चळवळ काँग्रेसच्या विरोधात होती, तशीच कम्युनिस्टांबद्दलही आंबेडकरी चळवळीला फारशी आपुलकी नव्हती. या परिस्थितीमुळे स्वातंत्र्योतर कालखंडात आंबेडकरी चळवळीपुढे नव्या संदर्भात राजकारण करण्याचे व त्यासाठी नव्या भूमिका घेण्याचे आव्हान होते. यातूनच आंबेडकरांच्या नंतरचे दलित राजकारण आकार घेत गेले. स्वातंत्र्योतर काळात पक्षीय राजकारणात एकट्या दलितांचा पक्ष काय करू शकेल यावर मर्यादा पडतात. त्याचप्रमाणे कोणत्या पक्षांबरोबर सहकार्य करायचे हा प्रश्नही गुंतागुंतीचा बनतो. १९५६ नंतर काँग्रेसने मराठी व गुजराती भाषिकांचे संयुक्त राज्य स्वीकारले. इतर सर्व पक्षांनी मात्र महाराष्ट्राची मागणी कायम ठेवली. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने (स्थापन होऊ घातलेल्या रिपब्लिकन पक्षाने) या मागणीला पाठिंबा देऊन संयुक्त महाराष्ट्राच्या काँग्रेसविरोधी आघाडीत भाग घेतला. १९५७ च्या निवडणूकित रिपब्लिकन पक्षाला मोठे यश मिळाले (लोकसभेत पाच जागा तर विधानसभेत तेरा जागा) अशा प्रकारे काँग्रेसच्या विरोधाचे राजकारण करीत रिपब्लिकन

पक्षाच्या वाटचालीला सुरूवात झाली. पण काँग्रेसविरोधकांची आघाडीच फार काळ टिकू शकली नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीत फुट पडली. त्यानंतर दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पक्षाने भूमिहीन शेतमजूरांची चळवळ उभी केली. डॉ. आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन बौद्ध झालेल्यांची संख्या मोठी होती. बाकीचा दलित सम ाज आपल्या बरोबर ठेवण्यात काँग्रेसपक्ष यशस्वी झाला होता. भूमिहीनांच्या चळवळीच्या मुद्द्यावरून दलितेतर समाजाचा पाठिंबा मिळविणे रिपब्लिकन पक्षाला शक्य झाले नाही. १९६७ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत दादासाहेब गायकवाडांनी काँग्रेसशी सहकार्य करण्याची भूमिका घेतली. त्यावरून पक्षात मतभेद झाले. यानंतरच्या काळात दलित नेत्यांपैकी काहीजण काँग्रेसमध्ये सामिल झाले. दलित पॅथर्स एका बाजूला आंबेडकर चळवळीचा वारसा आणि दुसऱ्या बाजूला परिणामकारक राजकारण करण्यात आलेले अपयश अशा कोंडीत सुशिक्षित दलित तरूणवर्ग सापडला. धर्मत्याग, शिक्षण, राखीव जागा, इ. सर्व घडूनही सामाजिक विषमतेचा अनुभव कमी झाला नाही. त्यामुळे राजकारणाइतकेच सांस्कृतिक चौकट बदलणे गरजेचे आहे याची जाणीव असलेल्या तरूण दलितांनी साहित्य निर्मिती करून सांस्कृतिक हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. यातून महाराष्ट्रात दलित साहित्याची परंपरा उदयाला आली दलित साहित्य हे १९७० च्या दशकाच्या आरंभकाळात दलित समाजाची जी कोंडी झाली होती त्याचीच परिणती होती. नेत्यांच्या बेजबाबदार वर्तनामुळे अनुयायी वाऱ्यावर पडतात या अनुभवातून कार्यकर्ते अस्वस्थ होते. या अस्वस्थतेमधून आक्रमक विचारांच्या 'दलित पॅथर्स' या संघटनेचा उदय झाला. (१९७२).

महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळींनाही पॅथर्सची स्थापना स्वागतार्ह वाटली. याचे कारण दलित पॅथर्सनी पुन्हा एकवार जातीचा प्रश्न चळवळीच्या केंद्रस्थानी आणला. तसेच पूर्वास्पृश्य आणि इतर बेकार, दरिद्री समाजघटक यांच्याशी सहकार्य करण्याची पॅथर्सची भूमिका होती. दलित याचा अर्थ सर्व शोषित–पीडित जनता असेही पॅथर्सच्या काळात म्हटले जाऊ लागले. दलित पॅथर्सनी मुंबईत शिवसेनेच्या विरोधात तर महाराष्ट्राच्या इतर भागात स्थानिक काँग्रेस पुढाऱ्यांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतल्याने दलित राजकारण धारदार बनण्याची शक्यता निर्माण झाली. मात्र दलित पॅथर्स ही संघटित संस्था म्हणून उभी राहू शकली नाही. गावोगाव पॅथर्सच्या कार्यकर्त्यांचे काम चालू राहिले पण त्यात सुसूत्रता नसे. काहीशा उत्स्फुर्त आणि तात्कालिक प्रतिसादांपुरतीच पॅथर्स चळवळ मर्यादित राहिली. सत्तेचा प्रश्न आणि वारंवार होणाऱ्या फुटी यांनी सातत्याने

सर्वच पॅथर गटांचा पिच्छा पुरवला. १९८१–८२ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात दलित समाजाचा प्रभाव पाडण्यात दलित पॅथर्सच्या कोणत्याच गटाला फारसे यश आले नाही.

१९५७ पासून पॅथर्सच्या फुटीपर्यंतच्या काळात दलित जातींचे राजकीय स्थान किंवा सामाजिक प्रतिष्ठा उंचावण्यात दलित राजकारण अपयशी ठरले. महाराष्ट्रात काँग्रेसविरोधी पक्ष फारसे बलवान नसल्यामुळे विरोधी पक्षांबरोबर राहून दलित राजकारणाचा फारसा फायदा होण्याची शक्यता नव्हतीच, पण विरोधी पक्षांना फारसे स्थान नसल्यामुळेच रिपब्लिकन पक्षाला काँग्रेसबरोबर जाऊनही सत्तेत वाटा मिळण्याची शक्यता नव्हती. दलित राजकारणाच्या या दुर्बल अवस्थेच्या पार्श्वभूमीवर १९७८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाला डॉ. आंबेडकरांचे नाव देण्याचा मुद्दा पुढे आला. या प्रस्तावाला मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला आणि मराठवाड्याच्या अनेक भागांत दलित विरोधी दंगली पेटल्या. या दंगलीच्या वेळी ग्रामीण दलितांचे संरक्षण करणे, दंगलीनंतर अत्याचार विरोधी खटल्यांचा पाठपुरावा करणे, यासाठी दलित संघटना व पक्ष यांच्याजवळ यंत्रणा नव्हती. त्यामुळे नामांतर–विरोध आणि त्यातून झालेल्या दंगली या दलित राजकारणाची पीछेहाट करणाऱ्या घटना ठरल्या. तसेच या पीछेहाटीमुळे पुढे दशकभर दलित संघटनांपुढे फक्त विद्यापिठाचे नामांतर करून घेणे एवढाच मुख्य कार्यक्रम राहिला. १९८४ नंतर प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील गटाने गायरान जमिनी, भूमिहीन या प्रश्नावरील आंदोलन करून दलित राजकारणाची ही कोंडी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र या पुढाकारामुळे दलित नेतृत्वातील फाटाफूट आणखी वाढली.[६७] दलित राजकारणापुढील समस्यांचा विचार चार मुद्द्याच्या आधारे करता येईल.

१९८५ नंतर महाराष्ट्रात काँग्रेसला पर्याय म्हणून शिवसेना–भाजप युती साकारली व पुढे ती यशस्वी झाली. या संदर्भात दलित राजकारणापुढे तीन पर्याय राहतात. (अ) काँग्रेसबरोबर सहकार्य करून सेना भाजप युतीच्या विरोधाचे राजकारण करीत आपले बळ वाढविणे, १९९८ या लोकसभा निवडणुकीत या पद्धतीने रिपब्लिकन पक्षाचे चार खासदार बिगरराखीव मतदार संघातून निवडून आले. या पर्यायात दलितांचे काँग्रेसवरील अवलंबित्व वाढण्याचा धोका राहतो. (ब) याउलट सेना–भाजप युतीशी सहकार्य करणे हा दुसरा पर्याय आहे. आंबेडकरी विचारांच्या चौकटीत राहून सेना–भाजप या हिंदुत्ववादी आणि उच्च जातींच्या पक्षपाती पक्षांशी सहकार्य करणे अवघड ठरू शकते. तसेच शिवसेना आणि भाजप यांच्या राजकारणाचा रोख दलित समाजात विभाजन घडविणे हा असल्याने त्यांच्याशी केलेले सहकार्य दलित गटांना प्रत्यक्षात त्रासदायक ठरू शकते.

(क) महाराष्ट्रात या दोन (काँग्रेस आणि सेना–भाजप) 'शक्ती' असल्यामुळे स्वतंत्रपणे राजकारण करण्याचा तिसरा पर्याय फारच मर्यादित ठरतो. या अडचणी पाहिल्यास सत्तेच्या राजकारणात दलित राजकारणावर पडणाऱ्या मर्यादा स्पष्ट होतात.

आंबेडकरी चळवळीने अशिक्षित, गरीब आणि सर्वत्र विखुरलेल्या दलित समाजाचे ऐक्य उभारण्याचा प्रयत्न केला. सर्व दलित समाज अस्पृश्यतेच्या रूढीने ग्रस्त असला तरी त्या समाजाच्या अंतर्गत विविध जाती आहेत. प्रत्येक जात दुसरीपासून अलग ठेवणे हे जातीव्यवस्थेचे एक वैशिष्ट्य असल्यामुळे दलित समाजातही जातीभेद आढळतात. आणि जाती–जातीत परस्परांबद्दल स्पर्धा आणि अविश्वास दिसतो. महार, मातंग आणि चर्मकार या महाराष्ट्रातील प्रमुख दलित जातींच्या परस्परासंबधही याला अपवाद नाहीत.

महार समाजात पूर्वापार शिक्षण आणि नोकरीपेशा यांची परंपरा होती. विशिष्ट कारागिरी किंवा कौशल्य यांचा अभाव असल्यामुळे हा समाज चटकन शहराकडे वळला आणि आधुनिक समाजव्यवस्थेत स्थान मिळविण्यासाठी धडपड करू लागला. त्यामुळे जेव्हा अनुसूचित जातींसाठी राखीव जागांचे धोरण अमलात आले तेव्हा त्याचा लाभ घेणे महार समाजाला सोपे गेले. या वस्तुस्थितीचा उपयोग महार–विरोधी प्रचार करण्यासाठी केला गेला. विशेषत: १९८० नंतरच्या काळात अनेक हिंदुत्ववादी संघटनांनी आणि शिवसेनेने या मुद्द्याचा वापर केला.

मातंग व चर्मकार समाजातील व्यक्तिंनी बौद्ध धर्म स्वीकारण्याचे प्रमाणही कमी आहे. त्यामुळे आक्रमक आंबेडकरवाद्यांनी या समाजावर टीका करून महार आणि महारेतर यांच्यातील अंतर वाढविण्यास हातभार लावल्याचे दिसते. १९९० नंतर सेना–भाजप युतीनेही मातंग व चर्मकार या समाजांना जवळ करण्याचे बरेच प्रयत्न केले. अशा प्रकारे दलित समाजाच्या अंतर्गत जाती जातींमधील स्पर्धेचे आव्हान दलित राजकारणापुढे उभे असल्याचे दिसते. या स्पर्धेच्या परिणामी पूर्वापारचे दलित राजकारण जास्तच एकांगी व महार बौद्ध केंद्री होण्याची शक्यता आहे.

१९९५ नंतर महाराष्ट्रात 'हिंदू दलितांना' एकत्र आणण्याचे प्रयत्न सुरू झालेले दिसतात. बौद्ध दलितांच्या राजकारणाला आव्हान देऊन दलितांमध्ये हिंदू अस्मिता निर्माण करणे हा या प्रयत्नांचा हेतू आहे. महारेतर दलितांचे वेगळेपण ठसविण्यासाठी संत रविदास, लहूजी वस्ताद, अण्णाभाऊ साठे यांचा प्रतिकासारखा उपयोग केला जाऊ लागला असून महारेतर दलितांनाही सुधारणा आणि क्रांतिची पार्श्वभूती आहे असे दाखविण्याचे प्रयत्न झाल्याचे आढळते.

**२.८ इतर मागास जातींचे राजकारण :**

'ओबीसी' राजकारणाची प्रत्यक्ष मांडणी १९८७–८८ नंतर झाली असली तरी महाराष्ट्राच्या राजकारणात इतर जातींनी मराठाविरोधी भूमिकेतून राजकारण करण्याचे प्रयत्न १९७७ नंतरच्या काळात सातत्याने केल्याचे दिसते. काँग्रेसवर मराठा नेतृत्वाची पकड असल्यामुळे १९७७ नंतरच्या काळात अनेक बिगर मराठा नेते शेतकरी संघटनेत सामिल झाले. १९८४ नंतरच्या काळात शिवसेनेने मराठवाडा आणि विदर्भात आपली संघटना वाढविण्यास सुरूवात केली तेव्हा या भागांतील बिगर मराठा तरूणांनी त्याला मोठा प्रतिसाद दिला. याचाच अर्थ बिगर मराठा समाजातील कार्यकर्ते राजकारणात उतरण्यासाठीचा प्रभावी मार्ग, शोधत होते. तो मार्ग शेतकरी संघटना आणि शिवसेना यांच्या रूपाने त्यांना उपलब्ध होताच अनेक बिगर मराठा नेते कार्यकर्ते या संघटनेमध्ये सामील झाले. मंडल आयोगाच्या निमित्ताने महाराष्ट्रात 'ओबीसी' राजकारण करण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यांना मात्र शेतकरी संघटना किंवा शिवसेना यापैकी कोणीच पाठिंबा दिला नाही.

महाराष्ट्रात ब्राम्हणेतर चळवळीच्या पार्श्वभूमीमुळे 'बहुजन' म्हणजे ब्राम्हणेतर, शेतकरी व कारागीर जाती असा अर्थ पूर्वापार केला जातो. या अर्थाने १९६० नंतर काँग्रेसपक्षाने 'बहुजन समाजाचे' राजकारण केले. ते राजकारण क्षत्रिय आणि बिगरक्षत्रिय शेतकरी समूहांवर आधारित होते. हरितक्रांती आणि राज्य सरकारची अनुकूल धोरणे यातून एका बाजूला सधन शेतकरी हा गट उदयाला आला. हळूहळू काँग्रेसचे राजकारण बहुजनविरोधी आहे अशी टीका केली १९८७–८९ नंतर विश्वनाथ प्रताप सिंगांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रातील जनता दलातील काहींनी 'ओबीसी' राजकारण करण्याचे प्रयत्न केले. पण जनता दलाला महाराष्ट्रात कोठेच फारसे स्थान नसल्यामुळे हे प्रयत्न निरर्थक होते. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळीच जनता दलामार्फत ओबीसी राजकारण होऊ शकणार नाही हे स्पष्ट झाले.

१९९१च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी जनता दलाने महाराष्ट्रात 'ओबीसी' ना अनुकूल भूमिका घेण्याचा प्रयत्न केला. पण निवडणुकीत अपयश आल्याने हा प्रयत्न बाजूला पडला. १९९३ मध्ये ओबीसी राजकारण करण्याच्या भूमिकेतून 'बहुजन महासंघ' स्थापन झाला. जात हाच राजकारणातील महत्वाचा घटक मानून सर्व मागास आणि शूद्रातिशूद्र जातींचे संघटन उभारण्यावर महासंघाने भर दिला. विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांमध्ये बिगरमराठा जाती मोठ्या संख्येने आढळतात. तेथे बहुजन महासंघाचा

चटकन प्रसारही झाला. महासंघाने मागास जाती आणि दलित यांच्या ऐक्यावर भर दिला. शिवाय बहुजन समाज हाच 'हिंदू' परंपरेचा खरा वारस असल्याचा दावा केला. अशा प्रकारे भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांच्या हिंदुत्वाचे आकर्षण कमी करण्याची महासंघाची योजना होती. १९९५ च्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर मात्र बहुजन महासंघाची वाढ थांबली.[६८]

बहुजन महासंघाने रिपब्लिकन पक्षाच्या भारतीय रिपब्लिकन पक्ष या गटाशी हातमिळवणी करून दलित–मागास युती साधण्याचे प्रयत्न केले. पण खुद्द रिपब्लिकन गटांच्या अंतर्गत राजकारणामुळे १९९६ नंतर या प्रयत्नांची धार कमी झाली. तसेच १९९५ च्या विधानसभा निवडणुकीने महाराष्ट्रात दोन आघाड्यांमध्ये राजकीय शक्तिचे ध्रुवीकरण झाले. त्यामुळे बहुजन महासंघाला फारसा वाव राहिला नाही. जातीच्या संदर्भात 'बहुजन' संकल्पनेच्या सीमा आखणे अवघड जाते. पूर्वापार महाराष्ट्रातील मराठा जातीला क्षत्रियत्वाचा दर्जा नाकारला होता. या आधारावर तिचा बहुजनांत समावेश होतो. पण खुद्द या जातीने मात्र सतत क्षत्रियत्वाचा दावा केल्याचे दिसते. आपण क्षत्रिय, द्विज, उच्चवर्णीय, राज्यकर्ते आहोत असे म्हणणाऱ्या समूहाला 'बहुजन' कसे समजायचे असा हा पेच आहे. दुसऱ्या बाजूला मराठा–कुणबी समाजातील मराठा आणि कुणबी हा भेद हा आणखी एक पेच आहे. मुळात मराठा आणि कुणबी हा भेद धूसर आहे. पण कुणबी हे सामान्य तर मराठा हे उच्च व प्रतिष्ठित मानले गेले आहेत. मंडल आयोगाने कुणबी हे मागास जातींमध्ये समाविष्ट केले आहेत. मराठ्यांना वेगळे काढून कुणबी जातीला राखीव जागा देणे शक्य आहे का ?

महाराष्ट्रपुरता विचार केला तर १९६० नंतरच्या काळात मराठा–कुणबी समाजातील काही गटांमध्ये सत्ता व संपत्तीचे केंद्रीकरण झाल्याचे दिसते. अशा समाजाला मागास कसे मानता येईल हा पेच आहेच. पण या समाजाला वगळून बहुजनवादी राजकारण होईल का याचीही शंका आहे. कुणबी जात वगळून राजकीय संघटन करणे दुरापास्त आहे. म्हणजेच मराठा समाजाचा समावेश केला तर बहुजनवादी राजकारण पातळ होते आणि न केला तर बहुजनवादी राजकारण आकार घेऊ शकत नाही.

बहुजनवादात मागास समूहांच्या आर्थिक मागासलेपणाचा मुद्दाही महत्वाचा आहे. सामाजिक विषमता आणि आर्थिक दुरावस्था या हातात हात घालूनच नांदतात. आर्थिक विषमता आणि साधनसामुग्रीच्या विषम वाटपाचाही प्रश्न बहुजनवादात अंतर्भूत आहे. बहुजन महासंघानेही हा मुद्दा डोळ्यापुढे ठेवून 'बहुजनांतील महाजन' असा शब्दप्रयोग

केला होता. मराठा जातीतील स्तरीकरणात चर्चा मागे येऊन गेली आहे. मोठे, श्रीमंत शेतकरी, मध्यम, कोरडवाहू शेतकरी, गरीब शेतकरी असे स्तरीकरण या शेतकरी जातीत झाले आहे. श्रीमंत शेतकऱ्याचे वर्चस्व असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांशीच गरीब शेतकरीही जोडलेला आहे. श्रीमंत शेतकऱ्यांच्या कुटुंबातील नवी पिढी उद्योजक बनू लागली आहे. कृषीउद्योग, निर्यात प्रधान क्रिया उद्योग, तसेच यंत्र उद्योग यात शिरकाव करून ही पिढी आपल्या संपन्नतेवर शिक्कामोर्तब करते आहे. हीच स्थिती, पण कमी प्रमाणात, इतर काही जातींच्या बाबतीत आढळते.[६९]

विविध मागास जाती आणि अल्पसंख्य विखुरलेले आहेत. त्यांना आपले उमेदवार आपल्या संख्याकबळावर निवडून आणता येत नाहीत. १९६० पासूनच्या काळात मराठा जातीच्या मदतीनेच अन्य जातीय उमेदवार निवडून येत राहिले. आता जर मराठा जातीला बाजूला ठेवून राजकारण करायचे झाले तर दलित व अन्य मागास जातींचा पाठिंबा मिळणे गरजेचे आहे. म्हणजेच आपल्या जातींच्या पलीकडे विचार करून मतदान झाले तरच बहुजनवादी राजकारण यशस्वी होऊ शकेल. महाराष्ट्रात शेतकरी संघटनेला उतरती कळा लागल्यानंतर १९८५-८६ नंतर कोणत्याही मोठ्या सामूहिक चळवळी झाल्या नाहीत. त्यामुळे बहुजनवादी जाणीव निर्माण होण्यास अवसर मिळाला नाही. शरद पवार १९८९ नंतर महाराष्ट्राचे पुन्हा मुख्यमंत्री झाले. त्यावेळी एक पुरागामी पाऊल म्हणून त्यांच्या सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 'ओबीसी' लोकप्रतिनिधीसाठी राखीव जागांची तरतूद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे सर्व जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि ग्रामपंचायतीमध्ये ओबीसी प्रतिनिधी निवडून येण्याची हमी मिळाली.

जातीय संघटनांचा विचार करता महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने हिंदुत्ववादी संघटना व नव्याने उभ्या राहत असलेल्या बहुजन संघटना यांच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने ब्राम्हणी-अब्राम्हणी स्वरूपाचे संघटन उभे राहताना बघावयास मिळत आहे. हिंदुत्ववादी संघटना प्रामुख्याने हिंदुत्वाच्या नावाखाली आखिल हिंदु जातीयांचे संघटन करून आपली ताकद वाढवू पाहत आहेत.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की देशातील अन्य भागांप्रमाणेच महाराष्ट्रातही असंख्य जाती-उपजाती आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी या जाती-उपजातींचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल :

**(अ) उच्च वर्णीय :** ब्राम्हण, गौड सारस्वत, सी. के. पी. पाठारे प्रभू इत्यादी जातींचा उच्च वर्णियात समावेश करण्यात येतो.

**(ब) मध्यस्तरीय :** मराठा, कुणबी जातिसमूहाच्या मध्य स्तरीय जातित समावेश केला जातो. या व्यतिरिक्त राजपूत, लेवा पाटील या तत्सम जातिसमूहांचाही या गटात समावेश करण्यात येतो.

**(क) कनिष्ठ जाति :** इतर मागास किंवा कनिष्ठ जातींची संख्या दोनशेहून अधिक आहे. कुणबी जातिसमुहाचा जरी मराठा कुणबी जातिसमुहात राजकीय कारणास्तव समावेश करण्यात येत असला तरी महाराष्ट्र शासनाच्या मान्यता प्राप्त इतर मागास वर्गात त्यांचा समावेश करण्यात आला आहे. मराठा महासंघाने मराठ्यांचाही या सूचीत समावेश करावा अशी मागणी केली आहे.

**(ड) दलित :** ५९ अनुसूचित जाती आणि नवबौद्धांच्या (पूर्वाश्रमीच्या महार जाती) दलित या सदरात समावेश करण्यात येतो. या व्यतिरिक्त विमुक्त आणि भटक्या जमातीही या गटात समाविष्ट केल्या जातात.

**(इ) अनुसूचित जमाती :** ४७ आदिवासी किंवा आदिम जमाती मान्यताप्राप्त अनुसूचित जमाती आहेत.

**(फ) अल्पसंख्य :** अल्पसंख्य सदरात मुस्लिम, जैन, बौद्ध, पारशी, ख्रिस्ती या धार्मिक अल्पसंख्य गटांचा समावेश करण्यात येतो.

**(ग) इतर जाति–जमाती :** या सदरात अमराठी भाषिक गटांचा उदा., उत्तर भारतीय, तेलगू, तामिळ, मल्याळी इत्यादींचा समावेश करण्यात येतो.

**२.९ भूधारणा किंवा जमिनीची मालकी :**

भूधारणा किंवा जमिनीची मालकी हा सुक्ष्मस्तरीय म्हणजेच ग्रामीण राजकारणाचा आर्थिक पाया आहे. भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे आणि शेती व्यवसाय हा जमिनीशी निगडित आहे. या अर्थाने भूधारणा म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेतील उत्पादन साधनाची मालकी होय. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ग्रामीण अर्थकारण सरंजामी स्वरूपाचे असे. वतनदार व जमीनदार या सरंजामदार वर्गाकडे जमिनीची मालकी असते. हा वर्ग जात–निरपेक्ष होता. म्हणजेच जमिनीची मालकी विशिष्ट जातीची मालकी नव्हती. ज्या व्यक्तिसमूदायाकडे जमिनीची मालकी असे तो वर्ग गावाच्या अर्थकारण व राजकारणावर नियंत्रण गाजवत असे. स्वातंत्र्योत्तर

कालखंडात भूधारणामधील अन्याय मूलक बाबी कायद्याने नष्ट करण्यात आल्या. जमिनीदारी कायद्याने रद्द करण्यात आली. हरित क्रांतीच्या कालखंडात ग्रामीण भागात श्रीमंत भूधारक वर्ग उदयास आला. संख्येने अल्पसंख्य असलेल्या मोठ्या आणि मध्यम जमिन–मालक वर्गाचे ग्रामीण राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित झाले. ग्रामीण भागात सहकारी चळवळीचा प्रसार झाल्याने, या संस्था ज्यांच्या नियंत्रणाखाली आहेत. त्या 'आश्रयदाता (Patron) आणि त्यांच्या कृपेवर अवलंबून असलेला आश्रितांचा (Client) वर्ग उदयास आला. आश्रयदाता आणि आश्रित यांच्या संबंधाच्या आधारे ग्रामीण राजकारणाची दिशा निर्धारित झाली.

या भागात जमिन, जमिनीची मालकी आणि त्याच्याशी निगडीत बाबींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**९.१ जमीन :** जमीन हा उत्पादनाच्या चार घटकांपैकी निसर्गत: उपलब्ध असणारा मूलभूत घटक आहे. जमीन या शब्दात केवळ लागवडीस योग्य आणि लागवडीखाली असलेल्या भूक्षेत्राचा समावेश होत नाही; तर त्यात लागवडीस योग्य नसलेल्या किंवा ज्याभूक्षेत्रात शेती केली जात नाही त्या बिगर शेती क्षेत्राचाही (non agricucltural Land) समावेश होत असतो. त्यात वनक्षेत्र, कुरणक्षेत्र, दलदलयुक्त जमीन, पडिक जमीन, निवासी क्षेत्र, कारखानदारीने व्यापलेले क्षेत्र इत्यादी सर्व बाबींचा समावेश करण्यात येतो. वाढत्या औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाबरोबरच बिगरशेती क्षेत्राचा विकार होत आहे. म्हणजेच शेती या उत्पादक कामासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र घटत चालले आहे. कारण निसर्गत: उपलब्ध असलेल्या जमीन या उत्पादन घटकाचा साठा मर्यादित व अलवचिक आहे. थोडक्यात म्हणजे ज्या गोष्टी आपण जमिनीपासून विभक्त करू शकत नाही आणि एखादी हस्तांतरित करताना ज्या गोष्टी आपोआप हस्तांतरित होतात, त्या साऱ्या गोष्टींचा 'जमीन' या संज्ञेत समावेश होतो.

**९.२ भारतातील जमीनमालकीतील स्थित्यंतरे :** कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत जमिनीची मालकी महत्त्वपूर्ण आहे. त्यात घडून आलेल्या स्थित्यंतराचे विवरण खालीलप्रमाणे आहे :

**(अ) ब्रिटिश–पूर्व कालखंड :** नवाश्म युगात मानवाने शिकार करण्याच्या जोडीने गुरे पाळण्यास व शेती करण्यास सुरुवात केली. मानवी टोळ्या स्थायिक झाल्या, त्यांनी आपल्या आजुबाजूच्या जमिनीवर शेती करण्यास सुरुवात केली. स्थायिक झालेल्या टोळ्यांमध्ये संघर्ष सुरू झाले. यातूनच पुढे राजसत्तेचा उदय झाला. राजे लोकांनी

लहान लहान राज्य निर्माण केली. सर्व जमीन राज्याच्या मालकीची हे तत्त्व राजसत्तेने प्रस्थापित केले. राज्य चालविण्यासाठी जनतेने जमिनीतून उत्पादित केलेल्या उत्पन्नातील काही हिस्सा घेण्यास येऊ लागला. परंतु प्रत्यक्षात जे शेतकरी जमीन कसत होते त्याना व्यवहारात त्या जमिनीचे मालकी हक्क वहिवाटीने प्राप्त झाले होते. ती जमीन वारसाहक्काने पुढच्या पिढीला मिळत असे. ती विकण्याचा, गहाण टाकण्याचा, त्याला अधिकार असे. अंतिम मालक म्हणून राजाला शेतसारा द्यावा लागत असे. दिल्लीला मोगल सत्ता असताना अकबर बादशहाच्या राज्यमंत्री तोडरमल यांनी जमीन मोजून त्या जमिनीतून मागील २० वर्षात मिळालेल्या उत्पन्नाची सरासरी काढून त्या आधारे जमीन महसूलाची आकारणी करण्याची ''झब्त'' ही पद्धत अंमलात आणली. या पद्धतीमुळे प्रजेला न्याय मिळाला. विजापूरचा प्रधान मलिक अंबरने राजा आणि प्रजा यामधील मध्यस्थ नाहिसे करणाऱ्या रयरतवारी पद्धतीची मुहूर्तमेढ रोवली. शहाजी राजाच्या पुणे जहागिरीमध्ये रयतवारी पद्धत दादोजी कोंडदेव यांनी सुरू केली. शिवाजी महाराजांनी पुढे आपल्या राज्यात रयतवारी पद्धतीचा अवलंब केला.

**(ब) ब्रिटिश राजवटीचा कालखंड :** सन १७९३ नंतर कंपनी सरकारने आपले साम्राज्य व्यापक करण्यास सुरुवात केली. त्यांना जसजशी पैशाची अधिक गरज भासू लागली तसतसा अधिकाधिक शेतसारा गोळा करण्याचे प्रयत्न होऊ लागले. यातूनच भारतातील भूमी व्यवस्थेची आखणी ब्रिटिश सरकारने चुकीच्या पद्धतीने केली. स्वातंत्र्यपूर्वकाळात 'भूस्वामित्वाच्या' तीन प्रणाली दिसून येतात. (१) जमीनदारी प्रणाली (२) महलवारी प्रणाली (३) रयतवारी प्रणाली.

**(१) जमीनदारी पद्धती :**

ही पद्धत लॉर्ड कॉर्नवॉलीस यांनी बंगालमध्ये सन १७९३ साली सुरू केली. ही पद्धत म्हणजे ब्रिटिश सरकारने आपल्या देशात इंग्लंड मधील भांडवलदारी पद्धतीचे केलेले अंधानुकरण होय. डॉ. बलजितसिंह यांच्या मते ब्रिटिश सरकारने ही भू-स्वामित्वाची पद्धत निर्माण करताना ऐतिहासिक घटनांचा व स्थानिक परिस्थितीचा अजिबाद विचार केला नाही. ही पद्धत केवळ त्यांनी देशातील जमिनीवर कायमचे हितसंबंध ठेवण्यासाठी व त्यायोगे एक श्रीमंत व एकनिष्ठ असा वर्ग निर्माण करण्यासाठी सुरू केली. या पद्धतीत जमीनदार हा सर्व जमिनीचा मालक होता त्याच्याकडे सर्व जमिनीचा ताबा होता. सर्व जमीनीवरील सारा सरकारला देण्यासाठी जमीनदार जबाबदार

होता. जोपर्यंत जमीनदार सरकारला नियमितपणे सारा देत असतो तोपर्यंत जमिनीची संपूर्ण मालकी जमीनदाराचीच होती. स्थलमानाने जमीनदारीचे प्रमुख दोन प्रकार होते.

१. **कायमधारा पद्धती –** या पद्धतीनुसार जमिनदारांनी सरकारकडे भरवयाचा जमीन–महसूल कायमचा निश्चित करण्यात आला होता. मात्र हे ठरविताना कोणत्याही प्रकारचे मोजमाप ठरविण्यात आले नाही किंवा कोणताही निकष लावण्यात आला नाही. उलट निश्चित रक्कम सारा म्हणून कंपनी सरकारच्या खजिन्यात भरल्यानंतर या जमीनदारांना आपल्या कुळांकडून मन मानेल तो कर वसूल करण्याचे मालकी हक्क देण्यात आले. या हक्कामुळे जमीनदारांच्या जुलमांना कायदेशीरपणा आला. त्याचा दुष्परिणाम म्हणजे कुळांना लुबाडण्याचे कायदेशीर हत्यार कंपनी सरकारने जमीनदारांच्या हाती दिले. त्यातून एक सामर्थ्यशाली प्रत्यक्ष जमीन न कसणारा श्रीमत ऐतखाऊ असा जमीनदार वर्ग भारतीय शेतकऱ्यांच्या उरावर बसविण्यात आला. या निर्णयामुळे एका बाजूने शेतसाऱ्याची निश्चितता झाली तर दुसऱ्या बाजूने उत्पादकांपासून कर वसूल करण्याची जबाबदारी परस्पर मधल्या जमीनदारांवर टाकल्यामुळे जनतेच्या असंतोषापासून कंपनी सरकार दूर राहिले. या पद्धतीतून एक मध्यस्थांची शिडी निर्माण झाली. या मध्यस्थांना पोटभाड्याने जमिनी देऊन, सारा वसूल करण्याचे अधिकार देण्यात आले. कालांतराने या मध्यस्थांची संख्या प्रचंड वाढली. प्रत्येक मध्यस्थ आपल्या पोटभाडेकरूकडून सारा वसूल करू लागल्याकारणाने याचा सर्व भार अखेरीस प्रत्यक्ष कसणाऱ्यावर पडला व त्याखाली तो भरडू लागला. आजही उत्तर भारतात शेतकऱ्यांची हलाकीची परिस्थिती आढळते त्याच्यापाठी हा इतिहास आहे.

२. **मालगुझारी पद्धती –** जमीनदारी प्रणालीच्या ह्या दुसऱ्या प्रकारात जमीनदारांनी सरकारकडे भरणा करावयाच्या जमीन महसूलाची रक्कम वेळोवेळी वाढविली जात असे. जमीनदारीची ही पद्धत आंध्र, उत्तर प्रदेशचा काही भाग आणि मध्यप्रदेशाचा काही भाग या प्रदेशात प्रचलित होती. मध्यप्रदेशामध्ये ज्यांना जमीनदार म्हणून मान्यता दिली होती त्यांना 'मालगुझार' म्हणून ओळखण्यात येऊ लागले व त्या पद्धतीला ''मालगुझारी पद्धती'' म्हटले जाऊ लागले. मालगुझाराकडून सरकारकडे भरल्या जाणाऱ्या जमीन–महसूलाची रक्कम वेळोवेळी वाढविण्यात येत असे.

**२. महलवारी पद्धती :**

कायमधारा पद्धतीचे दुष्परिणाम इंग्लंडमधील उदारमतवादी लोकांच्या लक्षात येऊ

लागले. विशेषत: नव्याने साम्राज्यात सामील झालेल्या पंजाब व मुंबई प्रांतात याला विरोध होऊन जमीन महसूल मिळविण्यास अडचण होईल ही भिती निर्माण झाली. या कारणास्तव या उदारमतवादी लोकांकडून कायमधारा पद्धतीचा धिक्कार होऊन १८८३ साली 'सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया' यांनी हिंदुस्थानच्या गर्व्हनर जनरलला ही पद्धत इतर प्रदेशांना लावू नये असा आदेश दिला. यातूनच पुढे बिगर जमीनदारी प्रदेशात 'महलदारी पद्धतीची' सुरुवात झाली. ही पद्धत प्रथमत: आग्रा व आंध्र प्रदेशात व नंतर पंजाबमध्ये सुरू झाली. महलवारी प्रणाली मुस्लिम प्रथेवर आधारित होती. या पद्धतीमध्ये जमिनीची संयुक्त मालकी गावातील लोकांच्या सहहिस्साधारकांकडे राहण्यास सरकारने मान्यता दिली. सरकार संबंध शेतीवाडीचा महसूल म्हणून एक विशिष्ठ ठरवून देते. त्या शेतीवाडीची संयुक्त मालकी ज्या लोकांकडे असते ते सर्व लोक त्या शेतीवाडीच्या जमीन महसूलाची रक्कम सरकारकडे भरण्यास व्यक्तिश: व संयुक्तरीतीने जबाबदार ठरले जातात. पंजाबमध्ये जमिनीची संयुक्त मालकी ज्या लोकांकडे असते त्यापैकी एका व्यक्तिस प्रमुख म्हणून ओळखले जात असे. जमिनीच्या अन्य मालकांकडून जमीन महसूल वसूल करण्याची व ती रक्कम सरकारकडे भरणा करण्याची जबाबदारी त्या प्रमुखाकडे असे. या पद्धतीमध्ये जेव्हा संयुक्त मालक जमीन कसण्याचे काम कुळांकडे देऊ लागले तेव्हापासून या पद्धतीत दोष निर्माण झाले.

**३. रयतवारी पद्धती :**

रयतवारी प्रणाली सर्वप्रथम १७९२ मध्ये मद्रास प्रांतात सुरू झाली. या पद्धतीचा नंतर मुंबई राज्य, बेरार व मध्यभारत या प्रदेशात विस्तार झाला. ही पद्धत हिंदू प्रथेवर आधारित होती. या पद्धतीत शेतकरी हाच जमिनीचा मालक होता. त्यामुळे शेतकरी व सरकार या दोहोतील संबंध प्रत्यक्ष होता. सरकारला शेतसाऱ्याची रक्कम शेतकरी स्वत: देत होता. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा उपयोग त्याच्या इच्छेनुसार करण्यास मोकळीक होती. तो आपली शेती दुसऱ्याला कसण्यासाठी देऊ शकत होता किंवा गहाण ठेवू शकत होता. त्यामुळेच कालांतराने जमिनदारीतील गैरप्रकार याही पद्धतीत येऊ लागले. वाढत्या लोकसंख्येमुळे जमिनीची मागणी वाढल्यामुळे किंमती वाढू लागल्या. तसतशी जमीन खंडाने किंवा भाडेपट्टीने दुसऱ्यांना देण्याची प्रवृत्ती वाढू लागली व जमीन न कसता फक्त महसूल व खंड गोळा करणाऱ्या 'मध्यस्थांची' साखळी निर्माण होऊ लागली. प्रत्यक्ष कसणारा व सरकर यात जे सरळ संबंध होते ते तुटले. कसणारे फक्त कुळे बनली व कोणत्याही प्रकारची शाश्वती न राहता,

दुसऱ्याला फक्त आपल्या कष्टाचा हिस्सा व जबरदस्त भाडे देण्यापलीकडे कुळांना काही राहिले नाही. अशा प्रकारे स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर असलेल्या हिंदुस्थानात अर्धाअधिक देश जमीनदारी पद्धतीखाली होता. ८० टक्के शेती न कसणाऱ्या मधयस्थांकडे होती व फक्त २० टक्के शेती प्रत्यक्ष कसणाऱ्या लोकांच्या मालकीची होती.

**(क) स्वातंत्र्योत्तर कालखंड :**

स्वातंत्र्य मिळण्याच्या सुमारास जमिनीतील हितसंबंधाचा विचार करता प्रत्यक्ष कसणारे मध्यस्थ, न कसणारे मध्यस्थ, तात्पुरती कुळे किंवा भाडेपट्टीने कसणारे भूमिहीन शेतमजूर अशा प्रकारे जमिनीतील हितसंबंध होते. मोठ्या प्रमाणावर जमीन सुधारणा केल्याशिवाय व प्रत्यक्ष कसणाऱ्यांची जमीन केल्याशिवाय, शेती उत्पादनाला चालना मिळणार नाही हा विचार स्वातंत्र्य येत असतानाच्या काळात अत्यंत प्रबळ होता आणि पहिल्या पंचवार्षिक योजनेत त्याच्या प्रतिध्वनी उमटलेला दिसतो.

महाराष्ट्र राज्यातील भूमीव्यवस्थेचा विचार करता सध्याचे महाराष्ट्र राज्य हे भूमीव्यवस्थेच्या व जमीनविषयक सुधारणांच्या दृष्टिने एकसंघ नव्हते, कारण पूर्वीच्या मुंबई राज्यात विदर्भ व मराठवाडा हे प्रदेश नंतरच्या काळात समाविष्ट झाले. विदर्भ हा प्रदेश मध्यप्रदेशात होता तर मराठवाडा हा प्रदेश पूर्वीच्या हैद्राबाद राज्यात होता. त्यामुळे या तीनही प्रदेशांत भूमीव्यवस्थेचे व स्वातंत्र्यानंतर केलेल्या जमीनसुधारणांचे विश्लेषण वरील बाबींचा विचार करून दिले आहे.'

पश्चिम महाराष्ट्रात प्रामुख्याने रयतवारी प्रणाली होती. तरीही काही प्रमाणात बिगर रयतवारी स्वरूपाची भूमीव्यवस्था अस्तित्वात होती. इनामदार, खोत, तालुकदार या नावाने जमीनदार ओळखलेजात. याशिवाय पाटील वतन, कुलकर्णी वतन, परगणा वतन, काही सेवा वतने व इनामे होती. पश्चिम महाराष्ट्रात या सर्व प्रकाराखाली एकूण ६१ लक्ष एकर एवढी जमीन होती यापैकी पहिल्या प्रकाराखाली जमीनदार वर्ग हा प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्यांचे बरेच शोषण करीत होता असे दिसून येते. विदर्भात मालगुझारी, जहागीरदारी या पद्धतीखाली पुष्कळच जमीन होती. मराठवाड्यात जवळजवळ १६ लक्ष एकर जमीन 'इनाम' किंवा 'जहागीर' या प्रकाराखाली होती. मालगुझारी व जहागीरदारी या भू–स्वामित्वाच्या प्रणाली कमी अधिक प्रमाणात जमीनदारी प्रणालीसारख्याच होत्या.

**२.१० महाराष्ट्रातील भूधारणा सुधारणा विषयक कायदे :**

समाजातील चुकीच्या भूस्वामित्वाच्या प्रणाली किंवा जमीनमहसूल पद्धती, समान

संधीचा अभाव व त्यामुळे उत्पन्नात होणारी आर्थिक विषमता इत्यादी अन्यायाच्या बाबी काढून टाकण्यासाठी जमीन सुधारणा आवश्यक असतात. प्रा. मुन्नार मिर्दाल यांच्या मते जमीन–विषयक सुधारणा म्हणजे माणूस आणि जमीन यांच्या संबंधात योजनाबद्ध आणि संस्थात्मक पुनर्रचना घडवून आणणे होय. भारतासारख्या शेती प्रधान अर्थव्यवस्थेमध्ये सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने जमीन सुधारणा फारच महत्त्वाच्या ठरतात. आपल्या देशात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जमीन सुधारणेचे धोरण केंद्र सरकारने ठरवून काही मार्गदर्शक तत्त्वे राज्याच्या अंमलबजावणीसाठी पुरस्कृत केली. जमीन–सुधारण्याच्या धोरणांची अंमलबजावणीची जबाबदारी राज्य सरकारवर पडल्यामुळे अनेक राज्यांनी जमीन सुधारणा कायदे वेळोवेळी संमत करून त्यांची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

**(१) मध्यस्थांचे उच्चाटनविषयक कायदे :**

स्वातंत्र्योत्तर काळात पश्चिम महाराष्ट्रातील देवस्थाने व काही संस्थांची इनामे सोडून बाकीची सर्व इनामे कायद्याने नष्ट करण्यात आली. वतन, इनाम, सेवा वतने या खालील जमिनी जमीन मालकांकडून काही प्रमाणात रक्कम घेऊन त्यांना वहिवाट हक्क देण्यात आले. विदर्भातील मालगुझारी व जहागीरदारी या अयोग्य प्रणाली मध्यप्रदेश अबोलिशन ऑफ प्रोप्रायटरी राईटस् (इस्टेटस्, महालस् व हस्तांतरित जमिनी) ॲक्ट १९५० या कायद्यानुसार संपुष्टात आल्या. मराठवाडा भागात लागू असलेला हैद्राबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९५४ या कायद्याने जवळ जवळ ७५ टक्के जहागिऱ्या व इनामे रयतवारी प्रणालीखाली आणली गेली. तसेच हैद्राबाद अबोलिशन ऑफ इनामस् ॲक्ट १९५४ या कायद्याने धार्मिक व सार्वजनिक संस्था सोडून सर्व इनामे रद्दबातल झाली. भूमीव्यवस्थेमधील मध्यस्थांचे उच्चाटन करण्याचा मुख्य हेतू रयतवारी प्रणाली आणण्याचा होता. याचे कारण रयतवारी प्रणालीमध्ये जमीन कसणारा शेतकरी हा स्वत:च जमीनीचा मालक असून तो त्या जमिनीचा शेतसारा कोणत्याही मध्यस्थांच्या अडथळ्याशिवाय सरळ सरकारला देऊ शकतो. हाच एक शेतीविकासाचा व ग्रामीण जीवनाचा कायापालट करणारा चांगला मार्ग आहे असे जमीनविषयक धोरण ठरविताना समजण्यात आले.

**(२) कुळवहिवाटसंबंधीचे कायदे :**

महाराष्ट्रातील रयतवारी भागांतसुद्धा जमीन मालक स्वत:जमीन न कसता ते कुळांच्याकडे देत आणि अवास्तव खंड वसूल करीत. त्यामुळे कुळांना शेतीमध्ये कायम

स्वरूपाची सुधारणा करून उत्पन्न वाढविण्यात काहीच स्वारस्य नसे. पश्चिम महाराष्ट्रात या प्रश्नाकडे स्वातंत्र्यपूर्व काळातच लक्ष दिले गेले होते. सन १९३७ च्या काँग्रेस मंत्रिमंडळाने कुळांची परिस्थिती सुधारणेचे धोरण आखून ''मुंबई कुळवहिवाट अधिनियम १९३९'' हा कायदा संमत केला. या कायद्यानुसार कुळांचे ''सरंक्षित कुळ'' व ''साधे कुळ'' असे दोन प्रकार करण्यात आले. जानेवारी १९३८ पूर्वी सतत सहा वर्षे जमीन कसणाऱ्यांना ''संरक्षित कुळ'' असे संबोधण्यात आले होते. या कायद्याने कुळांना शाश्वती खंड नियमन व इतर अधिकार दिले गेले. खंडाची मर्यादा बागायत व जिरायत जमिनीसाठी एकूण उत्पन्नाच्या एक चतृतांश व एक तृतीअंश अशी ठरविली होती.

स्वातंत्र्योत्तर काळात ''मुंबई कुळवहिवाट व शेतीजमीन अधिनियम १९४८'' हा महत्त्वाचा कायदा करण्यात आला. हा कायदा व्यापक स्वरूपाचा असून त्यात पूर्वीच्या अनुभवावरून सुधारणा केल्या होत्या. या कायद्यानुसार कुळाचे कायम, संरक्षित व सर्वसाधारण असे तीन वर्ग पाडण्यात आले व संरक्षित कुळास जमीन विकत घेण्याचे अधिकार दिले गेले. १९४८च्या कुळ कायद्याने १. मालक व कुळ यांचे संबंध सुधारणे. २. कुळांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारणे. ३. शेती उत्पादनाच्या वाढीसाठी जमिनीचा योग्य व कुशलरीतीने वापर करणे. अशी तीन उद्दिष्टे साध्य करण्याचा निर्धार जाहीर करून हा कायदा करण्यात आला. या कायद्यातील महत्त्वाच्या तरतूदी पुढीलप्रमाणे : (१) (अ) या कायद्याने कुळांचे तीन वर्ग करण्यात आले. ज्यांच्याजवळ पूर्वीच्या कराराने किंवा कोर्टाच्या हुकूमनाम्याअन्वये जमिनीचा कुळ म्हणून कब्जा आहे किंवा कूळ म्हणून ज्यांच्याबद्दल काही कागदोपत्री निश्चिती नाही पण जो अनिश्चित काळापासून जमीन करत आहे. किंवा ज्यांच्या पूर्वजांचे नाव सरकारी कागदोपत्री कुळ म्हणून नोंदविले गेले होते अशा कुळांना कायमकुळ म्हणून दर्जा देण्यात आला. (ब) जो १.१.१९३८ किंवा १.१.१९४५ पूर्वी किमान सहा वर्षे सतत जमीन कसत होता किंवा ८.११.१९४७ पूर्वी एक वर्ष जो जमीन कसत होता किंवा १.४.१९३७ किंवा १.४.१९४४ नंतर ज्याला मालकाने काढून टाकले आहे पण जो सहा वर्षापेक्षा अधिक काळ त्या जमिनीवर शेती करीत होता त्याला संरक्षित कुळ म्हणून संबोधण्यात आले. (क) ज्याला फक्त १० वर्षाच्या कराराने जमीन कसण्यास दिली असेल त्याला सामान्य कुळ म्हणून संबोधण्यात आले. (२) कुळांना लवादाने निश्चित केलेल्या रास्त किंमतीत पंधरा वर्षात १० हप्त्यांनी किंमत देऊन मात्र ५० एकरांची धारणमर्यादा व मालकाला स्वत:कडे जमीन ठेवण्याच्या अटी लक्षात घेऊन जमीन विकत घेण्याचे अधिकार देण्यात आले. (३) खंडाची

रक्कम एक षष्ठांश करण्यात येऊन ती पिकाच्या स्वरूपात किंवा रोकड पैशात भरण्याची मुभा देण्यात आली. (४) उदरनिर्वाहाचे शेती हे एकच किंवा मुख्य साधन असलेल्या किंवा विधवा, अपंग (५) या कायद्याने प्रथमच जमीन धारण मर्यादेचा विचार करण्यात येऊन जिरायत ४८ एकर, भातशेती २४ एकर व बारमाही जलसिंचनाखालील जमीन १२ एकर ठरविण्यात आली. (६) तसेच आर्थिक किफायतशीर धारणक्षेत्रासंबंधी विचार घेऊन १६ एकराची जिरायत, ८ एकराची भातशेती व ४ एकराची बारमाही सिंचनाखालील जमीन आर्थिकदृष्ट्या किफायतशीर धारणक्षेत्र ठरविण्यात आले. (७) मालकाने ५० एकर धारणमर्यादेचा गैरफायदा घेऊन कुळाकडून सर्वच चांगली जमीन आपल्याकडे घ्यावी वरकस किंवा पडीक कुळासाठी सोडावी असे होऊ नये म्हणून ५० एकरांत भातशेती अगर बारमाही सिंचनजमिनीचा हिस्सा सव्वा बारा एकरापेक्षा जास्त असता कामा नये अशी अट घालण्यात आली. (८) तसेच मालकाने स्वत:साठी घेतलेली जमीन वर्षभर कसली नाही तर पूर्वीच्या कुळाला ती परत करण्याची तरतूद करण्यात आली.

१९४८ च्या मुंबई कुळकायद्यात वरील दोष असल्यामुळेच शासनाने योग्य असे बदल करून वरील कायद्यास सखोल असा पुरवणी कायदा १९५५ मध्ये पास करून १ ऑगस्ट १९५६ पासून लागू केला. या पुरवणी कायद्यात समाजावादी समाज रचनेच्या कल्पनेने ''कसेल त्याची जमीन'' हे मुख्य उद्दिष्ट ठरविण्यात आले. हे त्यामुळे हा नवीन पुरवणी कायदा मुंबई राज्यात क्रांतिकारक समजण्यात आला. या कायद्यानुसार १ एप्रिल १९५७ हा कसणाऱ्याचा दिवस ठरविण्यात आला. त्या दिवशी सर्व कुळांना त्यांच्या जमीनमालकाकडून कुळ म्हणून कसण्यासाठी घेतलेल्या व जमीनीचे मालकीहक्क विकत घेण्याची सोय काही अटींवर करण्यात आली. विशेषत: कुळकायदा कलम ३२ हे कुळवहिवाट रद्द करण्याच्या दृष्टिकोनातून फारच महत्त्वाचे आहे. हा पुरवणी कुळकायदा पश्चिम महाराष्ट्रात १९५७ पासून अंमलात असून रयतवारी प्रणाली आणण्याच्या उद्देशानुसार फारच परिणामकारक ठरलेला आहे.

विदर्भामध्ये बहुसंख्य कुळे मालगुझारांची असल्यामुळे त्यांची परिस्थिती जास्त हलाखीची होती. पूर्वीच्या वऱ्हाड भागात रयतवारी प्रणाली असलेल्या क्षेत्रावरही बऱ्याच प्रमाणात कुळवहिवाट होती. ती कुळवहिवाट कमी करण्यासाठी व तिचे नियमन करण्यासाठी केलेला महत्त्वाचा पायदा म्हणजे ''दि बेरार रेग्युलेशन ऑफ ॲग्रीकल्चरल लीज ॲक्ट १०५१'' हा होय. पश्चिम महाराष्ट्रातील १९४८ च्या कुळकायदासारखाच हा कायदा होता. त्यामुळे कुळांना संरक्षण देऊन खंडाचे नियमन करण्यात आले. वरील

कायद्यातील उणिवा दूर करून १९५४ मध्ये संमत केलेला ''मध्यप्रदेश कुळकायदा व शेतसारा बील'' हा कायदा कुळवहिवाटीचा प्रश्न सोडविण्यास बराच उपयोगी पडला.

मराठवाड्यातील कुळवहिवाटीचा प्रश्न सोडविण्यासाठी हैद्राबाद कुळवहिवाट व शेत जमीन अधिनियम १९५० हा कायदा लागू केला. या कायद्यात ''कुटुंब जमीन धारण क्षेत्र'' व खंडाचे प्रमाण शेतसाऱ्याचा काही पटीने असे ठरविण्यात आले. त्याचप्रमाणे जमीनमालकाने वैयक्तिक कसण्यासाठी कुळाकडून जमीन परत घेण्यावर बंधने घातली. संरक्षित कुळ व सर्वसाधारण कुळ असे दोन वर्ग करऱ्यात आले. याचा परिणाम कुळांना संरक्षण मिळून शेवटी त्यांना मालकी हक्क मिळण्यास मदत झाली.

**(३) कमाल जमीन धारणा कायदा :**

कोणत्याही विकसनशिल देशामध्ये शेतजमिनीचे काही थोड्या लोकांच्या हाती केंद्रीकरण होऊ देणे हे सामाजिक आर्थिक दृष्ट्या न्यायाचे होणार नाही. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्वी प्रचलित असलेल्या अयोग्य व चुकीच्या भूमिव्यवस्थेमुळे शेतजमिनीवरील मालकीचे केंद्रीकरण काही विशिष्ट अशा थोड्या जमीनदारांकडे झाले होते. जमीन हे ग्रामीण भागातील उत्पन्नाचे एकमेव साधन असल्यामुळे व जमिनीचे सकेंद्रण झाल्यामुळे ग्रामीण भागात उत्पन्नामध्ये अफाट विषमता दिसत होती. ही विषमता समाजवादी समाजरचनेच्या दृष्टिकोनातून अयोग्य होती. म्हणूनच स्वातंत्र्य प्राप्ती नंतर धारण क्षेत्राची कमाल मर्यादा ठरविण्याकरिता प्रांतिक सरकारांनी पुढाकार घेऊन आवश्यक ते कायदे करावेत अशी शिफारस नियोजन मंडळाने पहिल्या पंचवाषिक योजनेच्या अहवालातच केली होती. परंतु १९५९ पर्यंत प्रांतिक सरकारने या संबंधात काहीच केले नव्हते. पुढे १९५९ च्या नागपूर अधिवेशनानंतर मात्र धारण क्षेत्राची कमाल मर्यादा ठरविणारे कायदे पास करण्यास चालना मिळाली. १९६१–६२ पर्यंत भारतातील सर्व राज्यांनी भू–धारणेवर कमाल मर्यादा वेगवेगळी ठरविली आहे.

महाराष्ट्रात कमाल जमीन धारणा कायदा सर्व प्रदेशासाठी १९६१ मध्ये मंजूर केला व त्याची अंमलबजावणी २६ जानेवारी १९६२ पासून सुरू केली. या कायद्याने निरनिराळ्या प्रकारच्या बागायती व जिरायती जमिनीनुसार १८ ते १२६ एकर अशी मर्यादा व्यक्तिने धारण केलेल्या क्षेत्रावर घालण्यात आली. शिवाय मोठ्या कुटुंबाकडे कमाल मर्यादा दुपटीपर्यंत ठेवण्याची सोय केली. या कायद्याची अंमलबजावणी एवढी काही समाधानकारक झाली नाही. कारण या कायद्याखाली धारण क्षेत्राची कमाल मर्यादा कुटुंबातील व्यक्ती हा घटक ठरवून केल्यामुळे अनेक जमीनदारांनी त्यांच्या

जमिनीचे हस्तांतर त्यांच्या कुटुंबातील व्यक्तिमध्ये व जवळच्या अन्य व्यक्तींमध्ये करून पळवाटा काढल्या. केंद्र सरकारने सन १९७२ मध्ये धारण क्षेत्राच्या कमाल मर्यादेबाबतचे धोरण बदलून धारण क्षेत्राची कमाल मर्यादा कमी करण्याचे ठरविले. त्यानुसार महाराष्ट्र सरकारने १९६१ च्या कायद्यात योग्य ते बदल करून ''दि महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल लॅण्डस् (लोअरिंग ऑफ सिलिंग ऑन होल्डींगस् ॲण्ड ॲमेन्डमेंट) ॲक्ट १९७२'' हा कायदा संमत केला. हा पुरवणी कायदा १९ सप्टेंबर १९७५ पासून महाराष्ट्रात लागू केला. या कायद्यात मर्यादाक्षेत्र कमी करून कुटुंबातील व्यक्ती ऐवजी पाच माणसांचे एक कुटुंब (पती, पत्नी व त्यांची तीन अज्ञान मुले) हा घटक अंमलबजावणीसाठी ठरविण्यात आला आहे. १९७२ च्या सुधारित कमाल जमीन धारणा कायद्याखाली धारण क्षेत्रावरील कमाल मर्यादा खालीलप्रमाणे ठेवण्यात आली. (अ) सरकारच्या कॅनॉल किंवा लिफ्ट प्रकल्पाखाली (ब) हंगामी खात्रीने भिजणारी जमीन किंवा खाजगी लिफ्टने बारमाही भिजणारी जमीन किंवा सिंचनक्षेत्रामधील विहिरीखाली बारमाही भिजणारे क्षेत्र. १०.९३ हेक्टर किंवा २७ एकर (क) हंगामी अनिश्चित बागायती जमीन किंवा निश्चित पाऊस पडणाऱ्या भागातील भात पिकाखालील जमीन. १४.५७ हेक्टर किंवा ३६ एकर (ड) इतर सर्व प्रकारची जिरायती जमीन २१.८५ हेक्टर किंवा ५४ एकर.

**(४) १९४७ चा तुकडेबंदी कायदा :**

शेती उत्पादन वाढविण्याच्या प्रयत्नात आड येणारी एक महत्त्वाची बाब म्हणजे धारणक्षेत्राचे आकारमान हे होय. वैयक्तिक शेतकरी करत असलेले परिचालन क्षेत्र हे जर योग्य आकारमानाचे नसेल तर जमीन आणि इतर साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर होत नाही. यामुळे शेती उत्पादकतेवर अनिष्ट परिणाम होतो. म्हणून १९४७ चा तुकडेबंदी या कायद्यान्वये जमिनीचा सर्वात लहान हिस्सा किती असावा हे ठरविण्यात आले. भाज शेती १ गुंठा ते १ एकर, कोरडवाहू १ ते ४ एकर, बागायती ५ गुंठे ते १ एकर वरकस २ एकर ते ६ एकर या पेक्षा कमी असलेल्या हिश्यास तुकडा म्हणून समजण्यात येऊन दिलेल्या मर्यादेखाली जमिनीची वाटणी, विक्री किंवा इतर व्यवहार करण्यास बंदी घालण्यात आली.

**(५) आदिवासी जमीन हस्तांतरण कायदा – १९७४**

आदिवासींचे उपजिविकेचे मुख्य साधन म्हणजे शेती असून हे आदिवासी जमिनीचे मालक होते व शेती करून भरपूर धान्य पिकवून सुखासमाधानाने जगत होते. पण इंग्रजी

अंमल सुरू झाल्यानंतर या जमिनी, बिगर आदिवासीकडे जाण्यास सुरुवात झाली होती. ती आजतागायत चालू आहे. १९६१ साली एकूण उपजिवीकेसाठी श्रम करणाऱ्या १३ लाख आदिवासींपैकी ५३ टक्के आदिवासींची नोंद जमीन कसणारे मालक म्हणून होती. त्याचे प्रमाण १९७१ मध्ये ४१ टक्के झाल्याचे आढळते. त्याउलट शेतमजुरांचे प्रमाण याच काळात ३८ टक्के वरून ५२ टक्केवर गेल्याचे आढळते. आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण हे अनेक कारणांमुळे होत होते. ते थांबिवण्यासाठी स्वातंत्र्योत्तरकाळात प्रतिबंध करण्याच प्रयत्न झाले. जमिनविषयक पुरोगामी धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. या कायद्यान्वये १.४.१९५७ ते ६.७.१९७४ या कालावधीत आदिवासींच्या जमिनींची बिगर आदिवासींकडे झालेली वैध–अवैध सर्व हस्तांतरे रद्द करण्यात येऊन त्या जमिनी आदिवासींच्या नावावर करण्यात आल्या.

**२.११ जागतिकीकरण आणि जमीन मालकी :**

सन १९९० पासून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाऊजा) या तत्त्वांची नवी बाजारी अर्थनिती आली. तेव्हा आता कायदाच बदलला जातोय. शेती, जमीन धारण करण्यावर कसलीच मर्यादा असणार नाही. ज्यांना जमेल त्यांना हवी तेवढी शेतजमीन मालकीची करून घेता येईल. हवी तेवढी शेतजमीन करार करून ताब्यात ठेवता येईल. हे कोण करू शकेल ? उत्तर स्पष्ट आहे. दोन नंबरचा, कष्ट न करता वाममार्गाने मिळविलेला काळा पैसा ज्यांच्याकडे असेल ते शेतकऱ्यांच्या शेतजमीनी खरेदी करतील, करताहेत, त्याची सुरूवात झाली आहे. 'कसेल त्याची जमीन' विकली जाईल. जमीन मालकीचे केंद्रीकरण होईल. गरीब व मध्यम शेतकरी भूमिहीन होईल. मालकी मिळविता आली नाही, तर कराराने शेती ताब्यात घेतली जाईल. शेतकऱ्यांची कब्जा वहिवाट उरणार नाही.

सन १९९० नंतरच्या नव्या 'खाऊजा' च्या बाजारी अर्थव्यवस्थेत आता या कायद्यातही बदल केले जात आहेत. आणखी बदल होण्याचे घोषित करण्यात आले आहे. जमिनीचे मालक होण्यासाठी आणि असण्यासाठी आता जमीन स्वत: कसली पाहिजे, असे बंधन नाही. काळापैसा खर्चून हवी तेवढी जमीन विकत घेऊन दुसऱ्यांकडून, यंत्राकडून पिकवून घेतली जाईल. शेती पिकवायला यंत्र जास्त व माणसे कमी वापरली जातील. भांडवल प्रधान भांडवली शेती येईल व श्रमप्रधान शेती जाईल. अशाने आधिच वाढत असलेली ग्रामीण बेरोजगारी अधिकच वाढत राहील. 'कसेल त्याची जमीन' या तत्वाआधारे जे जमिनीचे मालक होते, ते भूमिहीन शेतमजूर बनतील. हा क्रम

सुरू झालाच आहे. १९८७-८८ म्हणजे बाजारी अर्थव्यवस्था स्वीकारण्यापूर्वी ग्रामीण भागातील भूमिहीन कुटुंबांचे एकूण ग्रामीण कुटुंबांशी प्रमाण ३५ टक्के होते,. नव्या बाजारी अर्थव्यवस्थेची १२ वर्षे अंमलबजावणी झाल्यानंतर १९९९-२००० वर्षी हे प्रमाण ४१ टक्के झाले. अल्पभूधारकांचे प्रमाण यात १२ वर्षात १९ टक्यांवरून २२ टक्के झाले. हे अल्प भू-धारक जेमतेम ४ महिने आपल्या स्वत:च्या शेतात व उरलेले ८ महिने दुसऱ्यांच्या शेतात राबतात, नाही तर बेरोजगार राहतात. ग्रामीण भागातील भूमिहीन व अल्पभूधारक या दोन्ही कुटुंबांचे एकत्रित प्रमाण १९८० ते १९९९ या १२ वर्षात ५४ टक्क्यांवरून ६३ टक्क्यावर गेले. हा क्रम येत्या काळात वाढणार आहे, कारण नव्या बाजारी अर्थव्यवस्थेची गती वाढणार आहे. कारण 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व गुंडाळून ठेवण्यात आले आहे. यंत्राचा वापर वाढला की भूमिहीन व अल्पभूधारक हे सारे बेरोजगार बनतील. त्यांना काम मिळणार नाही. मग हे मटक्याचे आकडे घेत राहतील. हातभट्टीच्या दारूची ने-आण करतील, मधून-मधून तुरुंगात जावून कट्टर गुन्हेगार बनतील. 'खाऊजा' च्या नव्या बाजारी अर्थव्यवस्थेचे हे अपरिहार्य परिणाम आहेत. हे सारे आता घडतेच आहे, ते अधिक वेगाने घडेल.

**शेती न करणारे भांडवलदार शेतकरी :**

शेतजमीन मालकी संबंधीच्या कायद्याच्या आणखी एका तरतुदीत बदल केला जात आहे. पूर्वीच्या कायद्यात जो स्वत: शेती करीत नाही, त्याला शेतजमीन खरेदी करण्याचा अधिकार नव्हता. आता कायदा बदलला जात आहे. कोणालाही शेतजमीन खरेदी करता येईल, असा कायदा येत आहे. कोणा व्यक्तिला तशी कंपनीलाही जमीन खरेदी करता येईल. देशी, तसेच परदेशी भांडवलदार कंपनीलाही ती खरेदी करता येईल. खरेदी करणे जमले नाही, तर करार करून ताब्यात घेता येईल.

**कंपन्या शेतात काय पिकवतील ?**

नफा कमविणे, हे या भांडवलदार कंपन्यांचे स्पष्ट व जाहीर धोरण असते, आहे. जे पीक घेतल्याने जास्त नफा मिळेल, ते पीक ते पिकवतील. अन्नधान्याच्या पिकात नफा कमी मिळतो. पैशाच्या पिकात नफा जास्त मिळू शकतो. साहजिकच अन्नधान्य कमी पिकवली जातील. पैशाची पिके जास्त पिकवली जातात. देशाची अन्नधान्याची उपलब्धता कमी होईल. हे सारे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. जे स्वत:चे डोळे झाकून घेतील, त्यांनाच हे फक्त दिसणार नाही. अगोदरच शेतीचे उत्पादन, उत्पादन वाढीचा दर तसेच अन्नधान्याच्या उत्पादन वाढीचा दर तर अधिकच घटतो आहे. १९८०-८१ ते १९९०-९१ दहा वर्षात

अन्नधान्याच्या उत्पादन वाढीचा दर ३.५४ टक्के होता, तो १९९१–९२ ते १९९९–२००० या दहा वर्षात घटत जाऊन १.९२ टक्के झाला अन्नधान्य उत्पादनवाढीचा वार्षिक दर स्वातंत्र्यानंतर एवढा कमी कधीच नव्हता. सरकारी आकडेच हे सांगतात. अर्थात, आकडे वस्तुस्थिती तेवढी सांगत असतात, कारणे सांगत नसतात.

**शेतीचा कसच संपविणार :**

नफा कमविणे हा बाजारी अर्थव्यवस्थेचा अंगभूत दोषधर्म आहे. नफा कमविण्यासाठी माणसांचे निसर्गाचे शोषण केले जाते. तसेच शेती व्यवसायात येणारे भांडवलीकरण हे शेतकऱ्यांना प्रथम शेतमजूर आणि नंतर बेरोजगार व शेवटी गुन्हेगार करून शेतकऱ्यांचे, तसेच शेतजमिनीचे शोषण करणार आहेत. १०–१५ वर्षात किंवा १५–२० वर्षात नफा कमावण्यासाठी शेतीचा वाटेल तसा वापर करून शेतीचा कस नाहीसा केला जाणार आहे. रासायनिक खते, औषधांचा अतिरिक्त वापर करून पीक जास्तीत जास्त काढणार. शेतीचा कस कमी करून काही वर्षानी या शेतात काहीही पिकणार नाही, अशी शेती उरणार, निसर्गाला ओरबाडून नफा कमविणे, हा या बाजारी व नफा कमविणाऱ्या अर्थव्यवस्थेचा गाभा आहे. टिकाऊ शेती हा त्यांचा हेतू असणारच नाही. कायम पिकत राहणारी शेती त्यांना कोठे हवी आहे ? करार काळात नफा कमविणार आणि निघून जाणार.

शेतकरी जमिनीला 'आई' समजतो. आई जिवंत ठेवून शेतकरी जगतो निदान तसा त्याचा प्रयत्न असतो. भांडवली शेती करणारे शेतीला काय समजतील ? रोजगार कमी होऊन शेतकरी उद्ध्वस्त होण्याच्या दिशेने जाईल. शेतीचा कस कमी करून शेती उद्ध्वस्त केली जाईल. कदाचित उत्पन्न वाढेल, कदाचित उत्पादकता वाढेल (कदाचितच) तीही शक्यता दिसत नाही. गेल्या पंधरा वर्षात दिशा स्पष्टपणे अशी दाखविते की, उत्पादकता आणि उत्पादन वाढीचा दर कमी होत आहे. पण, आणखी एक होणार आहे. ते म्हणजे, विषमता वाढेल. जगभर विषमता वाढत आहे. श्रीमंत आणि गरीब राष्ट्रे यांच्यातील अंतर वाढत आहे. प्रत्यके देशात गरीब आणि श्रीमंत माणसे यांच्यातील अंतर वाढते आहे. भारतातही हे घडते आहे. वास्तव हे असे आहे. मात्र, भारतीय राज्यघटनेत संपत्तीचे विकेंद्रीकरण करा, असे सांगितले आहे. सामाजिक न्याय सांगितला आहे. 'कसेल त्याची जमीन' सांगितली आहे. समाजवाद आहे. उत्पादन वाढ व्हायला हवी. तसेच न्याय वाटप व्हायला हवे.

**२.१ सत्ता, प्रभाव आणि अधिकार :**

आधुनिक राज्यशास्त्रज्ञ असे प्रतिपादन करतात की, समाजात साधनसामुग्रीची विभागणी जशी नेहमीच विषम प्रमाणात असते तसेच सत्तेची वाटणी विषमच असते. सत्त्येची ही विषम वाटणीच समाजातील सर्व सत्ता संबंधांचा आधार असते. समाजात काही व्यक्ती अन्य व्यक्तिंपेक्षा वरचढ असतात आणि त्या वरचढ व्यक्ती इतरांवर वर्चस्व गाजवीत असतात त्यांना आपल्या स्वत:च्या इच्छेनुसार वागणे भाग पडते. या वरचढ व्यक्तिंना सत्ताधारक (पावर होल्डर), तर त्यांच्या इच्छेनुसार वागणाऱ्या व्यक्तिंना सत्ताग्राहक (पावर ॲड्रेसी) अशा संज्ञा दिल्या जातात या प्रतिपादनाच्या मुळाशी या राज्यशास्त्रज्ञांची अशी धारणा असते की, समाजात सत्ताधारक नेहमीच अल्पसंख्य असतात. तर सत्ता ग्राहकांची बहुसंख्य असते. या मुठभर सत्ता धारकांसाठी अभिजन किंवा श्रेष्ठी (एलीट) अशी संज्ञा ते वापरतात. समाजसत्ता ही नेहमी अभिजनसत्ताच असते. हे आधुनिक राज्यशास्त्रज्ञांचे गृहीतकृत्य आहे. त्यांच्यामते, सत्तांतर होते तेव्हा फक्त एक अभिजन वर्ग जातो व त्याची जागा दुसरा अभिजन वर्ग घेतो. एवढाच बदल होतो.[७०]

आधुनिक राज्यशास्त्रातील सत्ता संबंधाच्या विश्लेषणाच्या आधारभूत असलेली दोन मुख्य सुत्रे प्रारंभीच नमूद करणे योग्य होईल. पहिले सूत्र असे की, सत्ताधारक व सत्ता ग्राहक हे दोन्ही ज्या प्रसंगात उपस्थित असतील तिथेच सत्तासंबंध प्रस्थापित होऊ शकेल. त्यापैकी कोणाही एकाच्या अनुपस्थितीत दुसऱ्याचे अस्तित्व संभवतच नाही. यालाच सत्ता संबंधाचे आंतर संबंधात्मक (रिलेशनल) स्वरूप असे म्हणतात. दुसरे सूत्र असे आहे की, सत्ता संबंध परिमाणक्षम (क्वान्टिफायेबल) असतात. याचा अर्थ असा की, सत्ताधारक सत्ताग्राहकावर किती वर्चस्व गाजवतो याचे काटेकोर मोजमाप केले जाऊ शकते. आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी सत्तेच्या मोजमापनाच्या अनेक शास्त्रीय पद्धतीही तयार केल्या व वापरून पाहिल्या आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, सत्तेचेही आंतरसंबंधत्मकता व परिमाणक्षमता या दोन्ही गोष्टींचा परिणाम असा होतो की, सत्ताधारक श्रेष्ठींची सत्ता अमर्याद कधीच होऊ शकत नाही. सत्तेचा स्वीकार करणारा सत्ताग्राहकच जर नसेल तर सत्ताधारक कितीही सामर्थ्यवान असला तरी ते सत्ता कशी आणि कोणावर गाजविणार? सत्ताधारकाच्या सत्तेला सत्ता ग्राहकांची संमती असेल तर त्या सत्तेला अधिमान्यता लाभून तिचेच रूपांतर अधिसत्तेत होते, आणि असे रूपांतर झालेली सत्ता अधिक दीर्घ काळ टिकते. सत्ताधारकाने वाजवी मर्यादेबाहेर

सत्ता गाजविली तर सत्ताग्राहकांच्या ते लक्षात आल्यावाचून राहत नाही. कारण ज्या वस्तूचे वा शक्तिचे मोजमापन केले जाऊ शकते. त्यांचे वाजवी प्रमाण किती असते आणि वाजवीपणाची मर्यादा ओलांडून त्या अतिरिक्त (एक्सेस) केव्हा होतात हे लपून राहूच शकत नाही. सत्तेचे अचूक मोजमाप करणे शक्य असल्यामुळे अवाजवी सत्ता सत्ताग्राहकांच्या लक्षात येणे आणि ती तिच्या प्रतिकारार्थ उभे राहणे टाळले जाऊ शकत नाही. सत्तेच्या मापणाची प्रमाणके, मोजपट्ट्या व संख्याशास्त्रीय तंत्र विकसित करण्यावर अलीकडे राज्यशास्त्रज्ञांनी विशेष भर दिला आहे.

राज्यशास्त्रज्ञांचा असा ही एक गट आहे जो राजकारणाचा विचार केवळ सत्ता,अधिकार व प्रभाव यांच्याच अंगानी करतो. या गटाला अनुभववादी (इंपिरिसिस्ट) असे म्हटले जाते. ''राजकारणाचा अभ्यास म्हणजे प्रभाव आणि प्रभावी यांची अभ्यास होय,'' ''सत्तेला साकार करणे व तिचा वाटेकरी होणे या प्रक्रियांचा अनुभव सिद्ध अभ्यास करणे म्हणजे राज्यशास्त्र होय'' आणि ''जी कृती सत्ता–परिप्रेक्ष्यातून (पॉवर पर्स्पेक्टिव) केली गेली असेल ती राजकीय कृती होय'' अशा विधानांमधून हॅरॉल्ड लास्वेल याने ही भूमिका विशद केली आहे. जो ''वरचढपणा आणि दुय्यमपणा, वर्चस्व आणि शरणागती, शासक आणि शासित यांच्यातील संबंधाचा मूलत: सत्तारूपी राजकारणात समावेश होतो. राजकारणाचा अभ्यास म्हणजे या संबंधाचाच अभ्यास असतो.'' असे मत व्ही. ओ. की (ज्युनिअर) याने व्यक्त केले आहे. रॉबर्ट डहाल व डेव्हिड ईस्टन यांनीही ''अधिकारयुक्त धोरणनिर्मिती व त्या धोरणाची अंमलबजावणी'' याच अंगाने राजकारणाचा विचार केला आहे.[७१]

राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ व अंतिम सत्तेची धारक असते आणि तिच्या निर्णयांना ''बंधनकारकता'' असते. या गोष्टी निर्विवाद आहेत. पण केवळ तेवढ्यावरून राजकारणाला सर्वस्वी सत्तेशी जोडणे भ्रममूलक व चूक ठरते, कारण एकतर, सत्तेसाठी संघर्ष केवळ राजकीय क्षेत्रातच होतो असे नाही, तर तो कुटुंबात किंवा विद्यापीठातही होऊ शकतो, आणि दुसरे असे की, सत्ता या शब्दाची नेमकी व्याख्याच केली जाऊ शकत नाही. इष्ट मानल्या जाणाऱ्या नियंत्रणापासून ते अनिष्ठ ठरविलेल्या पाशवी वर्चस्वापर्यंतच्या सगळ्याच बाबींचा अंतरर्भाव सत्ता या संज्ञेखाली होतो. याचा अर्थ असा की, सत्ता ही संज्ञा कमालीची व्यापक, सर्वसाधारण आणि बुचकळ्यात पाडणारी असल्यामुळे तिचा वापर करून राजकारणाचे समग्र स्वरूप व्यक्त केले जाऊ शकत नाही.

राजकीय प्रक्रियेत सत्ता, प्रभाव आणि अधिकार या संकल्पना समानार्थी वापरण्याची

चूक अनेक अभ्यासकांकडून होत असते कारण इंग्रजी भाषेतील (पॉवर इन्फ्ल्यून्स् ॲण्ड ॲथॉरिटी) यास समर्पक मराठी पर्याय उपलब्ध नव्हते. मात्र डॉ. राजेंद्र व्होरा आणि डॉ. सुहास पळशीकर यांनी राज्यशास्त्र कोष तयार करून ही उणीव दूर केली आहे. त्यानुसार सत्ता, प्रभाव आणि अधिकार या एकमेकांशी घनिष्ठरीत्या निगडीत असलेल्या संकल्पनाचे विश्लेषण या पुढील भागात करण्यात आले आहे. राजकीय जीवनात सत्त्येची संकल्पना अत्यंत मूलभूत आणि व्यापक स्वरूपाची आहे. व्यवस्था विश्लेषणाच्या सहाय्याने आपणांस निरनिराळ्या प्रकारच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थांमध्ये सत्ता कोठे व कशाप्रकारे केंद्रीत झालेली आहे हे पाहता येते. व्यवस्थेच्या आदान प्रदानाच्या प्रक्रियेतून आपणांस सत्तेचे परिणाम पाहवयास मिळतात. म्हणून सत्तेच्या विविध रूपांचा, कार्याचा व परिणामांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. त्या दृष्टिने सत्ता म्हणजे काय ? तिचे स्वरूप काय ? तिची आपणांस का जरूरी भासते, तिचे वाटप कशा प्रकारे होते, सत्ताधारक कोण, त्यांच्या हाती सत्ता कशी एकवटते, तिचा ते कसा उपयोग करतात ते सर्व पाहणे महत्त्वाचे आहे.

**राजकारणाचे स्वरूप :**

मॅक्स वेबर यांच्या मते राजकारण हे सर्वव्यापी आहे. मानवाचा सर्व इतिहास राजकारणाने भरलेला आहे. मार्क्स मते जगाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे, तर वेबरच्या मते तो राजकारणाचा इतिहास आहे. इतिहासाच्या ओघात राजकारणाने अनेक रूपे धारण केली आहे. राजकारणाने अनेक संस्था निर्माण केल्या आहेत. म्हणून केवळ 'राज्य' म्हणजे राजकारण किंवा राजकीय कृती अशी गल्लत करून चालणार नाही. राज्य म्हणजे राजकारणाच्या अनेक अविष्कारापैकी एक ऐतिहासिक अविष्कार आहे. वेबरच्या मते कोणत्याही राजकीय कृती मध्ये सक्ती अभिप्रत असते. प्रत्येक राजकीय कृतीमध्ये अथवा घटनेमध्ये प्रभाव हा केंद्र स्थानी असतो आणि राजकीय गट हा प्रभावाचा वापर करणारा गट असतो. थोडक्यात प्रभावाचे संबंध निर्माण करणारी, त्यांचा विकास करणारी, त्यांना अडविणारी, त्यांना बदलणारी अथवा नष्ट करणारी, सतत चालू असणारी प्रक्रिया म्हणजे राजकीय प्रक्रिया होय. ग्रामीण राजकारणाचा विचार करता हा दोन किंवा अधिक व्यक्ती किंवा व्यक्ती समुदाय होणारा सततचा संघर्ष आहे.

**३.१७ सत्तेचे स्वरूप :**

सर्व सार्वजनिक व व्यापक स्वरूपाच्या घडामोडीत सत्ता सर्वत्र ओतप्रोत भरली आहे. परंतु तिचे प्रत्यक्ष दर्शन न होता तिचे परिणाम मात्र जाणवत असतात. प्रत्येक

सामाजिक कृती हा सत्तेच्या वापराचा एक अविष्कार असतो. कारण कोणत्याही सामाजिक व्यवस्थेत, कुटुंबात, जातीत, धर्मात व राज्यात क्रमपरंपरा असतेच. ही क्रमपरंपरा श्रेष्ठ–कनिष्ठ संबंधावर, उच्चनीच भावावर आधारलेली असते अशा क्रमपरंपरेशिवाय कोणतीही सामाजिक व्यवस्था उभी राहू शकत नाही. एकाने आज्ञा करणे आणि दुसऱ्याने तिचे पालन करणे म्हणजे सत्तेचाच अविष्कार होय.[७२] सत्ता टाळता येत नाही ती तटस्थ असते चांगलीही नसते वाईटही नसते सत्तेचा वापर तिचे चांगले वाईटपण निश्चित करतो. सत्ता व्यवस्थेपासून कोणत्याही व्यक्तिची सुटका नाही.

संघटित स्वरूपाचे सामाजिक जीवन म्हणजे एक प्रकारची सत्तेची संघटना असते. त्यात सत्तेची व्यवस्था व वापर यांची रूजुवात केलेली असते. समाजातील विविध संस्थेच्या संरचनेत सत्तेचे वाटपच प्रतिबिंबित झालेले असते. सारांश, समष्टींचा अशा कोणताही प्रकार आढळत नाही की ज्यात सत्तेचा अविष्कार नसतो.[७३] आर. एच. तॉनीने सत्तेची व्याख्या अशी केली आहे : सत्ता म्हणजे व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तिंचे वा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेऊ अशी क्षमता होय. डेव्हिड ईस्टनही असाच आशय पुढील शब्दातून व्यक्त करतो. तो म्हणतो, 'एक व्यक्ती वा गट जेव्हा स्वत:च्या इच्छेनुरूप इतरांच्या कृती निर्धारित करतो तेव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय.' लॉस्वेलच्यामते सत्ता म्हणजे निर्णय निर्मितीतील सहभाग होय, तो म्हणतो, निर्णय निर्मिती ही दोन वा अधिक व्यक्तिमधील आंतरक्रिया असते. इतर व्यक्तिंनी कोणत्या धोरणाचा सहभाग या अर्थाने सत्ता ही सुद्धा आंतर–व्यक्ती–संबंधच ठरते.' महात्मा ज्योतीरावांनी 'सत्ता' या विषयाचा सर्वांगाने व सुक्ष्म विचार केलेला आहे. परकिय राज्य कर्त्यांचे घोषित ध्येयधोरण, किंवा त्यांचे प्रत्यक्ष प्रशासन एवढ्या पुरता त्यांचा सत्ता विचार सीमित नव्हता. तर वरवर धार्मिक–सामाजिक दिसणाऱ्या व्यवस्थांच्या मुळाशी असणाऱ्या सत्तेलाही त्यांनी हात घातलेला होता.[७४] म्हणजेच ज्योतीरावांनी सत्ता संकल्पना केवळ शिखरपातळीवरच्या राजसंस्थेशी निगडीत नसून समाजात सर्वत्र विखुरलेल्या वर्चस्वसंबंधांना गवसणी घालणारी आहे. समाजशास्त्रात सत्तेची व्याख्या जशी व्यापक सामाजिक संदर्भात केली जाते तशीच व्याख्या ज्योतीरावांनी केली आहे. संस्थात्मकतेपेक्षा कार्यात्मकतेवर भर देऊन सत्तेची व्याख्या करताना ते असे म्हणतात की, सकार–नकारात्मक अधिबलनांचा (सॅक्शन्स) वापर करून इतर व्यक्तींकडून तिच्या इच्छेविरूद्ध आपल्या मनासारखे वर्तन करून घेण्याची क्षमता म्हणजे सत्ता होय. कोणतेही सत्ताधारक आणि सत्ताग्राहक जिथे एकत्र

येतात तिथे सत्तासंबंध उभे राहतात. या अर्थाने सत्ता ही राजसंस्थेची मिराजदारी न उरता समाजव्यापी होते. जो कोणी सत्ता वापरू इच्छितो त्याला काही मुर्त व अमुर्त साधनसामुग्री लाभते. पैसा, जमीन, भौतिक मालमत्ता किंवा ज्ञान, कौशल्य, शक्ती इत्यादींचा त्यात अंतर्भाव होतो. सत्ताधारकाजवळ साधन सामुग्री किती आहे त्याचप्रमाणे सत्ताग्राहकाकडून त्याला प्रतिकार किती प्रमाणात होतो यावरही सत्तेचे प्रमाण अवलंबून असते. प्रतिकार कमी असल्यास कमी साधनासह सत्ता चालविली जाऊ शकते. त्यामुळे प्रतिकार कमी करण्याची क्षमता म्हणजे सत्ता, अशीही सत्तेची ते व्याख्या करतात.[७५] सत्ताग्राहकांनी सत्तेचा स्वेच्छेने स्वीकार करणे यास अधिमान्यता (लेजिटिमसी) असे नाव त्यांनी दिले आहे. ज्योतीरावांच्या लेखनात सत्तेचे समाजव्यापी स्वरूप, सत्तेची सकार–नकारात्मक अधिबलने याचप्रमाणे ही आधिमान्यतेचीही संकल्पना व्यक्त झाली आहे.

**३.१८ प्रभाव :**

प्रभाव हे व्यक्ती–व्यक्तित, घटना–घटनात, संस्था–संस्थात, संघटना–संघटनात व राज्या–राज्यात असणारे एक नाते आहे. एका कर्त्याने स्वत:च्या मताप्रमाणे इतर कर्त्याना वागावयास लावले म्हणजे त्या कर्त्यांचा इतर कर्त्यावरील प्रभाव दिसून येतो. कारण ते आपले पूर्व संकल्पित मागे, सोडून त्याच्या आदेशाप्रमाणे वागू लागतात. थोडक्यात प्रभाव म्हणजे व्यक्तिंची इतरांच्या धोरणांना हेतूत: परिणामीत करण्याची क्षमता प्रभावधारक व्यक्ती समाजात सर्वच मूल्यांबाबत श्रेष्ठ मानली जाते. ती स्वत:च्या इच्छेनुरूप समाजातील अन्य व्यक्तिंचे वर्तन परिणामित करते. म्हणजे एकतर, प्रभाव हा किमान दोन व्यक्तिंच्या आंतरसंबंधावर आधारित असतो आणि दुसरे असे की प्रभाव संबंध प्रस्थापित होण्यासाठी प्रभाव धारकाचा हेतू महत्त्वाचा असतो. हेतू खेरीज प्रभाव म्हणताच येणार नाही केवळ दोन व्यक्तितीतल साधर्म्य हे एकीचा दुसरीवर प्रभाव असल्याचे पर्याप्त लक्षण असू शकत नाही. साधनसामुग्रीच्या विषय धारणेमुळे काही व्यक्ती अधिक प्रभावशाली, तर काही कमी प्रभावशाली तर आणखी काही व्यक्ती अगदी प्रभाव शून्य असणे अपरिहार्य ठरते.

साधनसामुग्रीच्या विषमधारणेतून निर्माण झालेली प्रभावविषयक विषमता काही घटकांमुळे अधिकच तीव्र होते. कौशल्य हा एक असा घटक असतो. केवळ साधनसामग्री असली म्हणजे व्यक्ती आपोआप प्रभावशाली होत नाही. त्या साधनसामुग्रीचा प्रभाव पाडण्यासाठी उपयोग करण्याचे कौशल्य ही व्यक्तिच्या अंगी असावे लागते. हे कौशल्य

तिला संगोपन, प्रशिक्षण संधी, प्रोत्साहन इ. मधून लाभते. व्यक्ती कशा प्रकारच्या कुटुंबात व सामाजिक पर्यावरणात वाढते यावर या सर्व गोष्टी अवलंबून असतात. साधन सामुग्री सारखीच संग्रही असलेल्या व्यक्तिंपैकी काहींनाच ती वापरण्याची प्रेरणा (मोटिवेशन) मिळते तर अन्य काहींना मात्र ती वापरण्यातून मिळणारे लाभ फारसे महत्वाचे वाटत नाहीत. हा व्यक्तिनिष्ठ अभिवृत्तीतील फरकही अनुभवांतून व धारणांमधून आकारास आलेला असतो.

वर्चस्व (डॉमिनन्स) व प्रभाव या दोन्ही गोष्टी परिणामांच्या दृष्टिने सारख्याच असतात. दोहोंच्या द्वारे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तिच्या कृती, निर्णय, मते व दृष्टिकोण यात बदल घडविते. पण प्रभावाचे वेगळेपण यात असते की बळ, धाकटदश्या यापेक्षा युक्तीवाद व पाठपुरावा यावर त्यांची भिस्त असते. प्रभाव पाडणारी व्यक्ती तार्किक युक्तीवाद, नैतिक मुद्दे, फायदे तोटे सांगून अन्य व्यक्तिंचा निर्णय प्रभावीत करते. मात्र प्रभावित होणारी व्यक्ती आपला निर्णय घेण्यास स्वतंत्र असते. या अर्थाने प्रभावात दडपण नसते. प्रभावधारक व्यक्तिचे दिव्य गुण, शिक्षण वगैरे मुळे आकर्षित होऊनही अन्य व्यक्ती प्रभावीत होऊ शकतात. याचा अर्थ प्रभाव केवळ तार्किक युक्तीवादावर अवलंबून नसतो.

**३.१९ सत्ता आणि प्रभाव यांचा संबंध :**

प्रभाव आणि सत्ता यांचा संबंध स्पष्ट करताना वेबरने म्हटले आहे की, प्रभाव हा सत्तेचा व्यवहारिक आणि अनुभवात्मक अविष्कार आहे. सामाजिक संबंधामध्ये एखाद्या घटकाची (इतरांचा) विरोध असतानाही स्वत:ची इच्छा पूर्ण करण्याची शक्यता म्हणजे सत्ता होय, तर विशिष्ट कृती अपेक्षित असलेली आज्ञा लोकांच्या निश्चित गटाकडून मानली जाण्याची शक्यता म्हणजे प्रभाव होय.[७६] यावरून हे लक्षात येईल की, केवळ राजकारणातच सत्तेचा अथवा प्रभावाचा आढळ होतो असे नाही. जेथे माणूस स्वत:ची इच्छा लादू शकतो. तेथे सत्तेचा आणि प्रभावाचा अविष्कार आढळतो. कुटुंबात प्रमुखाचा जाती श्रेष्ठाचा, धर्म गटात धर्म नेत्याचा हा प्रभाव आपणास नेहमी जाणवतो. किंबहुना जॉर्ज सिमेल याने म्हटल्याप्रमाणे श्रेष्ठ कनिष्ठ किंवा उच्च नीच्च भाव हा सामाजिक संबंधाचा सार्वत्रिक आकृतिबद्ध आहे. उच्च किंवा श्रेष्ठ आज्ञा करतात आणि नीच किंवा कनिष्ठ ती शिर सावंद्य मानतात. तिचे पालन करतात जे आज्ञा पालन करतात ते आज्ञेमागील प्रभाव जाणतात.

सत्ता फारच थोडे लोक वापरू शकतात, त्यामुळे सत्तेपोटी भिती दडलेली असते. याचा अर्थ असा की, भितीमुळे (सुप्त किंवा व्यप्त) आज्ञा पाळली जाते.

आज्ञेमागे एक प्रकारची गुप्तता असते, आणि कोणत्याही प्रकारच्या प्रभावामध्ये ही गुप्तता अभिप्रेत असते. सत्तेच्या सर्व केंद्रामध्ये म्हणजेच सत्ता गाजविणाऱ्या प्रत्येक व्यक्तिच्या ठाई अभिमान, आक्रमकता, अहंगंड, उद्धटपणा, स्वत:च्या स्थानाची जाणीव इ. गुण (दोष ?) स्वभाविकपणे येतात त्याचे प्रमाण व्यक्ती परत्वे आणि स्थानपरत्वे कमी–अधिक असते इतकेच. त्यामुळे सत्तेच्या प्रत्येक वापरामध्ये अविवेक अभिप्रेत असतो असे मानण्यास जागा आहे प्रभाव हा सत्तेचा एक विशिष्ट प्रकार आहे. सत्ता म्हणजे एक प्रकारचा समाज–अंतर्गत संबंध आहे. व मानव हा एक सत्ता इच्छिणारा प्राणी आहे.[७७] जेव्हा एखादा करणात्मक (होकारार्थी) संदेश देण्यासाठी अथवा समाज सुधारणा करण्याची पद्धत म्हणून सत्तेचा उपयोग होतो. तेव्हा त्याला प्रभावाचे स्वरूप प्राप्त होते. निराळ्या शब्दात सांगावयाचे तर प्रभाव हा सत्तेचा एक साचा आहे. सत्तेचा परिणाम प्रभाव निर्मितीत होतो. म्हणून प्रभावामुळे निर्माण झालेले सगळे संबंध अखेर सत्तात्मक संबंध असतात असे म्हणावे लागेल.

प्रभाव म्हणजे समाजातील एक नैसर्गिक संबंध आहे. मानवी जीवनच मुळी क्रमपरंपरात्मक आहे. मानवी संस्कृती निर्माण होत असता प्रभावाची गरज भासू लागते. मानवा मानवात सहकार्य निर्माण करण्यास प्रभाव कारणीभूत होतो. जेव्हा राज्यात प्रभाव कार्यान्वित होता. तेव्हा त्याला सत्तेचे स्वरूप प्राप्त होते. अन्यथा तो प्रभाव या स्वरूपात असतो. वेबरच्या मते आर्थिक घटक राजकीय संबंधावर परिणाम करतात, परंतु ते राजकीय संबंध ठरवित नाहीत. वेबरच्या मते समाजामध्ये अनेक स्वायत्त रचना असतात या स्वायत्त रचना स्वत:ची स्वायत्तता टिकवित. इतर स्वायत्त रचनांवर परिणाम घडवित असतात. हा परिणाम परस्पर स्वरूपाचा असतो. कोणत्याही एका घटकाला अथवा रचनेला एकमेव निर्णायक रचना असे स्तान नसते. उदा. समाजामध्ये दर्जा आर्थिक संबंध आणि सत्ता राजकारण या स्वायत्त रचना होत. दर्जा हा आर्थिक परिस्थिती, भाषा, जात, वंश जीवनपद्धती इ. घटकांवर अवलंबून असतो. आर्थिक परिस्थितीचा दर्जा ठरविण्यावर फार मोठा परिणाम होत असला तरी तो एकमेव निर्णायक घटक नसतो, उदा. भारतीय परिदृढ जातीय व्यवस्थेत कनिष्ठ वर्गीय जात, आर्थिक किंवा शैक्षणिक दृष्ट्या सुधारली तरी तिचा सामाजिक दर्जा बदलत नाही. हे आधुनिक समाजाचे लक्षण नाही हे खरे, परंतु वस्तुस्थिती नाकारता येत नाही. नव्या संक्रमणावस्थेत दर्जाच्या कल्पना बदलत आहेत. परंतु त्या बदलण्याचा वेग अत्यंत मर्यादित आहे ब्राम्हण वर्गातील कोकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे, कायस्थ हे पोटभेद आपल्या दर्जाच्या भिंती अद्याप कशा टिकवून आहेत व हे सर्व इतर जाती–पोट जातींना कसे लागू आहेत. हे वेगळे

सांगावयास नको. सत्तेवर आधारलेले संबंध हा ही एक स्वायत्त रचनेचा प्रकार होय. ही रचना स्वत:चे स्वायत्त अस्तित्व टिकवित इतर रचनांचा (दर्जा आणि आर्थिक संबंध यांना) छेदित असते. राजकीय सत्ता स्थानावर असलेल्या व्यक्तिचा दर्जा राजकीय दृष्ट्या श्रेष्ठ असला तरी तो राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित राहतो. या सत्ता स्थानामुळे काही आर्थिक आणि सामाजिक लाभ होत असले तरी ते लाभ तात्पुरते, तात्कालीक असतात व ते जोपर्यंत सत्तास्थान आहे तो पर्यंत टिकतात.

**३.२० अधिकार :**

कोणासही सत्ता प्राप्त होते ती अधिकारपदामार्फत. तो अधिकारपदाचा गुणधर्मच आहे. आज्ञा अथवा आदेश देणे हा सत्ताधीशांचा अधिकार आहे. सत्तेची सर्व स्थाने ही आज्ञा करण्याची अधिष्ठाने आहेत. सहभाग, सामंजस्य यांना येथे स्थान नाही. कारण सत्ता एकमार्गी असते, तर या गोष्टी उभयमार्गी असतात. सत्ता ही वरिष्ठांकडून कनिष्ठाप्रत कार्यान्वित होते अशी परंपरा आहे. वरिष्ठ व कनिष्ठ हे नाते एकमार्गी आहे. जेव्हा समाजातील काही वरिष्ठ व काही कनिष्ठ असतात व त्यामुळे (कनिष्ठांनी वरिष्ठांची आज्ञा पाळली पाहिजे अशा आशयाचे) संबंध उभयतांना माहीत असतात तेव्हाच अधिकाराचा अविष्कार होतो. वरिष्ठांकडून कनिष्ठाकडे एखादा संदेश संक्रमित करण्याचे कार्य परंपरेनुसार अधिकारामुळे पार पडते. अधिकार सार्वजनिक असतो. अधिकाराचे वर्गीकरण करताना मॅक्स वेबरने त्याचे तीन प्रकार पाडले आहेत.

१) परंपरागत अधिकार : हा विद्यमान समाजात परंपरेला जे अधिष्ठान लाभलेले असते त्यावर आधारलेला असतो. उदा. कुटुंबातील प्रमुखाचा अथवा जातीतील प्रमुखाचा अधिकार परंपरागत अधिकार होय.

२) संमोही अधिकार : हा बव्हंशी व्यक्तिगत स्वरूपाचा असतो. एखाद्या व्यक्तिचे चारित्र्य, पावित्र्य, वीरत्व, साधुत्व इ. मुळे तिच्या ठायी संमोही व्यक्तिमत्व प्राप्त होते आणि अशा व्यक्तिच्या आज्ञेला राजकीय आधार नसला तरी त्या आज्ञेसाठी आपले जीवन समर्पित करण्याची प्रवृत्ती अनुयायांमध्ये निर्माण होते. लेनिन, महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, जयप्रकाश ही संमोही अधिकाराची उदाहरणे होत.

३) विधिनिर्मित अथवा बुद्धीसंमत अधिकार : हाच कायदेशीर अधिकार होय. हा अधिकार मान्य कायद्यांवर आणि या कायद्याने नेमलेल्या व्यक्तिच्या वैध नेतृत्वावर अवलंबून असतो. राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री इ. ना प्राप्त होणारा अधिकार या प्रकाराचा होय.

पहिल्या दोन प्रकाराच्या अधिकारात आपण एखाद्या व्यक्तिची आज्ञा पाळतो ती त्याच्या अधिकारपदामुळे नव्हे तर व्यक्तिमत्वामुळे. आपण एक प्रकारे त्याच्या व्यक्तिम त्वास मान्यता देतो म्हणून त्याची आज्ञा पाळतो. म्हणजे या अधिकाराचे मूळ व्यक्तित असते. परंतु तिसऱ्या प्रकारात जाणून बुजून व्यक्ती निरपेक्ष स्वरूपात अविष्कार होतो. लोक आज्ञा पाळतात ती अधिकारपदस्थांची. त्या पदी एखादी व्यक्ती असेल तोवरच तिचा अधिकार चालेल. ती व्यक्ती अधिकारापासून वंचित होईल व दुसरी त्या पदी येणारी व्यक्ती तो अधिकार उपभोगील.

निराळ्या शब्दात सांगावयाचे तर ही आज्ञाधारकता वैयक्तिक न राहतात कार्यात्मक स्वरूपाची होईल अशी कार्यात्मक आज्ञाधारकता ही जीवनाच्या काही अंगांचे मूलभूत लक्षण आहे. ह्या तीन प्रकाराच्या अधिकारदर्शनात दोन प्रकारच्या भूमिका प्रत्ययास येतात. एक तर अधिकार व्यक्तिगत गुणातून निर्माण होतात अथवा ते अधिकार पदातून निर्माण होतात. अधिकारानुसार प्रभावाचे स्वरूप बदलते, कमी अधिक होते. विधिसंमत अधिकार प्राप्त झालेल्या व्यक्तिचा प्रभाव पदाशी निगडीत असल्याने पद संपल्यावर प्रभाव संपेल, किंवा कमी होईल.[७८]

**३.२१.१ राजकीय श्रेष्ठजन :**

सत्तेच्या राजकारणाशी श्रेष्ठजन ही कल्पना निगडीत आहे. समाजात सत्तायुक्त असणाऱ्यांना श्रेष्ठजन असे संबोधले जाते. कोणत्याही समाजात, अगदी लोकशाही समाजात देखील, सगळेच्या सगळे नागरिक सत्ता गाजवितात असे केव्हाही आढळत नाही. प्रत्यक्ष सत्ता गाजविणारे केव्हाही थोडेच असतात मात्र ते सर्वांच्यावतीने सत्ता गाजवितांना दिसतात.

प्रत्येक समाजरचनेत श्रेष्ठजन संकल्पना कमीअधिक प्रमाणात अभिप्रेत असते. या कल्पनेस नैसर्गिक आणि व्यावहारिक अर्थ आहे, संदर्भ आहे, इतकेच नव्हे तर नैसर्गिक अधिष्ठानही आहे. समता हे एक आदर्श मूल्य मानले जात असले तरी प्रत्यक्ष निसर्गामध्ये आणि मानवाच्या दैनंदिन जीवनामध्ये विषमता ओतप्रोत भरलेली आहे. उपजत गुणांचे नैसर्गिक दान सर्वांना सारखे लाभत नसते. बुद्धी, शारीरिक सामर्थ्य, कौशल्य, शौर्य इ. बाबतीत नैसर्गिक विषमता हा नियम आणि समता हा अपवाद आढळतो. परिणामत: निसर्गत: प्राप्त झालेल्या साधनांचा सत्ता आणि संपत्ती सारख्या ऐहिक लाभांसाठी अपरिहार्यपणे वापर होतो आणि व्यावहारिक विषमता निर्माण होते. श्रीमंत–गरीब, समर्थ–असमर्थ, सत्ताधीश–सत्ताहीन असे भेद निर्माण होतात. या भेदांचा अर्थव्यवस्थेवर

समाजरचनेवर आणि राजकीय व्यवस्थेवर परिणाम होत असतो आणि यातूनच आार्थिक, सामाजिक, राजकीय श्रेष्ठजन निर्माण होत असतात. जमीनदार–भांडवलदार आर्थिक क्षेत्रातील श्रेष्ठजन ठरतात, बुद्धिजीवी सांस्कृतिक–प्रशासकीय क्षेत्रातील श्रेष्ठजन ठरतात आणि आर्थिक–सामाजिक क्षेत्राची श्रेष्ठजन राजकीय क्षेत्रातील श्रेष्ठजन अथवा राजकीय सत्ताधीश ठरू पाहतात. भारतीय समाज रचनेत उदाहरण द्यावयाचे झाल्यास एकेकाळी ब्राम्हण वर्ग बौद्धिक क्षेत्रातील श्रेष्ठजन ठरला. क्षत्रियवर्ण राजकीय क्षेत्रातील श्रेष्ठजन बनला तर वैश्यवर्ण आर्थिक क्षेत्रातील श्रेष्ठजन झाला. अर्थात बदलत्या परिस्थितीनुसार श्रेष्ठजनांचे स्वरूप बदलते, कार्यपद्धती बदलते, महत्वही बदलते.[७९]

सत्तेचे फार विस्तृत प्रमाणावर विभाजन होता कामा नये. अगदी लोकशाहीत देखील ती थोड्याशा लोकांच्या हातीच एकवटली पाहिजे. एका दृष्टिने थोड्या श्रेष्ठजनांच्या हाती सत्ता एकवटने म्हणजे लोकशाहीच्या अस्तित्वास धोका आहे. हे खरे असले तरी लोकशाहीच्या अंतिम संगोपन व संरक्षणासाठी हेच योग्य आहे.

पेरी असे म्हणतो की, श्रेष्ठजनवादाचा मुख्य गाभा असा की, प्रत्येक समाजात एक अल्पसंख्य गट असतो. तो समाजाच्या हिताहिताचे महत्वाचे निर्णय घेतो. या निर्णयाची व्याप्ती मोठी असते व त्याचा परिणाम अनेक लोकांवर घडून येतो. त्यांना राजकीय निर्णय असे नाव दिले तरी ते नेहमीच्या अर्थाने शासनातील अधिकाऱ्यांकडून अथवा कायदेमंडळाकडून घेतले जात नाहीत तर एका अल्पसंख्य गटाकडून घेतले जातात. मोस्कांने ज्यांना राजकीय वर्ग असे म्हटले आहे, त्यांच्याकडून हे निर्णय घेतले जातात. श्रेष्ठजनांच्या ह्या सिद्धांतानुसार ह्या अल्पसंख्य गटाला सार्वत्रिक निवडणुकांमुळे नव्हे तर इतर मार्गांनी वर्चस्व मिळालेले असते. यावरून असे म्हणता येईल की मतदारांना जर कोणती सत्ता असेल तर ती असे निर्णय घेण्याची सत्ता नसून ते निर्णय कोणी घ्यावेत हे ठरविण्याची सत्ता मात्र असते.

**३ : २१ : २ श्रेष्ठजनांचे प्रकार :**


श्रेष्ठजनांचे बहुविध प्रकार असतात ते अधिकारी वर्गातील असतील अगर शासकीय श्रेष्ठजन असतील अगर बौद्धिक श्रेष्ठजन असू शकतील किंवा सूचनांचे जाळे त्यांच्या सत्तेखाली असेल अथवा औद्योगिक बाबतीत ते श्रेष्ठ असतील या श्रेष्ठजन संरचनेचे दोन प्रमुख भेद सांगता येतील. १) डालने वर्णन केलेला सत्ताधारी श्रेष्ठजनांचा. याला बहुलवादी नमूना असे नाव देता येईल. व २) सी. राईटमिल्स याने वर्णन केलेला संघटित कट करणाऱ्या श्रेष्ठजनांचा नमूना. ह्या दुसऱ्या प्रकारच्या नमून्यात बडे लष्करी

अंमलदार, उद्योगपती इ. प्रकारचे लोक शासनावरच नियंत्रण गाजवितात. याच्या उलट डालने वर्णन केलेल्या बहुलवादी नमून्यात सत्ता जरी काही विशिष्ट श्रेष्ठजन गटाच्या हाती असला तरी त्या श्रेष्ठजनांच्या गटात प्रवेश मिळविणे इतरांना देखील शक्य असते ही संरचना मुक्तद्वाराची असून इतरांचा त्यात प्रसंगानुसार समावेश होऊ शकतो म्हणून तिला बहुलवादी असे नाव दिले आहे. राजकीय श्रेष्ठजन, आर्थिक श्रेष्ठजन, बौद्धिक श्रेष्ठजन, तंत्रज्ञ श्रेष्ठजन हे सगळे मोस्काच्या मते एकत्र येतात व विशिष्ट निर्णय घेतात त्याच्या निर्णयांचा परस्परांवर परिणाम होत असतो. डालच्या मते श्रेष्ठजनातील हितसंबंध समान असतात तर मिलच्या मते समान नसतात. कोणत्याही समाजात राजकीय नेतृत्वाला एखाद्या सामाजिक वर्गाचा आधार असावा लागतो. कारण त्याच्यावर्गातून श्रेष्ठजनांची भरती होत असते.

परेटो ह्या समाजशास्त्रज्ञाने श्रेष्ठजनांच्या सतत परिवर्तनाचा सिद्धांत पुढे मांडला आहे, ( Criculation of Elites) याचा अर्थ असा की, श्रेष्ठजनांच्या दरबारात काहींचा नित्यनव्याने प्रवेश होत असतो. तर इतर काही हतप्रभ होऊन बाहेर जात असतात. या बाबत लोकशाही समाज हे इतर प्रकारच्या समाजाहून अधिक चांगले असतात, असे म्हटले पाहिजे कारण ह्यात हे परिवर्तन सुकररित्या होऊ शकते आपल्यात नव्याने सामील होणाऱ्या नवागतांचे योग्य रितीने सामाजिकरण व्हावे व आपल्या वर्गातून अशा लोकांची भरती होत रहावी याची श्रेष्ठजन काळजी घेतात. किंबहुना योग्य प्रकारच्या सामाजिकरणाने योग्य प्रकारच्या भरतीचे धोरण सांभाळले जाईल अशी त्यांची खात्री असते. या श्रेष्ठजनांचा आलेख काढल्यास अगदी वरच्या थरातील श्रेष्ठजनांचा प्रत्येक गोष्टीला अनुकूलता असते. उच्च कुलात (अथवा जातीत अथवा घराण्यात) जन्म, श्रेष्ठ प्रकारचे गृह शिक्षण, बौद्धिक व शैक्षणिक प्रगतीची संधी इ. गोष्टी त्यांना अनुकूल असतात. त्यांच्या खालील थरात क्रमाक्रमाने ही संधी कमी कमी होत जाते.

**३ : २१ : ३ राजकीय श्रेष्ठजन संबंधी आकृतिबंध :**

रॉबर्ट डाल यांनी सत्ताशोधनासंबंधी मांडलेला आकृतिबंध वेगळ्या पद्धतीने खालीलप्रमाणे मांडता येईल.



राजकीय श्रेष्ठजन (सत्ताधीश)

श्रेष्ठजन

राजकीय वर्ग सत्ताशोधक

राजकीय लोकसंख्या (राजकीय स्तर)

लोकसंख्या

वरील आकृतीबंधानुसार समाजातील सर्व लोकांना राजकीय व्यवहारांविषयी कुतूहल, जाणीव, माहिती असते असे नाही व ते आपल्या राजकीय जबाबदारी विषयी जागरूक असतात असेही नाही. ज्यांना या जाणिवा आहेत, त्याचा राजकीय लोकसंख्येत समावेश होतो. डालच्या भाषेत हा राजकीय स्तर होय. या गटातील सर्वांना राजकीय वर्गात समाविष्ठ करता येत नाही. राजकीय कार्यकर्ते आणि सत्ता शोधक यांचा राजकीय वर्ग होय. यातील काहींचा श्रेष्ठजनात समावेश होतो. श्रेष्ठजनातही खालील प्रकार आढळतील.

**श्रेष्ठजन :**

(१) आर्थिक – जमीनदार, भांडवलदार, सावकार

(२) धार्मिक – धर्मगुरू, पुरोहित, मुल्ला–मौलवी

(३) सामाजिक – जातिप्रमुख

(४) शैक्षणिक – उच्चशिक्षित

(५) सांस्कृतिक – नृत्य, नाट्य, चित्रपट कलावंत

(६) तांत्रिक – तंत्रज्ञ, स्थापत्यविशारद

(७) लष्करी – लष्करी नेते आणि उच्च अधिकारी

(८) प्रशासकीय – प्रशासक – सनदी नोकर

(९) राजकीय – राजकीय उच्च सदस्य – मंत्री, खासदार, आमदार, इ.

सर्वच श्रेष्ठजन राजकीय श्रेष्ठजन बनू शकतील असे नाही. धार्मिक, शैक्षणिक आणि तांत्रिक क्षेत्रातील श्रेष्ठजनांना राजकीय श्रेष्ठजन बनण्याची आस कमी असेल परंतु ते राजकीय क्षेत्रावर प्रभाव पाडणार नाहीत असे नाही. राजकीय श्रेष्ठजनांमध्ये – सत्ताधीशांमध्ये राष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवरील सत्ता स्थाने भूषविणाऱ्यांचा समावेश होतो. त्या त्या पातळीवर श्रेष्ठजनांची उतरंड तयार होते. उदा., खासदार राष्ट्रीय पातळीवरचा, आमदार राज्य पातळीवरचा तर पंच ग्रामीण पातळीवरचा श्रेष्ठजन बनतो. या राजकीय श्रेष्ठजनांना आपल्या कार्यक्षेत्रानुसार आणि कार्यकर्तृत्वानुसार मान, प्रतिष्ठा अर्थलाभ, सवलती प्राप्त होतात. या लाभांमुळे राजकीय श्रेष्ठजन बनण्यासाठी होणारी स्पर्धा तीव्र व क्वचित जीवघेणी असते. सवलती आणि अनुग्रह यांचा सत्तेशी अनन्यसाधारण संबंध असतो. अर्थ असा की स्वत: सत्ताधीश श्रेष्ठजन असणाऱ्यांना आर्थिक–राजकीय सवलती मिळतातच परंतु सरकारी निर्णय घेण्यात त्यांना महत्त्वाचे स्थान असल्याने इतरांवर अनुग्रह करण्याचे, इतरांना सवलती, फायदे देऊन उपकृत करून ठेवण्याचे, बांधिल करण्याचे भाग्यही लाभते. म्हणून राजकीय श्रेष्ठजन बनण्याचा प्रयत्न केला जातो.

**३ : २१ : ४ श्रेष्ठजनांचे विविध स्तर :**

राष्ट्रीय, राज्यीय व स्थानिक अशा तीन स्तरांवर श्रेष्ठजनांची जडणघडण चालू असते. तिचा आपण उलट क्रमाने विचार करू. कारण सत्ता संरचनेच्या दृष्टिने तोच क्रम महत्त्वाचा आहे.

जिल्हा पातळीवरील किंबहुना त्याच्या खालील राजकारणात श्रेष्ठजन संरचनेचा पायाच घातला जातो. सत्ता प्रधान नेतृत्व तेथे उदयास येऊ लागते. खरे पाहिले तर इतक्या खालच्या थरावर नेतृत्व केंद्रीत होणे लोकशाहीच्या हिताच्या दृष्टिने योग्य तर नाहीच परंतु धोकादायकही असते. एका क्षेत्रातील सत्ता अन्य क्षेत्रात संक्रमित करता येते. उदा., एका ग्रामीण भागातील सहकारी साखर कारखान्याच्या संचालकाच्या हाती एकवटलेली सत्ता सहकारी संस्थांच्या, ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अथवा शिक्षण संस्थांच्या कारभारावर प्रभाव पाडण्यासाठी वापरण्यात येते या सर्वांचा राज्याच्या कायदे मंडळाच्या तसेच संसदेच्या निवडणुकीवर परिणाम घडून येतो.

राजकीय क्षेत्रातील सत्तेचे आर्थिक सत्तेत तसेच सामाजिक सत्तेत रूपांतर घडवून आणता येते. अशा प्रकारे सत्ता संघटन करून एखादा विशिष्ट पक्ष अधिकारावर आला की, त्याच्या अनुषंगाने त्याला समर्थक अशा संबंधित श्रेष्ठजन वर्गाची बांधणी करण्यास मार्ग खुला होतो. उलटपक्षी अशा प्रकारे बांधलेल्या श्रेष्ठजन वर्गाचा पुढील निवडणूक–प्रसंगी हमखास उपयोग होतो.

राज्यपातळीवरील श्रेष्ठजन वर्गाचे व्यवहार अधिक व्यापक क्षेत्रात चालतात अर्थात इतक्या व्यापक क्षेत्रात ते यशस्वी व्हावयाचे तर जातीय व स्थानिक संकुचितपणा कमी करून त्याचे काही प्रमाणात तरी निधर्मीकरण व्हावे लागते.

राष्ट्रीय पातळीवर हीच प्रक्रिया पुढे चालू राहते. तेथे ही प्रक्रिया यशस्वी ठरेल त्या प्रमाणात सत्तारूढ पक्षास सत्तेची मिरासदारी निर्माण करता येते.

**श्रेष्ठजन निर्मितीचे चार प्रकार :**

**(१) परंपरागत :** खानदान, जातकुळी इत्यादी घटकांच्या आधारे श्रेष्ठजन निर्मिती होत असते. परंतु तिचा प्रभाव विशेषत: स्थानिक पातळीवर पडू शकतो. भारतात अद्याप एकत्र कुटुंब पद्धतीचा प्रभाव असल्यामुळे भाऊबंद, नातेवाईक, आप्तेष्ट इत्यादी 'एकमेका साहय्य करू' अशा प्रकारे पुढे येऊ लागतात. मात्र पुढे येताना केवळ अनुवंशिक घटकांचा अथवा नाते संबंधाचाच प्रभाव पुरेसा होत नाही. भारताच्या

प्रचलित सामाजिक परिस्थितीत श्रेष्ठजन निर्मितीत जातीस अनन्यसाधारण महत्त्व आहे. उदा., महाराष्ट्राच्या लोकसंख्येत मराठा ह्या एकमेव जातीचे प्रमाण शेकडा ४० इतके आहे. त्यामानाने इतर जातींचे प्रमाण शेकडा १ ते ९ इतकेच असल्यामुळे मराठा जातीस निर्विवाद बहुमत–निदान सर्वात मोठ्या एकमेव जातीचे महत्त्व नि:संशय आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, ह्या जातीस ७० ते ७५ टक्के सत्तास्थानांचा लाभ झाला आहे. सारांश भारतीय राजकारणात अर्जित गुणांच्या तुलनेत परंपरागत घटकास अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. काही अपवाद (श्री. वसंतराव नाईक) वगळता महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद प्रामुख्याने मराठा जातीत राहिले.

**(२) अर्जित घटक :** 'सामाजिकरण' होताना अर्जित घटकांचाही परिणाम होतो. विशिष्ट घराण्यातील परंतु सुशिक्षित व्यक्तीस प्राधान्य मिळते. तिची जायदाद व उत्पन्नही जमेस धरण्यात येते. तिने केलेली समाजसेवा उपयोगी पडते. नेतृत्व निवडीत तिचा राजकीय कामगिरीचा आढावा घेतला जातो. तिच्यातील व्यक्तिगत नेतृत्व गुणांची बुज राखली जाते. खानदानीपणाच्या सुपीक भूमीत या इतर अर्जित गुणांचे जणू बिजारोपण होते. इंदिरा गांधीच्या नेतृत्वाच्या बाबतीतही परंपरागत आणि अर्जित घटकांचे मिश्रण आढळते.

**(३) नेमणुकीच्या प्रक्रिया :** ही श्रेष्ठजन निर्मितीची एक महत्त्वाची अवस्था आहे. उदा., १९७७ पूर्वी काँग्रेस पक्षाच्या निवडणुकीचे तिकीट मिळविणे–अगर मिळणे–म्हणजे निवडणुकीची अर्धी लढाई जिंकण्यासारखे होते. ह्या प्रक्रियेचा अर्थ असा की, पूर्वी श्रेष्ठजनांच्या व्यक्तिस मान्यता मिळाली आहे. अगर त्यांनी त्या व्यक्तिचा स्वीकार केला आहे.

मात्र वरून कितीही लोकशाही पद्धतीचे तंत्र अवलंबण्यात आले तरीही ही प्रक्रिया सर्वांस प्रवेश मिळण्याकरिता सारखीच खुली असते. असे समजण्याचे कारण नाही. राजकारण कुशल व्यक्तिस अनेक युक्त्या प्रयुक्त्या लढवून अशी नेमणूक पदरात पाडून घेता येते. वरून दिसावयास अगर तांत्रिक दृष्ट्या अशी नेमणूक होण्यास सर्वांस सारखीच संधी असल्याचे भासविण्यात आले तरी प्रत्यक्ष व्यवहारात ही निवड खुली नसून बंदिस्त असते.

**(४) सत्तेची सोपान परंपरा :** श्रेष्ठजन निर्मितीत हा फार महत्त्वाचा घटक आहे. एखाद्यास पाठिंबा देणारी संरचना कितपत बळकट आहे ही गोष्ट तर महत्त्वाची असतेच परंतु त्याहूनही अधिक महत्त्वाची गोष्ट त्याचे वरिष्ठांशी, उच्च पदस्थ श्रेष्ठजनांशी काय लागेबांधे आहेत ही असते. हे लागेबांधे नाहीसे झाले की तो सत्ता भ्रष्ट झालाच.

कारण उच्च पदस्थांचा आधार हा समर्थकांच्या आधाराहूनही प्रसंगी अधिक मोलाचाच व निर्णायक ठरतो. भारतामध्ये प्रादेशिक पातळीवरील मुख्यमंत्र्याच्या निवडीवर राष्ट्रीय पातळीवरच्या श्रेष्ठजनांचा प्रभाव पडतो तर जिल्हा पातळीवरच्या नेत्यांच्या निवडीवर राज्यपातळीवरील श्रेष्ठजन प्रभाव पाडतात हीच क्रमपरंपरा स्थानिक पातळीवरही दिसून येते. परंतु त्या बरोबर हे ही लक्षात ठेवावयास हवे की, वरिष्ठांशी संबंध हे महत्त्वाचे असले तरी केवळ असे संबंध नेतृत्व निर्माण करू शकत नाहीत आणि निर्माण झाले तरी असे नेतृत्व टिकू शकत नाही. ज्या पातळीवर कार्य करावयाचे त्या पातळीवरील राजकारणांमध्ये त्या नेतृत्वास कितपत पाठिंबा आहे तोही विचारात घेतला पाहिजे.

**३ : २१ : ५ भारतातील श्रेष्ठजन :**

आधुनिक भारताच्या ऐतिहासिक विकासात भारतीय श्रेष्ठजनांचा उदय स्वातंत्र्य आंदोलनातून झाला. 'श्रेष्ठजन' ही संज्ञा सत्ताधारकांकरिताच वापरायचे ठरविल्यास ब्रिटीश सनदी अधिकारी वर्ग हे श्रेष्ठजन असून त्यांचेच सगेसोयरे असलेले ब्रिटीश व ॲग्लो इंडियन व्यापारी हे त्यांच्यातच मोडतात. स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करणारे भारतीय देशभक्त प्रतिश्रेष्ठजन म्हणून संबोधिता येईल सुरुवातीचा 'भिक्षांदेही' पंथ व मवाळांचा कालखंड ओलांडून स्वातंत्र्यचळवळीने लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली लढाऊ पवित्रा घेतला तेव्हा चळवळीचे नेतृत्व बुद्धिनिष्ठ मध्यमवर्गीयांकडे होते. वकील, डॉक्टर, छोटे जमीन मालक, उच्च शिक्षित, शिक्षक इत्यादी व्यवसायातून हे पुढे आलेले होते. मातृभूमिचे प्रेम व स्वातंत्र्य प्रीती ह्या भावनांपासून त्यांना प्रेरणा मिळाली व त्यांच्यात त्यागाची परंपरा निर्माण झाली. चळवळीत प्रत्यक्ष लढाऊ भाग न घेतलेल्या भावनाशील अंत:करणात देखीलही स्वातंत्र्य प्रीतीची ज्योत प्रज्वलीत झाली व तिने इतरांना स्फूर्ती दिली.

लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली स्वदेशीचा पुरस्कार व बहिष्काराचा समावेश चळवळीत होऊ लागला. त्या चळवळीत नि:स्वार्थ सेवा व त्यागमय जीवनावर भर देण्यात यावा हे क्रमप्राप्तच होते. लोकमान्य टिळकांनी जहाल धोरण स्वीकारून राष्ट्रीय सभेस एका लढाऊ संघटनेचे स्वरूप दिले. त्यांच्या पुढे एक पाऊल टाकून महात्मा गांधीनी दडपशाही करणाऱ्या ब्रिटीश सरकारला 'सैतानी' म्हणून संबोधिले व असहकाराची चळवळ सुरू केली. त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सभेने आपल्या ध्येयात, तसेच धोरणात एक महत्त्वाचा फरक घडवून आणला. 'घटनात्मक व सनदशीर' उपायांऐवजी 'शांततामय व अंहिसात्मक' उपाययोजना ठरवून पूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय पुढे ठेवण्यात

आले. लोकमान्यांच्या वेळेचे नेतृत्व बदलून महात्मा गांधीच्या काळी नवे नेतृत्व उदयास आले. ते शहरांपेक्षा ग्रामीण भागात निर्माण झाले.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या नव्या कालखंडातील श्रेष्ठजनांचे स्वरूप यांपेक्षा निराळ्या प्रकारचे होते. पूर्वी स्वत: अगर इतरांनी केलेल्या त्यागाचे बक्षीस पदरात पाडून घेण्याची नवी परंपरा आता उदयास आली व त्या वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्यासाठी अहमहमिका लागली. त्यातच आणखी काही गोष्टींची भर पडून श्रेष्ठजन संरचनेस महत्त्वाची कलाटणी मिळाली.

भारतीय संविधान प्रौढ मतदानाची तरतूद करण्यात आल्यामुळे सत्तेचे पारडे अफाट ग्रामीण जनतेकडे झुकले व त्यांना पूर्वी कधीही नव्हती इतकी राजकीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. भारतीय लोकसंख्येत ग्रामीण जनतेचे प्रमाण शेकडा ७० असल्यामुळे ज्यांना अफाट ग्रामीण जनतेवर नियंत्रण ठेवता येईल त्यांना सत्ता माळ घालणार हे स्पष्ट झाले. नवीन संधीची प्रत्येक वाढती क्षितिजे हेरून आता नव्या वर्गातील लोकांनी राजकीय क्षेत्रात प्रथमच पदार्पण केले. त्यांचा स्वातंत्र्य संघर्ष काळातील त्यागातीच्या परंपरेशी संबंध नव्हता. एका रूपकाच्या आधारे बोलावयाचे तर सत्ता प्रवाहाच्या पाणलोटाच्या क्षेत्रात नव्याने झालेल्या विस्तारामुळे श्रेष्ठजन निर्मितीची नवे द्‌वारे आता खुली झाली. प्रौढ मताधिकाऱ्यांच्या जोडीस पंचायती राज्याच्या स्थापनेमुळे ग्रामीण जनतेच्या सत्तेचे क्षेत्र आणखी रुंदावते या सर्व घटनांचा संकलीत परिणाम असा झाला की, १९४७ नंतर राजकीय क्षेत्रात अशा अनेक लोकांनी नव्याने पदार्पण केले. ज्यांना त्यागाची पूर्व परंपरा नव्हती तर सत्तेची जाणीव मात्र निर्माण झालेली होती एवढेच नव्हे तर काहींना स्वातंत्र्य चळवळींची पार्श्वभूमी नव्हती परंतु राजकीय सत्तेची महत्वाकांक्षा मात्र पुरेपूर होती. मायरॉन विनरने आणखी एका गोष्टीचा उल्लेख केला आहे, मागासलेल्या वर्गांना विशेष सहाय्य करण्याचे धोरण कायदेमंडळांनी अनुसरल्यामुळे अशा वर्गांना आपण संघटित होऊन आपापल्या विशिष्ट मागण्या जोराने पुढे मांडण्यास उत्तेजन मिळाले.

**३ : २१ : ६ भारतीय लोकशाहीतील श्रेष्ठजनांची भूमिका :**

भारतातील श्रेष्ठजन जनताभिमुख आहेत की जनता विरोधी आहेत असा प्रश्न कधीकधी विचारण्यात येतो. ज्या जनतेच्या पाठिंब्याने ते निवडून येतात. तिच्या हिताहिताचा पूर्ण विसर पडून ते स्वार्थरत होऊन राहतात की, आत्मनिरपेक्ष राहून त्या जनतेचे हित साधण्याचा प्रयत्न करतात हा महत्त्वाचा प्रश्न आहे. श्रेष्ठजन ही

संस्था अल्पजन सत्ताक स्वरूपाची आहे. हे खरे असले तरी तिचे ते स्वरूप कमी होत गेले पाहिजे. त्यासाठी तिच्यात स्वयंनियामक, स्वहितनिरपेक्ष स्वरूप निर्माण होणे इष्ट व आवश्यक आहे. हे इष्ट व आवश्यक असले तरी शक्य किंबहुना संभाव्य आहे की नाही यावर सर्व अवलंबून आहे. जर भारतातील श्रेष्ठजन आपली राजकीय सत्ता लोककल्याणासाठी वापरतील तर हे शक्य आहे. तसे झाल्यास एरव्ही त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या प्रति श्रेष्ठजनांकडून देखील त्यांना सामाजिक मान्यता प्राप्त होऊ शकेल. तसे होण्यास त्यांची लोकशाही मूल्य स्वीकारली पाहिजेत. मात्र, सध्याचे सत्तापिपासू श्रेष्ठजन पाहिले म्हणजे देशाच्या भवितव्याविषयी शंका निर्माण झाल्याखेरीज राहत नाही.

• • •

## संदर्भसूची


१. **Morris Jones, W. H.,** Government and politics of India, 1982, IBH, New Delhi, P. 4

२. **Lasswell Herald,** Quoted Johari J. C., 1986, Sterling Publishers, New Delhi, P. 372.

३. **Lipset S. M,** Politics and the Social Sciences, 1969, Oxford University Press, New York, P. 68

४. **सुमंत यशवंत आणि पुंडे दत्तात्रय,** महाराष्ट्रातील जातिसंस्था विषयक विचार, १९९४, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. ४.

५. **पलशीकर सुहास,** जात आणि महाराष्ट्रातील सत्ताकारण, २००३, सुगावर प्रकाशन, पुणे, पृ. २३.

६. **काळदाते सुधा,** भारतीय समाजरचना, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, भारत मृद्रक आणि प्रकाशक लि. औरंगाबाद, पृ. १६५.

७. कित्ता पृ. १६७ ते १७२.

८. **सुमंत यशंवत, पुंडे दत्तात्रय,** महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार पृ. ९.

९. कित्ता पृ. ९.

१०. कित्ता पृ. १०.

११. कित्ता पृ. १४.

१२. कित्ता पृ. १९८.

१३. कित्ता पृ. ८२.

१४. कित्ता पृ. १५.

१५. कित्ता पृ. ८.

१६. कित्ता पृ. ८.

१७. कित्ता पृ. १६.

१८. कित्ता पृ. १७.

१९. कित्ता पृ. १७.

२०. कित्ता पृ. १०.
२१. कित्ता पृ. १४.
२२. कित्ता पृ. १९८.
२३. कित्ता पृ. ८२.
२४. कित्ता पृ. १५.
२५. कित्ता पृ. ८.
२६. कित्ता पृ. ८.
२७. कित्ता पृ. १६.
२८. कित्ता पृ. १६.
२९. कित्ता पृ. १७.
३०. **भोळे भा. ल.** महात्मा जोतिराव फुले : वारसा आणि वसा. साकेत प्रकाशन, प्रा. लि., औरंगाबाद, दुसरी आवृत्ती–२००१, पृ. २९
३१. कित्ता पृ. २९.
३२. कित्ता पृ. १६.
३३. **लांजेकर ज्योती,** भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन पुणे–३०, प्रथम आवृत्ती २००५, पृ. १३९.
३४. कित्ता पृ. १५२.
३५. **ठोंबरे तानाजी,** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी सप्टेंबर १९९९.
३६. **सुमंत यशवंत, पुंडे दत्तात्रय,** महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, पृ. १९.
३७. **पवार दया,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ साहित्य संस्कृती मंडळ महाराष्ट्र राज्य, पृ. १९.
३८. **सुमंत यशवंत, पुंडे दत्तात्रय,** महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, पृ. २०.
३९. **पाटील निरंजन,** सम्राट लेख, संपादक – बबन कांबळे, डिसेंबर २००५.
४०. कित्ता सम्राट लेख.
४१. **भोसले एस्. एन्.,** यांचे व्याख्यान, राजश्री शाहू सामाजिक धारणा आणि शैक्षणिक कार्य U. G. C. Academic Staff College, Aurangabad University 54th Orientation Course, May 2004.

४२. **पानसरे गोविंद,** राजश्री शाहू, सत्ता आणि वारसा. प्रबोधन प्रकाशन, इंचलकरंजी, डिसेंबर १९९७, पृ. ४२.

४३. **भोसले एस्. एन्.,** यांचे व्याख्यान, राजश्री शाहू सामाजिक धारणा आणि शैक्षणिक कार्य U. G. C. Academic Staff College, Aurangabad University.

४४. **सुमंत यशवंत, पुंडे दत्तात्रय,** महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, पृ. २२.

४५. कित्ता पृ. २३.

४६. कित्ता पृ. २२.

४७. कित्ता पृ. २४.

४८. कित्ता पृ. २५.

४९. पळशीकर सुहास, समकालीन भारतीय राजकारण काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, २००४, प्रतिमा प्रकाशन, पुणे–३०, पृ. २१.

५०. कित्ता पृ. २२.

५१. कित्ता पृ. ५२.

५२. कित्ता पृ. ५२.

५३. कित्ता पृ. ५३.

५४. कित्ता पृ. १०५–१०६.

५५. कित्ता पृ. १०६.

५६. जैन अशोक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,शेठ पब्लि. प्रा. लि. मुंबई–०४, पृ. १८९ ते १९१.

५७. कित्ता पृ. १९३.

५८. पळशीकर सुहास, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, २००३. सुगावा प्रकाशन, पुणे–३०, पृ. १३.

५९. कित्ता पृ. १४.

६०. कित्ता पृ. १४.

६१. कित्ता पृ. १५.

६२. जैन अशोक, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,शेठ पब्लि. प्रा. लि. मुंबई–०४, पृ. २३६.

६३. कित्ता पृ. २३८.

६४. कित्ता पृ. २४३.

६५. **पळशीकर सुहास,** जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, पृ. ३१.

६६. कित्ता पृ. ३२.

६७. कित्ता पृ. ३५.

६८. कित्ता पृ. ४२.

६९. कित्ता पृ. ४४.

७०. **भोळे भा. ल.,** राजकीय सिद्धांत व विश्लेषण, २००२, पिंपळापुरे, नागपूर, पृ. १४५.

७१. कित्ता पृ. ४–५.

७२. **गर्दे वि. का. आणि बाचल वि. मा.,** १९७८ आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेटल प्रकाशन, विजयानगर, पुणे–३०, पृ. १२६.

७३. कित्ता पृ. १२२.

७४. **भोळे भा. ल.,** महात्मा जोतीराव फुले, वारसा आणि वसा. पृ. १७२.

७५. कित्ता पृ. १७२.

७६. **गर्दे वि. का. आणि वि. मा. बाचल,** आधुनिक राजकीय विश्लेषण, पृ. १२८.

७७. कित्ता पृ. १३५.

७८. कित्ता पृ. १३५, १३६.

७९. कित्ता पृ. १५३, १५४.

* * *

# ३. सुक्ष्मस्तरीय राजकीय प्रक्रिया
## (POLITICAL PROLESS AT MICRO LEVEL)

**२.१ प्रास्ताविक :**

भारतीय राजकारणाच्या अभ्यासकांच्या मते राज्य स्तरावरील राजकीय प्रक्रिया ही अखिल भारतीय स्तरावरील राजकीय प्रक्रियेची प्रतिकृती (Reflica) किंवा प्रतिबिंब (Reflection) असते. त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावरील राजकीय प्रक्रिया ही राज्य स्तरीय राजकीय प्रक्रियेची प्रतिकृती किंवा प्रतिबिंब असते. या दोन स्तरावरील प्रक्रियेत साम्यस्थले असली, तरी त्यात तफावतही दिसून येते. भारतीय राज्यघटना हा राज्य स्तरीय, राजकीय प्रक्रियेचा मूलाधार आहे, तर पंचायत राज संस्थाविषयीचे १९५८ व १९६१ चे कायदे हे ग्रामीण राजकीय प्रक्रियेचा मूलाधार आहे. राज्यस्तरावरील राजकारणावर 'शुगर लॉबी' चे वर्चस्व हे राजकीय वास्तव्य आहे, तर स्थानिक स्तरावरील राजकारणात सहकारी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांचे वर्चस्व हे राजकीय वास्तव्य आहे.

पंचायती राज संस्था महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर अस्तित्वात आल्या, तर सहकारी संस्थांचा व्यापक प्रसार महाराष्ट्र राज्यांच्या स्थापनेनंतर झाला. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या यंत्रणा, वास्तव अर्थाने ग्रामीण राजकारणाची सत्ताकेंद्रे बनली आहेत. सुक्ष्मस्तरीय राजकीय प्रक्रियेच्या विश्लेषणासाठी पंचायतीराज व्यवस्था आणि सहकारी संस्थांचे विवरण सदर प्रकरणात करण्यात आले आहे.

**३.२ पंचायती राज : उद्गम आणि विकास :**

'पंचायत' हा खूप जुना व अर्थपूर्ण शब्द आहे असे महात्मा गांधीजींनी म्हटलेले आहे. कारण या संकल्पनेत विकेंद्रीत लोकशाहीची व सत्तेची कल्पना अंतर्भूत आहे. प्राचीन काळी 'पंचायत' हे सामाजिक जीवनाचे अविभाज्य अंग मानले जात होते. राधाकमल मुखर्जी यांच्या मते प्राचीन भारतात राज्य सरकार व ग्रामपंचायतीसारख्या स्थानिक संस्था हे दोन्ही घटक एकमेकांपासून अलिप्त व काही अंशी स्वतंत्र होते. राष्ट्रीय व सामूहिक जीवन व कार्य यांची स्वावलंबी केंद्रे म्हणून कार्य करीत. हे घटक स्वतंत्र असून त्यांची रचना वेगवेगळी होती. तसेच त्यांच्या प्रगतीचे व उत्क्रांतीचे मार्ग वेगवेगळे होते.[२]

प्राचीन भारतामध्ये पंचायती काम करीत असल्याचे उल्लेख पाहवयास मिळतात.

सभा आणि समित्या या ग्राम पातळीवरील दोन महत्वाच्या संस्था होत्या. या ग्राम सभांच्यामध्ये त्या गावातील जेष्ठ नागरिकांचा समावेश असे आणि त्या ठिकाणी गावाच्या कल्याणाच्या योजना आखून त्या प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला जात असे. प्राचीन ग्राम व्यवस्थेविषयी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात माहिती दिली आहे. नेहरू लिहितात, ''ही व्यवस्था स्वयंपूर्ण आणि स्वनियंत्रित होती. गावचा सर्व कारभार महसूल, संरक्षण, न्यायदान, हिशेब व्यवस्था अशी सर्व कामे लोकांनी निवडून दिलेल्या गावचे पंचायतीचे पंच चालवित होते. दळणवळणाची साधने फारच कमी होती. पण तत्कालीन अर्थाने आर्थिक दृष्ट्या गावे स्वयंपूर्ण होती. शेती शिवाय गावात बारा बलुती, अठरा अलुती या नावाने सुमारे ३० प्रकारचे शेतीपूरक व ग्रामीण जीवनाच्या दैनंदिन गरजा भागविणारे विविध प्रकारचे उद्योग व्यवसाय चालत होते. गावाच्या बहुतेक सर्व गरजा शेती व शेतीपूरक व्यवसाय यातूनच भागविल्या जात होत्या.''[३]

**२.१ ऐतिहासिक पार्श्वभूमी :** वैदिक कालखंडामध्ये खेडेगावाचा कारभार ग्रामसभा पाहत होती. ग्रामसेवेमध्ये गावातील प्रमुख व्यक्ती होत्या. गावातील लोक एकत्र बसून गावाबद्दल निर्णय घेत असत. गावाच्या प्रमुखाला ग्रामिणी हे नावं होते. ग्रामसभा आणि ग्रामिणी यांचा उल्लेख रामायण आणि महाभारत ह्या ग्रंथामध्ये सुद्धा सापडतो. ग्रामपंचायतीची रचना आणि तिच्या कार्याबद्दलचा उल्लेख दहाव्या शतकातील शुक्र नीतीसार या ग्रंथामध्ये आढळतो. या ग्रंथातील वर्णनानुसार ग्रामपंचायतीचे सभासद जनतेकडून निवडले जात होते हे स्पष्ट होते. या सभासदांना न्यायदान करणे, गावातील सार्वजनिक जीवन सुरळीत राखणे हे अधिकार होते. प्रत्येक गावात एक ग्रामपंचायत होती. असा उल्लेख मनुस्मृती आणि नारदस्मृती ह्या ग्रंथात आढळतो. त्याचबरोबर गावातील पंचायतीला न्यायदानाचा अधिकार राजसत्तेच्या मान्यतेने मिळत होता असेही दिसते. गाव हे सत्तेचे केंद्र आहे असा उल्लेख बुद्ध काळातील जातक कथेमध्ये आढळतो. ही गावे स्वयंपूर्ण होती. गावाचा प्रमुख असणारा ग्रामीण जनतेच्या प्रतिनिधीच्या सल्ल्याने गावाचा कारभार पाहत होता. पूर्वीच्या काळी गाव हे स्वयंशासित होते. असा उल्लेख दक्षिण भारतातील शिलालेखावर आढळतो. ही गावे स्वयंपूर्ण होती. गावाचा प्रमुख असणारा ग्रामीण जनतेच्या प्रतिनिधीच्या सल्ल्याने गावाचा कारभार पाहत होता. पूर्वीच्या काळी गाव हे स्वयंशासित होते. असा उल्लेख दक्षिण भारतातील शिलालेखावर आढळतो. गावाचा कारभार करणारी पंचायत सत्तेचे केंद्र होती. ह्या केंद्राला सरकारला संरक्षणासाठी आवश्यक असणारा पैसा पुरविला म्हणजे सरकारचे नियंत्रण सैल होत

होते. राज्य सरकार आणि स्थानिक संस्था हे दोन्हीही घटक एकमेकांपासून अलिप्त परंतु काही प्रमाणात स्वतंत्र आणि राष्ट्रीय जीवन व सामूहिक जीवनाची स्वयंपूर्ण केंद्रे होती. दोन्हीही घटकांच्या प्रगतीचे मार्ग वेगवेगळे होते. ग्रामपंचायतीला न्यायदानाचे आणि प्रशासनाचे अधिकार होते. कौटिल्याच्या अर्थशास्त्रात सुद्धा ग्रामपंचायतीचे महत्व स्पष्ट केले आहेत. संरक्षणाकरिता राजाने गुप्तपोलिसांमार्फत गावाची माहिती मिळवावी असे कौटिल्याने सांगितले आहे. परंतु राजा हा गावच्या रोजच्या कारभारामध्ये सहसा हस्तक्षेप करत नव्हता.[४]

मौर्याच्या कालखंडात ग्रामीण शासन संस्थांचा विकास झालेला होता. सध्याच्या महाराष्ट्र विभागात, गुजरात, आंध्र, पूर्वीचा भोज आणि कंबोज अशा ठिकाणी ग्राम पंचायतीचा विकास झालेला होता. हे सापडलेल्या शिलालेखावरून स्पष्ट होते. तसेच त्या शासन संस्था विकसित, स्वायत्त आणि स्वयंपूर्ण होत्या. राजसत्ता पंचायतीच्या कामकाजात विनाकारण ढवळाढवळ करीत नव्हती. ग्रामपंचायत राजनैतिक सामाजिक तसेच धार्मिक क्षेत्रात आपले विचार स्पष्ट मांडत होती. न्यायदान करून दंड देण्याचा अधिकार पंचायतीकडे होता. कर वसूल करणे आणि जमिनीचे वाटप करणे ही कामे पंचायतीकडे होती. गावाच्या संरक्षणासाठी जबाबदारी केंद्रशासनावर होती. परंतु ह्या कालखंडात वारंवार लढाई होत असे. त्यामुळे प्रत्येक गावातील नागरिक आणि त्यांच्या मालमत्तेचे रक्षण करण्याची जबाबदारी ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीवर होती. गावाभोवती तटबंदी होती आणि आत जाण्याकरिता एकच रस्ता होता. बऱ्याच ठिकाणी ग्रामप्रवेशासाठी एखादा दरवाजा असे म्हणजे ग्रामसभा ही संरक्षण करत होती हे समजते. संकटाच्या वेळी ग्रामसंस्था आपली शस्त्रे तयार ठेवत होती. त्याचप्रमाणे आपल्या क्षेत्राभोवती किल्लेबंदी केलेली असे एखाद्या शत्रूचे सैन्य गावाजवळून जात असेल तर त्याला विरोध केला जात नसे परंतु जर त्या शत्रू सैन्याने कळ काढली तर त्या शत्रू सैन्याबरोबर मुकाबला केला जाती. यासाठी साधन सामग्री जमा केलेली असे. ग्रामप्रमुख हा आपल्या जनतेचे चोरापासून संरक्षण करीत होता. गावकरी एकत्र पैसे गोळा करून सार्वजनिक काम करीत असत.[५]

मध्ययुगीन भारतातील मोगल साम्राज्याच्या प्रशासनाची सुभा (प्रांत) आणि परगणा (जिल्हा) या घटकांत विभागणी करण्यात आली होती. प्रत्येक परगण्यात ६० ते १०० गावे असत. या काळातही गाव–खेडी स्वयंपूर्ण होती आणि गावाच्या कारभाराची जबाबदारी पंचायतकडे होती.

प्रत्येक गावात मुकादम (पाटील), पटवारी (तलाठी), चौधरी आणि चौकीदार

हे सरकारी कर्मचारी प्रशासकीय कार्ये पार पाडत असत. ग्राम पंचायत न्यायदान, पाणीपुरवठा आणि गावाची स्वच्छता ही कामे करत असत. पटवारी शेतसारा गोळा करत असे आणि शासकीय कोषागारात तो जमा करत असत. गावातील लोकांकडून गोळा करण्यात आलेला कर आणि वर्गणीतून सार्वजनिक स्वरूपाची कामे केली जात असत. करवसूलीचे कार्य शासकीय अधिकारी व सरंजामदारांकडे गेल्याने ग्राम पंचायतीचे महत्व कमी झाले. मोगल सरदार–सरंजामदारांनी स्वत:च्या वैयक्तिक फायद्यासाठी पंचायतीचे अधिकार काही प्रमाणात स्वत:कडे घेतल्याने पंचायतीचे महत्व कमी झाले.[६]

भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर ग्रामपातळीवरील व्यापारी धोरणांना आवश्यक असणारी केंद्रे शहरी भागात कमी होऊ लागली. वसाहतवादी अर्थव्यवस्था उभी राहू लागली. शहरी भागांमध्ये कर वसुली करणे सोयीचे व्हावे यासाठी ब्रिटीश शासन नियुक्त सदस्यांची महामंडळे निर्माण केली होती. १८७० मध्ये लॉर्ड मेयोने विकेंद्रीत मंडळाची कल्पना मांडली. महसूल वाढावा आणि त्याची वेळच्या वेळी वसुली व्हावी हा त्या मागचा उद्देश होता.

ब्रिटिश कालखंडात स्थानिक स्वराज्य संस्थांना मूर्त रूप येण्यास लॉर्ड रिपन हे व्हाईसरॉय कारणीभूत ठरले. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापनेस आणि कार्यास १८८२ ला चालना मिळाली. लॉर्ड रिपन यांच्या काळात १८ मे १८८२ ला स्थानिक स्वराज्य संस्था निर्मितीचा ठराव मान्य झाला. अशा संस्थांमध्ये बिनसरकारी लोकांची संख्या जास्त असेल, असे सदस्य लोकांनी निवडून दिलेले असतील, बिनसरकारी सदस्यांपैकी अध्यक्षही असेल अशा तरतूदी रिपन योजनेत होत्या. त्यामुळे भारतामधील स्थानिक लोकशाहीच्या इतिहासातील मॅग्ना चार्टा म्हणून रिपन ठरावाकडे पाहिले जाते. अर्थात रिपन योजनेचे अंतिम स्वरूप जेव्हा पुढे आले आणि १८८४ मध्ये प्रत्यक्षात त्याची कार्यवाही सुरू झाली त्यावेळी मात्र लोकांचा भ्रमनिरास झाला. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेचे घटक म्हणून जिल्हा आणि तालुका बोर्डाची स्थापना झाली आणि त्याचे अध्यक्ष म्हणून कलेक्टर, प्रांत, मामलेदार यासारखे सरकारी अधिकारी नेमण्यात आले. शासन नियुक्त सदस्यांची संख्याही मोठी होती. बिनसरकारी सदस्यांची निवड करण्याचे अधिकार ही जमीनदार, इनामदार या सारख्या वरिष्ठ वर्गास देण्यात आले होते. किमान ४८ रुपयांपेक्षा जास्त जमीन महसूल भरणारे लोक मतदानास पात्र समजले जायचे.[८]

लॉर्ड रिपन यांच्या ठरावानंतर १९०७ मध्ये विकेंद्रीकरणाच्या संदर्भात विचार

करण्यासाठी रॉयल कमिशनची नेमणूक करण्यात आली. या समितीमध्ये पाच सदस्य होते. त्यापैकी रमेशचंद्र दत्त हे एकमेव भारतीय प्रतिनिधी होते. स्थानिक पातळीवरील प्रशासनात लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी विकेंद्रीकरणाची आवश्यकता असल्याचे मत या कमिशनने नोंदविले तसेच लॉर्ड रिपन यांच्या योजनेप्रमाणे रॉयल कमिशनची योजना ही फक्त कागदावर राहिली. त्यानंतर १९१५ च्या लॉरेन्स कमिटीने नियुक्त आणि निवडून येणाऱ्या प्रतिनिधींची संख्या समान केली, तर १९१८ च्या मॉटफोर्ड अहवालाने नियुक्त सदस्यांची संख्या एक चतुर्थांश एवढ्यावर आणली. बोर्डाचा अध्यक्ष बिनसरकारी सदस्य असावा यासही त्या अहवालाने मान्यता दिली. १९३४ साली प्रथमत: स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य होण्याबाबतची स्त्रियांची अपात्रता काढून टाकण्यात आली. १९३५ च्या भारत सरकार कायद्याने प्रांतिक सरकारच कामाच्या यादीत एक हस्तांतरीत विषय म्हणून स्थानिक स्वराज्यास आवश्यक असलेले अधिकार देण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार प्रथमच १९३९ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा विकास मंडळ स्थापन करण्यात आले. १९३९ ला जरी लोक नियुक्त काँग्रेस सरकारनी प्रांतीय सरकारचे राजीनामे दिले, तरी त्यावेळची स्थानिक स्वराज्य व्यवस्था १९४७ पर्यंत अस्तित्वात होती.''[९]

राष्ट्रीय काँग्रेसच्या विषय पत्रिकेवर स्थानिक स्वराज्य या विषयास प्राधान्य होते. १९०६ च्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात अध्यक्ष दादाभाई नौरोजी यांनी 'स्थानिक स्वराज्य' हे राजकीय ध्येय असल्याचे जाहीर केले होते. १९१३ च्या कराची काँग्रेसमध्ये स्थानिक स्वराज्याच्या दिशेने ब्रिटीशांच्या उदासीनतेवर टीका केली होती, तर १९१७ च्या कोलकत्ता काँग्रेसमध्ये अध्यक्ष डॉ. ॲनीबेझंट यांनी विकेंद्रीकरणाबाबतच्या रॉयल कमिशनच्या अहवालावर काहीही कार्यवाही न केल्याबद्दल अकार्यक्षम नोकरशाहीस दोषी ठरविले. राष्ट्रीय काँग्रेसमध्ये महात्मा गांधीजींनी नेहमीच ग्रामस्वराज्याचा आग्रह धरलेला होता. त्यासाठी ग्रामपंचायतीच्या स्थापनेवर आणि त्यांच्या स्वायत्ततेच्या संदर्भात त्यांनी आपली भूमिका वारंवार स्पष्ट केली होती.''[१०]

इंग्रज आमदानीत १९३८ साली औंध संस्थानात एक लक्षवेधी प्रयोग करण्यात आला. तिथले संस्थानिक पंतप्रतिनिधी यांनी तो प्रयोग केला. म. गांधीनीही त्यांची प्रशंसा केली होती. त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था औध संस्थानात सुरू केल्या. ग्रामपंचायत, तालुका पंचायत व मध्यवर्ती कौन्सिल प्रौढ मतदानावर निवडलेले प्रत्येक गावात पाच पंच होते. त्यापैकी एक अध्यक्ष, सर्व गावांच्या अध्यक्षांची मिळून तालुका

पंचायत होती. दर तीन वर्षांनी प्रत्येक तालुका पंचायतीने आपल्यातून निवडलेले दोन प्रतिनिधी व तालुका पंचायतीचा सदस्य नसलेला एक प्रतिनिधी असे तीन सदस्य मध्यवर्ती कौन्सिलवर पाठवायचे या मध्यवर्ती कौन्सिलवरील एकास, औंधचे राजे, मंत्रिमंडळ बनविण्यास सांगीत हे मंत्रिमंडळ तालुका मध्यवर्ती कौन्सिलला जबाबदार होते. सर्व अधिकार मध्यवर्ती कौन्सिलला दिले होते. गाव पंचायतीचे अंदाजपत्रक, तालुका पंचायतीकडे मंजुरीसाठी, तर तालुका पंचायतीचे मध्यवर्ती कौन्सिलकडे अशी व्यवस्था होती. शाळा, दवाखाने यासाठी विशेष जादा तरतूदी होत्या गावपंचायतीच्या कामात तालुका पंचायतीचा हस्तक्षेप नसे, प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत होते, गावपंचायतीकडे शिक्षण, समाज शिक्षण, सामाजिक न्याय, पाणी पुरवठा, ग्रामीण सफाई, रस्ते, गटारे, पूल बांधणी, सार्वजनिक इमारतींची देखभाल, दिवाबत्ती, आरोग्य, बाजार नियंत्रण, बेकारांना रोजगार देणे इ. कामे होती, मतदारांना आपल्या प्रतिनिधीस परत बोलावण्याचे अधिकार होते.''[११]

**२.२ स्वातंत्र्योत्तर कालखंड :**

(१) भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामपंचायतींना पुन्हा बळकटी आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. घटनेच्या ४० व्या कलमाप्रमाणे ''राज्यसरकारने ग्रामपंचायतींना संघटित करण्याकरिता तसेच त्यांना स्थानिक शासनाचा एक घटक या दृष्टिने कार्य करण्याकरिता आवश्यक व सहाय्यभूत ठरतील असे अधिकार व सत्ता प्रधान करण्यासाठी पावले उचलावित असे निर्देश दिले.

(२) अधिक धान्य पिकवा या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी १९५१ साली भारत सरकारने श्री. व्ही. टी. कृष्णमाचारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. कृषी विकासाबरोबरच ग्रामीण विकासासंबंधी ठोस उपाययोजना सुचविण्याची कामगिरी या समितीकडे सोपविण्यात आली होती. या समितीने आपल्या अहवालात भारत सरकारला खालील शिफारशी केल्या :

(i) ग्रामीण भागात अस्तित्वात असलेल्या महसूल प्रशासन यंत्रणेकडे असलेल्या कामाचे ओझे प्रचंड असल्याने या यंत्रणेकडे विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपविली जाऊ नये.

(ii) महसूल प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा दृष्टिकोन लोकांवर अविश्वास

दाखविणारा, म्हणजेच लोकभिमुख नाही. विकास कार्याविषयी आस्था नसणाऱ्या या यंत्रणेकडून विकास कार्यक्रमांची योग्यरीत्या अंमलबजावणी केली जाणार नाही.

(iii) विकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणीची जबाबदारी अस्तित्वात असलेल्या महसूल प्रशासनाकडे न सोपवता, त्यासाठी स्वतंत्र विकास प्रशासकीय यंत्रणा स्थापन करण्यात यावी.

(iv) देशाच्या ग्रामीण भागाची ५०११ विकासगटांत विभागणी करण्यात यावी. प्रत्येक विकास गटातील लोकसंख्या ३५,००० ते ५०,००० असावी. त्यात ६० ते ७५ गावांचा समावेश असावा.

(v) प्रत्येक विकास गटासाठी एक गट विकास अधिकारी, चार विस्तार सेवा अधिकारी आणि सहा ते आठ ग्रामसेवकांची नेमणूक करण्यात यावी. या विकास यंत्रणेकडे ग्रामीण विकासाच्या कार्यक्रमाच्या कार्यवाहीची जबाबदारी सोपवण्यात यावी.

(vi) या यंत्रणेने स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्था, नेतृत्व आणि लोकांच्या सक्रिय सहभागाद्वारे ग्रामिण विकासाच्या उपक्रमांची अंमलबजावणी करावी.

(३) भारत सरकारने कृष्णमाचारी समितीच्या शिफारशी स्वीकारल्या. त्यावर आधारित सामूहिक विकास कार्यक्रमाचा पहिल्या पंचवार्षिक योजनेत समावेश करण्यात आला आणि त्यासाठी ९० कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली. २ ऑक्टोबर १९५२ रोजी या कार्यक्रमाची सुरूवात देशातील निवडक ५५ प्रकल्पांतील १६५ विकास गटांमध्ये करण्यात आली. २ ऑक्टोबर १९५३ रोजी त्यास पूरक ''राष्ट्रीय विस्तार कार्यक्रम'' सुरू करण्यात आला. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर सर्व ५०११ विकास गटांमध्ये विकास प्रशासनाची यंत्रणा स्थापन करण्यात आली आणि तिच्याकडे या महत्वकांक्षी बहुलक्ष्मी कार्यक्रमाच्या कार्यवाहीची जबाबदारी सोपवण्यात आली.

(४) वरील दोन्ही कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी नियोजन मंडळाच्या प्रकल्प समितीने १९५७ मध्ये स्व. बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली. या समितीने खालील गोष्टीच्या अनुषंगाने अभ्यास करावयाची जबाबदारी मेहता समितीवर सोपविली.

या अभ्यासगटाची (समितीची) कार्यकक्षा खालीलप्रमाणे होती :

१. सामूहिक विकास कार्यक्रम तसेच राष्ट्रीय विस्तार योजनेच्या कार्यवाहीचा अभ्यास

करणे. शेतीच्या उत्पादन वाढीकरिता हाती घेतलेल्या कार्यक्रमांची पाहणी करणे. केंद्र आणि राज्य सरकारमधील तसेच विविध खात्यातील सुसंवादांचा अभ्यास करणे.

२. विकासाचा वेग वाढवून कार्य पार पाडण्याकरिता कार्यपद्धती आणि संघटन यांचा अभ्यास करणे यासाठी आवश्यक असणाऱ्या नोकर वर्गाच्या प्रशिक्षणाचा अभ्यास करून आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी संस्था निर्माण करण्याबद्दल अभ्यास करणे.

३. वेगवेगळ्या विकास योजनांचे यश अपयश याचा अहवाल देण्याच्या पद्धतीचा विचार करून योजनांच्या खर्चात काटकसर करण्याबद्दल शिफारस करणे.

४. जिल्हा आणि तालुका तसचे त्या खालच्या स्तरावरील सत्तेचे विकेंद्रीकरण टप्प्याटप्प्याने कसे करता येईल या बद्दल शिफारस करणे.''[१२]

मेहता समितीने आपला अहवाल नियोजन मंडळाच्या प्रकल्प समितीकडे २४ नोव्हेंबर १९५७ रोजी सादर केला. समितीने सामूहिक विकास कार्यक्रम संपूर्णत: अयशस्वी झाल्याचे नमूद केले. समितीने असे प्रतिपादन केले की, स्थानिक हितसंबंधाकडे लक्ष देणारी, स्थानिक लोकांच्या इच्छेनुसार व गरजेप्रमाणे पैसा खर्च होतो किंवा नाही हे पाहणारे जनतेची प्रातिनिधिक लोकशाही संस्था निर्माण झाल्याशिवाय विकास कार्यक्रमात सहभागी होण्यास स्थानिक जनतेला उत्साह वाटणार नाही. राज्य सरकार पेक्षा खालच्या पातळीवर जबाबदारीचे व सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे.[१३]

समितीने आपल्या अहवालात लोकशाही विकेंद्रीकरणाच्या त्रिस्तरीय यंत्रणेची शिफारस केली. त्या अंतर्गत सर्वात वरच्या स्तरावर जिल्हा परिषद नंतरच्या मधल्या स्तरावर पंचायत समिती आणि कनिष्ठ, म्हणजेच तिसऱ्या स्तरावर ग्रामपंचायत यांचा समावेश केला. ग्रामपंचायतीकडे, पंचायत समितीकडे स्थानिक प्रश्नाचे काम आणि अधिकार द्यावा असेही सुचविले. राज्य सरकारने आपल्या विभागातील जिल्हा स्तरावरील संस्थाकडे सत्ता द्यावी व राज्य सरकारने देखरेख ठेवावी व मार्गदर्शन करावे व वरिष्ठ पातळीवरून नियोजन करावे. या संस्थांना गरजेनुसार अधिक पैसा उपलब्ध करून द्यावा. जिल्हा स्तरावरील यंत्रणेने विकासगट स्तरावर असणाऱ्या संस्थांच्या कार्यामध्ये सुसूत्रता आणून त्यांना मार्गदर्शन करावे. प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींनी करावी. मधल्यास्तरावरील पंचायत

समितीला शासकीय संस्थेचा दर्जा द्यावा. विकासगटाचे कार्यक्षेत्र स्थानिक स्वराज्याचा प्रभावी घटक अशा पातळीवर पंचायत समितीची स्थापना करावी. हे कार्यक्षेत्र प्रमाणापेक्षा जास्त मोठे असेल तर जनता त्या संस्थेच्या कामामध्ये रस दाखविणार नाही. तसेच कार्यक्षेत्र फार लहान असेल तर ती संस्था कार्यक्षम व स्वयंपूर्ण होणार नाही. तसेच लहान असणारी संस्था काटकसरीला बाधक ठरेल. जिल्हा विकासाचा खूप मोठा गट ठरेल. तर एकच गाव हे फारच लहान कार्यक्षेत्र ठरेल.''[१४]

स्व. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसी भारत सरकारने तसेच राष्ट्रीय विकास परिषद आणि राष्ट्रीय स्थानिक शासन परिषद यांनी १९५८ साली स्वीकारल्या. त्या शिफारसीची कार्यवाही करावी म्हणून राज्य सरकारांना योग्य त्या सूचना दिल्या. त्यानुसार राजस्थान राज्याने सर्वप्रथम २ ऑक्टोबर १९५८ मध्ये पंचायत राज्याची स्थापना केली. पंचायत राज नामकरण तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले. त्यानंतर आंध्रप्रदेशात १ नोव्हेंबर १९५९ रोजी पंचायती राजची स्थापना करण्यात आली. त्यानंतर देशातील इतर सर्व राज्यात व केंद्रशासीत प्रदेशात पंचायतीराज व्यवस्था स्थापन करण्यात आली.

**३.३ महाराष्ट्रातील पंचायती राज व्यवस्था :**

मेहता समितीच्या शिफारसी स्वीकृत करून, लोकशाही विकेंद्रीकरण करण्याची शिफारस भारत सरकारने १९५८ साली केली होती. याच वेळी महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र समितीचे आंदोलन निर्णायक टप्प्यात पोहोचलेले होते. त्यामुळे मुंबई राज्याचा पंचायत राज व्यवस्तेची स्थापना करण्याचा निर्णय लांबणीवर टाकला. याच दरम्यान संपूर्ण राज्यात ग्रामीण स्थानिक शासनात एकवाक्यता असावी या उद्देशाने १९५८ साली मुंबई ग्रामपंचायत अधिनियम पारित करण्यात आला. १ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर, १९६२ साली पंचायती राज व्यवस्था कार्यान्वित झाली.

**३.१ मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ :**

१९५६ साली राज्य पुनर्रचनेनुसार विशाल मुबई राज्याची निर्मिती झाली या विशाल मुंबई राज्यात पूर्वीच्या मध्यप्रांतातील विदर्भातील मराठी भाषिक प्रदेशातील पाच जिल्हे समाविष्ट करण्यात आले. विदर्भ व मराठवाड्यातील मराठी भाषिक प्रदेश महाराष्ट्र राज्यात समाविष्ट केल्यावर या राज्यात त्यावेळी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,

१९३३ हैद्राबाद ग्रामपंचायत अधिनियम १९५६, आणि मध्यप्रांत व वऱ्हाड ग्रामपंचायत अधिनियम असे तीन ग्रामपंचायत कायदे अस्तित्वात होते. १९५८ साली या तिन्ही कायद्यांचे एकत्रीकरण करून, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ हा कायदा संमत करण्यात आला. १ जून १९५९ पासून या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली त्यानंतर १ मे १९६० साली विशाल मुंबई राज्याचे विभाजन होऊन मराठी भाषिकांचे महाराष्ट्र व गुजराथी भाषिकांचे गुजराथ या राज्याची निर्मिती करण्यात आली. महाराष्ट्र राज्यातील ग्रामपंचायतीचे नियमन आज मुंबई राज्याच्या विधी मंडळाने संमत केलेल्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ अन्वये केले जात आहे. या कायद्यातील तरतूदी खालीलप्रमाणे आहेत.

**ग्राम स्तरावरील यंत्रणा :**

त्रिस्तरीय पंचायती राजव्यवस्थेतील सर्वात कनिष्ठ स्तर ग्रामपातळीवर आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे आहे :

**१. ग्रामसभा :**

ग्रामसभा हे खेडेगावातील सर्व मतदारांची सामान्य सभा असते. आसाम, उत्तर प्रदेश व दिल्ली येथे तिला 'गावसभा' असे म्हणतात. तर बिहारमध्ये 'पंचायत', ओरिसामध्ये 'पालीसभा' असे म्हणतात. इतरत्र ग्रामसभा म्हणतात. ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असते, तिच्यामार्फत खेडेगावचा कारभार पाहिला जातो.

**ग्रामसभेची कार्यपद्धती व कामे :**

बहुतेक सर्व राज्यांत ग्रामसभेची वर्षातून दोन वेळा बैठक होते. जम्मू व काश्मिर राज्यात मात्र ही बैठक एकदाच बोलाविली जाते. ग्रामसभेची कामे खालीलप्रमाणे आहेत :

अ) ग्रामपंचायतीचे वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

ब) मागील वर्षाचे हिशेब व ऑडिट अहवाल मंजूर करणे.

क) मागील वर्षाचा प्रशासनाबाबतचा अहवाल मंजूर करणे.

ड) चालू वर्षातील विकासाबाबत व इतर कार्यक्रमांना मंजूरी देणे.

इ) खेड्यातील उत्पादन व्यवस्थेची योजना मंजूर करणे.

फ) ग्रामपंचायतीचे सभासद निवडणे.[१५]

**२. ग्रामपंचायत :**

ग्रामपंचायत हा महाराष्ट्रातील पंचायती राजचा पायाभूत घटक आहे. पंचायती राजचे यशापयश ग्रामपंचायतीच्या कामगिरीवर अवलंबून असते. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीचा कारभार १९५८ सालाच्या कायद्यातील तरतूदी व त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या दुरूस्त्यांनुसार करण्यात येतो. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीची निर्मिती जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांपेक्षा स्वतंत्र रीतीने झालेली असली तरी कार्यात्मकदृष्ट्या त्या पंचायत समिती व जिल्हा परिषदांशी संलग्न आहेत.

**रचना :**

ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असते. ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड ग्रामसभेतून होत असते. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या ७ ते १७ असून जिल्हाधिकारी लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या निर्धारित करतो. ६०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते. तर ६०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी 'ग्रुप ग्रामपंचायत' स्थापन करण्यात येते.

ग्रामपंचायतीतील सभासदांची निवड प्रौढ मतधिकारी व गुप्त मतदान पद्धतीने होते. यासाठी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातून जितके सभासद निवडायचे असतील तितके प्रभाग करण्यात येतात. प्रत्येक प्रभागातून एक प्रतिनिधी निवडण्यात येतो. अनुसूचित जाती जमातीसाठी सुरूवातीपासून राखीव जागांची तरतूद होती. १९९२ सालाच्या ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षाचा निश्चित करण्यात आला आहे. म्हणजेच राज्य सरकारला ग्रामपंचायतीना मुदतवाढ देता येणार नाही आणि त्याला बरखास्त करण्यात आल्यास सहा महिन्यांच्या कालावधीत फेर-निवडणूक घेणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

**सरपंच :**

प्रत्येक ग्रामपंचायतीला एक सभापती असतो. त्याला सरपंच म्हणतात. महाराष्ट्रातील त्याची निवड ग्रामपंचायतीच्या सभासदांद्वारे करण्यात येत. राज्यात मात्र मतदारांमार्फत प्रत्यक्ष पद्धतीने सरपंचाची निवड होते. ग्रामपंचायतीच्या सभांचे कामकाज सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होत असते. गावाच्या कारभारावर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. गावातील विकासाची कामे त्याच्या देखरेखीखाली केली जातात. सरपंचाच्या अनुपस्थितीत त्याची

कार्ये उपसरपंच पार पाडतो उपसरपंचाची निवड ग्रामपंचायतीच्या सभासदांद्वारा करण्यात येते.

**ग्रामसेवक :**

ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी ग्रामसेवक या शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येते. ३००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी एक ग्रामसेवकाची तरतूद असते. मात्र गावाची लोकसंख्या कमी असल्यास, पंचक्रोशीतील ४–५ गावांसाठी एक ग्रामसेवक असतो. ग्रामसेवक प्रशासकीय कामांव्यतिरिक्त विकासविषयक कामाची जबाबदारी पार पाडतो.

**ग्रामपंचायतीची उत्पन्नाची साधने :**

स्व. बलवंतराय मेहता समितीने ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष फी, सेस इत्यादी उत्पन्नाची साधने सुचविली आहेत. सर्वसाधाररपणे जमीन महसूल कर, उपकर, घरपट्टी, व्यवसायकर, वाहन कर, मच्छीमारी कर व सरकारी अनुदाने यांचा त्यात समावेश होतो.

**ग्रामपंचायतीची कामे व अधिकार :**

ग्रामपंचायतीची अनेक कामे आहेत या कामाची दोन विभागात विभागणी करता येते.

१) अनिवार्य कामे व २) ऐच्छिक कामे. ऐच्छिक कामे करणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक नसले तरी जनहिताच्या दृष्टिने ती कामे ग्रामपंचायतीने करावीत अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

**अ) अनिवार्य किंवा आवश्यक कार्ये :**

१) सार्वजनिक सुरक्षितता, २) सार्वजनिक आरोग्य, ३) सार्वजनिक बांधकाम, ४) समाजशिक्षण, ५) दिवाबत्ती, ६) साफसफाई, ७) रोगराई व रोगाच्या साथीचा बंदोबस्त, ८) पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ९) सांडपाण्यासाठी मोऱ्या बांधणे, १०) सार्वजनिक करमणूक, ११) जन्म–मृत्यू विवाह याची नोंद ठेवणे, १२) गुरांची नोंद, १३) सार्वजनिक रस्ते, १४) सार्वजनिक इमारती, १५) वाचनालये, १६) झाडे लावणे इत्यादी.

**ब) ऐच्छिक कार्य :**

विकास विषयक १) बांधकाम विषयक सोयी, २) शेती, पशु, सहकारी संस्था, ग्रामोद्योग अल्पबचत इ. विकासासाठी ग्रामयोजना तयार करून त्यांची कार्यवाही होते की नाही ते पाहणे.

**समाज कल्याण :**

दुष्काळ किंवा आणीबाणीच्या काळात सहाय्य करणे, अपंगांना मदत करणे.

**इतर कामे :**

१) न्याय पंचायतीकडे तंटे देण्यापूर्वी मध्यस्थी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे. २) सरपंचाची निवड करणे. ३) महसूल गोळा करणे. ४) अंदाजपत्रक तयार करणे. ५) ग्रामपंचायतीच्या नोकर वर्गावर देखरेख ठेवणे.[१६]

**३.३ वसंतराव नाईक समितीचा अहवाल :**

भारत सरकारने बलवंतराय मेहता समितीचा अहवाल मान्य केल्यानंतर घटक राज्यांना पंचायती राज स्थापन करण्याची शिफारस केली. महाराष्ट्र शासनाने जून १९६० मध्ये तत्कालीन महसुल मंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नेमणूक केली. या समितीने मेहता समितीच्या शिफारसींच्या अंमलबजावणी विषयक आपल्या शिफारसी राज्य शासनास सप्टेंबर, १९६१ मध्ये सादर केल्या. राज्य शासनाने त्या शिफारसी स्वीकारल्या आणि त्यांवर आधारित महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ हा कायदा राज्य विधिमंडळाने संमत केला. १ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायती राजची स्थापना करण्यात आली.

नाईक समिती आपल्या अहवालात असे मत व्यक्त केले की, ''आमचा असा विश्वास आहे की, स्थानिक प्रशासनासाठी जिल्हा स्तरावरील संस्था सर्वोत्तम कार्यात्मक संस्था आहे. कारण हीच संस्था जिल्ह्याच्या संतुलीत विकासासाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री, प्रशासकीय व तांत्रिक कर्मचारी वर्ग व इतर गोष्टी उपलब्ध करू शकते. या गोष्टी विचारात घेऊन आम्ही असा निष्कर्ष काढतो की, विकेंद्रीकरण खऱ्या अर्थाने प्रभावी बनवायचे असेल तर जिल्हापातळीवर एक शक्तीमान कार्यकारी संस्था स्थापन करणे अटळ आहे. १७ महाराष्ट्रातील पंचायती राज्याचा आकृतीबंध अद्‌वितीय स्वरूपाचा आहे. कारण महाराष्ट्रात सर्वोच्च पातळीवरील जिल्हा परिषद ही स्थानिक संस्था इतर कोणत्याही घटकराज्यातील जिल्हा परिषदांपेक्षा अधिक बलवान आहे.

**३.४ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा १९६१ :**

महाराष्ट्र शासनाने नाईक समितीच्या शिफारसी स्वीकारल्या त्यावर आधारित

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा राज्य विधिमंडळाने १९६१ साली संमत केला. महाराष्ट्रात ग्रामीण विभागात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या स्थापन करून त्यांच्याकडून स्थानिक सरकारची काही कामे सोपविणे, पंचवार्षिक योजनाखालील काही कामे, तसेच विकास योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविणे, लोकशाही संस्था प्रभावी करणे, योजना कार्यात जनतेला सहभागी करणे व त्याकरिता सत्ता व कार्य यांचे विकेंद्रीकरण करणे या हेतूने ''महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती कायदा १९६१'' करण्यात आला. या कायद्यातील तरतुदीनुसार १ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायती राज्य व्यवस्थेची स्थापना करण्यात आली.

**३.५ महाराष्ट्रातील पंचायती राज्याची वैशिष्ट्ये :**

**१) जिल्हा हाच प्रमुख घटक :** महाराष्ट्रात जिल्हा स्तरावरील स्थानिक संस्थेलाच कार्यकारी तसेच महत्वाची संस्था म्हणून मान्यता दिली आहे. महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक जागृती आणि स्थानिक कारभाराचा अनुभव लक्षात घेऊन जिल्हा हाच घटक उपयुक्त मानला आहे.

**(२) प्रत्यक्ष निवडणुका :** महाराष्ट्रातील पंचायती राज्याच्या निवडणुका प्रत्यक्षरीत्या घेण्याबाबत समितीने शिफारशी केल्या आहेत. ग्रामपंचायती, समित्या आणि जिल्हा परिषदांच्या बहुसंख्य सदस्यांची प्रत्यक्षरीत्या निवड करण्यात येते.

**(३) स्थानिक नेतृत्वास वाव :** संसद सदस्य व राज्यविधिमंडळ सदस्यांना पदसिद्ध सभासदत्वाची तरतूद महाराष्ट्रात नाही. राजस्थान व आंध्र प्रदेशातील जिल्हा परिषदावर दिले आहे. तसे संसद सदस्य व राज्य विधिमंडळ सभासदांना पदसिद्ध सभासदत्व महाराष्ट्रात दिले गेले नाही. स्थानिक नेतृत्वाला व कर्तृत्वाला संधी मिळावी म्हणून असे सुचविण्यात आले आहे. कारण संसद व विधिमंडळाच्या सभासदांना जिल्हा परिषदेच्या कार्याकरिता वेळ नसतो तसेच त्यांनी आपल्या मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या कामांना किंवा समारंभांना उपस्थित राहावे अशी अपेक्षा नसते. यामुळे जिल्हा परिषदेचे सभासद व विधिमंडळाचे सभासद यांच्यामध्ये राजकीय क्षेत्रात स्पर्धा होणार नाही. यामुळे स्थानिक पातळीवरील नेतृत्वास वाव मिळेल.

**(४) तालुका स्तरावर पंचायत समिती :** मेहता समितीने विकास गट स्तरावर पंचायत समितीची स्थापना करण्याची शिफारस केली होती. नाईक समितीच्या मते विकास गट

आकारमान व साधनसंपत्तीच्या दृष्टीने सक्षम घटक ठरणार नाही. म्हणून त्याच्याऐवजी मध्य स्तरावरील यंत्रणेची म्हणजेच पंचायत समितीची तालुका पातळीवर स्थापना करण्याची नाईक समितीने शिफारस केली. मात्र पंचायत समितीला स्वतंत्र कार्यभाग देण्याऐवजी जिल्हा परिषद व ग्रामपंचायती यांना जोडणारा दुवा आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली विकास कार्ये करणारी यंत्रणा असा तिचा कार्यभाग असावा.

**(५) जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्याची तरतूद :** पंचायती राज्यव्यवस्थेत प्रशासकीय जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आल्याने राज्य शासनाने जिल्हा स्तरावरील विकास खात्यांची यंत्रणा जिल्हा परिषदेकडे सोपविली. या प्रशासकीय यंत्रणेच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी आणि प्रशासकीय यंत्रणेवर नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची नेमणूक करण्याची शिफारस नाईक समितीने केली. जिल्हाधिकाऱ्याच्या बरोबरीच्या भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्याची जिल्हा परिषदेच्या मुख्यधिकारी पदावर नेमणूक करण्यात यावी.

**(६) जिल्हाधिकाऱ्याचा नाममात्र कार्यभाग :** पंचायती राज्यव्यवस्थेत सुरवातीची दहा वर्षे पदसिद्ध अध्यक्ष असावा, अशी शिफारस मेहता समितीने केली होती. मात्र नाईक समितीने जिल्हाधिकाऱ्याकडे विकास कार्याची जबाबदारी सोपविण्याऐवजी ती जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्याकडे सोपवावी अशी शिफारस केली. त्यामुळे जिल्हा परिषदेतून जिल्हाधिकाऱ्यास पूर्णपणे वगळण्याची शिफारस नाईक समितीने केली. त्याचा कार्यभागग्रामपंचायतींचे सदस्य संख्या निर्धारित करणे, पदधिकाऱ्यावरील अविश्वासाच्या ठरावाच्या बैठकीची अध्यक्षता करणे आणि राज्य शासनाच्या निर्देशानुसार निवडणुका आयोजित करणे असा प्रशासकीय स्वरूपाचा असावा अशी शिफारस नाईक समितीने केली.

**३.६ महाराष्ट्रातील पंचायतीराज व्यवस्थेचा आकृतीबंध :** महाराष्ट्रातील पंचायतीराज व्यवस्था त्रिस्तरीय असून, गाव पातळीवर असणाऱ्या ग्रामपंचायतींचा कारभार १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार करण्यात येतो. तालुका स्तरावरील पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावरील जिल्हा परिषदांचा कारभार महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद कायद्यानुसार करण्यात येतो. १९९२ साली पारित झालेल्या ७३ व्या घटनादुरूस्तीतील तरतुर्दीची कार्यवाही करण्यासाठी १९५८ व १९६१ च्या कायद्यात मूलगामी स्वरूपाचे

बदल करण्यात आले. महाराष्ट्रात आणि अस्तित्वात असलेल्या पंचायतीराज व्यवस्थेचा आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे :

**१) ग्राम स्तरावरील यंत्रणा :** पंचायती व्यवस्थेचे सर्वांत कनिष्ठ स्तर असलेल्या ग्रामस्तरावर ग्रामसभा आणि ग्रामपंचायत या दोन यंत्रणा स्थापन करण्यात आल्या आहेत. ग्रामसभा ही गावातील सर्व प्रौढ नागरिकांची सर्वसामान्य सभा असते. वर्षातून ग्रामसभेच्या किमान चार सभा आयोजित करणे ग्राम पंचायतीवर बंधनकारक असते. या सभेत खालील कामकाज करण्यात येते :

(अ) ग्रामपंचायतीचे वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

(ब) मागील वर्षाचे हिशेब व ऑडिट अहवाल मंजूर करणे.

(क) मागील वर्षाचा प्रशासनाबाबतचा अहवाल मंजूर करणे.

(ड) चालू वर्षातील विकासाबाबत व इतर कार्यक्रमांना मंजुरी देणे.

(इ) खेड्यातील उत्पादन व्यवस्थेची योजना मंजूर करणे.

(फ) ग्रामपंचायतीचे सभासद निवडणे.

ग्रामपंचायत हा महाराष्ट्रातील पंचायती राजचा पायाभूत घटक आहे. पंचायती राजचे यशापयश ग्रामपंचायतींच्या कामगिरीवर अवलंबून असते. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींचा कारभार १९५८ सालच्या कायद्यातील तरतुदी व त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या दुरूस्त्यांनुसार करण्यात येतो. महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींची निर्मिती जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांपेक्षा स्वतंत्र रीतीने झालेली असली तरी कार्यात्मकदृष्ट्या त्या पंचायत समिती व जिल्हा परिषदांशी संलग्न आहेत.

ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असते. ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड ग्रामसभेतून होत असते. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या ७ ते १७ असून जिल्हाधिकारी लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या निर्धारित करतो. ६०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते; तर ६०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी 'ग्रुप ग्रामपंचायत' स्थापन करण्यात येते. ग्रामपंचायतीतील सभासदांची निवड प्रौढ मताधिकार व गुप्त मतदान पद्धतीने होते. यासाठी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातून जितके सभासद निवडायचे असतील तितके प्रभाग करण्यात येतात. प्रत्येक प्रभागातून एक प्रतिनिधी निवडण्यात

येतो. अनुसूचित जाती जमातीसाठी सुरूवातीपासून राखीव जागांची तरतूद होती. १९९४ साली महिलांसाठी ३३ टक्के जागा व अधिकारपदे राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली. या व्यतिरिक्त इतर मागास वर्गासाठीही १५% राखीव जागांची तरतूद करण्यात आली आहे. १९९२ सालच्या ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर ग्रामपंचायतीचा कार्यकाल पाच वर्षांचा निश्चित करण्यात आला आहे. म्हणजेच राज्य सरकारला ग्रामपंचायतीना मुदतवाढ देता येणार नाही आणि त्या बरखास्त करण्यात आल्यास सहा महिन्यांच्या कालावधीत फेरनिवडणुका घेणे कायदेशीररीत्या बंधनकारक आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीला एक सभापती असतो त्याला सरपंच म्हणतात. महाराष्ट्रातील त्याची निवड ग्रामपंचायतीच्या सभासदांद्वारे करण्यात येते. ग्रामपंचायतीच्या सभांचे कामकाज सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होत असते. गावाच्या कारभारावर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असते. गावातील विकासाची कामे त्याच्या देखरेखीखाली केली जातात. सरपंचाच्या अनुपस्थितीत त्याची कार्ये उपसरपंच पार पाडतो. उपसरपंचाची निवड ग्रामपंचायतीच्या सभासदांद्वारा करण्यात येते. ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार सरपंच पद हे महिला, अनुसूचित जाती व जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी चक्राकार पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद आहे, त्याचा प्रत्यक्ष परिणाम म्हणजे महाराष्ट्राच्या ९००० पेक्षा अधिक ग्रामपंचायतींच्या सरपंचपदी महिला आहेत.

ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी ग्रामसेवक या शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येते. ३००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी एका ग्रामसेवकाची तरतूद असते. मात्र गावाची लोकसंख्या कमी असल्यास पंचक्रोशीतील ४–५ गावांसाठी एक ग्रामसेवक असतो.

**(२) मध्य स्तरावरील यंत्रणा : पंचायत समिती :**

स्व. बलवंतराय मेहता समितीने प्रत्येक विकास गटासाठी मध्य स्तरावरील यंत्रणा, म्हणजेच पंचायत समितीची स्थापना करावी अशी शिफारस केली होती. मात्र नाईक समितीच्या शिफारसीनुसार महाराष्ट्रात विकास गटाच्या ऐवजी तालुका पातळीवर पंचायत समितीची स्थापना करण्यात आली आहे. मेहता समितीने सर्व विकासात्मक कार्यांची जबाबदारी पंचायत समितीस सोपवावी अशी शिफारस केली होती. महाराष्ट्र शासनाने ही शिफारस स्वीकारल्यामुळे पंचायत समितीचे स्थान व कार्यभाग दुय्यम स्वरूपाचा आहे. ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषद यांना जोडणारा दुवा किंवा यंत्रणा असे पंचायत

समितीचे वास्तव स्थान आहे. जिल्हा परिषद पंचायत समित्यांद्वारे विकास कार्यक्रमांची गाव स्तरावर कार्यवाही करतात.

**रचना :** महाराष्ट्रातील पंचायती समित्यांची सद्य (सुधारित) रचना खालीलप्रमाणे आहे :

१. विकास गटातील सतरा हजार पाचशे लोकसंख्येपेक्षा जास्त नाही अशा प्रत्येक पंचायत मतदार संघाने निवडलेला एक प्रतिनिधी.

२. विकास गटातील जिल्हापरिषदेवर निवडून आलेले सभासद.

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय नागरिक यांच्यासाठी विशिष्ट प्रमाणात जागा राखून ठेवलेल्या असतात. लोकनियुक्त जागांपैकी १३ जागा स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या असतात.

पंचायत समितीचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. १९९२ सालाच्या ७३ व्या घटना दुरूस्तीतील तरतूदीमुळे हा कार्यकाल निश्चित स्वरूपाचा बदला आहे. कारण राज्य शासनाला पंचायत समितीस मुदतवाढ देता येत नाही. तसेच पंचायतीचे मुदतपूर्व विसर्जन झाल्यास, सहा महिन्याच्या कालावधीत फेर–निवडणुका घेणे कायद्यातील तरतूदीवर बंधनकारक बनले आहे.

**सभापती आणि उपसभापती :**

पंचायत समितीचे लोकनियुक्त सभासद आपणांतून सभापती व उपसभापतीची निवड करतात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय नागरिक यांतील सदस्य आणि स्त्री सदस्य यांसाठी नेमून दिलेल्या पद्धतीने क्रमश: पंचायत समितीचे अध्यक्षपद राखून ठेवले आहे. सभापती पंचायत समितीच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारतो. तो पंचायत समितीच्या कार्यावर देखरेख ठेवतो. त्याच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समितीचे सर्व कार्य चालते. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती कार्य करतो. सभापती आणि उपसभापती यांना मानधन तसेच निवासस्थानाची सोय असते.

**गटविकास अधिकारी :**

गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी आणि सचिव असतो. त्याला शेती, आरोग्य, शिक्षण, पशुसंवर्धन, सहकार आणि उद्योग या क्षेत्रातील विस्ताराधिकारी मदत करतात.

**अधिकार व कार्य :**

१९६१ च्या कायद्याच्या परिशिष्टामध्ये दिलेल्या ७४ विषयाची प्राथमिक जबाबदारी पंचायत समितीकडे सोपविण्यात आली आहे. त्यातील महत्वाच्या जबाबदारी व अधिकार खालीलप्रमाणे आहेत.

१. जिल्हा परिषदेला आपल्या विकास योजना तयार करता याव्यात म्हणून गटात हाती घ्यावयाच्या कामांचे विकास योजनांचे आराखडे तयार करणे.

२. गटातील साधनसंपत्तीचा जास्त उपयोग करता यावे या दृष्टिने गटाच्या अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामाचे विकास योजनांचे आराखडे तयार करणे.

३. गट अनुदानातून कोणत्याही कामाला किंवा विकास योजनेला मंजुरी देणे, तिची अंमलबजावणी करणे, देखरेख व नियंत्रण ठेवणे व त्यासाठी खर्च करणे.

४. जिल्हा परिषदांची कामे व विकास योजना अंमलात आणणे, त्यांची व्यवस्था पाहणे व देखरेख करणे, जिल्हा परिषदेतर्फे सोपविण्यात आलेली इतर कामे करणे.

५. पंचायत समितीचे सभापती, उपसभापती किंवा समितीतील कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाची फेरतपासणी करणे किंवा त्यात बदल करणे.

६. कोणत्याही वेळी आपल्या अंदाजपत्रकात गट अनुदानासंबंधी फेरतपासणी करणे.

७. जिल्हा परिषदेकडून विकास गटात हाती घेतली जाणारी कामे व विकास योजना याबाबत शिफारासी करणे.

८. जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने सोपविण्यात आलेली इतर कामे पार पाडणे.

९. पंचायत समिती तिच्याकडे सोपविल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात गट विकास अधिकाऱ्याच्या कामावर देखरेख नियंत्रण ठेवते.

१०. आपल्या कामाच्या अहवालाचा त्रैमासिक सारांश जिल्हा परिषदेकडे पाठविणे.

वर निर्दिष्ट जबाबदाऱ्यांव्यतिरिक्त ग्रामीण विकासाशी निगडीत असलेल्या विविध बाबींची जबाबदारी पंचायत समितीकडे सोपविण्यात आली आहे.

**उत्पन्नाची साधने :** पंचायत समित्यांना उत्पन्नाची स्वतंत्र साधने नाहीत. त्यांच्या प्रशासकीय व विकासात्मक खर्चाची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे असते.[१८]

**(३) शिखर स्तरावरील यंत्रणा–जिल्हा परिषद**

पंचायत राज्यसंस्थांच्या तीन स्तरापैकी शिखर स्तरावरील यंत्रणा म्हणजे जिल्हा पातळीवरील जिल्हा परिषद होय. १९६२ साली आणि अस्तित्वात असलेल्या जिल्हा लोकल बोर्डच्या जागी जिल्हा परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्रात ३५ जिल्हे असले तरी, मुंबई आणि मुंबई उपनगरे हे पूर्णत: नागरी लोकवस्ती असलेले जिल्हे वगळता, उर्वरित ३३ जिल्ह्यात जिल्हा परिषद ही पंचायती राज व्यवस्थेतील मध्यवर्ती संस्था स्थापन करण्यात आली आहे.

**जिल्हा परिषदांची रचना :**

जिल्हा परिषदेमध्ये खालील प्रकारचे सभासद असतात.

१. प्रोढ मतदारांनी प्रत्यक्ष रीतीने निवडून दिलेले ५० ते ७५ सभासद असतात. सामान्यत: ३५,००० लोकसंख्येसाठी एक सभासद असतो. यातील काही जागा लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय नागरिक (Backward class of citizens) यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतात. एकूण निर्वाचित जागांपैकी १/३ जागा स्त्रियांसाठी राखीव असतात.

२. जिल्ह्यातील पंचायत समित्यांचे सभापती हे पदसिद्ध सभासद असतात.

**कार्यकाल :**

जिल्हा परिषदेचा कार्यकाल पाच वर्षाचा आहे. पंचायत समिती व सहकारी संस्थांचे सभापती ते जोपर्यंत पदावर आहेत तोपर्यंत जिल्हा परिषदेचे सभासद राहतो. १९९२ सालाच्या ७३ व्या घटनादुरूस्तीद्वारा जिल्हा परिषदेस मुदतवाढ देण्याचा राज्य सरकारचा अधिकार काढून घेण्यात आला आहे. म्हणजेच नियोजित वेळी जिल्हा परिषदांच्या निवडणुका आयोजित करणे राज्य शासनावर बंधनकारक आहे. एखादी जिल्हा परिषद योग्य रीत्या आपले कर्तव्य करीत नसेल तर ती विसर्जित करण्याचा अधिकार राज्यसरकारला आहे. मात्र सहा महिन्याच्या आत निवडणुका घेऊन जिल्हा परिषदेचे पुनर्गठन करणे राज्यशासनावर बंधनकारक आहे. या दुरूस्तीमुळे अनियमितपणे होणाऱ्या निवडणुका, राजकीय कारणात्सव निवडणुका पुढे ढकलणे आणि राजकीय कारणात्सव जिल्हा परिषदा बरखास्त करणे या तीन मूलभूत स्वरूपाच्या त्रुटी दूर करण्यात आल्या आहेत.

**पदाधिकारी :**

जिल्हा परिषदेचे सभासद आपणांमधून अध्यक्षाची व उपाध्यक्षाची निवड करतात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय नागरिक यांतील सदस्य आणि स्त्री सदस्य यांच्यासाठी, नेमून दिलेल्या पद्धतीने जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद क्रमश: राखून ठेवले जाते. अध्यक्ष व उपाध्यक्ष या पदांची मुदत पाच वर्षे असते.

अध्यक्षाचे महत्वाचे अधिकार व कार्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. जिल्हा परिषदेच्या सभा बोलाविणे, त्यांचे अध्यक्षस्थान स्वीकारणे आणि सभेचे कामकाज चालविणे.

२. जिल्हा परिषदेच्या आर्थिक आणि कार्यकारी प्रशासनावर देखरेख ठेवणे. त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे त्याला उपलब्ध करून दिली जातात. तसेच त्याला जिल्हा परिषदेचे अभिलेख पाहता येतात.

३. जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीचे, विषय समितीचे किंवा पंचायती समित्यांचे ठराव व निर्णय बरोबर अंमलात आणले जातात की नाही यावर नियंत्रण ठेवणे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर देखरेख ठेवणे.

४. अनपेक्षितरीत्या निर्माण झालेल्या संकटाला तोंड देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या निधीतून तो खर्च करू शकतो. अशा खर्चाला नंतर मान्यता घेतली जाते.

५. घटक राज्याने सोपविलेले कोणतेही कार्य किंवा विकास योजना पार पाडण्यासाठी जिल्हा निधीतून तो खर्च करू शकतो. अशा खर्चाला नंतर मान्यता घेता येते.

अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष यांची कामे पाहतो. त्या काळात त्याला अध्यक्षांचे सर्व अधिकार प्राप्त होतात. इतर वेळी तो अध्यक्षांनी सोपविलेली कामे पार पाडतो.

**जिल्हा परिषदेच्या समित्या :**

जिल्हा परिषदेचे कामकाज व्यवस्थितरीत्या पार पाडावे म्हणून विविध समित्या नियुक्त केल्या जातात. जिल्हा परिषदा खालील समित्यांद्वारे कार्य करतात.

१. स्थायी समिती, २. वित्त समिती, ३. काम समिती, ४. कृषी समिती, ५. समाज कल्याण समिती, ६. शिक्षण समिती, ७. दुग्ध शाळा व पशुसंवर्धन समिती, ८. महिला व बालकल्याण समिती, ९. जल संवर्धन व पिण्याचे पाणी पुरवठा समिती, १०. आरोग्य समिती. वरील एकूण दहा समित्यांपैकी क्रमांक ४ ते १० या समित्यांना विषय समित्या म्हणतात.

**जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी** (Chief Executive Officer)

जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय प्रमुखाला मुख्य कार्यकारी अधिकारी असे म्हणतात. तो जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जाचा अधिकारी असून राज्यशासन भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्याची या पदावर नेमणूक करते. त्याचा सामान्य कार्यकाल तीन वर्षाचा असतो. त्यापूर्वी त्यात बदल करण्याचा अधिकार राज्यशासनास आहे. त्याच्याविरूद्ध कारवाई करावयाची असल्यास जिल्हा परिषदेच्या विशेष सभेत २/३ बहुमताने अविश्वासाचा ठराव करून त्याला परत बोलावण्याची विनंती राज्यशासनास करण्यात येते.

**जिल्हा परिषदेची कामे :**

१९६१ सालच्या महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्याच्या पहिल्या परिशिष्टात नमूद केलेल्या १२८ विषयांची जबाबदारी जिल्हा परिषदाकडे सोपविण्यात आली आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीत समाविष्ट विषयांपैकी ही सूची अधिक व्यापक आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीन्वये जिल्हा नियोजन आणि विकासाची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपवण्यात आली आहे.

**जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने :**

जिल्हा परिषद निरनिराळ्या मार्गाने मिळणारे उत्पन्न प्रथमत: एका निधीत जमा करते. त्याला निधी असे म्हणतात. त्यातूनच जिल्हा परिषदेचा खर्च चालतो.

जिल्ह्याच्या क्षेत्रातील व्यवसाय, व्यापार, धंदा किंवा नोकरी करीत असलेल्या व्यक्तिवर बसवायचा कर, सार्वजनिक नळावर बसविण्यात येणारा कर, सार्वजनिक मनोरंजन व करमणूक यावरील कर, यात्रांवरील कर, जमिनी व इमारती यावरील विशिष्ट कर, जकात कर, बाजार शुल्क इ. याव्यतिरिक्त राज्य सरकार जिल्हा परिषदेत विविध प्रकारची अनुदाने आणि जमीन महसुलाचा वाटा देते.''

**३.४. ७३ वी घटना दुरूस्ती :**

स्व. बलवंतराय मेहता यांच्या नेतृत्वाखालील अभ्यासगटाच्या शिफारसीवर आधारित पंचायती राज्यव्यवस्था सर्वप्रथम राजस्थान आणि आंध्र प्रदेश या राज्यांत १९५९ साली स्थापन करण्यात आली. १ मे १९६२ रोजी महाराष्ट्रात पंचायती राजव्यवस्था अस्तित्वात आली. पंचायती राजव्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी जनता पक्षाच्या राजवटीत १९७८

साली जेष्ठ समाजवादी नेते स्व. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीने पंचायती राजव्यवस्थेत मूलगामी स्वरूपाचे बदल सुचविले परंतु १९८० साली सत्तांतर झाल्याने पंचायती राजव्यवस्थेच्या पुनर्रचनेचा प्रश्न लांबणीवर पडला. १९८६ साली तत्कालीन पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी या प्रश्नाला नव्याने चालना दिली. व्यापक स्वरूपाच्या विचारविनिमयानंतर पंचायती राजव्यवस्थेत अमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने ६४ वी घटना दुरूस्ती संसदेसमोर सादर करण्यात आली. लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताने संमत झालेली ही घटना दुरूस्ती राज्यसभेत आवश्यक दोन तृतीयांश बहुमत न मिळाल्याने फेटाळली गेली. १९९२ साली पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकीर्दीत या प्रश्नाला पुन्हा चाल मिळाली. सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांशी विचारविनिमय करून पंचायती राजविषयक घटना दुरूस्तीच्या विधेयकाला अंतिम स्वरूप देण्यात आले. २२ डिसेंबर १९९२ रोजी पंचायती राजसंस्थांना संवैधानिक दर्जा देणारी ७३ वी घटना दुरूस्ती संसदेने पास केली. स्थानिक स्वराज्य संस्था हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीत असल्याने राज्य विधिमंडळांनीही या घटनादुरूस्तीवर शिक्कामोर्तब केली. १९९६ अखेर सर्व राज्य विधिमंडळांनी ७३ व्या घटनादुरूस्ती कायद्यातील तरतूदीवर आधारित पंचायती राज कायदे संमत करणे अपेक्षित होते. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने १९५८ च्या मुंबई (महाराष्ट्र) ग्रामपंचायत कायदा आणि १९६१ च्या महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्यामध्ये १९९४ साली आवश्यक त्या दुरूस्त्या केल्या आहेत.

७३ व्या घटना दुरूस्तीत समाविष्ट असणाऱ्या काही तरतूदी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने १९९२ सालीच समाविष्ट केल्या होत्या. १९८४ साली महाराष्ट्र शासनाने प्राचार्य पी.बी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायती राजचे मूल्यमापन करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती नियुक्त केली होती. या समितीने आपला अहवाल १९८५ साली महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता. सुधाकरराव नाईक यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकीर्दीत त्या अहवालावर आधारित काही महत्वपूर्ण दुरूस्त्या १९९२ साली करण्यात आल्या होत्या. जिल्हा नियोजन आणि विकास संबंधीचे व्यापक अधिकार, महिलांसाठी ३० टक्के जागांचे आरक्षण, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षास राज्यमंत्राचा दर्जा इ. त्यातील काही महत्वपूर्ण दुरूस्त्या होय.

७३ व्या घटनादुरूस्तीतील मूलभूत किंवा सैद्धांतिक स्वरूपाच्या तरतूदींचा १९९४

साली स्वीकार करण्यात आला असला तरीही काही तरतूदी स्वीकारण्यात आल्या नाहीत. उदा. विधानसभा विधानपरिषद लोकसभा सदस्य यांचे वास्तव्य ज्या पंचायत समिती जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात असेल, त्या पंचायत समिती जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्यत्व देणारी तरतूद स्वीकारण्यात आलेली नाही.

**७३ व्या घटना दुरूस्तीतील महत्वपूर्ण तरतूदी :**

७३ व्या घटना दुरूस्तीद्वारे भारतीय संविधानात ९ व्या भागात अनुच्छेद (कलम) २४३ समाविष्ट करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त पंचायती राजसंस्थांकडे ज्या २९ बाबी हस्तांतरीत करणे अपेक्षित आहे, त्यांचा अंतर्भाव असलेले ११ वे परिशिष्ट संविधानात समाविष्ट करण्यात आले आहे. ७३ व्या घटनादुरूस्तीतील महत्वपूर्ण तरतूदी आणि त्याची महाराष्ट्रात करण्यात आलेली कार्यवाही यांचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.

**१. ग्रामसभा :**

अनुच्छेद २४३ (अ) अंतर्गत ग्रामसभा स्थापन करणे आणि त्यांचे अधिकार निर्धारित करण्यासंबंधीच्या तरतूदी करण्यात याव्यात असा निर्देश राज्य विधीमंडळांना देण्यात आला आहे. १९५८ सालच्य मुंबई ग्रामपंचायत कायद्यानुसार ग्रामसभा स्थापन करण्याची तरतूद महाराष्ट्रात अस्तित्वात होती. १९९४ पूर्वी ग्रामसभांचा असलेला वैधानिक दर्जा, ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार संवैधानिक झाला आहे.

**२. पंचायती राजसंस्था :**

अनुच्छेद २४३ (ब) च्या तरतूदीनुसार ग्रामस्तर, मध्यस्तर आणि जिल्हा स्तरावर ग्रामपंचायत, विकासगट किंवा तालूका पंचायत आणि जिल्हा पंचायत स्थापन करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्रात १९६२ सालापासून त्रिस्तरीय पंचायती राजव्यवस्था अस्तित्वात आहे. ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, तालुका किंवा मध्य स्तरावर पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद गेली ५० वर्षे कार्यान्वित आहे.

**(अ) लोकनिर्वाचित प्रतिनिधी :**

अनुच्छेद २४३ (क) मध्ये तीन स्तरावरील संस्थांच्या रचनेबाबतच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार लोकसंख्या आणि लोकप्रतिनिधींची संख्या यांचा गुणोत्तर (प्रमाण) राज्यात सर्वत्र समान असावा अशी अपेक्षा आहे. लोकसंख्येच्या आधारे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची संख्या निर्धारित केल्या

नंतर त्यांच्या भौगोलिक क्षेत्राची एक सदस्य मतदार संघात विभागणी करण्याची आणि लोकप्रतिनिधींची मतदारांद्वारे प्रत्यक्षरीत्या निवड करण्याची तरतूद करण्यात यावी. ही तरतूद महाराष्ट्रात १९६२ सालापासून अस्तित्वात आहे. १९९२ च्या दुरूस्तीनुसार १७५०० लोकसंख्येचा 'गण' आणि ३५००० लोकसंख्येचा 'गट' यांच्याद्वारे अनुक्रमे पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या प्रत्येकी एका सदस्याची निवड करण्यात येते.

**(ब) पदसिद्ध प्रतिनिधी :**

राज्य विधिमंडळाने ग्रामपंचायतीच्या सरपंचाना पंचायत समितीचे आणि पंचायत समितींच्या सभापतीला जिल्हा परिषदेचे पदसिद्ध प्रतिनिधित्व देण्यासंबंधीच्या तरतूदी करण्याचे निर्देश राज्य विधिमंडळांना देण्यात आले आहेत. महाराष्ट्रात १९६३ सालापासून सरपंच मतदार संघातून पंचायत समितीचे दोन सदस्य निवडले जात असत आणि सर्व पंचायत समित्यांचे सदस्य जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य असत. ही तरतूद कायम ठेवण्यात आलेली आहे.

पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात वास्तव्य असणाऱ्या संसद आणि राज्य विधिमंडळाच्या सदस्यांना पंचायत समिती जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्यत्व देण्यासंबंधीची तरतूद महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने स्वीकारलेली नाही. स्थानिक नेतृत्वास वाव देण्यासाठी स्थानिक आमदार व खासदारांना पंचायती राजसंस्थापासून वगळण्याची तरतूद १९६२ सालापासून महाराष्ट्रात अस्तित्वात आहे आणि त्यात बदल करण्यात आलेला नाही.

अशा पदसिद्ध सदस्यांना पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार असावा अशी तरतूद ७३ व्या घटना दुरूस्तीत आहे. महाराष्ट्रात पंचायत समितीच्या सभापतींना जिल्हा परिषदेच्या कामकाजात आणि सरपंचाच्या प्रतिनिधींना पंचायत समितीच्या कामकाजात मतदान करण्याचा अधिकार १९६२ सालापासून आहे.

**(क) पदाधिकाऱ्यांची निवड :**

ग्रामपंचायतीच्या सरपंचाची, पंचायत समितीच्या सभापतींची आणि जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाची निवड करण्यासंबंधीचे नियम राज्य विधिमंडळाने करावे मात्र निर्वाचित सदस्यांतूनच पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात यावी महाराष्ट्रात ही तरतूद १९६२ सालापासून अस्तित्वात आहे.

**३. आरक्षित जागासंबंधीची तरतूद :**

अनुच्छेद २४३ (ड) मध्ये निर्वाचित जागामध्ये अनुसूचित जाती व जमाती आणि महिलांसाठी तिन्ही आरक्षित जागासंबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती व जमातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित असाव्यात. अनुसूचित जाती व जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागापैकी एक तृतीयांश त्या गटातील महिलांसाठी आरक्षित असाव्यात. तिन्ही स्तरावरील एकूण निर्वाचित जागांपैकी एक तृतीयांश जागा (अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांसह) महिलांसाठी आरक्षित असाव्यात अशा राखीव जागा असलेले अनुसूचित जाती व जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी एक तृतीयांश जागा त्या गटातील महिलांसाठी आरक्षित असाव्यात. तिन्ही स्तरावरील एकूण निर्वाचित जागांपैकी एक तृतीयांश जागा (अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांसह) महिलांसाठी आरक्षित असाव्यात. मतदारसंघ चक्राकार पद्धतीने निर्धारित करण्यात यावी. महाराष्ट्रात तिन्ही स्तरांवर अनुसूचित जाती व जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण १९६२ सालापासून उपलब्ध होते. १९९२ साली तिन्ही स्तरांवर महिलांसाठी तीस टक्के राखीव जागांची तरतूद करण्यात आली होती आणि ही तरतूद १९९४ साली ३३ टक्के करण्यात आली.

अनुच्छेद २४३ (इ)मध्ये तिन्ही स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांसाठी एक तृतीयांश अधिकार पदे राखीव ठेवण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आले आहेत. अशी राखीव अधिकार पदे चक्राकार पद्धतीने निर्धारित करण्यात यावी. महाराष्ट्रात १९९४ सालच्या दुरूस्तीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, इतर मागासवर्गीय आणि सर्वसामान्य सदस्य अशा पाच वर्गासाठी अधिकारपदांचे चक्राकार पद्धतीने वाटप करण्यात येते.

**४. पंचायती संस्थेचा कार्यकाल**

अनुच्छेद २४३ (ई) प्रमाणे तिन्ही स्तरांवरील संस्थांचा सामान्य कार्यकाल पाच वर्षाचा असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. पाच वर्षांचा कार्यकाल पूर्ण होण्याआधी आगामी संस्थांच्या निवडणूका आयोजित करणे राज्य शासनावर बंधनकारक असेल. म्हणजेच ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेचा पाच वर्षाचा कार्यकाल पूर्ण

होताच त्यातील लोकप्रतिनिधींचे स्थान घेणाऱ्या लोकप्रतिनिधींच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली असेल. कोणत्याही परिस्थितीत अनुसूचित जाती जमातीसाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी एक तृतीयांश जागा पंचायती संस्थांना मुदत वाढ देता येणार नाही. काही कारणात्सव या संस्था मुदतपूर्व बरखास्त करण्यात आल्या असतील तर त्यांचे पुनर्गठन सहा महिन्याच्या आत करणे राज्य शासनावर बंधनकारक असेल. अशा पुर्नगठीत संस्था उर्वरित कालखंडासाठी अस्तित्वात राहतील.

**५. पंचायती संस्थांचे अधिकार व कार्ये :**

अनुच्छेद २४३ (ब) मध्ये पंचायती संस्थांचे अधिकार, कार्ये आणि जबाबदाऱ्या या संबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार संविधानातील तरतूदीच्या मर्यादा सांभाळून राज्यांची विधिमंडळे आवश्यक ते कायदे करून पंचायती संस्थांना अधिकार प्रदान करतील. त्या अंतर्गत आर्थिक व सामाजिक न्यायासाठी योजना तयार करणे आणि (खाली दिलेल्या) ११ व्या परिशिष्टात समाविष्ट बाबी पंचायती संस्थांकडे सोपविणे बंधनकारक असेल.

अकराव्या परिशिष्टात खालील बाबींचा समावेश आहे.

१. कृषी विस्तारासह कृषी.

२. भू–विकास, जमीन सुधारणांची अंमलबजावणी, जमिनीचे एकत्रीकरण मृद्संधारण.

३. छोटे पाट बंधारे, पाण्याचे व्यवस्थापन व पाणलोट विकास.

४. पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन,

५. मच्छिमारी

६. सामाजिक वनीकरण, शेत वनीकरण

७. किरकोळ जंगल उत्पन्न

८. अन्नावरील प्रक्रियांचे उद्योगासह लघुउद्योग

९. खादी, ग्राम व कुटीरोद्योग

१०. ग्रामीण घर बांधणी

११. पिण्याचे पाणी

१२. इंधन व चारा

१३. रस्ते, नाले, पूल, तरी, जलमार्ग आणि दळणवळणांची अन्य साधने

१४. ग्रामीण विद्युतीकरण, विजेचे वाटप

१५. अपारंपारिक ऊर्जा साधने

१६. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम

१७. प्राथमिक व दुय्यम शाळांसह शिक्षण

१८. तांत्रिक प्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण

१९. प्रौढ व अनोपचारिक शिक्षण

२०. ग्रंथालये

२१. सांस्कृतिक कार्यक्रम

२२. बाजार व जत्रा

२३. रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यांसह आरोग्य व स्वच्छता

२४. कुटुंब कल्याण

२५. स्त्रिया व बालविकास

२६. अपंग व मतिमंद यांच्या कल्याणासह समाज कल्याण

२७. दुर्बल घटकांचे विशेषत: अनुसूचित जाती व जमाती कल्याण

२८. सार्वजनिक वाटप योजना

२९. समाजाच्या मालमत्तेचा प्रतिपाळ

१९६१ च्या महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्यातील तरतूदींद्वारा वर नमूद केलेल्या बाबींपेक्षाही अधिक व्यापक अधिकार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना देण्यात आले आहेत. १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्याने यातील अनेक बाबी संबंधीचे अधिकार ग्रामपंचायतींना बहाल केले आहेत.

**६. उत्पन्नाची साधने :**

अनुच्छेद २४३ (एच) मध्ये पंचायत संस्थांच्या उत्पन्नांच्या साधनासंबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्य विधिमंडळ कायदा करून खालील आर्थिक तरतूदींची पूर्तता करेल.

अ) पंचायतींना कायद्याच्या मर्यादा सांभाळून व कायदेशीर कार्यपद्धतीचा अवलंब करून कर, जकाती व पथकर लादण्याचा, वसूल करण्याचा आणि वापरण्याचा अधिकार येईल.

ब) राज्य शासनाने लादलेले व वसूल केलेले कर, जकाती, पथकर इ. कायद्याने निश्चित केलेल्या उद्देशांसाठी आणि मर्यादित पंचायतीकडे सोपविल.

क) राज्याच्या एकत्रित निधीमधून पंचायतींना अनुदान देण्याची तजबीज करील आणि

ड) अशा निर्धींची स्थापना करील की, त्यामध्ये पंचायतीकडे येणारा पैसा जमा होईल व खर्चाला लागणारा पैसा त्यामधून काढता येईल.

**७. राज्य वित्त आयोग :**

अनुच्छेद २४३ (आय) मध्ये राज्य वित्त आयोगाच्या गठन संबंधीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १९९२ च्या ७३ व्या दुरूस्ती कायद्याच्या अंमलबजावणीपासून एक वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक पाचवे वर्ष संपल्यावर पंचायतीच्या आर्थिक स्थितीचे परीक्षण करून राज्यपालांना पुढील प्रमाणे शिफारसी करण्यासाठी राज्यपाल वित्त आयोगाची (Finance Commision) स्थापना करतील. वित्त आयोग राज्यशासनाला खालील बाबीसंबंधी शिफारशी करेल :

अ) राज्याने वसूल केलेले कर, जकाती, पथकर, शुल्क इ. पासूनच्या मिळकतीची वाटणी राज्य आणि पंचायती यांच्यामध्ये करणे आणि सर्व पातळ्यांवरील पंचायतीच्या उत्पन्नातील त्यांचा वाटा निश्चित करणे, पंचायतींकडे कोणकोणते कर, जकाती, पथकर इ. सोपवायचे ते ठरविणे, राज्याच्या एकत्रित निधीतून पंचायतींना अनुदान देणे या तिन्ही शिफारसी मागील तत्त्वे निश्चित करणे.

ब) पंचायतींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजणे आणि

क) पंचायतीच्या उत्तम आर्थिक स्थितीसाठी राज्यपालाने आर्थिक आयोगाकडे निर्देश केलेल्या अन्य बाबी.

**आयोगाची रचना :**

वित्त आयोगाची रचना, सभासदांच्या नेमणुकीसाठी पात्रता, त्यांची निवड करण्याची पद्धती या संबंधीच्या तरतुदीसाठी विधिमंडळ कायदा करेल. आयोग स्वत: आपली कार्यपद्धती निश्चित करेल आणि आपली कार्ये पार पाडण्यासाठी त्यांना आवश्यक ते अधिकार विधिमंडळाच्या कायद्याने दिली जाईल. आयोगाने केलेली प्रत्येक शिफारस त्यावरील कार्यवाहीच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनासह विधिमंडळासमोर ठेवण्याचा आदेश राज्यपाल मंत्रिमंडळास देईल. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली पहिल्या राज्य वित्त आयोगाचे गठन केले. वित्त आयोगाने आपला अहवाल राज्य शासनास १९९७ साली सादर केला.

**७. लेखा परीक्षण :**

अनुच्छेद २४३ (जे) मध्ये पंचायती संस्थांच्या लेखापरीक्षणासंबंधी खालील तरतूदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार पंचायतींनी आपले हिशेब ठेवावेत व त्यांचे लेखापरीक्षण व्हावे यासाठी विधिमंडळ कायदा करून तरतूद करेल. या तरतुदीनुसार आवश्यक त्या दुरूस्त्या १९६१ च्या कायद्यात करण्यात आल्या आहेत.

**८. निवडणूक आयोग :**

१९९२ च्या घटना दुरूस्तीतील सर्वात महत्त्वपूर्ण तरतूद राज्य निवडणूक आयोगाच्या गठन संबंधीची आहे. अनुच्छेद २४३ (के) मध्ये खालील तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

अ) मतदार यादया तयार करण्याच्या कामावर देखरेख करणे व नियंत्रण ठेवणे आणि पंचायतीच्या सर्व निवडणूका घेणे ही कामे राज्य निवडणूक आयोगाकडे असतील. त्यातील निवडणूक आयुक्ताची नेमणूक राज्यपाल करेल.

ब) राज्य निवडणूक आयुक्ताच्या नोकरीच्या शर्ती आणि त्यांची मुदत राज्यपालांने ठरविल्याप्रमाणे असतील. मात्र त्याची नेमणून झाल्यावर त्याचे नुकसान होईल असा बदल त्याच्या सेवा शर्तीत करता येणार नाही. तसेच उच्च न्यायलयाच्या न्यायाधिशांना ज्या पद्धतीने व ज्या कारणांसाठी नोकरीवरून दूर करण्यात येते त्याशिवाय अन्य पद्धतीने राज्य निवडणूक आयुक्ताला नोकरीवरून दूर करता येणार नाही.

क) राज्य निवडणूक आयोगाने विनंती केल्यावर राज्यपाल त्या आयोगास आपले कार्य पार पाडण्यासाठी आवश्यक ते कर्मचारी उपलब्ध करून देईल.

ड) घटनेतील तरतुर्दीच्या मर्यादेत पंचायतीच्या निवडणुकांशी संबंधित अशा सर्व बाबी संबंधी विधिमंडळ कायदा करेल. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली राज्य निवडणूक आयोगाचे गठन केले आहे.

**९. केंद्रशासित प्रदेशातील पंचायती संस्था :**

अनुच्छेद २४३ (एल) मध्ये हा घटना दुरूस्तीचा कायदा केंद्रशासित प्रदेशांना कसा लागू करावा या संबंदीची चर्चा आहे. २४३ (ड) मध्ये हा कायदा कोणत्या विशिष्ट प्रदेशांना (नागालँड, मेघालय, मिझोरोम इ.) लागू नाही त्या संबंधीचे विवेचन आहे.

**१०. ७३ व्या घटना दुरूस्तीची कार्यवाही :**

७३ व्या घटना दुरूस्ती कायद्याची अंमलबजावणी होण्यापूर्वी यातील तरतुदींशी विसंगत अशा पंचायतीशी संबंधित असलेला एखादा कायदा असेल, तर समक्ष विधीमंडळाने किंवा प्राधिकरणाने त्यात दुरूस्ती किंवा तो रद्द करीतोपर्यंत किंवा घटना दुरूस्ती कायद्याची अंमलबजावणी झाल्यापासून एक वर्ष संपेपर्यंत, या दोहोंपैकी जी मुदत कमी असेल, तो पर्यंत तो कायदा चालू राहील.

परंतु जर राज्याच्या विधानसभेने किंवा विधानपरिषद असेल तर दोन्ही सभागृहांनी ठराव करून पंचायती लवकर बरखास्त केल्या नसतील, तर ही दुरूस्ती होण्यापूर्वी ज्या पंचायती अस्तित्वात होत्या त्या त्यांची मुदत संपेपर्यंत चालू राहतील.

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने १९९४ साली १९६१ च्या जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा आणि १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्यात आवश्यक त्या दुरूस्त्या केल्या आहेत.

**११. न्यायालयीन हस्तक्षेपास प्रतिबंध :**

मतदारसंघ निर्धारण आणि जागांचे वाटप किंवा अनुच्छेद २४३ मधील तरतुर्दीच्या कार्यवाहीसाठी करण्यात आलेल्या कोणत्याही कायद्यास न्यायालयात आव्हान देता येणार नाही. राज्य निवडणूक आयोगाकडे निर्धारित पद्धतीने अर्ज केल्याशिवाय, पंचायतीच्या कोणत्याही निवडणुकीस न्यायालयात आव्हान देता येणार नाही. म्हणजेच पंचायत संस्थांच्या निवडणूकांबाबत न्यायालयीन हस्तक्षेपास अप्रक्षरीत्या प्रतिबंध करण्यात आला आहे.

**१२. जिल्हा नियोजन विकास समिती :**

अनुच्छेद २४३ (झेड्.डी) मध्ये राज्य विधिमंडळांना जिल्हा नियोजन आणि विकास समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ७४ व्या घटनादुरूस्तीत समाविष्ट आणि ७३ व्या घटना दुरूस्तीत समाविष्ट न करण्यात आलेली तरतूद म्हणजे जिल्हा किंवा स्थानिक स्तरावरील नियोजन आणि विकासाची जबाबदारी पार पाडणारी जिल्हा नियोजन आणि विकास समिती ही यंत्रणा होय. या समितीच्या कार्यकक्षेत जिल्ह्यातील सर्व नागरी आणि ग्रामीण स्थानिक शासन संस्थांचा अंतर्भाव करण्यात आला आहे. राज्य विधिमंडळाने या समित्यांची रचना, अधिकार व कार्ये आणि त्यांच्या आर्थिक तरतूदी या संबंधीच्या वैधानिक तरतूदी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अ) रचना : या समितीच्या एकूण सदस्यांपैकी चार पंचमांश सदस्यांची निवड स्थानिक शासन संस्थांनी करण्याची तरतूद करणे बंधनकारक आहे. जिल्ह्यातील ग्रामीण लोकसंख्या व शहरी लोकसंख्या यांचे जे प्रमाण असेल त्या प्रमाणात जिल्हा पातळीवरील पंचायतीमधून निवडलेल्या व नगरपालिकांमधून निवडलेल्या सभासदांचे प्रमाण असेल. सदस्यांची आणि समितीच्या कार्याध्यक्षांची निवड करण्याची पद्धती राज्य विधिमंडळाने निश्चित करावयाची आहे.

ब) अधिकार व कार्ये : जिल्हा नियोजन आणि विकास समितीने समग्र जिल्ह्याचे नियोजन व विकास आराखडा तयार करीत असताना कार्यक्षेत्रातील मोकळ्या जागेचे नियोजन, पाणी वाटप, इतर भौतिक, नैसर्गिक स्त्रोत, मूलभूत सुविधांचा एकात्मिक विकास व पर्यावरण संरक्षण करणे अपेक्षित आहे.

क) आर्थिक तरतुदी : केंद्राच्या आणि राज्याच्या योजना यातून प्रत्येक जिल्ह्याच्या नियोजन आणि विकास कार्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध होईल. निधीच्या उपलब्धतेच्या आधारे समितीने विकासविषयक योजना तयार करतांना तत्सम क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती व संस्थांशी विचारविनिमय करावा आणि अंतिम निर्णय देण्याचा अधिकार राज्यपालास असेल. जिल्हा नियोजन आणि विकास समितीने संमत केलेले जिल्ह्याच्या विकास योजनेचा आराखडा समितीचा कार्याध्यक्ष राज्यशासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवेल.[१९]

**४.२ ७३ व्या घटना दुरूस्तीचे ग्रामीण नेतृत्व आणि राजकारणावरील परिणाम :**

७३ व्या घटना दुरूस्तीतील अभिप्रेत असलेले ग्रामीण राजकीय व्यवस्थेतील परिवर्तनाचे सूतोवाच प्राचार्य पी. बी. पाटील समितीने केले होते. ग्रामीण राजकारण आणि ग्रामीण नेतृत्व या बाबत निर्णय विचारात घेता महिलांना पंचायतराजमधील आरक्षण ही शिफारस फारच आमूलाग्र क्रांतीची गोष्ट होती. पंचायतराज मध्ये ३० टक्के महिलांसाठी आरक्षणाचा निर्णय झाल्यानंतर १९९२ च्या पंचायत राज संस्थांच्या निवडणुकां या तरतुदीनुसार घेण्यात आल्या. याच तरतुदीचे व्यापक स्वरूप लक्षात घेता ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार महिला, अनुसूचित जाती, जमाती या दुर्लक्षित घटकांना ग्रामीण राजकारणात सत्तेत स्थान देण्यात आले. १९९४ साली महाराष्ट्र राज्यविधिमंडळाने ७३ व्या घटना दुरूस्तीची स्वीकृती केली आणि या तीन दुर्लक्षित घटकाबरोबरच इतर मागास वर्गासाठी जागा आणि अधिकार पदाचे आरक्षण लागू करण्यात आले. या सर्व तरतुदीचा एकत्रित विचार केल्यास आपणास एकूण आरक्षण पुढील प्रमाणे आढळून येते.

१) महिलांसाठी आरक्षित जागा आणि अधिकारपदे

२) अनु. जाती जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षित जागा व पदे

३) इतर मागास जाती वर्ग यांसाठी विशिष्ट प्रमाणात आरक्षित जागा व अधिकार पदे

७३ व्या घटना दुरूस्तीनुसार पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत चक्राकार पद्धतीचा स्वीकार करण्यात आला. त्यानुसार महिला अनु. जाती, जमाती, इतर मागासवर्ग, अन्य घटक यांच्याकडे आलटून पालटून अधिकार पदे चिठ्ठ्या टाकून देण्याची तरतूद करणे हे क्रमप्राप्त होते. महिला आरक्षणाबाबत अनु. जाती, जमाती आणि इतर मागास वर्गातील महिलांसाठी अधिकार पदाची तरतूद करण्यात आली. १९९९ साली अधिकारपदाचा कार्यकाल एका वर्षावरून अडीच वर्षे इतका वाढविण्यात आला.

रत्नागिरी जिल्ह्यात मराठा–कुणबी समूहाचे राजकारणावर मोठ्या प्रमाणात वर्चस्व आहे. ७३ व्या घटना दुरूस्तीने वरील बहुतांशी जागा आणि अधिकार पदे राजकीय दृष्ट्या कमकुवत घटकासाठी आरक्षित झाल्या आहेत. म्हणजेच प्रभावी जाती गटांचा सत्तेमधील वाटा व त्याद्वारे ग्रामीण राजकारण व अर्थकारण यावरील पकड सैल होईल असे वाटते. मात्र आज प्रत्यक्षात वरील गटांना जागा आरक्षित असल्या तरी मराठा–कुणबी समूहाने आपले वर्चस्व रत्नागिरी जिल्ह्यांत अबाधित राखलेले बघावयास मिळते. या सर्व तरतूदींचा एकत्रित विचार केल्यास ग्रामीण राजकारण आणि नेतृत्वावरील दूरगामी स्वरूपातील परिणामांचा अंदाज व्यक्त करता येईल.

१) राजकारण विशिष्ट जातीचे प्रमुखत्व ही संकल्पना आता लोप पावण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण १९९२ पूर्वी विशिष्ट जाती, विशिष्ट घराणी यांची मक्तेदारी जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीवर होती. गेल्या काही वर्षात ह्या प्रभावी जाती व्यतिरिक्त राजकीय दृष्ट्या दुर्बल घटकांचा ह्या सत्तेत वाटा वाढला आहे. त्यामुळे या प्रभावी गटाची राजकारणावरील मक्तेदारी कमी झाली आहे. प्रभावी जातींना प्राप्त झालेले अधिकार पदे मोठ्या प्रमाणात कमी झाले. म्हणजेच सातत्याने अधिकार पदावर राहून जे राजकीय लाभ या प्रभावी जातींना मिळत होते त्यापासून ते आता वंचित होत चाललेले आहेत. त्यामुळे त्यांची ग्रामीण राजकारणावरील पकड सैल झाली असून त्यांना पर्यायी ठरू शकेल अशी अन्य जाती, जमाती, महिला व इतर मागास नेतृत्व निर्माण झाले आहे. हे नव्याने निर्माण होणारे नेतृत्व पारंपारिक, प्रस्थापित नेतृत्वासमोरील असलेले सर्वात मोठे राजकीय आव्हान आहे.

२) नवीन सत्ता समीकरणे निर्माण होऊन या सत्तास्पर्धेत प्रभावी जाती सम ूदाय निष्प्रभ होण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र हे प्रस्थापित नेतृत्व अद्याप पूर्णपणे प्रभावहीन झालेले नाही. कारण त्यांचे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर नियंत्रण आहे. या नियंत्रणालाही ओहोटी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पंचायत राज संस्था प्रमाणेच सहकारी संस्थेमध्येही दुर्बल राजकीय व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना सत्तेत स्थान देण्याचे म्हणजेच त्यांचेसाठी जागा व अधिकारपदे राखीव ठेवण्याचा मानस राज्य शासनाने व्यक्त केला आहे. ही नियोजित तरतूद ज्यावेळी महाराष्ट्र सहकार अधिनियमात करणेत येईल त्यावेळी ग्रामीण राजकारणांत सत्तातराला वेग येईल. हे सत्तांतर साहजिकच प्रभावी गटांकडून दुर्बल जाती जमाती महिलांकडे असेल.

३) जिल्हा नियोजन आणि विकास समिती प्रभावी आणि प्रस्थापित राजकीय नेतृत्वाची आणखी एक सत्तास्थान होते. ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार जिल्हा नियोजन आणि विकास समितीची तरतुद नसल्याने त्यांच्या अस्तित्वालाच मुंबई उच्च न्यायालयात १९९८ साली आव्हान देण्यात आले होते. १९९९ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने जिल्हा नियोजन आणि विकास समिती घटनाबाह्य असल्याचे मत व्यक्त केले होते आणि त्या बरखास्त करण्याचे निर्देश राज्य शासनाला दिले होते. त्यानुसार १९९९ साली जिल्हानियोजन आणि विकास समित्या या बरखास्त करण्यात आल्या नियोजन समिती स्थापन करण्यात आली. हा बदल ग्रामीण राजकारणाच्या दृष्टिने क्रांतिकारक ठरणार आहे. कारण त्यातील ८० टक्के सभासदांची निवड लोक प्रतिनिधींनी करावयाची आहे. लोकप्रतिनिधींमधील बहुतांश प्रतिनिधी हे अनु. जाती, जमाती, इतर मागास व महिला असल्याने या समितीवर या गटाचेच वर्चस्व निर्माण होण्याचे ठळक संकेत दिसत आहेत.

१९९२ ते २००४ या कालावधीत पंचायत राज संस्थांच्या जागा, अधिकारपदे, या बाबतीत आरक्षण मिळाल्याने आता पर्यंतच्या कालखंडात ग्रामीण राजकीय प्रक्रियेत काही बदल व परिणाम घडून येत असल्याचे स्पष्टपणे जाणवते ते खालीलप्रमाणे

अ) दुर्बल आणि प्रभावहीन घटकांची काही जागा एक जूट होत असल्याने राजकीय सत्तेची समिकरणे पूर्णपणे बदलत आहेत.

ब) काही ठिकाणी प्रभावी जातींची इतर मागास किंवा अनु. जाती, जमाती यांच्याशी हात मिळवणी करून आपल्याच हातात सत्ता ठेवताना दिसून येतात.

क) महिला, अनु. जाती, जमाती व इतर मागास यांना आरक्षण देऊन सुद्धा काही ठिकाणी त्या आरक्षणाचा उमेदवार स्वत:हून मिळत नाही. कारण या घटकांमध्ये आजही राजकारणाबद्दल सजगता नाही. प्रभावी जातीतील पुढारलेला वर्ग त्याच्यामध्ये सजगता निर्माणही करत नाही. अशा घटकांना विविध माध्यमातून प्रलोभणे दाखवून आपल्या वर्चस्वाखालील सत्तेत येण्यास भाग पाडले जात आहे.

ड) काही ठिकाणी अनु. जाती, जमातीतील महिला आणि पुरूष, लोक प्रतिनिधी व अधिकार पदावरील व्यक्ती आपले अधिकार गाजवण्यात तरबेज होत आहेत. सत्तेपासून होत असलेल्या फायद्यांची त्यांना जाणीव निर्माण झालेली आहे. सत्तेवर असलेल्या या नेतृत्वाला सामान्य जनता पाठिंबाही देत आहे.

इ) काही ठिकाणी ३३ टक्के आरक्षणामुळे राजकीय क्षेत्रातील संबंधितांनी तसेच प्रभावी जाती गटांनी आपल्याच घरातील मुली, पत्नी यांना राजकारणात प्रवेश दिला आहे. त्यामुळे या प्रस्थापित वर्गाच्या हातात सत्ता राहिली. अशा महिला कुटुंबातील समाजातील पुरूष मंडळीच्या नियंत्रणाखाली राहून काम करताना बघावयास मिळतात. हा प्रभावी गट या सत्तेची सूत्रे चालविताना बघावयास मिळत आहेत. मात्र हे चित्र फार काळ टिकेल असे वाटत नाही. कारण आज महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात जागृती निर्माण होत आहे.

ई) मात्र काही स्त्रिया या ३३ टक्के आरक्षणामुळे स्वयंनिर्भर झालेले दिसून येत आहेत. लोकप्रतिनिधी व अधिकार पदावर त्या आरूढ होऊन पुरूष वर्गाचे नियंत्रण पूर्णपणे झिडकारून आपल्या पदाला योग्य न्याय देताना दिसून येत आहेत. १९९७ नंतर बरेचसे महिला नेतृत्व प्रगल्भ आणि स्वावलंबी झाल्याचे दिसून येते. असहाय्य व दुर्बल वाटणारे महिला नेतृत्व १० वर्षाच्या अनुभवानंतर प्रभावी होत असल्याचे दिसून येते.

७३ व्या घटना दुरूस्तीने ग्रामीण नेतृत्व आणि राजकारणावरील परिणाम याचेवर विश्लेषण केले आहे. कदाचित त्या आधारे सदर संशोधन देखील अर्थशून्य होण्याची शक्यता उद्भवते त्यास चुकीची संशोधन पद्धती कारणीभूत नसून राजकीय प्रक्रियेतील मूलगामी स्वरूपाचे परिवर्तन जबाबदार आहे. असे असले तरी ग्रामीण भागात अद्याप उत्पादनाच्या साधनांवर ज्या जाती समूहांची पकड असते त्या जातीतील नेतृत्व जरी राजकीय सत्ता व त्यापासून मिळणाऱ्या फायद्यापासून वंचित होत असले तरी उत्पादन साधनांची मालकी आणि पुरूष प्रधान संस्कृतीचा प्रभावी याद्वारे सत्तेच्या परिघाच्या बाहेर राहून देखील त्यांचा राजकीय प्रभाव कायम आहे.

**३.५ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :**

देशात सहकारविषयक पहिला कायदा १९०४ साली संमत करण्यात आला. १९९२, १९९९, १९२५ या वर्षी निरनिराळे कायदे करून या कायद्यातील उणिवा दूर करण्यात आल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण पत सर्वेक्षण समिती (१९५४) व वैकुठलाल मेहता समिती (१९६०) यांच्या अहवालात व पंचवार्षिक योजनांच्या मसुद्यांत सहकाराचा सातत्याने पुरस्कार करण्यात आला आहे. देशातील पहिला सहकारी साखर कारखाना उभारण्यात आला. प्रवरानगर–लोणी (जि. अहमदनगर) येथे १९४९ मध्ये सुरू झाला. त्यानंतर अनेक क्षेत्रांमध्ये सहकारी तत्त्वाची आगेकूच चालू आहे. देशातील सहकारी चळवळीत आज महाराष्ट्र आघाडीवर आहे. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून खंबीर व गतिमान नेतृत्व लाभले. १९६० नंतरच्या कालखंडात राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनाने सहकारी चळवळीने उल्लेखनीय प्रगती केली आहे. ग्रामीण विकासाला चालना देण्याचा घोषित उद्दिष्टांव्यतिरिक्त तत्कालीन सभासद पक्षाचा, म्हणजेच काँग्रेस पक्षाचा पाया ग्रामीण भागात मुक्काम करणे हा त्या मागचे अघोषित उद्दिष्ट आहे. या चळवळीच्या निमित्ताने पक्षातील कार्यक्रमांना विधायक कार्य करायाची आणि त्याद्वारा स्थानिक स्तरावर दुसऱ्या फळीचे नेतृत्व निर्माण करण्याचाही मानस होता. ग्रामीण महाराष्ट्रातील ९०% पेक्षा अधिक सहकारी संस्था काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली असल्याने राज्यात राजकीय स्थित्यंतरे घडत असतानाही ग्रामीण भागात, विशेषत: ज्या भागात सहकारी चळवळीचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला आहे. त्या भागात काँग्रेस पक्षाचा पाया भक्कम राहीला आहे. याची प्रचिती सन १९९९, २००४ आणि २००९ सालच्या विधानसभा निवडणुकात आली आहे.

सहकारी संस्थांची रचना त्रिस्तरीय आहे. कृषि पत पुरवठा सहकारी संस्थांची संख्या सर्वाधिक आहे. गाव स्तरावर प्राथमिक सहकारी पतसंस्ता, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक आहे. त्याचप्रमाणे गाव स्तरावर प्राथमिक विपणन, सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, दुग्ध संकलन, सहकारी संस्था आणि बहुउद्देशीय सहकारी संस्था कार्यरत् आहेत. कोकण विभागात मच्छिमारांच्या सहकारी संस्था गाव स्तरावर कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त स्थानिक पातळीवर सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी भात

गिरण्याही मोठ्या संख्येत स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून स्थानिक नेतृत्व ग्रामस्तरीय अर्थकारण आणि राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित करतात.

**५.२ सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राचे राजकारण :**

महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी चळवळीने मोलाची भूमिका बजावलेली आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील सत्तेची विविध केंद्रे आपल्या ताब्यात ठेवण्यात सहकारी संस्थांचे पुढारी यशस्वी झालेले आहेत. म्हणून ग्रामीण भागात सहकारी संस्था या राजकीय सत्तेच्या शक्तिस्त्रोत समजल्या जातात. आज महाराष्ट्राचे राजकारण तीन आखाड्यात खेळले जाते. त्यातील पहिला आखाडा राज्यस्तरावरचे राजकारण हा आहे. दुसरा आखाडा पंचायतीराज्य संस्थांचे राजकारण हा आहे आणि तिसरा आखाडा सहकारी संस्थांचे राजकारण हा आहे. सहकारी संस्थांमध्ये साखर कारखान्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. कारण सत्तेच्या राकारणासाठी आवश्यक असणारी साधनसामग्री आणि लोकांचा पाठिंबा साखर कारखान्यांच्या मदतीने मिळविता येतो. सत्तेच्या राजकारणाचे हे तिन्ही आखाडे राजकीय सत्तेने नियंत्रित केलेले आहेत. या सर्व संस्थांच्या परस्पर व्यवहारामध्ये काँग्रेस पक्षाची भूमिका महत्त्वाची आहे. कारण महाराष्ट्रात राज्यस्तरावरची सत्ता काबी करावयाची असेल तर काँग्रेस पक्षाचा पाठिंबा असणे जरूरीचे असते. १९६० पासून महाराष्ट्राच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचेचे वर्चस्व आहे. राज्यातील सहकारी संस्थांचे राजकारण हे काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत गटबाजीच्या राजकारणाशी संबंधित आहे.

सहकारी चळवळ आणि महाराष्ट्राच्या राजकारणाचे विविध पैलू यांचे विवरण खालीलप्रमाणे आहेत.

**(१) सहकारी संस्था – नवीन सत्ता केंद्रे :** महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक विकासाचा कार्यक्रम राबवायला सुरूवात केली. शेती, सहकार, वीज, पाटबंधारे, यांचा विकास करून ग्रामीण भागात शेतमालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे करावेत असे त्यांचे मत होते राज्य व केंद्र सरकारांना ग्रामीण भागामध्ये विकास संस्थांचे जाळे निर्माण करावयाचे होते. त्यासाठी त्यांना लोकांचा पाठिंबा हवा होता. ग्रामीण भागातील लोकांची व कार्यकर्त्यांची कर्तृत्वशक्ती जागृत करून विकास प्रक्रिया त्यांना गतिमान करावयाच्या होत्या.

सहकारी चळवळीला यशवंतराव चव्हाणांनी महत्त्वाचे स्थान दिलेले होते. शेती क्षेत्रासाठी उपयुक्त अशा सहकारी पतसंस्था व सेवा सहकारी संस्था स्थापन करून ग्रामीण भागात प्रवेश करण्याचाही त्यांचा प्रयत्न होता. त्यातून ग्रामीण भागात आपली प्रभाव क्षेत्र निर्माण होतील, कर्तृत्ववान कार्यकर्ते निर्माण होतील आणि ग्रामीण भागाचा कायापालट होईल, असे त्यांचे मत होते या सहकारी चळवळीचा पायाभूत घटक म्हणून गावागावातील सेवा सहकारी सोसायट्या काम करतील असे त्यांचे मत होते. महाराष्ट्र सरकारने राज्यात सहकारी चळवळीच्या विकासाला मोठा हातभार लावला. कारण विकासाच्या प्रेरणा राज्यस्तरावरून व केंद्रस्तरावरून प्रवृत्त कराव्या लागणार होत्या. यशवंतरावांना असे वाटले की सहकारी संस्थांच्या साह्याने लोकांच्या मनात विकास प्रक्रियेबाबत जागृती निर्माण करता येईल आणि विकास कार्यासाठी ग्रामीण भागातील लोकांचा पाठिंबाही मिळविता येईल. त्याचप्रमाणे या संस्थांना लोकशाही स्वरूप देऊन ग्रामीण भागात मजबूत राजकीय पाया तयार करणेही शक्य होईल. त्यामुळे त्यांनी अनेक काँग्रेस पुढाऱ्यांना सहकारी क्षेत्रात सामील व्हावयास प्रवृत्त केले. सहकारी क्षेत्रातील लोकांना त्यांनी काँग्रेस पक्षात सामावून घेतले. विरोधी पक्षांतून काँग्रेसमध्ये आलेल्या अनेक पुढाऱ्यांना त्यांनी सहकारी संस्थात अधिकारपदे दिली. अनेकांना त्यांनी सहकारी साखर कारखाने काढावयास प्रवृत्त केले. थोडक्यात १९६० नंतर यशवंतरावांनी राजकीय सत्ता आणि प्रभाव संपादन करण्याचा एक नवा मार्ग या पुढाऱ्यांच्या पुढे खुला केला. सहकारी संस्था व पंचायती राज्य संस्थांच्या मदतीने ग्रामीण भागात प्रवेश करून नवीन प्रभाव क्षेत्रे व सत्ता केंद्रे निर्माण करणे आणि ग्रामीण जनतेला विकास कार्यामध्ये गुंतवणे ही दोन उद्दिष्टे यशवंतरावांना त्यामधून साध्य करावयाची होती.

सहकारी चळवळ राजकीय कार्यकर्त्यांसाठी उपयुक्त अशी चळवळ होती. कारण या संस्थांच्या साह्याने राजकीय कार्यकर्ते ग्रामीण भागात आपले प्रभाव क्षेत्र निर्माण करू शकत होते. आपल्या पाठीराख्यांचे व समर्थकांचे एक जाळे ते निर्माण करू शकत होते. त्यासाठी ते या समर्थकांमध्ये सत्ता व साधने यांचे वितरण करीत होते. शिवाय सहकारी संस्थांच्या जवळ जी साधनसामुग्री असते त्या साधनांचा ते निवडणुकीत वापर करू शकत होते. सर्व सहकारी संस्थांत सहकारी साखर कारखान्याजवळ साधनांची विपुलता होती. त्यामुळे बहुतेक राजकीय पुढाऱ्यांना सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यात जास्त रस होता.

**(२) जिल्हा मध्यवर्ती बँका :** निरनिराळ्या सहकारी संस्थांच्या विकास कार्यास आर्थिक मदत पुरविण्याचे काम जिल्हा मध्यर्ती सहकारी बँक करते. शेतकऱ्यांना कमी व्याज दरात अडचणीच्या वेळी कर्जपुरवठा करण्याचे कार्य ही बँक करते. पूर्वीच्या काळी या सहकारी बँका शहरी पुढाऱ्यांच्या हातात होत्या आणि त्यांचे कार्यक्षेत्र बरेचसे मर्यादित होते. परंतु ग्रामीण भागात शेतकऱ्यांना पतपुरवठा करणाऱ्या संस्थांतील मुख्य संस्था म्हणून तिला मान्यता मिळाल्यानंतर बँकाच्या कायद्यात अनेक बदल करण्यात आले. या बँकांचे मोठ्या प्रमाणात लोकशाहीकरण करण्यात आले. १९६० नंतर या बँका ग्रामीण भागातील राजकीय पुढाऱ्यांच्या ताब्यात आल्या. बँकांवर त्यांचे प्रतिनिधित्व वाढले. सरकारच्या अनेक योजना या बँकाच्याद्वारे राबविण्यात आल्या. शेतकऱ्यांना खते, बी बियाणे कर्जाऊ देण्यात आले. सहकारी साखर कारखाने स्थापन करण्यासाठीचे बीज भांडवल या बँकांच्या मदतीने गोळा करण्यात आले. सहकारी बँकांच्या कार्यक्षमतेमुळे राजकीय पुढाऱ्यांचे लोकांशी जवळचे संबंध प्रस्थापित झाले आणि त्यातून राजकीय पुढाऱ्यांची एक नवी फळी राजकारणात आली.

ग्रामीण महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मोलाची भूमिका पार पाडते. जिल्हा स्तरावर शेतकऱ्यांना कर्ज देणे, इतर अवजारांसाठी आर्थिक साह्य करणे, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना आर्थिक मदत देणे आणि साखर कारखान्यांच्या विविध विकास योजनांना मदत देणे इत्यादी गोष्टी जिल्हा बँक करते. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्षपद मिळविणे ही राजकीयदृष्ट्या महत्त्वाची बाब असते, कारण या अध्यक्षपदाच्या निमित्ताने ग्रामीण भागात कार्यरत असणाऱ्या विविध कार्यकर्त्यांचा परिचय होतो आणि बँकेच्या मदतीने आपल्या पाठीराख्यांचे व कार्यकर्त्यांचे जाळे निर्माण करता येते. त्यामुळे सर्वच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका राजकीय प्रभावाखाली आलेल्या आहेत. राजकीय गटबाजीचे केंद्र बनलेल्या आहेत.

**(३) सहकारी साखर कारखाने :** सहकारी साखर कारखाने ही महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची सर्वात उल्लेखनीय बाब आहे. सहकारी क्षेत्रातील पहिला साखर कारखाना विठ्ठलराव विखे–पाटील यांनी १९४९ साली महाराष्ट्रात प्रवरानगर येथे स्थापन केला. महाराष्ट्र राज्यातील १९४ साखर कारखान्यातील १६६ साखर कारखाने सहकारी

क्षेत्रात आहे. त्यातील ९२ कारखान्यात सन २००८ – ०९ च्या हंगामात उत्पादनाचे कार्य हाती घेण्यात आले. राज्यातील साखर कारखान्यांचे ७.५ लाख सभासद आहेत. त्यापैकी ६.९ लाख ऊस उत्पादक शेतकरी सभासद आहेत. राज्यात साखर कारखान्यामध्ये एकूण अंदाजे २,५०० कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक आहे आणि त्यांची वार्षिक उलाढाल ५००० कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. जळगाव, धुळे, नाशिक, औरंगाबाद, जालना, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांमध्ये सहकारी साखर कारखाने एकवटलेले आहेत. उसाची लागवड, रसायन उद्योग, वाहतूक व्यवसाय, शेतीतील यंत्रसामग्री, सहकारी बँका अशा अनेक व्यवसायांना साखर कारखान्यांनी चालना दिली आहे. दर कारखान्यामागे सरासरी सुमारे ७,७०० सभासद आहेत. त्यापैकी ९३% लघु वा सीमांत शेतकरी आहेत. गाळप हंगामात दर कारखान्यामागे सुमारे ५,००० व्यक्तींना रोजगार मिळतो. सहकारी साखर कारखान्यात १०% शेतकऱ्यांचे भांडवल, २५% राज्यसरकारने व ६५% वित्तीय संस्थांचे भांडवल असते.

राजकारणाचा विचार करता सर्व सहकारी संस्थांमध्ये सहकारी साखर कारखाने सर्वात जास्त महत्त्वाचे आहेत. कारण साखर कारखाने राजकीय सत्तेची केंद्रे आहेत. त्यामुळेच प्रत्येक साखर कारखान्याच्या अध्यक्षात आमदार, खासदार किंवा मंत्री व्हावयाचे असते किंवा प्रत्येक आमदार, खासदार व मंत्री आपला स्वत:चा असा कारखाना स्थापन करण्याची इच्छा बाळगून असतो. पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक महत्त्वाकांक्षी पुढाऱ्यांच्या नियंत्रणाखाली एक किंवा अधिक कारखाने असल्याचे दिसून येते. राज्यस्तरावरील राजकारणात 'शुगर लॉबी' चा प्रभाव सर्वज्ञान आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावरील राजकारणात सहकारी साखर कारखानदार निर्णायक भूमिका पार पाडतात.

सहकारी चळवळीतील मोक्याच्या बहुसंख्य जागा मराठा जातीतील पुढाऱ्यांना मिळाल्या. जैन, लिंगायत, लेवा पाटील वगैरे शेती क्षेत्रात मालमत्ता असणाऱ्या जातीतील पुढाऱ्यांनाही त्यात महत्त्वाच्या जागा मिळाल्या.

**३.६ सुक्ष्म स्तरीय राजकारणाचे स्वरूप :**

भारतीय शासनपद्धतीच्या अभ्यासकांच्या मते, 'केंद्र आणि राज्य सरकारातील फरक मूलभूत स्वरूपाचा नाही तो प्रमाणाचा आहे.'' ("The difference between the Union and the State Government is one of the degree rather than kind") भारतीय शासन पद्धतीत राज्यसरकारे केंद्रसरकारची प्रतिकृती Replica किंवा प्रतिबिंब Reflection

आहे असे म्हटले जाते. सदर संशोधनाच्या संदर्भात महाराष्ट्राचे राजकारण समग्रस्तरीय आणि स्थानिक पातळीवरील राजकारण सुक्ष्मस्तरीय आहे. याचाच अर्थ सुक्ष्म स्तरीय राजकारण हे समग्र स्तरीय राजकारणाची प्रतिकृती असली, तरी तिची स्वत:ची काही वैशिष्ट्ये आहेत.

महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली, तर स्थानिक स्तरावरील शासकीय यंत्रणा असलेल्या त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्थेची स्थापना १ मे १९६२ रोजी करण्यात आली. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यातील पहिली सार्वत्रिक निवडणूक १९६२ साली संपन्न झाली. त्याच प्रमाणे महाराष्ट्र राज्यातील पंचायती राज संस्थांच्या निवडणूका १९६२ साली आयोजित करण्यात आल्या. राज्य स्तरावर सत्ता संपादन करण्यासाठी अनेक राजकीय पक्ष निवडणूकीत सहभागी झाले असले तरी इ. स. १९९० पर्यंत राज्याच्या राजकारणावर काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व होते. त्याचप्रमाणे इ. स. १९९२ पर्यंत काही अपवाद वगळता पंचायती राज संस्था काँग्रेस पक्षाच्या नियंत्रणाखाली होत्या. शिवसेना–भारतीय जनता पार्टी युतीने १९९० साली काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला आव्हान दिले. त्याचप्रमाणे १९९२ साली स्थानिक स्तरावर काँग्रेस पक्षाच्या वर्चस्वाला आव्हान काँग्रेसेतर पक्षांनी उभे केले. १९९५ साली काँग्रेस पक्षाने राज्य स्तरावर सत्ता गमावली. त्याचप्रमाणे १९९७ सालच्या पंचायती राजसंस्थाच्या निवडणुकात, काही जिल्हा परिषदा व पंचायती समित्या काँग्रेस पक्षाने गमावल्या. १९९९ साली काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या लोकशाही आघाडीने सत्ता जरी काबीज केली असली तरी शिवसेना–भाजपाचे आव्हान त्यांच्यासमोर कायम राहिले आहे. या राजकीय परिस्थितीची प्रचिती स्थानिक स्तरावर देखील येते. सदर संशोधनात ज्या जिल्ह्यातील सुक्ष्मस्तरीय राजकारणाचा अभ्यास करण्यात आला आहे, त्या रायगड जिल्ह्यात शेतकरी कामगार पक्ष १९९७ सालापासून शिवसेनेच्या पाठिंब्याने सत्तेवर आहे.

राज्यस्तरीय राजकारणाप्रमाणेच जिल्हा परिषदा व पंचायती समित्यांचे राजकारण पक्षाधिष्ठित आहे. सुरूवातीच्या काळात ग्राम पंचायतीच्या निवडणूका पक्ष–निरपेक्ष असत. मात्र गेल्या दोन दशकांत राजकीय पक्षांद्वारा पुरस्कृत उमेदवार ग्राम पंचायतींच्या निवडणूकात सहभागी होतात किंवा निवडणूक संपन्न झाल्यानंतर जिल्हा किंवा तालुक्यातील प्रभावी राजकीय पक्षांच्या छत्रछायेत जातात. याचाच अर्थ समग्र स्तरावरील राजकारणाप्रमाणेच सुक्ष्मस्तरीय राजकारण राजकीय पक्षांच्या नियंत्रणाखाली संपन्न होत असते. त्यातील उल्लेखनीय तफावत् म्हणजे ग्राम स्तरावरील एका गटाने ज्या पक्षात

सामील व्हायचा निर्णय घेतला असेल, तर प्रतिस्पर्धी गट त्याच्या विरोधी पक्षाचे अधिपत्र स्वीकारतो. १९९० नंतरच्या कालखंडात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शिवसेना–भाजपा युतीचा वेगाने प्रसार होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे काँग्रेस पक्षातील असंतुष्ट गटांना या पक्षांच्या माध्यमातून आपल्या राजकीय आकांक्षा साकार करण्याचे, म्हणजेच सत्ता काबिज करण्याचे एक प्रभावी माध्यम उपलब्ध झाले.

या आधी नमूद केल्याप्रमाणे राज्यस्तरीय राजकारण जातीनिष्ठ आहे. मराठा–कुणबी जाती समूहाचे राज्यस्तरीय राजकारणावरील वर्चस्व याची प्रचिती देते. मात्र मराठा–मराठेतर वाद १९७० च्या दशकात निर्माण झाल्याने, मराठेतर जातींचा सत्ता स्थानातील वाटा उत्तरोत्र वाढत गेला आहे. ज्याप्रमाणे मराठा–कुरबी जातीसमूह राज्य स्तरावर प्रभावी आहे, त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावर विशिष्ट जातीसमूह प्रभावी असल्याचे दिसून येते. म्हणजेच राज्याच्या ज्या जिल्ह्यांत व तालुक्यांत मराठेतर जातींचे संख्याबळ अधिक आहेत, त्या जिल्हा परिषदा व पंचायती समित्यात माळी, धनगर, कोळी, लिंगायत, वंजारी, आगरी इत्यादी जातींच्या नेतृत्वाचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. स्थानिक, म्हणजेच गाव स्तरावर हे राजकीय वास्तव्य अधिक व्यापक प्रमाणात दिसून येते.

समग्र स्तरीय राजकारण बव्हतांशी पक्षाधिष्ठित असले, तरी पक्षांतर्गत राजकारणाचा केंद्रबिंदू प्रभावी नेता आणि त्याचे प्रतिस्पर्धक असतात. म्हणजेच पक्षांतर्गत गटबाजी आणि त्यांच्यातील सत्ता स्पर्धा दोन किंवा अधिक प्रभावी अभीजनांच्या समर्थकांमध्ये होत असते. महाराष्ट्राच्या राजकारणात आज सत्तारूढ असलेल्या काँग्रेस पक्षात अशोकराव चव्हाणांचा गट आणि त्यांचे प्रमुख प्रतिस्पर्धी असलेल्या विलासराव देशमुख, नारायणराव राणे आणि पतंगराव कदम यांचे गट क्रियाशील असल्याचे दिसून येते. जिल्हा आणि तालुका स्तरावर अशाच प्रकारची व्यक्तीनिष्ठ पक्षांतर्गत गटबाजी दिसून येत. ग्रामस्तरावरील राजकारण हे अधिक व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचे असल्याचे दिसून येते. त्याचा केंद्रबिंदू गावातील एक किंवा अधिक राजकीय घराणी असल्याचेही दिसून येते. अशा प्रभावी व्यक्तींचे अनुयायी एकत्र येतात आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुका लढवतात. काही गावांत विशिष्ट घराण्याचे निर्विवाद वर्चस्व असल्याने, ग्रामपंचायत प्रदीर्घ काळ त्या घराण्याच्या नियंत्रणा खाली राहतात. असा नेता गावाचा 'सर्वेसर्वा' असतो. मात्र

प्रभावी घराण्यात भाऊबंदकी निर्माण झाल्यास, 'थोरली पाती' आणि 'धाकटी पाती' यांच्यात सत्तासंघर्ष उद्‌भवतो. तसेच एकाच कुटुंबाकडे प्रदीर्घ काळ सत्ता राहील्याने, असंतुष्ट एकत्र येतात आणि त्यांच्यासमोर राजकीय आव्हान उभे करतात. याचाच अर्थ ग्राम पातळीवरील राजकारण हे व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचे असते.

उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण हा ग्रामस्तरीय राजकारणाचा निर्णायक घटक असतो. राज्यस्तरीय राजकारणात 'शुगर लॉबी' स स्वीकृत नसलेला आणि पक्षश्रेष्ठींनी लादलेला मुख्यमंत्री हा नेहमीच अस्थिर असतो आणि 'शुगर लॉबी' च्या दबावाखाली पक्षश्रेष्ठींना मुख्यमंत्री बदलावा लागतो, याची प्रचिती महाराष्ट्राच्या राजकारणात वारंवार आली आहे. ग्रामीण राजकारणात हे राजकीय वास्तव अधिक प्रकर्षाने जाणवते. कृषिप्रधान अर्थव्यवस्था असलेल्या ग्रामीण भागात पूर्वीच्या काळी वतनदार आणि १९६० च्या दशकानंतर श्रीमंत शेतकऱ्यांचे निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक आणि भूमीहिन शेत मजूरांची संख्या अधिक असली तरी ते मोठ्या श्रीमंत शेतकऱ्यांचे आश्रीत असतात. त्यांच्या विरोधात जाणे त्यांना परवडणारे नसते. ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर महिला आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सत्तास्थाने प्राप्त करण्याची संधी उपलब्ध झाली असली, तरी पारंपारिक राज्यकर्त्यांचा 'प्रभाव' कायम आहे. त्यांच्याशी या नव–नेतृत्वाला जुळवून घ्यावे लागते. राजकीय तडजोड करण्यास नकार देणाऱ्या महिला सरपंचांना अधिकारपदे गमवावी लागली आहेत. म्हणजेच उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण असलेल्या वर्गाकडे सत्ता असली किंवा नसली, तरी ग्रामस्तरीय राजकारणावर हाच वर्ग वर्चस्व गमावतो.

• • •

## संदर्भसूची


१) **पंडित ग. शा., पंचायत राज्य आणि ग्रामीण महिला,** सुगावा प्रकाशक पुणे, मे १९९९, पृ. १

२) **डॉ. विजया देशपांडे, प्रा. मोरेश्वर बर्दापूरकर, भारतीय सामाजिक संरचना,** विद्या बुक पब्लिशर्स औरंगपूरा, ओरंगाबाद. ९ जुलै १९९८. पृ. २३०.

३) **डॉ भालबा विभूते, पंचायत राज्यव्यवस्था,** मनोविकास प्रकाशन मुंबई. नवी सुधारित आर्वत्ती २००४ पृ ९

४) **प्रा. अनंत वासुदेव वाईकर–भारत सरकार आणि भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था,** निराळी प्रकाशन, पुणे. ऑगस्ट १९९९ पृ. १७३, १७४

५) कित्ता पृ. १७४

६) कित्ता पृ. १७४, १७५

७) **डॉ. भालबा विभूते, पंचायत राजव्यवस्था,** उनि पृ. ९

८) कित्ता पृ. ९, १०

९) कित्ता पृ. १०

१०) कित्ता पृ. ११

११) **प्राचार्य पी. बी. पाटील, पंचायत राज्यातून लोक–स्वराज्याकडे,** प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी पृ २१

१२) **प्रा. अनंत वासुदेव वाईकर**–भारत सरकार. उनि पृ. १९४

१३) कित्ता पृ. १९५

१४) कित्ता पृ. १९४, १९५

१५) **डॉ. अशोक जैन, महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण,** शेठ प्रकाशन, दुसरी आवृत्ती (२००२) पृ. २५६

१६) कित्ता पृ. २७६ – २७७

१७) कित्ता पृ. २७७ – २७८

१८) कित्ता पृ. २७९ – २८०

१९) कित्ता पृ. २८३ – २८६


* * *

# ४. रायगड जिल्ह्याचा संक्षिप्त परिचय

**४.१ प्रास्ताविक :**

राजकीय प्रक्रिया घडत असताना उत्तरोत्तर तिच्यामध्ये बदल घडत असतात. ही प्रक्रिया ऐतिहासिक पार्श्वभूमीवर घडत असते. ही प्रक्रिया ज्या भौगोलिक क्षेत्रात घडत असते त्या भौगोलिक क्षेत्रातील सामाजिक व आर्थिक जडणघडण त्याला कारणीभूत असते. समाजातील जातीय बदल व आर्थिक बदल खऱ्या अर्थाने राजकारणाला दिशा देत असतात. रायगड जिल्ह्यातील राजकीय प्रक्रियेची जडणघडण या पर्यावरणीय घटकांमुळे झाली आहे. या प्रक्रियेचे अर्थपूर्ण स्पष्टीकरण करण्याच्या उद्देशाने या प्रकरणात रायगड जिल्ह्याचा संक्षिप्त परिचय करून देण्यात आले आहे.

**४.२ ऐतिहासिक पार्श्वभूमी :**

अरबीसमुद्र व सह्याद्री दरम्यान असलेला उत्तरेकडील दमणापासून दक्षिणेकडील गोव्यापर्यंतचा किनारपट्टीचा प्रदेश कोकण म्हणून ओळखला जातो. कालांतराने त्याचे उत्तर व दक्षिण कोकण असे भाग पडले. सूरत जिल्ह्याच्या दक्षिणेपासून रत्नागिरी जिल्ह्याच्या उत्तरेपर्यंतचा प्रदेश उत्तर कोकणात मोडतो. म्हणजे रायगडचा प्राचिन इतिहास हा **उत्तर कोकणचा इतिहास होय.** उत्तर कोकणास 'अपरान्त' (दक्षिणेकडील शेवटचे टोक) असे ऐतिहासिक नाव आहे. प्राचिन ग्रंथात इ.स.पू. चौथ्या शतकापासून कोकणचा उल्लेख आढळतो. उत्तर कोकणचा इतिहास म्हणजे प्रामुख्याने तेथिल बंदरे, खाड्या व देशी–विदेशी लोकांबरोबर होत असलेल्या व्यापारी, सांस्कृतिक संबंधाचा इतिहास होय. इ.स. पूर्व ३ ऱ्या शतकात अशोक मौर्याच्या कारकिर्दीत सोपारा हे मोर्य साम्राज्यातील एक मोठे बंदर होते. मौर्याच्या राजकीय धोरणामुळे उत्तर कोकणात केवळ बौद्ध धर्मप्रचारच नव्हे तर व्यापारी मोठ्या प्रमाणात सुधारण्याचे अनेक पुरावे सापडतात.

**कोकणचे मौर्य –** मौर्य सूकेतूवर्यन याने इ. स. चौथ्या शतकाच्या अखेरीस उत्तर कोकणात आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले, त्यामुळे त्यानंतरच्या काळातील मौर्य शास्त्रज्ञ कोकणचे मौर्य किंवा उत्तरकालीन, रायगडचे मौर्य या नावाने इतिहासात ओळखले जातात. इ. स. चौथ्या शतकाच्या अखेरीस स्थापन केलेले कोकणातील मौर्याचे राज्य ७ व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत अस्तित्वात आल्याची माहिती बदामिचा चालुक्य सम्राटाच्या शिलालेखातून प्राप्त होते.

**चालुक्य –** चालुक्याचा सर्वात प्रभावी राजा दुसरा पुलकेशी (इ. स. ६१०–६४९) याने कर्नाटकचे कर्दळ यांचा पराभव करून आपली सत्ता येथे विस्तारली. चालुक्य विक्रमादित्याचा पुत्र दुसरा किर्तीवर्मा याच्या कारकिर्दीत अनेक प्रांताधिकारी मांडलीकाच्या उत्कर्षामुळे उत्तर कोकणात मोठा गोंधळ निर्माण झाला. त्याचा फायदा घेवून इ. स. आठव्या शतकाच्या मध्यावर राष्ट्रकुटांनी अनेक मांडलीकांचा पराभव केला, चालुक्याने राजकीय वर्चस्व नष्ट होऊन तेथे राष्ट्रकूट सत्तेची स्थापना झाली.

**सातवाहन :** मौर्यसाम्राज्यानंतर व्यापाराकरिता लागणारी राजकिय स्थिरता व शांतता सातवाहन काळात आल्याचा पुरावा म्हणजे त्या काळातील व्यापारी मार्गावरील बौद्ध लेणी होत. सातवाहनांनी त्यांच्या पैठण राजधानीपासून नाणेघाटातून कल्याण बंदरापर्यंत व्यापारी मार्ग तयार केला. बोरघाटातून चौल बंदराशी व्यापारी संबंध केले. सातवाहन व क्षत्रयांचा प्रदिर्घ संघर्ष केवळ राजकिय नव्हता, व्यापारी मार्ग व आंतरराष्ट्रीय बंदरे आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्यासाठीच अखंड प्रयत्न झाले. ऐतिहासिक दृष्ट्या प्राचीन रायगड जिल्ह्याचे ज्ञात राज्यकर्ते सातवाहनच होत. इ.स. पहिल्या शतकातील सातवाहन राजा 'हाल' याने संकलीत केलेला प्राकृत भाषेतील 'गाभा सप्तशनी' हा काव्यसंग्रह महाराष्ट्राच्या मानवी जीवनाचे यथार्थ–मोहक वर्णन करणारे आहे. ही प्राकृत भाषा मराठीची जननी मानतात. प्राचीन रायगडचा प्रभावी शेवटचा सातवाहन राजा म्हणजे यजसी होय. यजसी नंतर सातवाहनांच्या आपसातील मतभेदांमुळे अनेक शाखा बनल्या. व शेवटी सातवाहनांचे साम्राज्य इ.स. २२५ च्या आसपास संपुष्टात आले.

**राष्ट्रकुट –** दन्तिदुर्गानंतरचे उत्तर कोकणातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रावर राज्य असल्याचे दिसले. त्याच्यानंतर त्याचा चुलता कृष्ण (प्रथम) गादीवर आला. (इ.स. ७५६) त्याने पश्चिम चालुक्यांचा पूर्ण नाश केला. खारेपाटण येथिल ताम्रपटात शिलाहार सगफुल यास कृष्ण (प्रथम) ने दिला. (येथिल प्रवेश) म्हणजेच त्याची संपूर्ण कोकणावर सत्ता होती असे दिसते. गोविंद (तृतिय) हा राष्ट्रकुटांचा सर्वात बलशाली राजा होता. उत्तर कोकणावर राज्य करणारा शेवटचा पराक्रमि राष्ट्रकुट नृपती म्हणजे कृष्णराव (तृतिय) होय. राष्ट्रकुटांच्या अखेरच्या काळातील उत्तर कोकणच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रमुख लक्षण म्हणजे पौराणिक हिंदू धर्माची वाढ.

**शिलाहार :** आठव्या शतकापासून पश्चिम भारतावर राष्ट्रकुटांचे मांडलिक असलेल्या तीन शिलाहार राजघराण्यांचा अंमल होता. इ.स.८०० ते १२५० पर्यंत उत्तर कोकणवर दुसऱ्या घराण्याने राज्य केले. या उत्तर कोकणची राजधानी ठाणे होती. या शाखेचा

संस्थापक कपर्दी (प्रथम) (इ.स.८०० ते ८२५) हा राष्ट्रकुट नृपती गोविंद (तृतीय) यांच्या अनेक लढायांमधील श्रेष्ठ सेनापतींपैकी एक होता. त्याच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल त्यास उत्तर कोकणची राजसत्ता बक्षिस म्हणून दिली असावी. काही पीढी नंतरच्या छिबराजाचा विद्या व कलांना उदार आश्रय होता. अंबरनाथ येथिल सुंदर आणि भव्य शिवमंदिर बांधण्यास त्याने आरंभ केला होता. त्याचा धाकटा भाऊ मुम्मुमिराज याच्या कारकीर्दीत मंदीर पूर्ण झाले. ते वास्तुशास्त्राचा उत्तम नमुना आहे.

याच्या कारकीर्दीत शिलाहारांच्या सत्तेला उतरती कळा लागली. शिलाहारांची सत्ता दुर्बल झाल्यावर संजानचे त्यांचे मोठ वंशी सामंत स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करू लागले आणि शिलाहारांची बिरूदे स्वत: धारण करू लागले. गोव्याच्या कदंबांनी उत्तर कोकण जिंकून काही काळ आपल्या ताब्यात ठेवला असावा. कारण काही लेखांत त्याला 'कोकणाधिपती' म्हटले आहे. कदंबांनी काही अरबांना आपले मंत्री नेमून त्यांना ग्रामदाने दिली होती. शिलाहारांच्या अनेक लेखांत त्या काळातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकिय स्थितीवर प्रकाश पडतो. बहुतेक शिलाहार राजे राष्ट्रकुटांचे, चालुक्यांचे, परमारांचे किंवा कदंबांचे मांडलिक होते, तरीपण त्यांना बऱ्याच सवलती व स्वातंत्र्य होते. या राज्यात हिंदू, बौद्ध व जैन धर्म मोकळेपणाने नांदत होते. शिलाहार प्रामुख्याने शैव पंथिय होते हे त्यांच्या अंबरनाथ येथिल शिवमंदीर व खारेपाटण ताम्रपटातील शिवाचे उल्लेख यावरून दिसते.

**मध्ययुग :** देवगिरीच्या यादवांची राजवट संपुष्टात आल्यानंतर (१३१८) येथे मुस्लीम राजवट आली. मात्र कोकणात, रायगडात ही राजवट येण्यास बराच काळ लागला. कुलाबा जिल्ह्याचा काही भाग १३७७ पर्यंत विजयनगरच्या राजवटी खाली होता.

कुलाबा जिल्ह्यातील कोळी लोकांनी काही भागांवर आपली छाप बसविली. या प्रदेशावर मुख्यत्वे स्थानिक सत्ताधारी अधिकार चालवीत असावेत. नागोठणे येथे असेच एक अधिकार केंद्र होते. रायरी किंवा रायगडावर मराठा पाळेगारांची सत्ता असून ते विजयनगरच्या राजवटी खाली होते. १३९० च्या सुमारास बहमनींनी कोकणातील बऱ्याच बंदरांवर ताबा मिळविला. त्यांनी १४२९ मध्ये कोकण किनारा जिंकला. पण पूर्ण कोकणावर त्यांना ताबा मिळविला आला नाही. मलीक अहमद बदमनीने मात्र कोकण व घाटावरील किल्ले जिंकून घेतले व कुलाबा जिल्हा आपल्या राज्यास जोडला. १४८९ मध्ये कुलाबा जिल्ह्याचा काही भाग बहमनींकडे तर काही भाग गुजरातच्या सुलतानाकडे होता. (नागोठणे, चौल)

अहमदनगरच्या निजामशहाकडे पंधराव्या शतकात कुलाबा जिल्ह्याचा अंतर्गत भाग बहमनींकडून गेला. १५०९ मध्ये चौलचे स्वामित्व गुजरातच्या सुलतानाकडून पोर्तुगिजांकडे गेले. पोर्तुगिजांनी आपले स्थान बळकट करण्यासाठी व्यापारावर ताबा मिळविला. व्यक्तिगत धर्मांतर करण्यासही सुरूवात केली. सोळाव्या शतकात चौलला पुन्हा महत्त्व प्राप्त झाले. चौलचे व्यापारी महत्त्व ओळखून निजामाच्या अनुमतीने पोर्तुगिजांनी तेथे व्यापारी केंद्र, वखारी स्थापन केल्या. परिणामी चौल येथून परदेशी व्यापार तेजीत आला. पण तेथे साठत गेलेल्या गाळामुळे सागरी वाहतुक सोयीची न राहिल्याने, १५२१ मध्ये पोर्तुगिजांनी अहमदनगरच्या सुलतानाकडून रेवदंडा येथे किल्ला बांधण्याची परवानगी मिळविली.

साधारणपणे १५ व्या शतकाच्या मध्यास (१४३७) अैबिसिनिया आणि इतर पूर्व आफ्रिकेतील लोक मोठ्या प्रमाणावर पश्चिम भारतात येवू लागले. अरब अलहवीश येथून ईशान्य आफ्रिकेतून येणारे हे लोक ''हबशी'' म्हणून ओळखले जात त्यांना सीदी असेही म्हणत. सय्यद या नावाचा अपभ्रंश असल्याचे काही मानतात. त्यांनी तिकडून गुलाम विकत आणले. तसेच आफ्रिकेतील निग्रो लोकांनाही आणले. त्यांनी भारतीयांशी विवाह केल्याने निराळी व्यक्तीमत्व दिसणारी जमात स्वतंत्र अशी तयार झाली. अल्पावधीतच हबशी लोक धाडसी, दर्यावर्दी म्हणून परिचित झाले. निजामशाहीचा पाया घालणारा मलीक अहमद (१४५०–१५०८) याने सर्वप्रथम जंजिऱ्याच्या जलदुर्गचा प्रमुख म्हणून अॅबॅसिनियस सरटाटाची नियुक्ती केली. जंजिऱ्यातील कोळी व शिबंदीतील सैनिकांना साखळदंडांनी बांधुन समुद्रात फेकून दिले. १६३६ मध्ये शाहजहानने अहमदनगरची निजामशाही नष्ट करेपर्यंच दंडा, राजपुरीसह कुलाबा अहमदनगरच्या राजाकडे ठेवला. मोगलांनी निजामशाही नष्ट केल्यानंतर आदिलशाहीशी झालेल्या करारानुसार १६३६ मध्ये रायरी आणि त्याच्या सभोवतालचा प्रदेश आदिलशहाकडे पुन्हा आला.

आदिलशहाने १६३६ ते १६४४ दरम्यान सिद्धी घराण्यातील इब्राहीम, सय्यद कब्बरी व शेख अली यांना मुरूड जंजिराचे हवालदारीचे हक्क दिले. चंद्रराव मोरे यांच्याकडे रायरी परिसराची वतनदारी देण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६५६ च्या सुमारास चंद्रराव मोरे यांचा पराभव करून रायरी व त्याच्या सभोवतालचा प्रदेश काबीज केला. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायरीचे रायगड असे नामकरण केले आणि स्वराज्याची राजधानी रायगड येथे स्थापन करण्याचा मानस व्यक्त केला.

शिवाजी महाराजांनी १६६२ मध्ये कायमच्या राजधानीसाठी रायगडची निवड केली.

१६७४ मध्ये रायगड येथे शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यांच्या मृत्यूनंतर १६८९ पर्यंत हा परिसर छत्रपती संभाजीच्या ताब्यात होता, पुढे १६८९ मध्ये मोगलांनी तो घेतला. १७३५ मध्ये मराठ्यांनी तो प्रदेश मोगलांकडून पुन्हा संपादन केला.

**आधुनिक युग :** मराठ्यांचा पराभव करून ब्रिटीश लष्करी अधिकारी कर्नल प्रॉथरने १० मे १८१८ रोजी रायगड परिसर काबीज केला. १८१८ ते १९४७ या कालखंडात ब्रिटीश राजवटीतील मुंबई इलाख्यातील कुलाबा जिल्हा म्हणून हा परिसर ओळखला जात असे. १ जानेवारी १९८१ साली कुलाबा जिल्ह्याचे रायगड असे नामकरण करण्यात आले. कुलाबा हे नाव भौगोलिक असून शब्द व्यत्पत्तीशास्त्रानुसार कुलाबा म्हणजे समुद्रात गेलेली जमिनीची दांडी अथवा भूशिर, शिवाजी महाराजांनी अलिबाग नजिक बांधलेल्या कुलाबा किल्ल्याच्या जागी अशी दांडी अथवा भूशिर असल्या कारणाने किल्ल्यास हे नाव पडले. किल्ल्याच्या नावावरून जिल्ह्यास कुलाबा हे नाव प्राप्त झाले.

**४.३ भौगोलिक स्थान आणि वैशिष्ट्ये :**

महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागातील कोकण विभागात रायगड जिल्हा आहे. जिल्ह्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र पसरलेला असून पूर्वेस सह्याद्री पर्वतरांगा व त्याला लागून पुणे जिल्हा पसरलेला आहे. या जिल्ह्याच्या दक्षिणेस रत्नागिरी जिल्हा असून आग्नेयेस सातारा जिल्हा आहे. ठाणे जिल्हा या जिल्ह्याच्या उत्तरेस आहे. जिल्ह्याच्या नैसर्गिक सीमा सांगावयाच्या झाल्यास जिल्ह्याची पश्चिम सीमा अरबी समुद्राने निश्चित केल्याचे, पूर्व सीमा सद्याद्री पर्वतरांगांनी सीमित केल्याचे तर दक्षिण सीमेचा काही भाग बाणकोटची खाडी व काही भाग सह्याद्रीच्या रांगा यांनी सीमित झालेला आहे. उत्तरेकडे जिल्ह्यास नैसर्गिक सीमा नाही. हा जिल्हा १७.५१ ते १९.८० उत्तर अक्षांश आणि ७२.५१ ते ७३.४० पूर्व रेखांश या भौगोलिक पट्ट्यात वसला आहे. जिल्ह्याचा दक्षिण–उत्तर विस्तार सुमारे १६० कि.मी. असून पूर्व–पश्चिम विस्तार अंदाजे ५० कि.मी. आहे या जिल्ह्यास एकूण २४० कि.मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला असून किनाऱ्यालगत खांदेरी–उंदेरी–घारापुरी, करंजा, कासा, कुलाबा, जंजिरा अशी अनेक लहानमोठी बेटे आहेत. राज्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी २.३२ टक्के क्षेत्र या जिल्ह्याने व्यापलेले आहे. म्हणजेच जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१४८ चौ. किमी इतके आहे. (नकाशा क्र. ४.१ ते ४.४)

जिल्ह्याच्या पूर्व सीमेवर सह्याद्रीच्या उंच रांगा आहेत. या पर्वत शिखरांची उंची

साधारणपणे ४०० मीटर ते २००० मीटर आहे. हा खडकांचा उभा भाग व किनारपट्टी या मधला प्रदेश एकमेकांना समांतर अशा असंख्य डोंगरांचा आहे. त्यामुळे सह्याद्रीतून उगम पावलेले पाण्याचे प्रवाह एकमेकांना समांतर असे वाहत येऊन खाडीच्या स्वरूपात समुद्राला मिळतात.

जिल्ह्याची एकूण भौगोलिक रचना लक्षात घेता त्याचे तीन स्वाभाविक विभाग पडतात. १) सह्याद्री पट्टी व त्याचा उताराचा भाग म्हणजेच पूर्वेकडील डोंगराळ प्रदेश ज्यामध्ये डोंगरमाथे व सभोवतालचा १५ कि.मी. पर्यंतचा प्रदेश २) वलाटी म्हणजेच मध्यभाग ज्यामध्ये सह्याद्री पर्वताच्या पायथ्यापासून १५ कि.मी. अंतरानंतरचा आणि किनारपट्टीपासून १० ते १५ कि.मी. अंतराच्या प्रदेशाचा समावेश होतो. ३) खलाटी– म्हणजेच किनारपट्टी व त्यालगतचा भू–भाग होय. हा पट्टा समुद्रकिनाऱ्यापासून जवळजवळ १५ कि.मी. दूर आहे.


**नकाशा क्रमांक ४.१ रायगड जिल्ह्याचे भौगोलिक स्थान**




## नकाशा क्रमांक ४.२ कोकण विभागात रायगड जिल्ह्याचे स्थान



नकाशा क्रमांक ४.३ रायगड जिल्हा



## नकाशा क्रमांक ४.४ रायगड जिल्हा प्रमुख रस्ते व लोहमार्ग



**३.२ भौगोलिक वैशिष्ट्ये :** रायगड जिल्ह्याची ठळक भौगोलिक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

**१) मृदा :** जिल्ह्याच्या मध्यभागातील सखल मैदानी प्रदेशात गाळाची व सुपीक मृदा असून किनारी रेती वाळूमिश्रित मृदा आहे. जिल्ह्याच्या पूर्वेकडील डोंगराळ भागात 'लॅटेराईट' प्रकारची माती आढळते. सर्वसाधारणपणे जिल्ह्यातील जमिनीचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

१) जंगलव्याप्त जमीन, २) वरकस जमीन, ३) भात जमीन, ४) खार जमीन, ५) समुद्र व नदी किनाऱ्यालगतची गाळाची जमीन, ६) लॅटेराईट जमीन.

**२) पर्जन्यमान :** जिल्ह्यातील सर्वसाधारण पावसाचे प्रमाण ३००० मि.मि. आहे. जिल्ह्याच्या सर्व भागात सारखा पाऊस पडत नाही. समुद्रकिनाऱ्यापासून सह्याद्री पर्वताकडे पावसाचे प्रमाण वाढत जाते. सह्याद्री पर्वताच्या उंच भागात अधिक पाऊस पडतो. तसेच जून ते ऑक्टोबर या पाच महिन्यातल्या कालावधीत पाऊस पडतो. तथापि पावसाचे प्रमाण जुलै महिन्यात सर्वाधिक असते. मागील दहा वर्षातील सरासरी पर्जन्यमान ३४४८ मि.मि. आहे.

**३) हवामान :** हा समुद्रकिनाऱ्या लगतचा जिल्हा असल्याने येथील हवामान उष्ण व दमट असते. जिल्ह्यात उन्हाळा, पावसाळा व हिवाळा असे तीन तू असतात. या तीनही तूमध्ये वातावरणात मोठा फरक जाणवत नाही. महत्तम तापमान ३४°३५ अंश सेंटीग्रेड असून न्यूनतम तापमान १९ अंश सेंटीग्रेड इतके असते.

**४) वनसंपत्ती** : जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जवळजवळ एक चतुर्थांश क्षेत्रावर वनसंपत्ती आढळते. जिल्ह्यातील १५२, ६३५ हॅक्टर क्षेत्र जंगल व्याप्त आहे. या व्यतिरिक्त ७५६ हॅक्टर क्षेत्र सामाजिक वनीकरणाखाली आहे. पेण, पनवेल, कर्जत, रोहे आणि सुधागड या तालुक्यांत वनांचे प्रमाण अधिक आहे. या वनांमध्ये साग, ऐन, खैर, आंबा, चिंच यांसारखे वृक्ष आहेत. पनवेल तालुक्यात कर्नाळा येथे पक्ष्यांसाठी राखीव असलेले अभयारण्य आहे. उरण तालुक्यात घारापुरी बेटावर व कर्जत तालुक्यात माथेरान येथे वनोद्याने आहेत. जिल्ह्यातील फणसाड येथे अभयारण्य अतिशय विस्तृत क्षेत्रावर पसरलेले आहे.

**५) सागर संपत्ती :** जिल्ह्याला सुमारे २४० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. साहजिकच मत्स्यव्यवसाय हा जिल्ह्यातील एक प्रमुख व्यवसाय आहे. जिल्ह्यात खाऱ्या पाण्यातील सुरमई, बांगडा, रावस, पापलेट, कोलंबी, पेडवे इत्यादी प्रकारच्या माशांची पकड मोठ्या प्रमाणावर होते. खाजणांमध्ये कोलंबीची शेतीही केली जाते. काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणात गोड्या पाण्यातील मासेमारी केली जाते. अलिकडील काळात मासेमारीसाठी यांत्रिक नौकांचा वापर व प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल तालुक्यात मिठागरे आहेत. मासे व मीठ ही समुद्रापासून मिळणारी उत्पन्ने आहेत.

**६) जलसंपत्ती :** गंगाघटी, सूर्या, सावित्री, कुंडलिका, काळ, पाताळगंगा, उल्हास, अंबा आणि भोगावती या जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत त्या सह्याद्री पर्वतरांगांत उगम पावतात आणि अरबी समुद्रात जाऊन मिळतात.

**४.४ लोकसंख्या व तिची वैशिष्ट्ये :**

२००१ च्या जनगणनेनुसार रायगड जिल्ह्याची लोकसंख्या २२.७ लाख ईतकी आहे. त्यापैकी पुरूषांचे प्रमाण ५०.६१ टक्के तर महिलांचे प्रमाण ४९.३८ टक्के आहे. जिल्ह्यामध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण २४.२२ टक्के आहे तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ७५.७७ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण साक्षरता ६६.४ टक्के आहे. ग्रामीण साक्षरता ६३.६ टक्के असून ग्रामीण पुरूषांमधील साक्षरतेचे प्रमाण ५६.५ टक्के व महिलांमधील साक्षरतेचे प्रमाण ४३.४८ टक्के आहे. जिल्ह्यात अनुसूचित जमातीची लोकसंख्या १२.१८ टक्के असून कातकरी, महादेव कोळी, ठाकूर आणि वारली या भागातील अनुसूचित जमाती आहेत. जिल्ह्यात अनुसूचित जातींची लोकसंख्या सर्वात कमी म्हणजे एकूण लोकसंख्येच्या २.४३ टक्के आहे.

रायगड जिल्ह्यातील तालुक्यांचे भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्येचा सांख्यिकी तपशील तक्ता क्र. ४.१ मध्ये देण्यात आला आहे.

## तक्ता क्रमांक ४.१
## रायगड जिल्ह्यातील तालुक्यांचे भौगोलिक क्षेत्र आणि लोकसंख्या

| आ. क्र. | तालुका | भौगोलिक क्षेत्र | | | | लोकसंख्या ('०००) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | गावे | | शहरे | विस्तार चौ.किमी. | पुरुष | स्त्री | एकूण |
| १ | अलिबाग | १८५ | २३ | ०२ | ४९९ | ९२ | ९४ | १८६ |
| २ | उरण | ५२ | ०९ | ०२ | १८६.४ | ५५ | ५२ | १०७ |
| ३ | पनवेल | १६२ | ०१ | ०३ | ५७८.३ | १४८ | १३४ | २८२ |
| ४ | कर्जत | १७४ | ०१ | ०३ | ६५१.२ | ८० | ७५ | १५५ |
| ५ | खालापूर | १२१ | ०१ | ०१ | ४०६.१ | ७७ | ६८ | १४५ |
| ६ | पेण | १४३ | १८ | ०१ | ४९८.५ | ७५ | ७३ | १४८ |
| ७ | सुधागड | ९५ | ०१ | ०१ | ४५८ | ३१ | ३१ | ६२ |
| ८ | रोहा | १७० | ०० | ०१ | ६३२.४ | ७० | ६९ | १३९ |
| ९ | माणगाव | २४४ | ०० | ०१ | ९३८.६ | ८५ | ९७ | १८२ |
| १० | महाड | १८३ | ०० | ०१ | ८१०.५ | ७८ | ८६ | १६४ |
| ११ | पोलादपूर | ८७ | ०० | ०० | ३७१.५ | २५ | ३० | ५५ |
| १२ | म्हाळसा | ८० | ०२ | ०१ | ३११.७ | २५ | ३३ | ५८ |
| १३ | श्रीवर्धन | ७८ | ०० | ०१ | २६०.२ | ३५ | ४३ | ७८ |
| १४ | मुरूड | ७२ | ०१ | ०१ | २६५.२ | ३१ | ३३ | ६४ |
| १५ | तळा* | – | – | – | – | – | – | – |
| | रायगड जिल्हा | १८५१ | ५७ | १९ | ७१४८ | ९१८ | ९०७ | १८२५ |

* नवनिर्मित तालुका. तपशील रोहा तालुक्यात समाविष्ट

**स्त्रोत :** (१) जनगणना अहवाल–२००१

(२) तालुक्यांचे महसूल अहवाल

(३) सर्व्हे ऑफ इंडिया

**४.५ रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्था :**

७५% हून अधिक ग्रामीण लोकसंख्या असलेल्या रायगड जिल्ह्याची अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. मात्र मागच्या दोन दशकात या जिल्ह्याच्या उत्तरेकडील पनवेल आणि उरण तालुक्यात प्रचंह वेगाने औद्योगिकीकरण घडून आले आहे. या जिल्ह्याची ठळक आर्थिक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :

**(१) शेती :** भात हे रायगड जिल्ह्यातील मुख्य पीक आहे. भाताचे पीक जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांमध्ये होत असले तरी माणगांव, तळे, अलिबाग, पनवेल व पेण या तालुक्यात भाताचे पीक जास्त प्रमाणात घेतले जातात. तसेच पोलादपूर, महाड, माणगांव, तळे, रोहे या तालुक्यांत नाचणी व वरीचे पीक घेतली जातात. याशिवाय वाल, तूर ही पिकेही घेतली जातात. उपलब्ध असलेल्या क्षेत्रातील १८०,४०० हॅक्टर जमिन लागवडी खाली आहे. त्यातील १४,५०० हॅक्टर क्षेत्र सिंचित आहे.

**(२) मासेमारी :** शेती खालोखाल जिल्ह्यात मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असून तो प्रामुख्याने अलिबाग, उरण, मुरूड व श्रीवर्धन या किनारी तालुक्यांत केला जातो.


**(३) उद्योगधंदे :** खोपोली, पनवेल, रोहे, अलिबाग, तळोजे, पाताळगंगा, नागोठणे व महाड इत्यादी ठिकाणी औद्योगिक वसाहती असून जिल्हा औद्योगिकदृष्ट्या झपाट्याने विकसित होत आहे.

थळ वायशेत येथील राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स हा सार्वजनिक क्षेत्रातील खत प्रकल्प कार्यरत आहे. येथे सुफला व उज्वला ही खते तयार होतात. पनवेल जवळील रसायनी नावाने ओळखल्या जाणाऱ्या परिसरात हिन्दुस्थान ऑरगॅनिक केमिकल्सचा सार्वजनिक क्षेत्रातील रसायन निर्मिती प्रकल्प आहे. पनवेल शहरात धूत–पापेश्वर कंपनीचा आर्युवेदिक औषधांचा कारखाना आहे. नागोठणे येथे इंडियन पेट्रोकेमिकल्सचा प्रकल्प असून उरण व बॉम्बे हाय मधून उपलब्ध झालेल्या खनिज तेलापासून इथेन व प्रोपन या वायूंवर प्रक्रिया करून इथिलिन मिळविले जाते. हा वायूविभाजन प्रकल्प नुकताच खाजगी क्षेत्राकडे सोपविला गेला आहे. उरण येथे तेल व नैसर्गिक वायू प्रकल्प आहे. महाड येथे हातकागद तयार करण्याचा उद्योग असून रोहे व खोपोली येथे पुठ्ठे तयार करण्याचा व्यवसाय चालतो. खोपोली येथे एक कागद गिरणीही आहे. रोहे, महाड व पाली येथे तांब्या–पितळेची भांडी तयार करण्याचा उद्योग असून महाड, पोयनाड, पाली व खालापूर येथे मातीची भांडी व विटा तयार करण्याचा उद्योग आहे. पेण येथे शाडूच्या मूर्ती तयार करण्याचा परंपरागत व्यवसाय असून येथे तयार होणाऱ्या गणपतीच्या मूर्ती प्रसिद्ध आहेत.

रायगड जिल्ह्यातील उद्योगधंद्याचे विवरण नकाशा क्र. ४.५ मध्ये देण्यात आले आहे.

जिल्ह्यात सहकारी चळवळीचा प्रसार अल्पप्रमाणात झाला असून, सहकारी संस्था प्रामुख्याने पतपुरवठा आणि गृहबांधणी या क्षेत्रात कार्यरत आहेत. सहकारी तत्त्वांवर चालणारे उद्योग अत्यल्प आहेत. जिल्ह्याच्या ग्रामीण भागाच्या मागासलेपणाचे हे एक प्रमुख कारण आहे.

नकाशा क्रमांक ४.५ रायगड जिल्हा – उद्योगधंदे



रायगड जिल्ह्यातील कारखानदारी आणि त्यातील कामगारांची सांख्यिकी माहिती तक्ता क्रमांक ४.२ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक ४.२ कारखानदारी आणि त्यातील कामगारांची संख्या**

| कामगारांची संख्या | कारखान्यांची संख्या | कामगारांची एकूण संख्या |
|---|---|---|
| १० पेक्षा कमी | २०१ | १०८६ |
| १० ते १९ | १३६ | १९७२ |
| २० ते ४९ | १७४ | ५५१२ |
| ५० ते ९९ | ९३ | ६२४६ |
| १०० ते ४९९ | ९२ | १८६५६ |
| ५०० ते ९९९ | १० | ७०४१ |
| १००० ते ४९९९ | ५ | ७६५६ |
| ५००० पेक्षा अधिक | १ | ५७१७ |
| **एकूण** | **७१२** | **५३८८५** |

जिल्ह्यातील क्षेत्रनिहाय रोजगाराचे विवरण तक्ता क्रमांक ४.३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ४.३ रायगड जिल्ह्यातील रोजगार**

| अ. क्र. | रोजगाराचा प्रकार | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | भूधारक शेतकरी | १,६२,१९१ | १,६०,४७१ | ३,२२,६२२ (४४.८१) |
| २. | भूमीहिन शेतमजूर | ६२,४३३ | ६४,६६९ | १,२७,१०२ (१७.६५) |
| ३. | शेतीचे जोड व्यवसाय | १८,१३२ | ३१०६ | २१,२३८ (२.९५) |
| ४. | खाणकाम | २१६३ | ५०० | २६६३ (०.३७) |
| ५. | i. लघुउद्योग, ग्रामोद्योग व कुटीराद्योग | ७,६१६ | ३,३५७ | १०,९७३ (१.५२) |
| | ii. मध्यम आणि मोठे उद्योग | ७६,९९० | ५,०५५ | ८२.०४५ (११.३९) |
| ६. | बांधकाम व्यवसाय | १७,३०२ | २,६४८ | १९,९५० (२.७७) |
| ७. | व्यापार व तत्सम उपक्रम | ३६,९३१ | ८,६६६ | ४५,५९७ (६.३३) |
| ८. | वाहतूक व संदेशवहन | २३,६६० | ५४५ | २४,२०५ (३.३६) |
| ९. | अन्य उपक्रम | ४९,१९७ | १४,४७१ | ६३,६६८ (८.८५) |
| | **एकूण** | **४,५६,६१५** | **२,६३,४८८** | **७२,१०३ (१००.००)** |

**ग्रामीण भागात संरचनात्मक सुविधांची उपलब्धता**

रायगड जिल्ह्यात १८५१ खेड्यात २००१ साली उपलब्ध असलेल्या संरचनात्मक सुविधांच्या उबलब्धतेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

**तक्ता क्रमांक ४.४ संरचनात्मक सुविधांची उपलब्धता**

| अ. क्र. | संरचनात्मक सुविधा | गावांची संख्या | % |
|---|---|---|---|
| १. | शिक्षण (प्राथमिक) | १,६८२ | ९०.८७ |
| २. | आरोग्य सेवा | २१० | ११.३५ |
| ३. | पिण्याचे पाणी | १,८५१ | १००.०० |
| ४. | डाकसेवा | ३०७ | १६.५० |
| ५. | आठवडा बाजार | २७ | ०१.४६ |
| ६. | दळणवळण | १,३२७ | ७२.२३ |
| ७. | पक्के रस्ते | ९५२ | ५१.४३ |
| ८. | विद्युत पुरवठा | १,८३१ | ९८.९२ |

**४.६ प्रशासकीय यंत्रणा :**

जिल्ह्याचे क्षेत्रफळ ७१४८ चौ. किलोमीटर असून प्रशासकीय कामाच्या दृष्टीने या जिल्ह्याची अलिबाग, पनवेल, महाड व माणगाव या चार उपविभागांत विभागणी करण्यात आली आहे. या उपविभागांची खालील पंधरा तालुक्यांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय १) अलिबाग, २) उरण, ३) पनवेल, ४) कर्जत, ५) खालापूर, ६) पेण, ७) सुधागड (पाली) ८) रोहे, ९) माणगाव, १०) महाड, ११) पोलादपूर, १२) म्हसळे, १३) श्रीवर्धन, १४) मुरूड, १५) तळे.

प्रत्येक उपविभागात समाविष्ट तालुके खालीलप्रमाणे आहेत :

**(१) अलिबाग :** अलिबाग, श्रीवर्धन आणि मुरूड.

**(२) पनवेल :** पनवेल, उरण, कर्जत आणि खालापूर.


**(३) महाड :** महाड, पोलादपूर, म्हाळसा आणि सुधागड.

**(४) माणगाव :** पेण, माणगाव, रोहा आणि तळे.


जिल्ह्याच्या ग्रामीण भागात त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्था १ मे १९६२ रोजी स्थापन करण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या ६१ आहे. त्यापैकी ३९ पुरूष असून २२ महिला सदस्या आहेत. रायगड जिल्ह्याच्या १५ तालुक्यांत तालुका पंचायत समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील ग्रामपंचायतीची संख्या ८१५ आहे.

रायगड जिल्ह्यातील प्रशासकीय विभागांचे विवरण नकाशा क्र. ४.६ आणि आकृती क्र. ४.१ मध्ये करण्यात आले आहे.

**नकाशा क्रमांक ४.६ रायगड जिल्हा– प्रशासकीय विभाग**



आकृती क्रमांक ४.१ रायगड जिल्ह्याची–प्रशासकीय संरचना



वरील माहितीचा सारांश खालील तक्ता क्रमांक ४.५ मध्ये देण्यात आला आहे.

**दृष्टिक्षेपात रायगड जिल्हा (DISTRICT SUMMARY)**

| | | |
|---|---|---|
| Geographical area | : | 7148 sq. kms |
| Rivers | : | Gangadhari, Surya, Savitri, Kundalika, Kal, Patalgariga, |
| Temp. | : | 40.70 to 17.90 C. |
| Average rainfall | : | 3794 ram |
| Talukas | : | Karjat, PanveL Uran, Khalapur, Alibag, Pen, |
| | : | Rohe, Sudhagad, Murud, Mangaon, Mhasale, Shrivardhan, Mahad, Poladpur, Tala. |
| Villages | : | 1851 |
| Towns | : | 19 |
| Gram panchayat | : | 808 |
| Municipalities | : | 11 |
| Police St. & out posts | : | 51 |
| Population | : | 22,05,972 (2001) |
| Male | : | 11,16,821 |
| Female | : | 10,89,151 |
| Literacy | : | 77.32% |
| Area under Agiiculture | : | 1,80,426 hectares |
| Industrial Estates | : | Taloja, Roha, Patalganga, Panvel, Mahad, usar, Nagothane, Pen-Khopoli, Mangaon. |
| Medical Institutes | : | 39 |
| Educational Institutes | : | — |
| Primary | : | 780 |
| Secondary | : | 213 |
| Higher | : | 71 |
| Road length | : | 417.21 Kms. |
| Electrified Villages | : | 1851 |
| Towns | : | 19 |

* * *

# ५. रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–१ (पनवेल तालुका)

**५.१ प्रास्ताविक :**

भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्यातील आंतरसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी रायगड जिल्ह्याची निवड केली आहे. या जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्यातील प्रत्येकी पाच गावांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. अभ्यासासाठी निवडलेले दोन तालुके व दहा गावांच्या निवडीसंबंधीच्या निकषांची सविस्तर चर्चा प्रकरण पाच व सहामध्ये केली आहे. प्रत्येक गावाचा अभ्यास करत असताना त्या गावातील सर्व भू–धारकांची नावे व त्यांच्या मालकीचे भू–धारण क्षेत्र याची माहिती तलाठी कार्यालयातील उपलब्ध दस्तऐवज 'अभिलेख ८ अ' वरून घेतली आहे. गावातील भू–धारकांची जात ही त्या गावातील सरपंच, पोलीस पाटील त्याचप्रमाणे गावातील बुझुर्ग मंडळींशी चर्चा करून घेतली आहे. सत्तेचा अभ्यास करण्यासाठी दहा ग्रामपंचायतींच्या सदस्यांच्या नावाची व जातीची माहिती ग्रामसचिवाकडून मिळवली आहे. सदर दहा गावांत विविध कार्यकारी सहकारी संस्था अस्त्विात नसल्याने, सहकारी संस्थेच्या सदस्यांची माहिती उपलब्ध नाही.

**५.२ पनवेल तालुक्याचा संक्षिप्त आढावा :**

रायगड जिल्ह्यातील १५ तालुक्यांपैकी पनवेल हा सर्वाधिक प्रगत तालुका आहे. पनवेल हे मुंबईच्या पूर्वेस २६ कि.मी. आणि मुंबई–बंगलोर या राष्ट्रीय महामार्गावर व मुंबई–कोकण–गोवा या राज्य महामार्गावर व पनवेल खाडीच्या टोकाशी वसले आहे. येथून उत्तरेस ठाण्याकडे, आग्नेयेस खोपोलीकडे, नैऋत्येस उरणकडे व पश्चिमेस कळव्याकडे मार्ग जातात. दिवा–पनवेल–उरण–आपटा आणि कुर्ला–मानखुर्द–छत्रपती शिवाजी टर्मिनल–पनवेल या नव्या कोकण लोहमार्गाने ते मुंबईशी जोडल्याने, तसेच भरती आल्यावर लहान बोटी ये–जा करू शकत असल्यामुळे पनवेलला वाहतूक व व्यापारी केंद्राचे स्वरूप आले आहे.

पनवेल तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र ५७३.८ चौ.कि.मी असून त्यातील गावांची संख्या १७६ आहे. त्यांचे वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :

| | |
|---|---|
| (अ) लोकवस्ती असलेली गावे – | १७२ |
| (ब) लोकवस्ती नसलेली गावे – | ००१ |
| (क) शहरे – | ००३ |
| **एकूण –** | **१७६** |

ग्रामीण क्षेत्रातील १६२ गावांचा समावेश ८८ ग्रामपंचायतींमध्ये करण्यात आला आहे. ८८ ग्रामपंचायतींपैकी ४८ ग्रामपंचायती स्वतंत्र असून ४० ग्रुप ग्रामपंचायती आहेत. तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पनवेल शहरात 'ब' वर्गाची नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे पनवेल तालुक्याच्या उत्तरेकडील ४१ गावांचा समावेश नवी मुंबई महानगरपालिकेत करण्यात आला आहे.

पनवेल तालुक्याची लोकसंख्या ४,२२,५२२ असून ग्रामीण भागातील लोकसंख्या २,०४,३३६ आहे, तर नागरी लोकसंक्या २,१८,१८६ आहे. गेल्या दशकात वेगाने नागरीकरण झाले असून नागरी लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात भर पडली आहे. ग्रामीण भागात पुरुषांची संख्या १,११,०१५ असून स्त्रियांची संख्या ९३, ३२१ आहे. तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ८०%हून अधिक आहे.

पनवेल तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र ५३,१६८ हेक्टर आहे. त्या क्षेत्रापैकी ५११८ हेक्टर सिडको, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व रसायनीने ताब्यात घेतले आहे. तालुक्यातील उर्वरित क्षेत्रापैकी१६,४४४ हेक्टर जमीन पडीक आहे व १०,८१२ हेक्टर जंगलक्षेत्र नोंदवलेले आहे. लागवडी खालील क्षेत्रात प्रामुख्याने भातशेती केली जाते.

**तक्ता क्रमांक ५.१**

**पनवेल तालुक्यातील पिकानुसार जमिनीची विभागणी**

| पिकाचे नांव खरीप–रब्बी | क्षेत्र हेक्टरमध्ये |
|---|---|
| (१) भात–खरीप | २१.७०२ |
| (२) नागली–खरीप | ३०० |
| (३) वरी–खरीप | ४५ |
| (४) कडधान्य–रब्बी | ३,२३४ |
| (५) भाजीपाला–रब्बी | ५,०३२ |
| (६) भात–उन्हाळी | १४० |

**संदर्भ : पंचायत समिती कृषी विभाग**

या तालुक्यात तांदुळ, मीठ, मासे यांचा व्यापार चालतो. पूर्वीपासून बैलगाडीची चाके बनवण्याचा उद्योग या तालुक्यात चालतो. गेल्या दोन दशकात कारखानदारीचा वेगाने प्रसार झाला तालुक्याती २५०० हेक्टर क्षेत्र  खाली आणण्याचा शासनाचा मानस आहे. कळंबोली, तलोजे, रसायनी व पनवेल या ठिकाणी औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात आल्या आहेत.

पनवेल तालुक्यात शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी विहीर, तलाव, बोरवे, सिंचन तलाव व पाझर तलाव यांचा वापर केला जातो. तालुक्यातील विहीर व बोरवेल खाजगी मालकीच्या आहेत तर तलाव गावाच्या मालकीचे आहेत. तालुक्यात सिंचन तलाव तीन आहेत. यापैकी उरण बंधारा १०० हेक्टर क्षमतेचा आहे. मोर्बे येथील सिंचन तलाव १०९ हेक्टर क्षमतेचा आहे तर जांभिवली येथील सिंचन तलाव ५० हेक्टर क्षमतेचा आहे.

तालुक्यात पाझर तलावांची संख्या दोन आहे. त्यापैकी एकणझर तलाव धामणी येथे आहे. या पाझर तलावाचे पाणलोट क्षेत्र ९.३२ चौ.कि.मी असून त्याची सिंचन क्षमता ४० हेक्टर इतकी आहे. धामणी तलावाचे पाणी पनवेल तालुक्यात पिण्यासाठी पुरवले जाते. वाजापूर येथील तलावाचे पाणलोट क्षेत्र ४.३९ चौ.कि.मी असून त्याची सिंचन क्षमता ६४ हेक्टर आहे.

पनवेल तालुक्याच्या कार्यक्षेत्रात एकूण १७६ गावे आहेत. एकूण गावांपैकी पक्क्या रस्त्याने जोडलेली ५१ गावे आहेत. कच्च्या रस्त्याने जोडलेली १०६ तर १९ गावांचा पावसाळ्यामध्ये रस्त्यांच्या सोयीअभावी इतर गावांशी असणारा संबंध तुटतो.


पनवेल तालुक्यातील शेतकरी शेतीमाल वाहतूकीसाठी प्रामुख्याने बैलगाडी, ट्रक, टेंपो या साधनांचा वापर करतात. पनवेल तालुक्यातून रेल्वेमार्ग गेल्यामुळे रेल्वे वाहतूकीचाही उपयोग शेतीमाल वाहतूकीसाठी होत असतो. त्याचा तपशील तक्ता क्रमांक ५.२ आणि आकृती क्रमांक ५.१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.२**

**पनवेल तालुक्यातील रस्त्यांचे प्रकार व लांबी**

| रस्त्यांचे प्रकार | लांबी (कि. मी.) |
|---|---|
| (१) रेल्वेमार्ग | ३८ |
| (२) राष्ट्रीय महामार्ग | ७६ |
| (३) राज्य हमरस्ते | ४२ |
| (४) प्रमुख जिल्हा रस्ते | २७ |
| (५) इतर जिल्हा रस्ते | ३० |
| (६) पक्के ग्रामीण रस्ते | ८९ |
| (७) कच्चे ग्रामीण रस्ते | १८१ |

**संदर्भ : जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभाग–उपविभाग–पनवेल**




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India.

The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.

© Government of India Copyright, 1984.

**५.३ पनवेल तालुक्यातील पाच गावांचा अभ्यास :**

सदर संशोधन कार्यासाठी पनवेल तालुक्यातील पाच गावांची निवड करण्यात आली :

(१) वाकडी

(२) रवानाव

(३) खैरवाडी

(४) चिंचवली

(५) कांदले

**३.१ वाकडी :** वाकडी गाव पनवेल गावापासून ८ कि.मी. अंतरावर आहे. पनवेल शहर आणि वाकडी गावाच्या दरम्यान 'सीडको'ने नवीन पनवेल या पनवेल शहराच्या विस्तारित भागाचा विकास केल्याने आणि प्रचंड वेगाने होणाऱ्या शहरीकरणामुळे वाकडी गावापर्यंत शहरीकरणाचे लोण पोहोचले आहे. त्यामुळे या गावात एस.टी. बस सेवा, विद्युतीकरण व नळाद्वारे पाणी, प्राथमिक शाळा इत्यादी मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. वाकडी गावाच्या सभोवतालच्या परिसरात कुष्ठरोग निवारण केंद्र–शांतिवन या नावाजलेल्या स्वयंसेवी संस्थेचे कार्यक्षेत्र असल्याने आरोग्य व शिक्षण सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

वाकडी गावाची लोकसंख्या ९४३ आहे. त्यात पुरुष ५१९ आणि स्त्रियांची लोकसंख्या ४२४ आहे. पुरुष साक्षरतेची टक्केवारी ६४.५% असून, महिला साक्षरतेचे प्रमाण ४३.७% आहे. गावातील कुटुंबांची संख्या १२९ असून, त्यातील ४२ कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत. गावातील सर्वाधिक ५४ खातेदार आगरी जातीचे आहेत. या व्यतिरिक्त गावात ब्राह्मण, मराठा, कुणबी, कोळी, माळी, दलित, आदिवासी, मुस्लीम आणि परप्रांतीयांची वस्ती आहे. लोकसंख्येचे जातीनिहार वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.३ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.३**

**वाकडी गावाच्या लोकसंख्येचे जाती-निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राह्मण | ०६ | ०.६३ |
| (२) मराठा | २६ | २.७५ |
| (३) कुणबी | ६२ | ६.५७ |
| (४) आगरी | ५४७ | ५८ |
| (५) कोळी | १६ | १.६९ |
| (६) माळी | १६ | १.६९ |
| (७) दलित (नवबौद्धासह) | १०३ | १०.९२ |
| (८) आदिवासी | १९ | २.०१ |
| (९) मुस्लीम | ७० | ७.४२ |
| (१०) परप्रांतीय | ७८ | ८.२७ |
| **एकूण** | **९४३** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की वाकडी गावात आगरी जातीसमूहाची लोकसंख्या सर्वाधिक म्हणजे ५८% आहे. त्याच्या खालोखाल दलितांची लोकसंख्या ११% आहे. अन्य जातीसमूहांची टक्केवारी १०%पेक्षा कमी आहे.

वाकडी गावाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २०१ हेक्टर असून बिगर-शेती (निवासी व अन्य) क्षेत्र सुमारे २ हेक्टर आहे. उर्वरित जातीतील सुमारे ५.५० हेक्टरक्षेत्र गुरेचरण आणि देवस्थान इनाम जमीन आहे. ग्रामपंचायत, महाराष्ट्र शासन, वनखाते आणि अन्य खातेदारांची भूधारणा वगळता, वैयक्तिक खातेदारांची जमीन सुमारे १३१ हेक्टर आहे.

वाकडी गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ५.४ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक ५.४**

**वाकडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्र प्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | १३०.६५.४० | ६५ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | ३१.९५.२५ | १६ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.३८.५० | ०.१९ |
| (४) गुरचरण | ५.१८.०० | २.४८ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ६.२०.०० | २.९८ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | २४.९१.२५ | ११.९४ |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | २.१०.१० | १.०० |
| **एकूण** | **२०१.०१.००** | **१०० |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, वाकडी गावातील सर्वाधिक, म्हणजे सुमारे ६५% क्षेत्र वैयक्तिक खातेदारांच्या मालकीचे आहे. कुष्ठरोग निवारण समिती आणि स्वप्ननगरी रिसोर्ट या अन्य खातेदारांच्या ताब्यात सुमारे १६% क्षेत्र आहे. वैयक्तिक भूधारकांच्या जाती–निहाय भूधारणेचा तपशील खाली तक्ता क्रमांक ५.५ मध्ये देण्यात आला आहे :

**तक्ता क्रमांक ५.५**

**वाकडी गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जाती-निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारणा क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण व तत्सम | १२ | १६.०२.३० | १२.२१ |
| (२) मराठा | ०६ | ७.६६.५० | ६.१० |
| (३) कुणबी | १५ | १३.६८.०० | १०.६८ |
| (४) आगरी | ५४ | ४५.९४.१० | ३५.११ |
| (५) कोळी | ०३ | १.२४.१० | ०.९५ |
| (६) माळी | ०३ | १.४६.३० | १.१४ |
| (७) दलित | १७ | १४.१९.१० | १०.८३ |
| (८) आदिवासी | ०४ | २.२८.४० | १.७१ |
| (९) मुस्लीम | ११ | १२.६८.२० | ९.९२ |
| (१०) परप्रांतीय | १४ | १५.४८.४० | ११.८३ |
| **एकूण** | **१३९** | **१३०.६५.४०** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, वाकडी गावातील वैयक्तिक खातेदारांची संख्या १३९ आहे आणि त्यांचे भू-धारणा क्षेत्र सुमारे १३१ हेक्टर आहे. त्यात आगरी जाती समूहाच्या खातेदारांची संख्या सर्वाधिक-५४ असून, त्यांच्या मालकीची सुमारे ३५% जमीन आहे. ब्राह्मण जाती समूहातील आणि परप्रांतीय भू-धारकांची आगरी जाती समूहाकडून जमीनी संपादन केल्या. स्वप्ननगरी रिसोर्टच्या मालकांनीही आगरी भू-धारकांकडून जमीन

संपादन केली. याचाच अर्थ वाकडी गावातील सुमारे ६५% क्षेत्र पूर्वी आगरी जाती समूहाच्या मालकीची होती. त्याच्या खालोखाल ब्राह्मण व तत्सम जातींनी भू–धारणा सुमारे १३% आहे. मात्र बहुसंख्य उच्च वर्णीय कुटुंबांनी पनवेल, ठाणे आणि मुंबई या शहरात स्थलांतर केले आहे. मराठा–कुणबी जाती समूहाची एकत्रित भू–धारणा सुमारे १५% टक्के आहे. दलितांकडे १०% पेक्षा अधिक जमीनीची मालकी आहे. मुस्लीम व परप्रांतीयांकडे एकत्रित २०% पेक्षा अधिक जमीनीची मालकी असली तरी स्थानिक राजकारणात ते आगरी समाजाचे समर्थक आहेत. म्हणजेच आगरी जाती समूह आणि त्यांच्या समर्थकांच्या मालकीचे भू–धारणा क्षेत्र ५५% पेक्षा अधिक आहे.

वाकडी गावात स्वतंत्र ग्रामपंचायत असून, ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ७ आहे. सन १९९५, २००० आणि २००५ मध्ये झालेल्या ग्रामं पंचायतीच्या निवडणूकीत आगरी जाती समूहाचे सर्वाधिक सदस्य निवडून आले. सन २००५ची निवडणूक बिनविरोध झाली. आगरी जाती समूह सन १९९९च्या आधी शेतकरी कामगार पक्षाचा समर्थक होता. आगरी समाजाचे नेते रामशेठ ठाकूर यांचा या गावातील मतदारांवर प्रभाव असल्याने, रामशेठ ठाकूर यांनी काँग्रेस पक्षात २००४ साली प्रवेश केल्यानंतर हे गाव काँग्रेसमय झाले आहे.

मागील तीन निवडणुकांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ५.६ मध्ये करण्यात आले आहे :

## तक्ता क्रमांक ५.६

## ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे विश्लेषण

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) मराठा | – | १ *** | – | १ |
| (३) कुणबी | – | – | – | – |
| (४) आगरी | ४ * | ४ * | ४ * | १२ |
| (५) कोळी | – | – | – | – |
| (६) माळी | – | – | – | – |
| (७) दलित | २ ** | २ ** | २ ** | ६ |
| (८) आदिवासी | – | – | – | – |
| (९) मुस्लीम | १ *** | – | – | १ |
| (१०) परप्रांतीय | – | – | १ *** | १ |
| **एकूण** | **७** | **७** | **७** | **२१** |

*** महिलांसाठी आरक्षित १ + इतर मागस वर्गीय राखीव – १

*** महिलांसाठी आरक्षित १ + दलितांसाठी आरक्षित – १

*** खुल्या जागा – प्रत्येकी १

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की आगरी जातीसमूहाने मागील १९९५, २००० आणि २००५च्या निवडणुकीत बहुमत संपादन केले आहे. त्यांच्या समर्थकांनी १९९५ आणि २००५ साली प्रत्येकी १–१ जागा संपादन केल्या आहेत. दलितांनी प्रत्येक निवडणुकीत दलितांसाठी आरक्षित १ आणि दलित महिलांसाठी आरक्षित १ जागा संपादन केली आहे. २००० साली मराठा उमेदवाराने मुस्लीम उमेदवाराचा पराभव करून १ जागा जिंकली होती.

२००५च्या निवडणूकीनंतर सरपंच आणि उपसरपंच ही दोन्ही अधिकारपदे महिलांसाठी आरक्षित होती. सरपंचपदी आगरी जाती समूहातील आणि उपसरपंचपदी दलित महिला सदस्याची निवड करण्यात आली.

वरील विश्लेषणाच्या आधारे वाकडी गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध खालील तक्ता क्रमांक ५.७ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत.

**तक्ता क्रमांक ५.७**

**वाकडी गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारण | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण | ०६ | १६ हेक्टर | — | |
| (२) मराठा | २६ | ७.५ हेक्टर | — | |
| (३) कुणबी | ६२ | १३.५ हेक्टर | — | |
| (४) आगरी | ५४७ | ४६ हेक्टर | ४ जागा | सत्ताधारी |
| (५) मुस्लीम | ७० | १३ हेक्टर | — | जातीसमूह |
| (६) परप्रांतीय | ७८ | १५.५ हेक्टर | १ जागा | |
| (७) दलित | १०३ | १४.२ हेक्टर | २ जागा | |
| (८) आदिवासी | १९ | २.२ हेक्टर | — | |
| (९) कोळी | १६ | १.२ हेक्टर | — | |
| (१०) माळी | १६ | १.५ हेक्टर | — | |
| **एकूण** | **९४३** | **१३०.६५.४०** | **९** | |

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतात.

(१) आगरी जाती समूहाची लोकसंख्या ५८% आहे. त्यांची भू–धारणा ३५% आहे. त्यांचा सत्तेतील वाटा ५९% आहे.

(२) आगरी जाती समूहाला मुस्लीम आणि परप्रांतीयांचे समर्थन लाभले आहे. त्यांची लोकसंख्या १५%, भू–धारणा १०% आणि सत्तेतील वाटा १४% आहे.

(३) दलितांची आणि आदिवासींची लोकसंख्या १३%, भू–धारणा१६% आणि आरक्षणाच्या तरतुदीमुळे सत्तेचा वाटा २७% आहे.

(४) ७३व्या घयनेतील आरक्षणाच्या तरतुदीमुळे आगरी आणि दलित जाती समूहातील महिलांना ग्रामंपचायत आणि अधिकार पदे प्राप्त झाली आहेत.

(५) म्हणजेच वाकडी गावात जाती समूहाचे संख्याबल हे सत्तासंपादनात निर्णायक ठरले आहे. सत्ता संपादन करण्यासाठी प्रभावी जाती समूहाने अन्य जातींशी युती केली आहे.

**३.२ खानाव :** खानाव गाव पनवेलपासून ४ कि.मी अंतरावर आहे. नवीन पनवेलची हद्द संपताच खानाव गावाची सुरुवात होते. पनवेल शहराचे प्रचंड वेगाने शहरीकरण होत आहे. त्याचे लोण खानाव गावापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे या गावात एस.टी. बस–सेवा, विद्युतीकरण व नळाद्वारे पाणी, प्राथमिक शाळा इत्यादी मूलभूत नागरी सेवा उपलब्ध झाल्या आहेत.

खानाव गावाची लोकसंख्या १०९८ आहे. त्यात पुरुष लोकसंख्या ५५५ आणि स्त्रियांची लोकसंख्या ५४३ आहे. पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६७% असून, महिला साक्षरतेचे प्रमाण ५२% आहे. गावातील कुटुंबांची संख्या २०८ असून, त्यातील ६४ कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत. गावात सर्वाधिक घरं खातेदार आगरी जातीचे आहेत. या व्यतिरिक्त गावात ब्राह्मण, कुणबी, तांबोळी, दलित, आदिवासी, वंझारी, मुस्लीम आणि परप्रातीयांची वस्ती आहे. लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.८ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.८**

**खानाव गावाच्या लोकसंख्येचे जाती-निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण व तत्सम | १८ | १.६ |
| (२) कुणबी | ९८ | ८.९ |
| (३) आगरी | ५९८ | ५४.५ |
| (४) तांबोळी | ०६ | ०.५ |
| (५) दलित | २०४ | १८.६ |
| (६) आदिवासी | ५६ | ५.१ |
| (७) वंजारी | ११ | १.० |
| (८) मुस्लीम | ९३ | ८.५ |
| (९) परप्रांतीय | १४ | १.३ |
| **एकूण** | **१०९८** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की खानव गावात आगरी जाती समूहाची लोकसंख्या सर्वाधिक, म्हणजे ५४.२% आहे. त्याच्या खालोखाल दलितांची लोकसंख्या १८.९% आहे. अन्य जाती समूहांची लोकसंख्या १०% पेक्षा कमी आहे.

खानव गावाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे २५७ हेक्टर आहे. त्यातील १२४ हेक्टर क्षेत्र वैयक्तिक खातेदारांच्या मालकीचे आणि १४.२७ हेक्टर क्षेत्र अन्य खातेदारांच्या मालकीचे आहे. ग्रामपंचायत, भूचरण आणि देवस्थानची इनामी जमीन १४ हेक्टर, तर ३.२५ हेक्टर क्षेत्र निवासी व अन्य बिगर शेती क्षेत्र आहे. गावातील १०० हेक्टरहून अधिक जमीन महाराष्ट्र शासनाच्या वनखात्याची आहे.

खानव गावाच्या भौगोलिक क्षेत्राचे वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.९ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.९**

**खानव गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | १२४.०८.९० | ४८.२४ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | १४.२७.०० | ५.५४ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.६०.०० | ०.२३ |
| (४) गुरचरण | ५.३४.६० | २.०४ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ८.२४.०० | ३.२० |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | १०१.००.७० | ३९.३० |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | ३.२५.१० | १.२६ |
| **एकूण** | **२५६.८०.३०** | **१००** |

वरील तक्तावरून हे स्पष्ट होते की खानव गावातील सुमारे ४०% जमीन महाराष्ट्र शासनाच्या वनखात्याच्या ताब्यात आहे. अन्य खातेदार म्हणजे पनवेल दफनभूमी आणि रिसोर्ट हे आहेत. वैयक्तिक खातेदारांची जमीन १२४ हेक्टर आहे. वैयक्तिक भूधारकांच्या जातीनिहाय भूधारणेचा तपशील तक्ता क्रमांक ५.१० मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१०**

**खानव गावातील वैयक्तिक भूधारकांच्या भूधारणेचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ३४ | १९.७८.८० | १५.७ |
| (२) कुणबी | २० | १७.४०.१० | १३.९ |
| (३) आगरी | ६२ | ५३.४४.३० | ४४.२ |
| (४) तांबोळी | १ | ०.२४.८० | ०.२ |
| (५) दलित | ४० | २२.६५.१० | १८.० |
| (६) आदिवासी | ८ | १.९१.४० | १.५ |
| (७) वंजारी | २ | १.३६.६० | १.० |
| (८) मुस्लीम | २० | ५.५६.५० | ४.३ |
| (९) परप्रांतीय | ३ | १.६५.३० | १.३ |
| **एकूण** | **१९१** | **१२४.०८.९०** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की खानव गावातील सर्वाधिक जमीन म्हणजेच ५३.५ हेक्टर जमीन आगरी जातीसमूहाच्या भूधारकांची आहे. त्यांच्या खालोखाल दलित भूधारकांची २२.५ हेक्टर जमीन आहे. ब्राह्मण जातीच्या खातेदारांच्या मालकीची २० हेक्टर जमीन असली तरी, बहुसंख्य ब्राह्मण खातेदार खानव गावात रहात नाही. त्यांनी पववेल, पेण, अलिबाग येथे स्थलांतर केले आहे. त्यांच्या खालोखाल १७.५ हेक्टर जमीन कुणबी खातेदारांची आहे. अन्य जातींची भू–धारणा नगण्य आहे. स्थानिक राजकारणात आगरी, कुणबी आणि दलितांमध्ये सामंजस्य आहे. त्यांच्या मालकीचे क्षेत्र ७५% पेक्षा अधिक आहे.

खानव गावात स्वतंत्र ग्रामपंचायत असून, ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ७ आहे. सन १९९५, २००० आणि २००५च्या निवडणुका बिनविरोध झाल्या कारणाने गावातील तीन प्रमुख जाती समूहात सामंजस्य आहे.

मागील तीन निवडणूकांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ५.११ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.११**

**खानव ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) कुणबी | १ * | १ * | १ * | ३ |
| (३) आगरी | ४ ** | ४ ** | ४ ** | १२ |
| (४) तांबोळी | – | – | – | – |
| (५) दलित | २ *** | २ *** | २ *** | ६ |
| (६) आदिवासी | – | – | – | – |
| (७) वंजारी | – | – | – | – |
| (८) मुस्लीम | – | – | – | – |
| (९) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **७** | **७** | **७** | **२१** |

*** खुली जागा

*** १०आरक्षित १ महिला आरक्षित, २ खुल्या जागा

*** १ अ.मा. आरक्षित, १ महिला अ. मा. आरक्षित

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, आगरी जातीसमूहाने मागील १९९५, २००० आणि २००५च्या निवडणुकांत बहुमत संपादन केले आहे. तीन प्रमुख जातीतील सामंजस्यामुळे आगरी, दलित आणि कुणबी जाती समूहांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व प्राप्त झाले आहे.

२००५च्या निवडणूकीनंतर आगरी जातीच्या महिला सदस्यांची सरपंचपदी, तर दलित जातीतील पुरुष सदस्याची उपसरपंच पदी निवड करन्यात आली.

वरील विश्लेषणाच्या आधारे खानव गावातील जाती, भू–धारणा आणि तक्ता यांचे आंतर संबंध खालील तक्ता क्रमांक ५.१२ मध्ये स्पष्ट करण्यात आले आहेत :

**तक्ता क्रमांक ५.१२**

**खानव गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारण | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | १८ | २० हेक्टर | — | |
| (२) कुणबी | ९८ | १७.५ हेक्टर | १ जागा | सत्ताधारी जातीसमूह |
| (३) आगरी | ५९८ | ५३.५ हेक्टर | ४ जागा | |
| (४) दलित | २०४ | २२.५ हेक्टर | २ जागा | |
| (५) तांबोळी | ०६ | ०.२५ हेक्टर | — | |
| (६) आदिवासी | ५६ | २.०० हेक्टर | — | |
| (७) वंजारी | ११ | १.५ हेक्टर | — | |
| (८) मुस्लीम | ९३ | ५.५ हेक्टर | — | |
| (९) परप्रांतीय | १४ | १.५ हेक्टर | — | |
| **एकूण** | **१०९८** | **१२४.०८.९** | **७** | |

वरील तक्त्यावरून खालील बाबी स्पष्ट होतात:

(१) आगरी लोकसमूहाची लोकसंख्या ५३.५% आहे. त्यांची भू–धारणा ४४% आहे. खानव गावातील हा सर्वात प्रभावी जातीसमूह असल्याने व त्याची भू–धारणा सर्वाधिक असल्याने त्याचा सत्तेतील वाटा ५९% आहे.

(२) या जातीसमूहाने अन्य दोन जातीसमूह–कुणबी आणि दलितांची युती टीकून, गावात सामंजस्य प्रस्थापित केले आहे. या दोन अन्य जातींना सभेत वाटेकरी करून घेतले आहे.

(३) म्हणजेच खानव गावात जातीसमूहाचे संख्याबल व भू–धारणा हा सभा संपादनातील निर्णायक घटक ठरला आहे.

(४) आगरी जातीसमूहाने दलित व कुणबी जातीसमूहांना सभेत वाटेकरी करून, गावात आपली सत्ता निर्विवाद ठेवली आहे.

**३.३ खैरवाडी :** खैरवाडी गाव खैरवाडी, चिंचवली आणि कांदळे ग्रुप पंचायतीचा घटक आहे. गावाची लोकसंख्या ५१५ आहे. त्यात पुरुष लोकसंख्या २६८ आणि स्त्रियांची लोकसंख्या २४७ आहे. पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६५% तर महिला साक्षरतेचे प्रमाण ४३% आहे. गावातील कुटुंबांची संख्या ७१ असून, त्यातील ३४ कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आहेत. दलितांची लोकसंख्या सर्वाधिक म्हणजे ३७% आहे. त्याच्या खालोखाल आदिवासींची लोकसंख्या आहे. आगरी आणि माळी गावातील अन्य जातीसमूह आहेत.

पनवेल–माथेरान राज्य मार्गावरील या गावात एस.टी. बससेवा, नेरे आरोग्य केंद्राचे उपकेंद्र आणि प्राथमिक शाळा या सुविधा उपलब्ध आहेत.

गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.१३ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.१३**

**खैरवाडी गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) |
|---|---|---|
| (१) माळी | ६८ | १३.२० |
| (२) आगरी | १३२ | २५.६० |
| (३) दलित | १६१ | ३१.३० |
| (४) आदिवासी | १५४ | २९.९० |
| **एकूण** | **५१५** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की दलित–आदिवासी लोकसंख्या बहुसंख्य असणारे हे गाव आहे.

या गावाचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १६१ हेक्टर आहे. त्यातील १०० हेक्टर हून अधिक क्षेत्र शासनाच्या ताब्यात आहे; तर ४४.४१ हेक्टर जमीन वैयक्तिक खातेदारांची आहे. त्याचा सांख्यिकी तकशील तक्ता क्रमांक ५.१४ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१४**

**खैरवाडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | ४४.४१.०० | २७.८० |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | — | — |
| (३) देवस्थान इनाम जमीन | — | — |
| (४) गुरचरण | ०.१०.० | ०.६० |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ९.९९.३ | ६.२० |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | १०३.८६.२ | ६५.०० |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | १.२४.५ | ०.८० |
| **एकूण** | **१५९.६१.६** | **१००** |

वैयक्तिक खातेदारांच्या भू–धारणेचा जातीनिहाय तपशील खालील तक्ता क्रमांक ५.१५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१५**

**खैरवाडी गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भू–धारणेचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारणा क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) माळी | ३ | ४.८१.० | १०.५० |
| (२) आगरी | ५ | १२.८६.६ | २९.२५ |
| (३) दलित | १३ | २२.०५.० | ४९.७५ |
| (४) आदिवासी | ९ | ४.६९.० | १०.५० |
| **एकूण** | **३०** | **१२४.०८.९** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की १३ दलित भू–धारकांच्या मालकीची सुमारे ५०% तर ५ आगरी भू–धारकांच्या मालकीची सुमारे २९% जमीन आहे.

सदर गाव ग्रुप ग्रामपंचायतीचा घटक असून, त्यावर गावातून तीन सभासद निवडले जातात. भागील तीन ग्रामपंचायत निवडणूकांचा तपशील तक्ता क्रमांक ५.१६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.१६**

**खैरवाडी ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) माळी | – | – | – | – |
| (२) आगरी | १ * | १ * | १ * | ३ |
| (३) दलित | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (४)आदिवासी | १ *** | १ *** | १ *** | ३ |
| **एकूण** | **३** | **३** | **३** | **९** |

*** OBC करीता आरक्षित जागा

*** दलित महिलांकरता आरक्षित जागा

*** आदिवासीकरता आरक्षित जागा

खैरवाडी, चिंचवली व कांदले गावांच्या ग्रुप ग्रामपंचायतीत खैरवाडी गावातून तीन सभासद निवडले जातात. ते , दलित आणि आदिवासींसाठी आरक्षित जागांतून निवडले गेले. जाती, भू–धारणा आणि सभा यांच्या आंतरसंबंधांचे विश्लेषण या तीन गावांच्या विशलेषणानंतर एकत्रितपणे करण्यात आले आहे. या गावातील जाती, भू–धारणा आणि सभा यांच्या आंतरसंबंधांचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ५.१७ मध्ये करन्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.१७**

**खैरवाडी गावातील जाती, भू-धारणा आणि सत्ता यांच्यातील आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारण | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) माळी | ६८ | ४.८१.० | — | |
| (२) आगरी | १३२ | १२.८६.६ | १ | |
| (३) दलित | १६१ | २२.०५.० | १ | |
| (४) आदिवासी | १५४ | ४.६९.० | १ | |
| **एकूण** | **५१५** | ४४.४१.६ | | |

गावातील जातीरचना संमिश्र असल्याने, कोणाही एका जातीचे गावाच्या राजकारणावर वर्चस्व नाही, आगरी, दलित आणि आदिवासी जातीसमूहाचे प्रत्येकी एक उमेदवार चिंचवली ग्रुप ग्रामपंचायतीवर निवडले गेले.

**३.४ चिंचवली :** मागील भागात नमूद केल्याप्रमाणे बचचवली गाव खैरवाडी, चिंचवली आणि कांदळे ग्रुपग्रामपंचातीचा घटक आहे. बचचवली गावाची लोकसंख्या ६६२ आहे. त्यात पुरुषांची संख्या ३६४ आणि स्त्रियांची संख्या २९८ आहे. पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६५.५% आणि महिला साक्षरतेचे प्रमाण ५२% आहे. गावातील कुटुंबांची संख्या १२० असून, त्यातील ४६ कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आहेत. गावातील दलितांची लोकसंख्या सर्वाधिक २१६ असून, त्यांच्या खालोखाल आगरी जातीसमूहाची लोकसंख्या १३८ आहे. या व्यतिरिक्त ब्राह्मण, कुणबी, तांबोळी, कोळी, गवळी, वैश्य-वाणी, आदिवासी जातीसमूह आणि परप्रांतीयांची लोकवस्ती आहे.

पनवेल-माथेरान राज्य मार्गावरील या गावात एस.टी. बससेवा, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत या गावात समावेश आहे.

गावातील लोकसंख्येचे जाती-निहाय वर्गीकरण खालील तक्ताक्रमांक ५.१८ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.१८**

**चिंचवली गावाच्या लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ८ | १.२० |
| (२) कुणबी | ४२ | ६.३४ |
| (३) आगरी | १३८ | २०.८४ |
| (४) तांबोळी | ३१ | ४.६८ |
| (५) कोळी | ३२ | ४.७० |
| (६) गवळी | ५९ | ८.९१ |
| (७) वैश्यवाणी | ४२ | ६.३४ |
| (८) दलित | २१६ | ३२.६२ |
| (९) आदिवासी | ४२ | ६.३४ |
| (१०) परप्रांतीय | ५४ | ८.१५ |
| **एकूण** | **६६२** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की दलित–आदिवासी बहुसंख्य असणारे हे गाव आहे.

या गावाचे भौगोलिक क्षेत्र १४७ हेक्टर असून, त्यातील १०७ हेक्टर क्षेत्र वैयक्तिक खातेदारांच्या आणि राज्य शासनाच्या वन खात्याच्या अखत्यारीत ३५ हेक्टर क्षेत्र आहे. त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ५.१९ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.१९**

**चिंचवली गावाच्या भौगोलिक क्षेत्राचे वर्गीकरण**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | १०७.०३.० | ७२.८० |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | — | — |
| (३) देवस्थान इनाम जमीन | — | — |
| (४) गुरचरण | — | — |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | २.९९.४ | २.०४ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | ३४.९१.० | २३.८० |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | २.१६.० | १.३६ |
| **एकूण** | **१४७.०९.४** | **१०० ** |

वैयक्तिक खातेदारांच्या भू–धारणेचे जातीनिहाय विवरण खालील तक्ता क्रमांक ५.२० मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्र. ५.२०**

**चिंचवली गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भू–धारणेचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ६ | ५.१७.६ | ४.८३ |
| (२) कुणबी | ७ | ५.७८.९ | ५.४१ |
| (३) आगरी | २३ | २५.९८.९ | २४.२९ |
| (४) तांबोळी | ५ | ६.१६.२ | ५.७५ |
| (५) कोळी | ५ | ३.८९.२ | ३.६३ |
| (६) गवळी | १० | ५.८२.१ | ५.४४ |
| (७) वैश्यवाणी | ७ | ९.३८.६ | ८.७६ |
| (८) दलित | ३६ | ३०.५३.० | २८.९७ |
| (९) आदिवासी | ६ | ४.१०.७ | ३.८३ |
| (१०) परप्रांतीय | १० | १०.२६.८ | ९.५८ |
| **एकूण** | **१०५** | **१०७.०३.०** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की दलित–आदिवासी जातीसमूहाच्या मालकीचे भू–धारणा क्षेत्र ३०% पेक्षा अधिक आहे, तर आगरी जाती समूहाच्या भू–धारणेचे क्षेत्र सुमारे २५% आहे. अन्य जातीसमूहांची प्रत्येकी भू–धारणा १०% पेक्षा कमी आहे.

चिंचवली गाव ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट असून या गावातून पाच सभासद निवडले जातात. मागील तीन ग्रामपंचायत निवडणूकांचा तपशील तक्ता क्रमांक ५.२१ मध्ये देण्यात आला आहे :

**तक्ता क्रमांक ५.२१**

**चिंचवली ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) कुणबी | १ * | – | – | १ |
| (३) आगरी | २ ** | २ ** | २ ** | ६ |
| (४) तांबोळी | – | – | – | – |
| (५) कोळी | – | – | – | – |
| (६) गवळी | – | १ * | – | १ |
| (७) वैश्यवाणी | – | – | १ * | १ |
| (८) दलित | २ *** | २ *** | २ ** | ६ |
| (९) आदिवासी | – | – | – | – |
| (१०) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **५** | **५** | **५** | **१५** |

*** खुली जागा

*** खुल्या जागा

*** १ जागा दलित महिलांसाठी आरक्षित

*** १ जागा दलितांसाठी आरक्षित

गावातील मतदारांची सवर्ण, दलित अशी विभागणी झाल्याने आगरी जाती समूहाच्या नेतृत्त्वाखाली सवर्णाची एकजूट होऊन ३ खुल्या जागा सवर्णांनी जिंकल्या. बहुसंख्य असलेल्या आगरी जाती समूहाला प्रत्येक निवडणूकीत २ जागा आणि त्यांच्याशी युती असणाऱ्या कुणबी, गवळी आणि वैश्यवाणी जाती समूहाला प्रत्येकी १ जागा संपादन करता आल्या.

जाती, भू–धारणा आणि सभा यांच्यातील आंतरसंबंधाचे विवरण प्रकरणाच्या शेवटच्या भागात करण्यात आले आहे. चिंचवली गावातील जाती, भू–धारणा आणि सभा यांच्या आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ५.२२ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.२२**

**चिंचवली गावातील जाती, भूधारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ८ | ५.१७.२ | — | |
| (२) कुणबी | ४२ | ५.७८.९ | २ | |
| (३) आगरी | १३८ | २५.९८.९ | — | सवर्ण युतीचे नेतृत्व |
| (४) तांबोळी | ३१ | ६.१६.२ | — | |
| (५) कोळी | ३२ | ३.८९.२ | — | |
| (६) गवळी | ५९ | ५.८२.१ | — | |
| (७) वैश्यवाणी | ४२ | ९.३८.६ | १ | |
| (८) दलित | २१६ | ३०.५३.० | २ | |
| (९) आदिवासी | ४२ | ४.१०.७ | — | |
| (१०) परप्रांतीय | ५४ | १०.२६.८ | — | |
| **एकूण** | **६६२** | **१०७.०३.०** | **०५** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की दलितांची लोकसंख्या व भू–धारणा सर्वाधिक असाताना ही या वर्गातील उमेदवार केवळ राखीव जागाच संपादित करू शकतात. कोणत्याही सवर्ण जातीचे संख्याबल व भू–धारणा निर्णायक स्वरूपाची नसल्याने, त्यांची युती होऊन आगरी, कुणबी, गवळी आणि वैश्यवाणी जाती समूहांमध्ये सभा स्थानांचे वाटप घडून आले. म्हणजेच कोणत्याही सभा जातीचे गावाच्या राजकारणावर पर्याय नाही, तर सवर्ण–इतर मागासवर्गीयांचे नेतृत्त्व करणारा आगरी जाती समूह सर्वांत प्रभावी आहे.

**३.५ कांदले :** मागील भागात नमूद केल्याप्रमाणे कांदले गाव खेरवाडी, चिंचवली आणि कांदले ग्रुप ग्रामपंचायत समाविष्ट आहे. कांदले गावाची लोकसंख्या ३८३ आहे. त्यात पुरुषांची संख्या २०१ आणि स्त्रियांची संख्या १८२ आहे. पुरुष साक्षरतेचे प्रमाण ६६.५% आणि महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण ५४% आहे. गावातील कुटुंबांची संख्या ५९ असून, त्यातील ३२ कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. गावात आदिवासींची संख्या सर्वाधिक १५४ असून, त्यांच्या खालोखाल दलितांची संख्या ७२ आहे. पनवेल तालुक्यातील आदिवासी–दलित बहुसंख्य असलेले हे अपवादात्मक गाव आहे. त्यांच्या व्यतिरिक्त ब्राह्मण, आगरी, माळी, कोळी, मुस्लिम आणि परप्रांतीयांची वस्ती गावात आहे.

पनवेल–माथेरान राज्य मार्गावरील या गावात एस.टी. बस–सेवा, प्राथमिक शाळा आणि विद्युत पुरवठा या सुविधा उपलब्ध आहेत. नेरे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत या गावाचा समावेश आहे.

गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ५.२३ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.२३**

**कांदले गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | — | ०० |
| (२) आगरी | ६२ | १६.१८ |
| (३) माळी | १४ | ३.६५ |
| (४) कोळी | ४९ | १२.७९ |
| (५) दलित | ७२ | १८.८० |
| (६) आदिवासी | १५४ | ४०.२० |
| (७) मुस्लीम | १३ | ३.३९ |
| (८) परप्रांतीय | १९ | ४.९६ |
| **एकूण** | **३८३** | **१००** |

या गावातील भौगोलिक क्षेत्र १०६ हेक्टर असून, त्यातील ८४ हेक्टर क्षेत्र व्यक्तिगत खातेदायरांचे आहे. त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ५.२४ मध्ये करण्यात आले आहे:

**तक्ता क्रमांक ५.२४**

**कांदले गावाच्या भौगोलिक क्षेत्राचे वर्गीकरण**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | ८४.२८.२ | ७९.२४ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | — | ०.०० |
| (३) देवस्थान इनाम जमीन | — | ०.०० |
| (४) गुरचरण | ०.२२.० | ०.२१ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ११.६५.० | ११.०० |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | ७.९७.२ | ७.५१ |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | २.१२.३ | २.०० |
| **एकूण** | **१०६.२४.७** | **१००** |

वैयक्तिक खातेदारांच्या भू–धारणेचे जाती–निहाय विवरण खालील तक्ता क्रमांक ५.२५ मध्ये करण्यात आले आहे:

**तक्ता क्रमांक ५.२५**

**कांदले गावातील वैयक्तिक भू–धारकांची जाती–निहाय भू–धारणा**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ४ | ७.४१.४ | ८.८२ |
| (२) आगरी | ९ | ४.७९.५ | ५.७० |
| (३) माळी | २ | ८.७५.९ | १०.४२ |
| (४) कोळी | ७ | ११.९५.१ | १४.२२ |
| (५) दलित | १० | ११.६१.७ | १३.८२ |
| (६) आदिवासी | २२ | १६.४८.० | १९.६२ |
| (७) मुस्लीम | २ | ०.६७.५ | ०.७९ |
| (८) परप्रांतीय | ३ | २३.१३.१ | २७.५७ |
| **एकूण** | **५९** | **८४.२८.२** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की तीन परप्रांतीय खातेदारांच्या ताब्यात सर्वाधिक भू–क्षेत्र आहे. ही जमीन त्यांनी सावकारी व्यवसायाच्या अंतर्गत कर्जाची परतफेड न करणाऱ्या आदिवासी व अन्य ग्रामस्तांकडून संपादन केली आहे. त्या विरुद्ध तीव्र स्वरूपांची नाराजी ग्रामस्थांत दिसून आली.

कांदले गाव ग्रुप ग्रामपंचायत समाविष्ट असून, या गावातून तीन सभासद निवडले जातात. मागील तीन ग्रामपंचायत निवडणुकांचा तपशील खालील तक्ता क्रमांक ५.२६ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ५.२६**

**कांदले गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| **जातीसमूह** | **संपादित केलेल्या जागा** | | | |
|---|---|---|---|---|
| | **१९९५** | **२०००** | **२००५** | **एकूण** |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) आगरी | १ * | – | – | १ |
| (३) माळी | – | २ ** | २ ** | ६ |
| (४) कोळी | १ ** | – | – | – |
| (५) दलित | – | – | – | – |
| (६) आदिवासी | १ *** | १ * | – | १ |
| (७) मुस्लीम | – | – | १ * | १ |
| (८) परप्रांतीय | – | २ *** | २ ** | ६ |
| **एकूण** | **३** | **३** | ३ | ९ |

*** खुला प्रभाग

*** खुला प्रभाग

*** आदिवासी महिला आरक्षित

चिंचवली गावा प्रमाणेच या गावात मतदारांची सवर्ण–दलित विभागणी होऊन, खुल्या प्रभागातून सवर्ण जातीचे २ उमेदवार निवडून आले. आदिवासी महिलांसाठी आरक्षित मतदार संघातून १ आदिवासी निवडून आला.

या गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ५.२७ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.२७**

**कांदले गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | — | ७.४१.४ | — | |
| (२) आगरी | ६२ | ४.७९.५ | १ | |
| (३) माळी | १४ | ८.७५.९ | — | |
| (४) कोळी | ४९ | ११.९५.१ | १ | |
| (५) दलित | ७२ | ११.६१.७ | — | |
| (६) आदिवासी | १५४ | १६.४८.० | १ | |
| (७) मुस्लीम | १३ | ०.६७.५ | — | |
| (८) परप्रांतीय | १९ | २३.१३.१ | — | |
| **एकूण** | **३८३** | **१०६.२४.७** | **०३** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, आदिवासी समुदायाची लोकसंख्या व भू–धारणा सर्वाधिक असतानाही, या समुदायासाठी आरक्षित जागेवरच त्यांचा उमेदवार निवडला जातो. इतर मागास वर्गीयांची युती असल्याने आगरी आणि कोळी जाती समूहाने तीनही निवडणूकीत प्रत्येकी एक जागा संपादन केली आहे. म्हणजेच जाती व्यवस्थेच्या अंतर्गत कनिष्ठ स्तरावर असणारे जातीसमूह सत्ता स्पर्धेत आपला प्रभाव पाडू शकत नाही.

**३.६ खैरवाडी, चिंचवली व कांदले ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भू-धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण :**

या प्रकरणाच्या भाग ३.५.३, ३.५.४ आणि ३.५.५ मध्ये खैरवाडी चिंचवली व कांदले गावातील जाती, भू-धारणा आणि सभासंपादन यांचा आढावा घेतल्यानंतर, या भागात त्यातील आंतरसंबंधाचे विश्लेषण करण्यात आले आहे.

सर्व प्रथम या तीन गावातील जातीसमूहांच्या सांख्यिक बलाचे विवरण खालील तक्ता क्रमांक ५.२८ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.२८**

**लोकसंख्येचे जातीनिहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खेरवाडी | चिंचवली | कांदले | एकूण लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | – | ८ | – | ८ | ०.५१ |
| (२) कुणबी | – | ४२ | – | ४२ | २.६९ |
| (३) आगरी | १३२ | १३८ | ६२ | २३२ | १४.८७ |
| (४) माळी | ६८ | – | १४ | ३२ | २.०५ |
| (५) तांबोळी | – | ३१ | – | ३१ | १.९८ |
| (६) कोळी | – | ३२ | ४९ | ८१ | ५.१९ |
| (७) गवळी | – | ५९ | – | ५९ | ३.७८ |
| (८) वैश्यवाणी | – | ४२ | – | ४२ | २.६९ |
| (९) दलित | १६१ | २१६ | ७२ | ३४९ | २२.३७ |
| (१०) आदिवासी | १५४ | ४२ | १५४ | २५० | १६.०२ |
| (११) मुस्लीम | – | – | १३ | १३ | ०.८३ |
| (१२) परप्रांतीय | – | ५४ | १९ | ७३ | ४.६८ |
| **एकूण** | **५११** | **६६२** | **३८३** | **१५६०** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की या ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात दलितांची लोकसंख्या सर्वाधिक–३४९ आणि त्या खालोखाल आदिवासींची–२५० आहे. दलित–आदिवासींची एकत्रित लोकसंख्या जवळपास ५०% तर आगरी जातीसमूहाची लोकसंख्या जवळपास २०% आहे.

जातीनिहाय भूधारणेचे विवरण खालील तक्ता क्रमांक ५.२९ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.२९**

**जाती निहाय भूधारणा**

| जातीसमूह | खेरवाडी | चिंचवली | कांदले | एकूण भूधारण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | – | ५.१७.६ | ७.४१.४ | १२.५९.० | ४.८८ |
| (२) कुणबी | – | ५.७८.९ | – | ५.७८.९ | २.२४ |
| (३) आगरी | १२.८६.६ | – | ४.७९.५ | ४३.६५.० | १६.९१ |
| (४) माळी | ४.८१.० | – | ८.७५.९ | १३.५६.२ | ५.२५ |
| (५) तांबोळी | – | ६.१६.२ | – | ६.१६.२ | २.३८ |
| (६) कोळी | – | ३.८९.२ | ११.९५.१ | १५.८४.३ | ६.१३ |
| (७) गवळी | – | ५.८२.१ | – | ५.८२.१ | २.२५ |
| (८) वैश्यवाणी | – | ९.३८.६ | – | ९.३८.६ | ३.६३ |
| (९) दलित | २२.२५.० | ३०.५३.० | ११.६१.७ | ६४.३९.७ | २४.९६ |
| (१०) आदिवासी | ४.६९.० | ४.१०.७ | १६.४८.० | २५.२७.७ | ९.७९ |
| (११) मुस्लीम | – | – | ०.६७.५ | ०.६७.५ | ०.२६ |
| (१२) परप्रांतीय | – | १०.२६.८ | २३.१३.१ | ३३.३९.९ | १२.९४ |
| **एकूण** | **४४.४१.६** | **१०७.०३.०** | **१०६.२४.७** | **२५७.६९.३** | **१००** |

या तीन गावातून ग्रुप ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या सदस्यांचे जाती–निहाय विवरण खालील तक्ता क्रमांक ५.३० मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ५.३०**

**ग्रुप ग्रामपंचायतीवर निवडून आलेल्या सदस्यांचे जाती–निहाय विवरण**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | — | — | — | ०० |
| (२) कुणबी | — | १ | — | ०१ |
| (३) आगरी | ३ | ६ | ३ | १२ |
| (४) माळी | — | — | — | ०० |
| (५) तांबोळी | — | — | — | ०० |
| (६) कोळी | — | — | ३ | ०३ |
| (७) गवळी | — | १ | — | ०१ |
| (८) वैश्यवाणी | — | १ | — | ०१ |
| (९) दलित | ३ | ६ | — | ०९ |
| (१०) आदिवासी | ३ | — | ३ | ०६ |
| (११) मुस्लीम | — | — | — | ०० |
| (१२) परप्रांतीय | — | — | — | ०० |
| **एकूण** | **९** | **१५** | **९** | ३३ |

वरील विवरणाच्या आधारे जाती, भू–धारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंधाचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ५.३१ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.३१**

**खैरवाडी, चिंचवली आणि कांदले ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंध**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता स्थान प्राप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ०८ | १२.५९.० | — | |
| (२) कुणबी | ४२ | ५.७८.९ | — | |
| (३) आगरी | २३२ | ४३.६५.० | ४ | सवर्णांची युती सत्त–ाधारी जाती समूह |
| (४) माळी | ३२ | १३.५६.२ | — | |
| (५) तांबोळी | ३१ | ६.१६.२ | — | |
| (६) कोळी | ८१ | १५.८४.३ | १ | |
| (७) गवळी | ५९ | ५.८२.१ | — | |
| (८) वैश्यवाणी | ४२ | ९.३८.६ | १ | |
| (९) दलित | ३४९ | ६४.३९.७ | ३ | |
| (१०) आदिवासी | २५० | २५.२७.७ | २ | |
| (११) मुस्लीम | १३ | ०.६७.५ | — | |
| (१२) परप्रांतीय | ७३ | ३२.३९.९ | — | |
| **एकूण** | **१५६०** | **२५७.९०.३** | **११** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की दलितांकडे सर्वाधिक आणि भू–धारणा म्हणजेच जातीय पाठबळ आणि उत्पन्नाची साधने असली तरी त्यांचा प्रभाव केवळ आरक्षित मतदार संघांपुरताच मर्यादित आहे. आदिवासींचे संख्याबळ दलितांच्या खालोखाल असले तरी त्यांचाही प्रभाव केवळ आरक्षित मतदारसंघांपुरताच आहे.

दलितांची संख्या जेव्हा सर्वाधिक असते, त्यावेळेला सवर्ण जातीतील मतदार एकत्र येतात आणि खुल्या जागा काबीज करतात.

ग्रामीण भागात सवर्ण जातीचे राजकारणी आश्रयदात्याची भूमिका पार पाडतात आणि त्यांचे आश्रित असलेले दलित व आदिवासी मतदार त्यांच्या आदेशाप्रमाणेच मतदान करतात.

ग्रामपंचायती वर सवर्ण जातीचे १८ सभासद आणि दलित–आदिवासी १५ सभासद अशी समतुल्य विभागणी दिली असली, तरी दलित आणि आदिवासी सभासद प्रस्थापित नेतृत्वाच्या आदेशाप्रमाणेच कार्य करतात. याची प्रचिती सत्ता स्थपनेत म्हणजेच सरपंच आणि उपसरपंचाच्या निवडणूकीत येते. त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ५.३२ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ५.३२**
**सरपंच आणि उपसरपंचाच्या निवडीचे विश्लेषण**

| अधिकार पद | १९९५ | २००० | २००५ |
|---|---|---|---|
| (१) सरपंच | खुले<br>आगरी | दलित महिला<br>दलित | OBC महिला<br>आगरी |
| (२) उपसरपंच | आदिवासी<br>महिला<br>आदिवासी | खुले<br>आगरी | खुले<br>आगरी |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की,

(१) २००० साली दलित महिला सरपंचपदी निवडून आली कारण सरपंचपद त्या वर्गासाठी आरक्षित होते.

(२) १९९५ साली आदिवासी महिला उपसरपंचपदी निवडून आली कारण उपसरपंचपद या वर्गासाठी आरक्षित होते.

(३) सन १९९५ व २००५ मध्ये सरपंचपदी आणि २००० व २००५ मध्ये उपसरपंचपदी आगरी जातीचे महिलापुरुष निवडून आले.

(४) ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर महिला, दलित आणि आदिवासी या वर्गांसाठी अधिकार पदाचे आरक्षण करण्याची तरतुद असल्याने, त्यांच्या सभा केंद्रात प्रवेश झाला. असे असले तरीही गावाच्या राजकारणावर आणि ग्रामपंचायतीच्या कामकाजावर प्रस्थापित–सवर्ण जातीच्या नेतृत्त्वाचा प्रभाव कायम आहे.

* * *

# ६. रायगड जिल्ह्यातील ग्रामस्तरावरील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–२ (कर्जत तालुका)

**६.१ कर्जत तालुका :**

रायगड जिल्ह्यातील सर्वात प्रगत पनवेल तालुक्याती ग्राम स्तरावरील भू–धारणा, जाती आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे मागील प्रकरणात विश्लेषण केल्यानंतर, त्याला लागूनच असलेल्या कर्जत तालुक्यातील ग्राम स्तरावरील भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण या प्रकरणात करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याच्या उत्तर टोकास आणि सह्याद्री पर्वत रांगात कर्जत तालुका आहे. त्याच्या उत्तरेस ठाणे जिल्हा आणि दक्षिणेस पुणे जिल्हा आहे. त्याचे भौगोलिक क्षेत्र डोंगरदऱ्यांनी व्यापले असल्याने, लोकसंख्या लहान–मोठ्या खेड्यात आणि वाड्यांत विखुलेली आहे. तालुक्याचे क्षेत्रफळ ६५.१२ चौ.कि.मी असून, त्यातील नागरी क्षेत्र केवळ २०.२ चौ.कि.मी आहे. उर्वरित क्षेत्रात जनवस्ती असलेली १७५ आणि निर्जन असलेले १ खेडे आहे. तालुक्यात केवळ तीन नगर परिषदा आहेत. त्यातील माथेरान नगर परिषद ठंड हवेचे ठिकाण असलेली विशेष नगर परिषद आहे. वर नमूद केल्याप्रमाणे लोकवस्त्या विखुरलेल्या असल्याने तालुक्यात केवळ ४९ ग्रामपंचायती आहेत. त्या बहुतांशी ग्रुप ग्रामपंचायतीच्या स्वरूपाच्या असून, प्रत्येक ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात ३ ते ६ गावांचा समावेश आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार कर्जत तालुक्याची लोकसंख्या १८४, ४२० असून, त्यातील ४५,४०९ नागरी आणि १३९, ०११ लोकसंख्या ग्रामीण आहे. त्यातील पुरुषांची लोकसंख्या ९४,९२४ आणि स्त्रियांची लोकसंख्या ८९, ६९६ आहे. ग्रामीण भागात पुरुष लोकसंख्या ७०,९८८ आणि स्त्रियांची लोकसंख्या ६८,०२३ आहे. तालुक्यातील २०% हून अधिक लोकसंख्या आदिवासींची असून, कामकरी व ठाकर या प्रमुख आदिवासी जमाती आहेत.

तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ७१.९७% आहे. शहरी भागात साक्षरता ८३.१३%, तर ग्रामीण भागात ६८.०९% लोकसंख्या साक्षर आहे. ग्रामीण भागात पुरुष साक्षरतेचे प्रमाण ७८.६%, तर महिला साक्षरतेचे प्रमाण सुमारे ३०% आहे.

तालुक्यातील कुटुंबांची संख्या ३६,४६७ असून, त्यातील २६,८०० कुटुंबांचे वास्तव्य ग्रामीण भागात आहे. दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या ८,००० पेक्षा अधिक असून, ती बहुतांशी आदिवासी जमातीतील आणि दलित जाती समूहातील आहे. बहुसंख्य भू–धारक अल्प आणि सीमांत वर्गातील आहेत. त्यांची सरासरी भू–धारणा १ हेक्टर पेक्षाही कमी आहे. अलीकडच्या काळात पर्यटन काळात पर्यटन व्यवसायाचा विकास या तालुक्यात झाला आहे. त्याचप्रमाणे फार्म–हाऊस आणि शहरी भागातील लोकांचे

'सेकंड होम'चे प्रस्थ वाढल्याने, परप्रांतीयांनी स्थानिकांकडून मोठ्या प्रमाणात जमीनी संपादन करण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे असंख्य अल्प भू–धारक विस्थापित झाल्याने, भूमीहिन शेतमजूरांच्या आणि अळथळ कामगारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे, तालुक्यात कारकानदारी अत्यल्प प्रमाणात आहे. मात्र अलीकडच्या काळात हॉटेल व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यात अत्यल्प प्रमाणात स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होतो. एकंदरीत हा तालुका अविकसित आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे.


मुंबई–पुणे, कर्जत–खोपोली आणि कर्जत–पनवेल रेल्वेमार्ग या तालुक्यातून जातात. तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र डोंगराळ असल्याने बारमाही स्वरूपाचे पक्के रस्ते या तालुक्यात जवळपास नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य वाहतूक मंडळाची सेवा अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. अनेक गावांपर्यंत ही बस सेवा पोहोचली नसल्याने, सहा आसनी रिक्षा हे या भागातील प्रवासी वाहतूकीचे प्रमुख साधन आहे.

या तालुक्यात उपलब्ध असणाऱ्या नागरी सुविधांचा तपशील खालील तक्ता क्रमांक ६.१ मध्ये देण्यात आला आहे :

**तक्ता ६.१**

**कर्जत तालुक्यातील नागरी सुविधांचा तपशील**

| सुविधा | उपलब्ध असलेल्या गावांची संख्या | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|
| (१) प्राथमिक शिक्षण | १६६ | ९५.४० | |
| (२) आरोग्य सेवा | १२ | ६.९० | प्राथमिक आरोग्य केंद्र |
| (३) पिण्याचे पाणी | १७५ | १००.०० | |
| (४) डाक सेवा | ६ | ३.४५ | |
| (५) विदयुतीकरण | १७२ | ९८.८५ | |
| (६) बाजार व्यवस्था | ६ | ३.४५ | |
| (७) वाहतूक सुविधा | १३५ | ७७.५९ | |
| (८) संपर्क रस्ते | ९० | ५१.७२ | |
| (९) बँक सेवा | १२ | ६.७० | |
| (१०) माध्यमिक शिक्षण | १२ | ६.७० | |
| (११) उच्च शिक्षण | १ | ०.६० | कर्जत येथे |


MAHARASHTRA
TAHSIL KARJAT
DISTRICT RAIGARH
THANE
DISTRICT
KHALAPUR
TAHSIL
PANVEL
NERAL VI
MATHERAN
KARJAT
VII
To Murbad
SH 8
From Kalyan
Ulhas River
Poshir River
To Pune
SH
To Khopoli
Ulhas River
Sukar Nadi
Pej River
To Pune
MSH-MAJOR STATE HIGHWAY
Kms 2 0 2 4 6 8 10 Kms
Miles 1 0 1 2 3 4 5 Miles
BOUNDARY, DISTRICT
TAHSIL
VILLAGE WITH LOCATION CODE NUMBER
HEADQUARTERS: TAHSIL
VILLAGES WITH POPULATION SIZE: BELOW 200, 200-499, 500-999, 1000-4999, 5000 AND ABOVE
URBAN AREA WITH LOCATION CODE
STATE HIGHWAY
IMPORTANT METALLED ROAD
UNMETALLED AND OTHER ROADS
RAILWAY LINE WITH STATION, BROAD GAUGE
NARROW GAUGE
RIVER AND STREAM
POST OFFICE EXCLUDING R.M.S.
HIGHER SECONDARY SCHOOL
HOSPITAL, PRIMARY HEALTH CENTRE, DISPENSARY, MATERNITY AND CHILD WELFARE CENTRE
IMPORTANT VILLAGE MARKET/HAT
55
VI
SH8
RS
PO
S

**६.२ कर्जत तालुक्यातील सहा गावांचा अभ्यास :**

सदर संशोदन कार्यासाठी कर्जत तालुक्यातील दोन ग्रुप ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. प्रत्येक ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातील तीन, अशा खालील सहा गावांची निवड करण्यात आली. ती गावे खालीलप्रमाणे :

**(अ) कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायत :**

(१) चोची

(२) मुगवे

(३) कोंदीवडे

**(ब) बीड ग्रुप ग्रामपंचायत :**

(१) खरवंडी

(२) कोंढणे

(३) बीड

**६.३ कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट गावांचा अभ्यास :**

कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या तीन गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे :

**३.१ चोची :** कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट असणाऱ्या चोची गावाची लोकसंख्या ६८४ आहे. त्यातील पुरुष लोकसंख्या ३४७ आणि स्त्रियांची लोकसंख्या ३३७ आहे. गावात प्राथमिक शाळा आणि आरोग्य सेवा देणारा एक खाजगी दवाखाना आहे. गावाचे विद्युतीकरण झाले असून, नळाद्वारा पिण्याचे पाणी पुरवले जाते. गावातील १२६ हेक्टर क्षेत्रात पावसाळी भाताचे पिक घेतले जाते. गावापर्यंत एस्.टी.ची सुविधा उपलब्ध नसल्याने, कोंदीवडे– पासून गावापर्यंत सहा आसनी रिक्षातून प्रवासी वाहतूक केली जाते. चोची ते कोंदीवडे अंतर सुमारे चार कि.मी. आहे. कोंदीवडे ते नेरळ व कर्जत मार्गावर एस्.टी. बस सेवा उपलब्ध आहे. गावातील कुटुंबांती संख्या ९८ असून, त्यातील २४ कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत. कर्जत परिसरातपर्यटन व्यवसाय विकसित होत असल्याने, परप्रांतीयांनी गावातील ६७ हेक्टर जमीन पर्यटक निवास आणि फार्म–हाऊस प्रकल्पांसाठी संपादन केली आहे. म्हणजेच गावातील ५०% क्षेत्र परप्रातीयांनी संपादन केले आहे. आगरी, दलित व आदिवासी समुदायाच्या बहुतांशी जमीनी बाहेच्या

लोकांनी संपादन केल्याने, लागवडीखालील क्षेत्रात उल्लेखनीय घट झाली आहे आणि भूमीहिन शसतमजूरांची संख्या वाढली आहे. विस्थापित झालेल्या अनेक कुटुंबातील सदस्य रोजगारासाठी नागरी भागात स्थलांतर करण्याची प्रेक्रया सुरू झाली आहे.

चोची गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.२ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.२**

**चोची गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राह्मण व तत्सम | २३ | ३.३६ |
| (२) मराठा | २७१ | ३९.६१ |
| (३) आगरी | ४२ | ६.१४ |
| (४) कासार | ८ | १.१७ |
| (५) दलित | ८१ | ११.८४ |
| (६) आदिवासी | १०२ | १४.९१ |
| (७) मुस्लीम | १२ | १.७५ |
| (८) परप्रांतीय | ४५ | ६.५८ |
| **एकूण** | **६८४** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की गावात मराठा जातीची लोकसंख्या सर्वाधिक आहे. त्याच्या खालोखाल आदिवासी समुदायाची लोकसंख्या आहे. वर नमूद केल्याप्रमाणे आपली जमीन परप्रांतीयांना विकणाऱ्या आगरी, दलित व आदिवासी कुटुंबांनी रोजगाराच्या शोधार्थ गावातून स्थलांतर केले आहे. मराठा जातीसमूहा व्यतिरिक्त ब्राह्मण, आगरी, कासार, दलित, आदिवासी आणि मुस्लीम जाती समूहांची गावात वस्ती आहे.

चोची गावात उपलब्ध असणाऱ्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता क्रमांक ६.३**

**चोची गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्र प्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | १२६.३६.० | ९१.५६ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | ०.०५.१ | ०.०३ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.५४.५ | ०.४० |
| (४) गुरचरण | २.६१.६ | १.८९ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ५.२४.३ | ३.८० |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | – | – |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | ३.२६.९ | २.३७ |
| **एकूण** | **१३८.०८.४** | **१००** |

गावात उपलब्ध असलेल्या क्षेत्रापैकी १२६.३६ हेक्टर क्षेत्र वैयक्तिक खातेदारांचे आहे. त्याचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.४ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.४**

**चोची गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भू–धारणेचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारणा क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण व तत्सम | ५ | ४.२८.६ | ३.१७ |
| (२) मराठा | ३७ | ३४.६०.८ | २७.४६ |
| (३) आगरी | ७ | ६.१६.० | ४.८८ |
| (४) कासार | १ | ०.२२.० | ०.१७ |
| (५) दलित | १४ | १०.११.२ | ८.०२ |
| (६) आदिवासी | २ | २.१७.३ | १.७२ |
| (७) मुस्लीम | १ | १.७०.३ | १.३५ |
| (८) परप्रांतीय | ९ | ६७.१०.४ | ५३.२५ |
| **एकूण** | **७६** | **१२६.३६.०** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, ९ परप्रांतीय खातेदारांच्या ताब्यात ६७ हेक्टर जमीन आहे. त्यावर आज भात शेती केली जात नाही. कालांतराने या जमीनेचे बिगर–शेती क्षेत्रात रूपांतर करून, फार्म–हाऊसेस, गृहनिर्माण आणि पर्यटन व्यवसायासाठी आवश्यक होटेल्स उभाली जातील. परकीय–परप्रांतीय व्यावसायिकांना गावाच्या राजकारणात स्वारस्य नाही. उर्वरित खातेदारांच्या जमीनी संपादन करण्यात त्यांना स्वारस्य आहे. मराठा जातीच्या खातेदारांची संख्या सर्वाधिक असून, त्यांचे भू–धारणा क्षेत्र सुमारे ३५ हेक्टर आहे. उर्वरित जाती–समूहांची भू–दारणा नगण्य आहे.

कोंदीवडे ग्रुप ग्रामंपचायतीवर चोची गावातून तीन सदस्य निवडले जातात. ग्राम पंचायतीच्या मागील तीन निवडणुकांचे विश्लेषण खालील तक्ता क्रामंक ६.५ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.५**

**चोची गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण व तत्सम | – | – | – | – |
| (२) मराठा | २ * | २ * | २ * | ६ |
| (३) आगरी | – | – | – | – |
| (४) कासार | – | – | – | – |
| (५) दलित | – | – | – | – |
| (६) आदिवासी | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (७) मुस्लीम | – | – | – | – |
| (८) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **३** | **३** | **३** | **९** |

* खुल्या जागा – २

** आदिवासी आरक्षित – १

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की सर्वाधिक संख्याबल असणाऱ्या मराठा जाती–समूहाच्या उमेदवारांनी खुल्या वर्गासाठी असणाऱ्या दोन जागा मागील निवडणुकांमध्ये काबीज गेल्या आहेत. उर्वरित एक जागा आदिवासी समुदायासाठी आरक्षित असल्याने, ती जागा आदिवासी समुदायातील पुरुष उमेदवारांनी जिंकली आहे.

वरील विश्लेषणाच्या आधारे चोची गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता संपादन यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.६ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.६**

**चोची गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचा आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण तत्सम | २३ | ४.२८.६ | — | |
| (२) मराठा | २७१ | ३४.६०.८ | २ | |
| (३) आगरी | ४२ | ६.१६.० | — | |
| (४) कासार | ०८ | ०.२२.० | — | |
| (५) दलित | ८१ | १०.११.२ | — | |
| (६) आदिवासी | १०२ | २.१७.३ | १ | |
| (७) मुस्लीम | १२ | १.७०.३ | — | |
| (८) परप्रांतीय | ४५ | ६७.१०.४ | — | |
| **एकूण** | **५८४** | **१२६.३६.०** | **०३** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की,

(१) सर्वाधिक संख्याबल आणि परप्रांतीयांची भू–धारणा वगळता सर्वाधिक भू–धारणा असलेल्या मराठा जाती–समूहाचे चोची गावातील खुल्या वर्गासाठी असलेल्या दोन्ही जागा संपादन केल्या आहेत.

(२) मराठ्यांच्या खालोखाल संख्याबल असणाऱ्या आदिवासी समुदायाने एक आरक्षित समुदायाने एक आरक्षित जागा संपादन केली आहे.

(३) गावातील अन्य जाती समूहांकडे संख्याबल व भू–धारणा या दोन्हींचा अभाव असल्याने आणि परप्रांतीयांना स्थानिक राजकारणात स्वारस्य नसल्याने व त्यांच्याकडे संख्याबल नसल्याने ते गावाच्या सूक्ष्म स्तरीय राजकारणात निष्प्रभ ठरले आहे.

(४) चोची गावाच्या राजकारणात जाती समूहाची लोकसंख्या हा घटक निर्णायक ठरला आहे.

**३.२ मुगवे :** कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट मुगवे गावाची लोकसंख्या २६९ आहे, त्यातील पुरुष लोकसंख्या १४६ असून स्त्रियांची लोकसंख्या १२३ आहे. गावात प्राथमिक शाळा आणि एक खाजगी दवाखाना आहे. गावाचे विद्युतीकरण झाले असून, नळाद्वारा पिण्याचे पाणी पुरवले जाते. गावातील ८९ हेक्टर क्षेत्रात पावसाळी भाताचे पिक घेतले जाते. गावापर्यंत एस्.टी. बस सेवा उपलब्ध नसल्याने कोंदीवडेपासून मुगवे गावापर्यंत सहा आसनी रिक्षातून प्रवासी वाहतूक केली जाते. मुगवे ते कोंदीवडे अंतर सुमारे ६ किमी. आहे. गावातील कुटुंबांची संख्या ६२ असून, त्यातील ३० कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. ब्राह्मण व परप्रांतीयांच्या गावात जमीनी असल्या, तरी त्यांचे गावात वास्तव्य नाही. गावात आगरी जाती–समूहांची संख्या सर्वाधिक म्हणजे ९६ आहे. या व्यतिरिक्त या गावात मराठा, तेली, वैश्य वाणी आणि आदिवासी जाती–समूहांची वस्ती आहे. त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ६.७ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.७**

**मुगवे गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | – | ०.०० |
| (२) मराठा | २२ | ८.१८ |
| (३) आगरी | ९६ | ३५.६९ |
| (४) माळी | ०८ | २.९७ |
| (५) तेली | ३८ | १४.१३ |
| (६) वैश्यवाणी | ०९ | ३.३५ |
| (७) दलित | ५५ | २०.४५ |
| (८) आदिवासी | ४१ | १५.२४ |
| (९) परप्रांतीय | – | ०.०० |
| **एकूण** | **२६९** | **१००** |

मुगवे गावात उपलब्ध असणाऱ्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.८ मध्ये देण्यात आली आहे :

**तक्ता क्रमांक ६.८**

**मुगवे गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | ८८.६३.१ | ९१.४२ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | ३.९५.९ | ४.११ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.१०.२ | ०.१० |
| (४) गुरचरण | १.१८.२ | १.२१ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | २.२४.६ | २.३१ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | – | – |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | १.२३.६ | १.२७ |
| **एकूण** | **९७.३५.६** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होत आहे की, गावातील सुमारे ९०% जमीन वैयक्तिक खातेदारांच्या मालकीची आहे. वैयक्तिक खातेदारांच्या मालकीच्या जमीनाचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.९ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.९**

**मुगवे गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भूधारणेचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | १७ | १४.५८.३ | १६.४५ |
| (२) मराठा | ११ | ८.६५.५ | ९.७७ |
| (३) आगरी | २६ | २८.८७.३ | ३२.५७ |
| (४) माळी | १ | १.१५.८ | १.३० |
| (५) तेली | १४ | १०.६८.२ | १२.०५ |
| (६) वैश्यवाणी | २ | १.७६.१ | १.९९ |
| (७) दलित | १५ | १२.८२.२ | १४.४७ |
| (८) आदिवासी | १५ | १०.४७.० | ११.८१ |
| (९) परप्रांतीय | १२ | १०.०९.७ | ११.४० |
| **एकूण** | **९८** | **८८.६३.१** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होत आहे की आगरी जाती समूहाच्या मालकीची सर्वाधिक म्हणजे २९ हेक्टर जमीन आहे. आगरी जाती–समूहांचे सांख्यिक बल आणि भू–धारणा सर्वाधिक आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली बिगर मराठा जातींची एकजूट झाल्याने, कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत त्यांचे वर्चस्व आहे. त्याची प्रचिती खालील तक्ता क्रमांक ६.१० मध्ये येते.

**तक्ता क्रमांक ६.१०**

**मुगवे गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) मराठा | – | – | – | – |
| (३) आगरी | १ * | १ * | १ * | ३ |
| (४) माळी | – | – | – | – |
| (५) तेली | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (६) वैश्यवाणी | – | – | – | – |
| (७) दलित | – | – | – | – |
| (८) आदिवासी | – | – | – | – |
| (९) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **२** | **२** | **२** | **६** |

* खुल्या जागा – २

** OBC महिला आरक्षित – १

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की खुल्या वर्गाची एक जागा आगरी जाती समूहाने आणि इतर मागास वर्गीयांकरिता आरक्षित असलेली एक जागा तेली जातीच्या उमेदवाराने १९९५, २००० आणि २००५च्या निवडणूकीत संपादन केली आहे.

मुगवे गावातील जाती समूह, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंदाचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.११ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.११**

**मुगवे गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचा आंतरसंबंध (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण तत्सम | — | १४.५८.२ | — | |
| (२) मराठा | २२ | ८.६५.५ | — | |
| (३) आगरी | ९६ | २८.८७.३ | २ | बिगर–मराठा जातीची युती |
| (४) माळी | ०८ | १.१५.८ | — | |
| (५) तेली | ३८ | १०.६८.२ | १ | |
| (६) वैश्यवाणी | ०९ | १.७६.१ | — | |
| (७) दलित | ५५ | १२.८२.२ | — | |
| (८) आदिवासी | ४१ | १०.४७.० | — | |
| (९) परप्रांतीय | — | १०.०९.७ | — | |
| **एकूण** | **२६९** | **८८.६३.१** | **३** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक संख्याबल आणि भू–धारणा असलेल्या आगरी जाती समूहाने, अन्य बिगर मराठा जातींशी समतोल करून गावाच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

आगरी जातीचे संख्याबल सर्वाधिक असले तरी सत्ता संपादनासाठी ते पुरेसे नसल्याने त्यास इतर मागासवर्गीय दलित व आदिवासींशी सामंजस्य करणे भाग पडले.

तेली जाती समूहाचे संख्याबल व भू–धारणा मर्यादित असले तरी अन्य इतर मागास वर्गीयांच्या पाठिंब्याने त्यास इतर मागास वर्गीयांसाठी आरक्षित असणारी एक जागा संपादन करता आली.

आगरी जाती समूह इर मागास वर्गीयांमध्ये समाविष्ट असला तरी त्याने बिगर–मराठा जाती समूहांशी सामंजस्य प्रस्थापित करून, खुल्या वर्गाच्या दोन जागा काबिज केल्या.

**३.३ कोंदीवडे :** कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीचे मुख्य गाव असलेल्या कोंदीवडे गावाची लोकसंख्या ७८३ आहे. त्यात पुरुषांची लोकसंख्या ४११ आणि स्त्रियांची लोकसंख्या ३७२ आहे. गावात प्राथमिक शाळा आणि शासकीय प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे. गावाचे विद्युतीकरण झाले असून, पिण्याचे पाणी नळाद्वारा पुरवले जाते. कर्जत–नेरळ मार्गावरील या गावात राज्य परिवहन मंडळाची बस सेवा उपलब्ध आहे. त्या व्यतिरिक्त सहा आसनी रिक्षा हे पर्यायी प्रवासी वाहतूक सेवेचे साधन आहे. गावात १०१ हेक्टर क्षेत्रात पावसाळी हंगामात भाताचे पिक घेतले जाते.

गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय विवरण खालील तक्ता क्रमांक ६.१२ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.१२**

**कोंदीवडे गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | – | ०.०० |
| (२) मराठा | ३७६ | ४८.०२ |
| (३) आगरी | १६२ | २०.६९ |
| (४) माळी | ०९ | १.१५ |
| (५) तेली | २७ | ३.४५ |
| (६) कासार | २६ | ३.३२ |
| (७) खाटीक | ०८ | १.०२ |
| (८) दलित | १४७ | १८.७७ |
| (९) मुस्लीम | ०६ | ०.७७ |
| (१०) परप्रांतीय | २२ | २.८१ |
| **एकूण** | **७८३** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की मराठा जाती समूह बहुसंख्य असलेले हे गाव आहे. त्यांच्या खालोखाल आगरी आणि दलितांची लोकसंख्या आहे. या व्यतिरिक्त गावात माळी, तेली, कासार, खाटीक आणि परप्रांतीयांची वस्ती आहे.

गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.१३ मध्ये देण्यात आली आहे :

**तक्ता क्रमांक ६.१३**

**कोंदीवडे गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | १०१.३३.५ | ९३.८२ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | १.०७.६ | ०.९९ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.९८.७ | ०.९१ |
| (४) गुरचरण | ०.०१.० | ०.०१ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | २.२३.४ | २.०६ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | — | — |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | २.४३.३ | २.२५ |
| **एकूण** | **१०८.०७.५** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की गावातील बहुतांशी जमीन व्यक्तिगत खातेदारांच्या मालकीची आहे. व्यक्तिगत खातेदारांच्या जमीनीचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.१४ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.१४**

**कोंदीवडे गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भू–धारणेचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ०३ | १.०२.४ | १.०० |
| (२) मराठा | ४८ | ३३.५४.२ | ३३.१० |
| (३) आगरी | २० | १८.४८.७ | १८.२५ |
| (४) माळी | ०२ | ०.६८.० | ०.६७ |
| (५) तेली | ०४ | १.३३.३ | १.३१ |
| (६) कासार | ०४ | २.५०.३ | २.४७ |
| (७) खाटीक | ०१ | १.५२.८ | १.५१ |
| (८) दलित | २१ | १६.९५.२ | १६.७३ |
| (९) मुस्लीम | ०१ | ३.१८.८ | ३.१५ |
| (१०) परप्रांतीय | १५ | २२.१०.६ | २१.८२ |
| **एकूण** | **११९** | **१०१.३३.५** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की मराठा जाती समूहाची भू–धारणा सर्वाधिक म्हणजे ३४ हेक्टर आहे. परप्रांतीयांची भू–धारणा २२ हेक्टर असली तरी फार्म–हाऊस व गृहनिर्माण या उद्देशाने ती संपादित करण्यात आली आहे. त्यांच्या खालोखाल आगरी आणि दलित जाती–समूहांची भू–धारणा आहे.

सर्वाधिक संख्याबल आणि भू–धारणा असलेल्या मराठा समाजाचे गावाच्या राजकारणावर वर्चस्व आहे. ग्रुप ग्रामपंचायतीवर कोंदीवडे गावातून चार सभासद निवडले जातात. मागील तीन निवडणुकांच्या परिणामांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.१५ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.१५**

**कोंदीवडे ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९५ | २००० | २००५ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) मराठा | २ * | २ * | २ * | ६ |
| (३) आगरी | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (४) माळी | – | – | – | – |
| (५) तेली | – | – | – | – |
| (६) कासार | – | – | – | – |
| (७) खाटीक | – | – | – | – |
| (८) दलित | १ *** | १ *** | १ *** | ३ |
| (९) मुस्लीम | – | – | – | – |
| (१०) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **४** | **४** | **४** | **१२** |

* खुल्या वर्गातील

** इतर मागासवर्गीय महिला राखीव

*** दलित महिला राखीव

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की खुल्या वर्गाच्या दोन्ही जागा मराठ्यांनी तर इतर मागास वर्गीय महिलांसाठी आरक्षित जागा, आगरी आणि दलित आरक्षित जागा दलित पुरुष उमेदवारांनी जिंकल्या आहेत.

कोंदीवडे गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंधाचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.१६ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.१६**

**कोंदीवडे गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांतील आंतरसंबंध**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | — | १.०२.४ | — | |
| (२) मराठा | ३७६ | ३३.५४.२ | २ | प्रभावी जाती |
| (३) आगरी | १६२ | १८.४८.७ | १ | |
| (४) माळी | ०९ | ०.६८.० | — | |
| (५) तेली | २७ | १.३३.३ | — | |
| (६) कासार | २६ | २.५०.३ | — | |
| (७) खाटीक | ०८ | १.५२.८ | — | |
| (८) दलित | १४७ | १६.९५.२ | १ | मराठ्यांना पाठिंबा |
| (९) मुस्लीम | ०६ | ३.१८.८ | — | |
| (१०) परप्रांतीय | २२ | २२.१०.६ | — | |
| **एकूण** | **७८३** | **१०१.३३.५** | **४** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, कोंदीवडे गावात सर्वाधिक संख्याबल आणि भू–धारणा असलेल्या मराठा जाती–समूहाचे वर्चस्व आहे. दलित जाती–समूहाचा मराठा जाती–समूहास पाठिंबा असल्याने, मराठा–दलित जातींच्या युतीचे कोंदीवडे गावाच्या राजकारणावर निर्विवाद वर्चस्व होते. मराठ्यांच्या खालोखाल संख्याबल आणि भू–धारणा असलेल्या आगरी जाती–समूहास आरक्षणाच्या तरतुदींमुळे सभेत वाटा प्राप्त झाला. म्हणजेच ज्या वेळी विशिष्ट जातीकडे निर्विवाद संख्याबल नसते, त्यावेळी सत्तासंपादन करण्यासाठी अन्य जातीजातींबरोबर समझोता करावा लागतो.

**३.४ कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचातीतील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध :**

कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट तीन गावांतील राजकीय प्रकियेच्या आधारे कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भू–धारणा आणि सत्ता संबंध यांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.१७ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.१७**

**जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००५)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण तत्सम | २३ | १९.८९.२ | — | |
| (२) मराठा | ६६९ | ७६.८०.५ | ४ | सत्तारूढ जाती |
| (३) आगरी | ३०० | ५३.५२.० | २ | |
| (४) माळी | १७ | १.८३.८ | — | |
| (५) तेली | ६५ | १२.०१.५ | १ | |
| (६) वैश्यवाणी | ०९ | १.७६.१ | — | |
| (७) कासार | ०८ | २.७२.३ | — | |
| (८) खाटीक | ०८ | १.५२.८ | — | |
| (९) दलित | २८३ | ३९.३८.६ | १ | मराठ्यांशी युती |
| (१०) आदिवासी | १४३ | १२.६४.३ | १ | मराठ्यांशी युती |
| (११) मुस्लीम | १८ | ४.८९.१ | — | |
| (१२) परप्रांतीय | ६७ | ९९.५३.६ | — | |
| **एकूण** | **१७३६** | **३१६.३४.६** | **९** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की मराठा जातीसमूहाने दलित व आदिवासी जाती–समूहांची युती करून कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीने सत्ता काबिज केली आहे. प्रत्येक निवडणूकीत ९ पैकी मराठा जातीचे ४ + दलित १ + आदिवासी १ असे ६ उमेदवार निवडून आले.

इतर मागास वर्गीयांनी प्रत्येक निवडणूकीत २ ं १ अशा ३ जागा संपादन केल्या.

या ग्रुप ग्रामपंचायतीतील सर्वाधिक संख्याबल आणि दुसऱ्या क्रमांकाची भू–धारणा मराठा जाती–समूहाकडे आहे. आदिवासी व दलित अल्प भू–धारक व भूमिहिन शेत मजूरांना मराठा जातीचे शेतकरी रोजगार देतात. आश्रयदाता व आश्रीत असे मध्यम व कनिष्ठ जातीतील संबंध या ग्रामपंचायतीत दिसून येतात. त्यामुळे सुमारे ४०% संख्याबल आणि २५% भू–धारणा असणाऱ्या मराठा जातीचे कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीवर वर्चस्व आहे.

सर्वाधिक भू–धारणा परप्रांतीयांची असली तरी त्यांना स्थानिक राजकारणात स्वारस्य नाही. आपले हितसंबंध जोपासण्यासाठी ते सत्तारूढ जाती–समूहाशी सलोख्याचे संबंध ठेवून आहेत.

कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत सत्तारूढ जाती गटाचे संख्याबल हा निर्णायक घटक ठरला आहे. त्याची प्रचिती अधिकारपद संपादनात आली आहे. त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ६.१८ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.१८**

**सरपंच आणि उपसरपंच निवडीचे विश्लेषण**

| अधिकार पद | १९९५ | २००० | २००५ |
|---|---|---|---|
| (१) सरपंच | खुल्या वर्गासाठी मराठा | इतर मागासवर्गीय आगरी | आदिवासी महिला आदिवासी |
| (२) उपसरपंच | दलित महिला दलित | खुल्या वर्गासाठी मराठा | खुल्या वर्गासाठी मराठा |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की मराठा जाती–समूहाने सरपंचपद १९९५ साली आणि उपसरपंचपद २००० व २००५ साली संपादन केले.

दलित, इतर मागासवर्गीय आणि आदिवासी जाती–समूहांना १९९५ साली उपसरपंच पद, तर सरपंचपद २००० आणि २००५ साली प्राप्त झाले. त्याचे कारण ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार सोडतद्वारा विशिष्ट वर्गासाठी आरक्षणाची तरतुद आहे. असे असले तरी कोंदीवडे गावाच्या राजकारणावर आणि ग्रुप ग्रामपंचायतीवर मराठा जातीचे निर्विवाद वर्चस्व होते.

**६.४ बीड ग्रुप ग्रामपंचायीत समाविष्ट गावांचा अभ्यास :**

कर्जत तालुक्यातील बीड ग्रुप ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात समाविष्ट असणाऱ्या तीन गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांतील आतरसंबंधांचे विश्लेषण खालीलप्रमाणे आहे :

**४.१ खरवंडी :** बीड ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट असणाऱ्या खरवंडी गावाची लोकसंख्या २८३ आहे. त्यातील पुरुष लोकसंख्या १४६ आणि स्त्रियांची लोकसंख्या १३७ आहे. गावात प्राथमिक शाळा आणि एक खाजगी दवाखाना आहे. गावाचे विद्युतीकरण झाले आहे. कर्जत–नेरळ मार्गावरील या गावात एस.टी.ची बस सेवा उपलब्ध नाही. गावातील लागवडी योग्य क्षेत्र ८९ हेक्टर असून, त्यात पावसाळी हंगामात भात शेती केली जाते. गावातील कुटुंबांची संख्या ८२ असून, त्यातील १८ कुटुंबे दारिद्र्यरेषेखाली आहेत. गावात सर्वाधिक लोकसंख्या मराठा जातीची असून, त्या खालोखाल दलितांची लोकसंख्या आहे.

गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.१९ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.१९**

**खरवंडी गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | २३ | ८.१३ |
| (२) मराठा | १२१ | ४२.७६ |
| (३) माळी | ०९ | ३.१८ |
| (४) सोनार | ०९ | ३.१८ |
| (५) तेली | १९ | ६.७१ |
| (६) पिंजारी | १० | ३.५३ |
| (७) दलित | ६४ | २२.६१ |
| (८) आदिवासी | १९ | ६.७१ |
| (९) मुस्लीम | ०९ | ३.१८ |
| (१०) परप्रांतीय | – | – |
| **एकूण** | **२८३** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, मराठा जाती–समूहाची लोकसंख्या १२१ म्हणजे ४३% आहे, तर त्याच्या खालोखाल दलितांची लोकसंख्या ६४ म्हणजे २६% आहे. अन्य जातीसमूहांची, म्हणजेच ब्राह्मण, सोनार, तेली, पिंपरी, आदिवासी व मुस्लीमांची लोकसंख्या नगण्य म्हणजे १०% पेक्षा कमी आहे.

गावातील लागवडीस एकूण क्षेत्र ८९ हेक्टर आणि योग्य क्षेत्र ८२ हेक्टर आहे. त्याची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.२० मध्ये देण्यात आली आहे :

**तक्ता क्रमांक ६.२०**

**खरवंडी गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | ८२.०८.६ | ९२.१३ |
| (२)अन्य खातेदारांची जमीन | १.६३.१ | १.८३ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | ०.५८.० | ०.६५ |
| (४) गुरचरण | ०.४२.० | ०.४७ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | २.२६.६ | २.५४ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | — | — |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | १.९४.० | २.१८ |
| **एकूण** | **८८.९२.३** | **१००** |

वैयक्तिक भू–धारकांच्या जाती–निहाय एकूण भू–धारणेचा तपशील खालील तक्ता क्रमांक ६.२१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता क्रमांक ६.२१**

**खरवंडी गावातील वैयक्तिक भू–धारकांच्या भूधारणेचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | १३ | १४.९७.६ | १८.२९ |
| (२) मराठा | ३५ | ३२.१७.१ | ३९.०२ |
| (३) माळी | ०२ | २.८७.५ | ३.५१ |
| (४) सोनार | ०२ | १.९१.१ | २.३३ |
| (५) तेली | ०४ | ३.३६.४ | ४.०९ |
| (६) पिंजारी | ०२ | ३.३९.५ | ४.१५ |
| (७) दलित | १२ | ८.२३.० | १०.०४ |
| (८) आदिवासी | ०२ | ०.६१.२ | ०.७४ |
| (९) मुस्लीम | ०२ | ३.७२.६ | ४.५५ |
| (१०) परप्रांतीय | ०४ | १०.८२.६ | १३.२० |
| **एकूण** | **७८** | **८२.०८.६** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या मराठा जाती–समूहाची भू–धारणा सर्वाधिक आहे. त्यांच्या खालोखाल भू–धारणा असलेल्या ब्राह्मण जातीचे बहुतांशी भू–धारक गावात रहात नाहीत. अलीकडच्या काळात परप्रांतीयांनी त्यांच्या व्यवसायासाठी स्थानिक भू–धारकांच्या जमिनी विकत घेतल्या आहेत. मात्र त्यांचे गावात वास्तव्य नाही.

बीड ग्रुप ग्रामपंचायतीवर खरवंडी गावातून दोन सभासद निवडले जातात. मागील तीन निवडणुकांच्या तपशीलाचे विवरण खालील तक्ता क्रमांक ६.२२ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.२२**

**खरवंडी गावातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९८ | २००३ | २००८ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) मराठा | १ * | १ * | १ * | ३ |
| (३) माळी | – | – | – | – |
| (४) सोनार | – | – | – | – |
| (५) तेली | – | – | – | – |
| (६) पिंजारी | – | – | – | – |
| (७) दलित | १ * | १ * | १ * | ३ |
| (८) आदिवासी | – | – | – | – |
| (९) मुस्लीम | – | – | – | – |
| (१०) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **२** | **२** | **२** | **६** |

** खुल्या वर्गासाठी

** दलित महिला राखीव

वरील तक्त्यावरून हे दिसून येते की, सर्वाधिक लोकसंख्या व सर्वाधिक भू–धारणा असलेल्या मराठा जाती–समूहातील उमेदवार खुल्या जागेवर निवडून आले आहेत. अन्य जागा दलित महिलांसाठी आरशित असल्याने, मराठा जातीच्या पाठिंब्याने सत्ता दलितांनी संपादन केली आहे.

खरवंडी गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ६.२३ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.२३**

**खरवंडी गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००८)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | २३ | १४.९७.६ | — | |
| (२) मराठा | १२१ | ३२.१७.१ | १ | सत्ताधारी वर्ग |
| (३) माळी | ०९ | २.८७.५ | — | |
| (४) सोनार | ०९ | १.९१.१ | — | |
| (५) तेली | १९ | ३.३६.४ | — | |
| (६) वंजारी | १० | ३.३९.५ | — | |
| (७) दलित | ६४ | ८.२३.० | १ | |
| (८) आदिवासी | १९ | ०.६१.२ | — | |
| (९) मुस्लीम | ०९ | ३.७२.६ | — | |
| (१०) परप्रांतीय | — | १०.८२.६ | — | |
| **एकूण** | **२८३** | **८२.०८.६** | **२** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक लोकसंख्या आणि सर्वाधिक भू–धारणा असलेल्या मराठा जातीचे खरवंडी गावाच्या राजकारणावर वर्चस्व आहे. दलित आणि आदिवासी जातींचे अल्प भू–धारक रोजगारासाठी मराठा जातीच्या शेतकऱ्यांवर अवलंबून आहेत. त्यामुळे स्थानिक राजकारणात दलित व आदिवासी मतदारांचा मराठा जातीच्या आणि त्याद्वारा पुरस्कृत उमेदवारांना पाठिंबा आहे.

**४.२ कोंढाणे :** बीड ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट कोंढाणे गावाची लोकसंख्या ४११ आहे. त्यातील पुरुष लोकसंख्या २०० आणि स्त्रियांची लोकसंख्या २११ आहे. गावात प्राथमिक शाळा असून, विद्युतीकरण झाले आहे. गावातील ७० हेक्टर क्षेत्रात पावसाळी हंगामात भात शेती केली जाते. कोंढाणे गावात एस्.टी. बस–सेवा उपलब्ध नसल्याने, कोंदीवडे गावापासून सहा आसनी रिक्षातून प्रवासी वाहतूक केली जाते. गावातील कुटुंबांची संख्या ६४ असून, त्यातील १५ कुटुंबे दारिद्र्यरेषेखालील आहेत. गावात सर्वाधिक लोकसंख्या ब्राह्मण जाती–समूहाची असून, त्या खालोखाल मराठ्यांची लोकसंख्या आहे. मात्र दलित–आदिवासी या आर्थिकदृष्ट्या कमकूवत समाज घटकांची एकत्रित लोकसंख्या ब्राह्मणांपेक्षा अधिक आहे. या व्यतिरिक्त माळी, तेली, मुस्लीम आणि परप्रांतीयांची वस्ती आहे.

गावातील लोकसंख्या जाती–निहाय विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.२४ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.२४**

**कोंढाणे गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | ११५ | २७.९८ |
| (२) मराठा | १०६ | २५.७९ |
| (३) माळी | २७ | ६.५७ |
| (४) तेली | ०६ | १.४६ |
| (५) दलित | ४२ | १०.२२ |
| (६) आदिवासी | ८७ | २१.१६ |
| (७) मुस्लीम | ६ | १.४६ |
| (८) परप्रांतीय | २२ | ५.३५ |
| **एकूण** | **४११** | **१००** |

कोंढाणे गावातील भौगोलिक क्षेत्राती वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.२५ मध्ये देण्यात आली आहे :

**तक्ता क्रमांक ६.२५**

**कोंढाणे भागातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) व्यक्तिगत भूधारकांची जमीन | ७०.४४.७ | ८८.०५ |
| (२) अन्य भूधारकांची जमीन | — | — |
| (३) ग्रामदेवता इनाम जमीन | २.०८.२ | २.६० |
| (४) गुरचरण | ०.९३.० | १.१६ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | २.५६.२ | ३.२० |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | १.८५.० | १.३२ |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | २.१८.४ | २.७३ |
| **एकूण** | **८०.०५.४** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, कोंढाणे गावातील सर्वाधिक जमीन व्यक्तिगत भू–धारकांच्या मालकीची आहे. त्याचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.२६ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.२६**

**कोंढाणे गावातील वैयक्तिक भू-धारकांची जाती-निहाय भू-धारणा**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | २८ | ३४.१४.७ | ४८.४७ |
| (२) मराठा | १५ | १७.५९.९ | २४.९८ |
| (३) माळी | ४ | ४.३४.० | ६.१६ |
| (४) तेली | ०१ | ०.२४.० | ०.३४ |
| (५) दलित | १० | ४.९८.७ | ७.०८ |
| (६) आदिवासी | ५ | ३.३९.३ | ४.८१ |
| (७) मुस्लीम | ०१ | ०.७५.४ | १.०६ |
| (८) परप्रांतीय | ५ | ४.९८.७ | ७.०६ |
| **एकूण** | **५९** | **७०.४४.७** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, कोंढाणे गावात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या ब्राह्मण जाती-समूहाची भूधारणा सर्वाधिक आहे. त्याचे प्रतिबिंब ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत दिसून येते. बीड ग्रुप ग्रामपंचायतीवर कोंढाणे गावातून तीन सदस्यांची निवड करण्यात येते. त्यातील खुल्या वर्गाची प्रत्येकी एक जागा ब्राह्मण आणि मराठा जाती-समूहांनी संपादन केली आहे तर महिलांसाठी आरक्षित एक जागा आदिवासी जाती-समूहाने संपादित केली आहे.

ग्रामपंचायतीच्या मागील तीन निवडणुकांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.२७ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.२७**

**ग्रामपंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९८ | २००३ | २००८ | एकूण |
| (१) ब्राह्मण | १ * | १ * | १ * | ३ |
| (२) मराठा | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (३) माळी | – | – | – | – |
| (४) तेली | – | – | – | – |
| (५) दलित | – | – | – | – |
| (६) आदिवासी | १ *** | १ *** | १ *** | ३ |
| (७) मुस्लीम | – | – | – | – |
| (८) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **३** | **३** | **३** | **९** |

*** खुल्या वर्गातील

*** खुल्या वर्गातील

*** आदिवासी महिला आरक्षित

कोंढाणे गावातील जाती–समूह, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विशलेषण खालील तक्ता क्रमांक ६.२८ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.२८**

**कोंढाणे गावातील जाती–समूह, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे विश्लेषण (२००८)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण | ११५ | ३४.१४.७ | १ | |
| (२) मराठा | १०६ | १७.५९.९ | १ | |
| (३) माळी | २७ | ४.३४.० | — | |
| (४) तेली | ०६ | ०.२४.० | — | |
| (५) दलित | ४२ | ४.९८.७ | १ | |
| (६) आदिवासी | ८७ | ३.३९.३ | — | |
| (७) मुस्लीम | ०६ | ०.७५.४ | — | |
| (८) परप्रांतीय | २२ | ४.९८.७ | — | |
| **एकूण** | **४११** | **७०.४४.७** | **०३** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक संख्याबल आणि भू–धारणा असलेल्या ब्राह्मण जाती–समूहाने मागील तीन निवडणूकांत तीन जागा संपादन केल्या आहेत. त्याच्या खालोखाल लोकसंख्या व भू–धारणा असलेल्या मराठा जाती–समूहाने आणि महिलांसाठी आरक्षित एक जागा आदिवासी जाती–समूहाने काबिज केली आहे. म्हणजेच कोंढाणे गावाच्या राजकारणात जाती आणि भू–धारणा या घटकांचे संयुक्त वर्चस्व दिसून येते.

**४.३ बीड :** बीड ग्रुप ग्रामपंचायतीचे मुख्य गाव असलेल्या बीड गावाची लोकसंख्या १६३६ आहे. त्यात पुरुष लोकसंख्या ८५२ आणि स्त्रियांची लोकसंख्या ७५७ आहे. गावात प्राथमिक शाळा आणि शासनाच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे उपकेंद्र आहे. गावाचे विद्युतीकरण झाले असून, नळाद्वारे पाण्याचा पुरवठा करण्यात येतो. गावात एस्.टी. बस–सेवा उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त सहा आसनी रिक्षा हे प्रवासी वाहतूकीचे प्रमुख साधन आहे. गावातील २७४ हेक्टर जमीनीत पावसाळी भाताचे पिक घेतले जाते.

गावातील लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.२९ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.२९**

**बीड गावाच्या लोकसंख्येचे जाती–निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) ब्राम्हण | २४ | १.४८ |
| (२) मराठा | १६६ | १०.२१ |
| (३) आगरी | ६६२ | ४०.७१ |
| (४) माळी | १७४ | १०.७० |
| (५) तेली | ९६ | ५.९० |
| (६) दलित | २३३ | १४.३३ |
| (७) आदिवासी | १६८ | १०.३३ |
| (८) मुस्लीम | ५४ | ३.३२ |
| (९) परप्रांतीय | ५९ | ३.६३ |
| **एकूण** | **१६२६** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, गावात आगरी जाती–समूहाची लोकसंख्या सर्वाधिक आहे. त्याच्या खालोखाल दलित, आदिवासी आणि मराठा जाती–समूहांची लोकसंख्या आहे. या व्यतिरिक्त गावात ब्राह्मण, माळी, तेली, मुस्लीम व परप्रांतीयांची वस्ती आहे.

बीड गावाच्या भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी खालील तक्ता क्रमांक ६.३० मध्ये देण्यात आली आहे :

**तक्ता क्रमांक ६.३०**

**बीड गावातील भौगोलिक क्षेत्राची वर्गवारी**

| क्षेत्रप्रकार | क्षेत्र (हेक्टर) | टक्केवारी |
|---|---|---|
| (१) वैयक्तिक खातेदारांची जमीन | २७४.१९.९ | ८२.३४ |
| (२) अन्य खातेदारांचीी जमीन | १६.४५.४ | ४.९४ |
| (३) देवस्थान इनाम जमीन | २.०१.६ | ०.६१ |
| (४) गुरचरण | ३.१४.७ | ०.९५ |
| (५) ग्रामपंचायतीच्या मालकीची जमीन | ७.२६.८ | २.१८ |
| (६) महाराष्ट्र शासन – वनखात्याची जमीन | २४.३३.३ | ७.३१ |
| (७) बिगर–शेती (निवासी व अन्य) | ५.२६.२ | १.५८ |
| **एकूण** | **३३२.६७.९** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, गावातील सर्वाधिक जमीन वैयक्तिक खातेदारांची आहे. त्यांचे जाती–निहाय वर्गीकरण खालील तक्ता क्रमांक ६.३१ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.३१**

**वैयक्तिक भू-धारकांच्या भू-धारणेचे जाती-निहाय वर्गीकरण**

| जातीसमूह | खातेदारांची संख्या | एकूण भूधारण क्षेत्र हेक्टर | टक्केवारी |
|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | १३ | २७.१९.६ | ९.९२ |
| (२) मराठा | ४० | ५४.६६.२ | १९.९३ |
| (३) आगरी | १५३ | १०६.०१.४ | ३८.६६ |
| (४) माळी | २४ | २६.१३.८ | ९.५३ |
| (५) तेली | ०९ | ९.०१.९ | ३.२९ |
| (६) दलित | १९ | १४.०२.६ | ५.१२ |
| (७) आदिवासी | ०४ | २.०१.३ | ०.७३ |
| (८) मुस्लीम | ०२ | ४.९१.१ | १.७९ |
| (९) परप्रांतीय | १२ | ३०.७०.० | ११.२० |
| **एकूण** | **२७६** | **२७४.१९.९** | **१००** |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या आगरी जाती-समूहाची भू-धारणा सर्वाधिक आहे. त्यांच्या खालोखाल मराठा जाती-समूहाची भू-धारणा आहे.

बीड ग्रुप ग्रामपंचायतीवर बीड गावातून पाच सभासद निवडले जातात. मागील तीन ग्रामपंचायत निवडणुकांचे विश्लेषण खालील तक्ता क्रमांक ६.३२ मध्ये देण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.३२**

**ग्राम पंचायतीच्या निवडणुकांचे विश्लेषण**

| जातीसमूह | संपादित केलेल्या जागा | | | |
|---|---|---|---|---|
| | १९९८ | २००३ | २००८ | एकूण |
| (१) ब्राह्मण | – | – | – | – |
| (२) मराठा | – | – | – | – |
| (३) आगरी | ३ * | ३ * | ३ * | ९ |
| (४) माळी | १ ** | १ ** | १ ** | ३ |
| (५) तेली | – | – | – | – |
| (६) दलित | १ *** | १ *** | १ *** | ३ |
| (७) आदिवासी | १ **** | १ **** | १ **** | ३ |
| (८) मुस्लीम | – | – | – | – |
| (९) परप्रांतीय | – | – | – | – |
| **एकूण** | **६** | **६** | **६** | **१८** |

**** खुल्या वर्गातील दोन–बीड महिला आरक्षित एक

**** महिला आरक्षित–एक

**** दलित आरक्षित– –एक

**** आदिवासी महिला आरक्षित–एक

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की बीड गावात इतर मागास वर्गीय जातींत सामंजस्य असून, त्यांनी खुल्या वर्गातील आणि OBC महिला राखीव जागा संपादन केल्या आहेत. दलित आणि आदिवासींसाठी प्रत्येकी १ जागा आरक्षित असल्याने, त्या जाती–समूहातील प्रत्येकी १ उमेदवार निवडून आले आहेत.

बीड गावातील जाती, भू–धारणा आणि सभा यांतील आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ६.३३ मध्ये करण्यात आले आहे :

**तक्ता क्रमांक ६.३३**

**बीड गावातील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण (२००८)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता स्थान | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राह्मण | २४ | २७.१९.६ | — | |
| (२) मराठा | १६६ | ५४.६६.२ | — | |
| (३) आगरी | ६६२ | १०६.०१.४ | ३ | इतर मागास वर्गीयांची युती |
| (४) माळी | १७४ | २६.१३.८ | १ | |
| (५) तेली | ९६ | ९.०१.९ | — | |
| (६) दलित | २३३ | १४.०२.६ | १ | |
| (७) आदिवासी | १६८ | २.०१.३ | १ | |
| (८) मुस्लीम | ५४ | ४.९१.१ | — | |
| (९) परप्रांतीय | ५९ | ३०.७०.० | — | |
| **एकूण** | **१६३६** | **७०.४४.७** | **०६** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, सर्वाधिक संयुक्त लोकसंख्या आणि भू–धारणा असलेल्या आगरी, माळी व तेली समाजाचे बीड गावाच्या राजकारणावर वर्चस्व आहे. त्यांना मुस्लीम व परप्रांतीयांनी सत्तारूढ गटाला पाठिंबा दिला आहे. म्हणजेच जाती

व भू–धारणा हे घटक बीड गावाच्या राजकारणात प्रभावी आहेत. सत्ता संपादन करण्यासाठी बहुमत आवश्यक असते आणि म्हणून सर्वाधिक लोकसंख्या व भू–धारणा असलेल्या आगरी जाती–समूहाने माळी व तेली या इतर मागास वर्गीयांशी युती केली. त्यास मुस्लीम व परप्रांतीयांचा पाठिंबा असल्याने त्या आघाडीने प्रत्येक निवडणूकीत तीन जागा जिंकल्या. ७३ व्या घटना दुरुस्ती अन्वये दलित आणि आदिवासींसाठी प्रत्येकी एक जागा आरक्षित असल्याने, त्यांना सत्ता स्थाने प्राप्त झाली.

### ४.४ बीड ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध

बीड ग्रुप ग्रामपंचायतीत समाविष्ट असणाऱ्या खरवंडी, कोंढाणे आणि बीड गावांतील जाती, भू–धारणा आणि सत्ता संबंध यांच्या स्पष्टीकरणाच्या आधारे या भागात बीड ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती भू–धारणा आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे स्पष्टीकरण खालील तक्ता क्रमांक ६.३४ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.३४**

**बीड ग्रुप ग्रामपंचायतीतील जाती, भू–धारणा आणि सत्ता यांचे आंतरसंबंध (२००८)**

| जातीसमूह | संख्याबल | भूधारणा (हेक्टर) | सत्ता संपादन | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) ब्राम्हण | १६२ | ७६.२९.९ | १ | |
| (२) मराठा | ३९३ | १०४.४३.२ | २ | |
| (३) आगरी | ६६२ | १०६.०१.४ | ३ | सत्तारूढ युती |
| (४) माळी | २१० | ३३.३५.३ | १ | |
| (५) सोनार | ०९ | १.९१.१ | — | सत्तारूढ युतीस पाठिंबा |
| (६) तेली | १२१ | १२.५२.३ | — | |
| (७) वंजारी | १० | ३.३९.५ | — | |
| (८) दलित | ३२९ | २७.२४.३ | २ | सत्तारूढ युतीस पाठिंबा |
| (९) आदिवासी | २७४ | ६.०१.८ | २ | |
| (१०) मुस्लीम | ६९ | ९.३९.१ | — | |
| (११) परप्रांतीय | ८१ | ४६.५१.३ | — | |
| **एकूण** | **२३२०** | **४२७.२१.२** | **११** | |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, ज्या गावात विशिष्ट जातीचे निर्णायक बहुमत

नसते, त्यास इतर जाती–समूहांशी समझोता करावा लागतो. बीड ग्रुप ग्रामपंचायतीत आगरी जातीच्या नेतृत्वाखाली इतर मागास वर्गीयांची एकजूट होऊन आणि दलित व आदिवासींच्या पाठिंबांने त्यांनी सत्ता संपादन केली. याचा प्रत्यय सरपंच आणि उपसरपंच निवडणूकीत आला त्याचे विवरण खालील तक्ता क्रमांक ६.३५ मध्ये करण्यात आले आहे.

**तक्ता क्रमांक ६.३५**

**सरपंच आणि उपसरपंच निवडीचे विश्लेषण**

| अधिकार पद | १९९८ | २००३ | २००८ |
|---|---|---|---|
| (१) सरपंच | खुल्या वर्गासाठी आगरी | OBC महिला माळी | OBC आगरी |
| (२) उपसरपंच | दलित महिला दलित | आदिवासी आदिवासी | दलित दलित |

वरील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, मागील तीन निवडणूकात आगरी नेतृत्वाखालील आघाडीने सरपंच पद जिंकले आहे. उपसरपंचपद दलित महिलाआदिवासीदलित राखीव असल्याने त्या वर्गातील उमेदवारांनी हे अधिकारपद प्राप्त केले आहे.

* * *

# ७. संशोधनाची निरिक्षणे आणि निष्कर्ष (FINDINGS AND CONCLUSIONS OF RESEARCH)

**७.१ प्रस्ताविक :**

रायगड जिल्ह्यातील ग्राम स्तरीय राजकारणात भू–धारणा, जात आणि सत्ता यांचा संबंधाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने सदर संशोधन कार्य हाती घेण्यात आले होते. त्यासाठी रायगड जिल्ह्यातील सर्वांत प्रगत असलेल्या पनवेल तालुक्यात पाच आणि त्याच्या तुलनेत कमी विकसित असलेल्या कर्जत तालुक्यातील सहा गावांची पूर्व–निर्धारित निष्कर्षाच्या आधारे निवड करण्यात आली. या गावांतील भू–धारकांच्या भू–धारणेविषयीची तपशीलवार सांख्यिकी ग्रामपंचायतीतील तलाठी कार्यालयातून प्राप्त करण्यात आली. भू–धारकांचा जातीविषयीचा तपशील गावांतील ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा करून संपादन केला. ग्राम पंचायतींच्या सदस्यांविषयीचा तपशील ग्रामपंचायतीतील कार्यालयातून उपलब्ध झाला. ग्रामस्तरीय राजकारणात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांकडून अभिजन वर्गासंबंधीचा तपशील प्राप्त केला. या संकलित माहितीच्या आधारे भू–धारणा, जात आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाचे सांख्यिकी शास्त्रातील प्रस्थापित पद्धतीनुसार विश्लेषण करण्यात आले. त्यावर आधारित निरिक्षणे आणि निष्कर्षांची मांडणी प्रकरण ७ मध्ये केली आहे. ग्राम स्तरीय राजकारणाच्या सखोल विश्लेषणातून हे स्पष्ट होते की, समग्रस्तरीय राजकारण आणि सूक्ष्मस्तरीय राजकारण मूलभूत स्वरूपाचे साम्य असले तरी तपशीलाबाबत तफावत आढळून येते.

**७.२ गृहीतकांची पडताळणी (Verification of Hypothesis) :**

सदर संशोधन कार्य हाती घेताना काही गृहीतके आधारभूत मानण्यात आली होती. संशोधन कार्य पूर्ण केल्यानंतर ती कितपत संयुक्तिक होती किंवा सदोष होती याची पडताळणी या भागात करण्यात आली आहे.

**गृहीतक १ : समग्र वस्तुस्थिती आणि गाव पातळीवरील सूक्ष्मस्तरीय यात साम्य असले तरी काही भेदही असतात :**

राज्य पातळीवरील राजकीय प्रक्रियेचे प्रतिबिंब ग्रामस्तरीय राजकीय प्रक्रियेत उमटत असले तरी स्थानिक परिस्थितीनुरूप त्यात तफावत दिसून येते. रायगड जिल्ह्यातील ११

गावांचा सखोल अभ्यास हाती घेण्यात आलेल्या संशोधन कार्याच्या अखेरीस हे गृहीतक संयुक्तिक होते असे आढळून आले आहे. राज्य स्तरीय राजकारणात, महाराष्ट्राची स्थापना झाल्यानंतर, मराठा–कुणबी जातीसमूह हा प्रभावी आहे. राजकीय आर्थिक सत्ता केंद्रे बहुतांशी या जातींच्या अभिजन वर्गाच्या ताब्यात आहेत. पक्षांतर्गत तीव्र स्वरूपाची गटबाजी अस्तित्वात आहे. गाव पातळीवरील राजकारणात या बाबी दिसून येत असल्या तरी त्यांचे स्वरूप भिन्न आहे. गाव पातळीवरील गटबाजी व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची असते, कारण प्रभावी कुळांची संख्या दोनपेक्षा अधिक असल्यास त्यांच्यात संघर्ष उद्‌भवतो. गाव पातळीवरील विशिष्ट जातीचे प्रभुत्व असले तरी गावनिहाय प्रभावी जातीसमूह भिन्न असतात. रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्यात आगरी जाती समूहाचे राजकीय वर्चस्व असल्याचे दिसून आले.

**गृहीतक २ : स्वातंत्र्योत्तर ग्रामीण राजकारणावर मध्यस्तरावरील शेतकरी जातीचे वर्चस्व प्रस्थापित झाले :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही आणि प्रौढ मताधिकाराचा स्वीकार करण्यात आला. त्याचा परिणाम म्हणजे देशाच्या बहुसंख्य राज्यात ग्रामीण भागात संख्येने बहुसंख्य असलेल्या मध्यस्तरावरील शेतकरी जातींचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाची सुत्रे मध्य स्तरावरील शेतकरी समुदायातून आलेल्या नेतृत्वाकडे गेली आहे. सदर संशोधनाच्या अखेर हे गृहीतक संयुक्तिक असल्याचे सिद्‌ध झाले आहे. ग्रामीण भागात शेतीव्यवसाय हा प्रमुख व्यवसाय असतो. रायगड जिल्ह्याच्या पनवेल आणि कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. वाढत्या नागरीकरणा बरोबरच शेती खालची जमीन बिगर–शेती कामासाठी संपादन करण्याची प्रक्रिया सुरू झाली असली, परप्रांतीयांनी स्थानिकांकडून जमीनी विकत घेतल्या असल्या, तरी त्यांना स्थानिक राजकारणात स्वारस्य नाही. परिणामी अभ्यासात समाविष्ट गावांच्या राजकारणाची सुत्रे शेतकरी जातीच्या नेतृत्वाकडेच कायम राहिली आहे.

**गृहीतक ३ : ग्रामीण राजकारणात कुळ/घराणे/भावकी ही जातीपेक्षा अधिक महत्त्वपूर्ण असते :**

असे म्हटले जाते की, १०८ घराण्यांचे महाराष्ट्राच्या राजकारणावर प्रभुत्व आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वतनदार मराठ्यांचे स्थानिक राजकारणावर

निर्विवाद वर्चस्व आहे. कोकणातील काही भागात वतनदार मंडळीचे प्रभुत्व असले, तरी रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्यात बडे जमीनदार अभावानेच आढळतात. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात या तालुक्यातील राजकारणाची सुत्रे विशिष्ट नेतृत्वाकडे होती. ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर औपचारिक अर्थाने त्यांची सत्ता संपुष्टात आली आहे. असे असले तरीही या प्रस्थापित नेतृत्वाचे वर्चस्व आजही कायम आहे. या अर्थाने हे गृहीतक काही प्रमाणात संयुक्तिक असल्याचे दिसून येते.

**गृहीतक ४ : गावपातळीवरील गटबाजीचे राजकारण भाऊबंदकीचे आणि जात आकृतीबंधाचे प्रतिबिंब असते :**

गाव पातळीवरील राजकारण पक्षनिरपेक्ष असते. औपचारिक अर्थाने राजकीय पक्ष ग्राम पंचायतीच्या निवडणुकांत सहभागी होत नाही. असे असले तरी ही गाव पातळीवर सत्ता संपादन करण्यासाठी दोन किंवा अधिक गटांमध्ये स्पर्धा असते. रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्यातील काही गावात त्याची प्रचिती आली. दलित बहुसंख्य असलेल्या गावांत सवर्ण आणि दलित, मराठा आणि आगरी जाती तुल्यबळ असलेल्या गावात इतर मागास जाती म्हणजेच बिगर–मराठ्यांची एकजूट झाल्याचे आढळून आले. म्हणजेच गाव पातळीवरील गटबाजीचे राजकारण जातीवर आधारित असल्याचे दिसून आले.

**गृहीतक ५ : उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण ग्रामस्तरीय सत्तेचा मूलादार आहे :**

जातीसमूहाच्या संख्याबला प्रमाणेच उत्पादन साधनांची मालकी व नियंत्रण ग्रामस्तरीय सत्तेचा मूलादार असल्याची परिस्थिती महाराष्ट्र राज्याच्या प्रगत भागात असली, तरी रायगड जिल्ह्यातील परिस्थिती भिन्न आहे. सहकारी चळवळीचा प्रसार कोकण विभागात अल्प प्रमाणात झाला आहे. रायगड जिल्ह्याच्या पनवेल व कर्जत तालुक्यातील ज्या गावाचा अभ्यास करण्यात आला आहे, त्या गावांत कोणतीही सहकारी संस्था अस्तित्वात नाही. बव्हुतांशी भू–धारणा मोठी आहे त्या ब्राह्मण जातीसमूहातील लोकांचे गावात वास्तव्य नाही. परप्रांतीयांनी मोठ्या प्रमाणात जमीनी खरेदी केल्या असल्या, तरी त्यांना स्थानिक राजकारणात स्वारस्य नाही. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील पनवेल व कर्जत तालुक्यात जातीचे संख्याबल हा निर्णायक घटक आहे. याचाच अर्थ वरील गृहीतकात

ज्या गावांचा अभ्यास केला, त्यांना गैरलागू आहे. मात्र ज्या जातीसमूहाकडे संख्याबल आणि भू–धारणा हे दोन्ही घटक अनुकूल आहेत, त्यांचे ग्रामस्तरीय सत्ताकारणात वर्चस्व असल्याचे दिसून येते.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे काही गावात दलितांची लोकसंख्यां व भू–धारणा सर्वाधिक असतानाही, गावाच्या राजकारणावर त्यांचे वर्चस्व नाही. या अर्थाने जातीसमूहाचे संख्याबल आणि भू–धारणा हे गृहीतक या गावांना गैरलागू ठरते.

**गृहीतक ६ : ग्रामस्तरीय राजकारणात जाती आणि भू–धारणा हे दोन घटक संयुक्तरीत्या कार्यरत असतात :**

हे गृहीतक सिद्ध झाले आहे. ग्रामीण राजकारणात असे आढळून आले आहे की सामान्यत: ज्या जातीसमूहाची लोकसंख्या सर्वाधिक असते, त्याचीच भू–धारणा ही सर्वाधिक असते. त्यांचा संयुक्त परिणाम म्हणजे गावच्या राजकारणावर त्या जातीसमूहाचे वर्चस्व असते. असा जातीसमूह गावात सत्ताधारी असतो किंवा गावाच्या राजकारणावर त्याचे वर्चस्व असते. पनवेल तालूक्याच्या राजकारणात आगरी जातीसमूह सर्वांत प्रभावशाली असल्याचे आढळले. उदा., वाकड गावात सर्वाधिक संख्याबल आणि भू–धारणा असलेला आगरी जातीसमलह सर्वांत प्रभावशाली असल्याचे दिसून आले. आगरी जातीच्या अभिजन वर्गाच्या हातात गावातील सत्तेची सूत्रे असल्याचे दिसून आले. म्हणजेच जाती आणि भू–धारणा हे दोन घटक ग्रामस्तरीय राजकारणात संयुक्तरीत्या कार्यरत असतात.

**गृहीतक ७ : ७३ व्या घटनादुरुस्तीनंतर महिला, अनुसूचित जाती आणि जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे राजकीय सक्षमीकरण घडून येत आहे :**

हे गृहीतक सिद्ध झाले आहे. कारण पारंपारिक अर्थाने ग्रामीण समाजातील या दुर्बल घटकांसाठी जागा व चक्राकार पद्धतीने अधिकार पदांच्या आरक्षणाची तरतुद करण्यात आली. त्यामुळे ग्राम स्तरीय राजकारणात त्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला. याचाच अर्थ प्रस्थापित नेतृत्वाची सत्ता औपचारिक अर्थाने कमी झाली. असे असले तरी ही ग्रामस्तरीय राजकारणावर असलेला त्यांचा प्रभाव आणि नियंत्रण कायम आहे.

**७.३ रायगड जिल्हयाच्या ग्रामीण राजकारणासंबंधीची निरिक्षणे :**

सदर संशोधनाच्या ओघात रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणाचा अभ्यास

करण्याची संधी सदर संशोधनाला प्राप्त झाली. या अभ्यासाच्या आधारे नोंदलेली निरिक्षणे खालीलप्रमाणे आहेत :

(१) शेतकरी कामगार पक्ष हा प्रादेशिक राजकीय पक्ष रायगड जिल्ह्यात १९५२ सालापासून प्रभावी राजकीय शक्ती आहे. १९६० नंतर राज्यात अन्यत्र या पक्षाचा प्रभाव उतरणीस लागला असला, तरी रायगड जिल्ह्यात तो कायम आहे. १९७८ सालापासून रायगड जिल्हा परिषद शेतकरी कामगार पक्षाच्या नियंत्रणाखाली आहे. १९९९ ते २००४ या कालखंडात या पक्षाने काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबरोबर सहकार्य केले असले, तरी २००४ सालापासून त्यातील एक गट काँग्रेसमध्ये गेल्यानंतर दुसऱ्या गटाने शिवसेनेशी घरोबा करून आपली सत्ता टिकवली आहे. प्रभावी बिगर–काँग्रेस पक्ष हे रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणाचे सर्वांत उललेखनीय वैशिष्ट्य आहे.

(२) औद्योगिकदृष्ट्या प्रगत मुंबई आणि ठाणे जिल्ह्याच्या सीमेवरील या जिल्ह्याच्या पनवेल आणि उरण तालुक्यात, तसेच त्यास निकटवर्ती क्षेत्रात औद्योगिकीकरण आणि शहरीकरण झपाट्याने होत आहे. पनवेल तालुक्यातील ४१ गावे नव्या मुंबईत समाविष्ट करण्यात आली. जवाहरलाल नेहरू बंदर उरण येथे उभारण्यात आले. मुंबईचे दुसरे विमानतळ पनवेल तालुक्यात उभारले जाणार आहे. रिलायन्स उद्योग समूहाने विशेष आर्थिक विभाग (SEZ) स्थापन करण्यासाठी पनवेल तालुक्यात जमिनी संपादन करण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या तालुक्यांचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलणार आहे, त्याचा प्रत्यक्ष परिणाम जिल्ह्याच्या ग्रामीण राजकारणावर होत आहे.

(३) रायगड जिल्हा राजकीयदृष्ट्या मागासलेला आहे. त्याच्या ग्रामीण राजकारणावर जातीचा पगडा आहे. आगरी हा इतर मागास वर्गीय जातीसमूह पनवेल, पेण, उरण कर्जत, माणगाव, खालापूर तालुक्यात प्रभावी आहे. जिल्ह्याच्या राजकारणाची सूत्रे या जातीच्या अभिजन वर्गाकडे आहेत. या जिल्ह्यात बडे जमीनदार नसल्याने, ग्रामस्तरीय राजकारणावर पारंपारिक जातीनिष्ठ नेतृत्वाचा पगडा जास्त आहे. ग्राम स्तरीय राजकारणात सहकारी संस्थांचा प्रभाव नगण्य आहे. कारण या जिल्ह्यात सहकारी चळवळीचा प्रसार अत्यंत कमी प्रमाणात झाला आहे. त्यामुळे राज्याच्या अन्य भागात आढळून येणारी 'प्रभावी घराणी' या जिल्ह्यात आढळून येत नाही. जिल्ह्यातील राजकारणावर प्रभाव असणारे राजकारणी बिगर–शेती क्षेत्रातील आहेत.

(४) रायगड जिल्ह्यात अनुसूचित जमाती, म्हणजेच आदिवासी जमातींची संख्या सुमारे १२% असली तरी ग्रामस्तरीय राजकारणात त्यांचा प्रभाव दिसून येत नाही. अनुसूचित जाती व जमातीचे अभिजन केवळ त्यांच्यासाठी आरक्षित जागांवरच निवडून येतात. महिलांचा सहभाग वाढत असला तरी त्या प्रस्थापित नेतृत्वाच्या प्रभावाखाली राहूनच कार्य करतात.

(५) पनवेल तालुक्याचा अपवाद वगळता, जिल्ह्यातील अन्य तालुक्यातील लोकसंख्या विखुरलेली आहे. कर्जत तालुक्यात गावांची संख्या १७५ असली तरी ग्रामपंचातींची संख्या ४९ आहे. बहुसंख्य गावांत ग्रुप ग्रामपंचायती अस्तित्वात असल्याचे आढळून आले.

**७.४ ग्रामस्तरीय राजकारणासंबंधीची निरिक्षणे :**

सदर संशोधनात पनवेल तालुक्यातील पाच गावांचा आणि कर्जत तालुक्यातील सहा गावांतील राजकारणाचा सखोल अभ्यास करण्यात आला होता. या गावातील भू–धारणा, जाती आणि सत्ता यांच्या आंतरसंबंधाविषयीची निरिक्षणे खालीलप्रमाणे आहेत :

**४.१ पनवेल तालुक्यातील पाच गावांच्या अभ्यासावर आधारित निरिक्षणे :**

**(१) वाकडी :** वाकडी गावात आगरी जाती समूहाची लोकसंख्या ५८% भू–धारणा ३५% आणि सत्तेतील वाटा ५९% आहे. जाती समूहाचे संख्या बळ हे सत्तासंपादनात निर्णायक ठरले आहे. सत्ता संपादन करण्यासाठी प्रभावी जातीसमूहाने अन्य जातींचा पाठिंबा संपादन केला आहे.

**(२) खानव :** खानव गावात आगरी जाती समूहाची लोकसंख्या ५३.५% भू–धारणा ४४% आहे. खानव गावातील हा सर्वांत प्रभावी जातीसमूह असल्याने व त्याची भू–धारणा सर्वाधिक असल्याने त्याचा सत्तेतील वाटा ५९% आहे. जातीसमूहाचे संख्याबळ आणि भू–धारणा हा सत्तासंपादनातील निर्णायक घटक ठरला आहे.

**(३) खैरवाडी :** गावात दलित आणि आदिवासी या दुर्बल घटकांची लोकसंख्या सर्वाधिक आहे. मात्र त्यांना केवळ आरक्षित जागा संपादन करता आल्या. ७३व्या घटनादुरुस्तीतील आरक्षणाची तरतुद जर नसती, तर त्यांना सत्तेतील वाटा मिळाला नसता.

**(४) चिंचवली :** खैरवाडी प्रमाणे चिंचवली गावात दलितांची लोकसंख्या व भू–धारणा सर्वाधिक असली, तरी केवळ राखीव जागाच संपादन करू शकतात. आगरी, कुणबी, गवळी आणि वैश्यवाणी जाती समूहांमध्ये सत्ता स्थानांचे वाटप घडून आले.

**(५) कांदळे :** कांदळे गावात आदिवासी समुदायाची लोकसंख्या व भू–धारणा सर्वाधिक असतानाही, या समुदायासाठी आरक्षित जागेवरच त्यांचा उमेदवार निवडला जातो. इतर मागास वर्गीयांची युती असल्याने आगरी, कोळी आणि माळी समूहाने तीनही निवडणुकीत प्रत्येकी एक जागा संपादन केली आहे. म्हणजेच जाती व्यवस्थेच्या अंतर्गत कनिष्ठ स्तरावर असणारे जातीसमूह सत्ता स्पर्धेत आपला प्रभाव पाडू शकत नाही.

खैरवाडी, चिंचवणी आणि कोंदळे या गावांचा समावेश असलेल्या ग्रुप ग्रामपंचायतीतील दलित व आदिवासींकडे संख्याबळ आणि भू–धारणा, म्हणजेच जातीय पाठबळ आणि उत्पन्नाची साधने असली तरी त्यांचा प्रभाव केवळ आरक्षित मतदार संघांपुरताच मर्यादित आहे. आदिवासींचे संख्याबळ दलितांच्या खालोखाल असले तरी त्यांचाही प्रभाव केवळ आरक्षित मतदार संघापुरताच आहे.

दलितांची संख्या जेव्हा सर्वाधिक असते, त्यावेळेला सर्व सवर्णातील मदतार एकत्र येतात आणि खुल्या जागा काबीज करतात.

ग्रमीण भागात सवर्ण जातीचे राजकारणी आश्रयदायाची भूमिका पार पाडतात आणि त्यांचे आश्रित असलेले दलित व आदिवासी मतदार त्यांच्या आदेशा प्रमाणेच मतदान करतात.

**४.२ कर्जत तालूक्यातील सहा गावांच्या अभ्यासावर आधारित निरिक्षणे :**

**(१) चोची :** चोची गावात परप्रांतीयांची भू–धारणा सर्वाधिक असली तरी, त्यांना स्थानिक राजकारणात स्वारस्य नाही. सर्वाधिक संख्याबळ असणाऱ्या मराठा जाती समूहाचे गावाच्या राजकारणावर वर्चस्व आहे.

**(२) मुगवे :** मुगवे गावात सर्वाधिक संख्याबळ आणि भू–धारक असलेल्या आगरी जाती समूहाने, अन्य बिगर मराठा जातींची समझोता करून गावाच्या राजकारणात आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे.

**(३) कोंदवडे :** कोंदीवडे गावाच्या राजकारणावर सर्वाधिक संख्याबळ आणि भू–धारणा असलेल्या मराठा जातीसमूहाचे वर्चस्व आहे. मराठा जातीकडे निर्विवाद बहुमत नसल्याने, त्यास अन्य जातींबरोबर समझोता करावा लागला.

कोंदीवडे ग्रुप ग्रामपंचायतीत मराठा जातीचे वर्चस्व आहे. ते प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी दलित व आदिवासी समुदायांचा पाठिंबा संपादन केला.

**(४) खरवंडी :** खरवंडी गावात सर्वाधिक लोकसंख्या आणि सर्वाधिक भू–धारणा असलेल्या मराठा जातीचे राजकारणावर वर्चस्व आहे. दलित आणि आदिवासी जातींचे

अल्पभूधारक रोजगारासाठी मराठा जातीच्या शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. त्यामुळे स्थानिक राजकारणात दलित व आदिवासी मतदारांचा मराठा जातीच्या आणि त्याद्वारा पुरस्कृत उमेदवारांना पाठिंबा देतात.

**(५) कोंढणे :** कोंढणे गावाच्या राजकारणावर सर्वाधिक संख्याबळ आणि भू–धारणा असणाऱ्या ब्राह्मण जातीचे पर्याय आहे. ही अपवादात्मक परिस्थिती आहे कारण पनवेल आणि कर्जत तालुक्यातील बहुसंख्य गावात भू–धारणा असलेल्या ब्राह्मण जाती समूहाच्या कुटुंबांची शहरी भागात स्थलांतर केले आहे.

**(६) बीड :** बीड गावाच्या राजकारणावर इतर मागास वर्गाच्या युतीचे वर्चस्व आहे. सर्वाधिक संयुक्त लोकसंख्या आणि भू–धारणा असलेल्या आगरी, माळी व तेली समाजाचे बीड गावाच्या राजकारणावर वर्चस्य आहे. मुस्लीम आणि परप्रांतीयांनी सत्ताधारी गटाला पाठिंबा दिला आहे. म्हणजेच जाती व भू–धारणा हे घटक बीड गावाच्या राजकारणात प्रभावी आहेत.

बीड ग्रुप ग्रामपंचायतीतील आगरी जातीच्या नेतृत्वाखाली इतर मागास वर्गीयांची एकजूट होऊन आणि दलित व आदिवासींच्या पाठिंब्याने त्यांनी सत्ता संपादन केली.

**७.५ ग्रामस्तरीय राजकारणासंबंधीचे निष्कर्ष :**

रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्यातील गावांच्या अभ्यासाच्या आधारे ग्राम स्तरीय राजकारणासंबंधाचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत :

(१) ग्रामीण राजकारणावर जातीचा पगडा आहे. गावामध्ये ज्या जातीची लोकसंख्या अधिक त्यात जातीचा राजकारणावर प्रभाव असलेला दिसून येतो. संमिश्र जाती असलेल्या गावामध्ये त्या त्या जातींना त्यांच्या जातीच्या प्रमाणात कमी–अधिक सत्ता सहभाग मिळालेला दिसून येतो. काही गावांमध्ये लोकसंख्येने कमी असलेल्या जातींनी आपला राजकीय प्रभाव टिकवण्यासाठी अन्य जातींबरोबर समझोता करून त्यांना सत्तेत सहभागी करून घेतल्यांचे दिसते.

(२) सामान्यत: ज्या जातीसमूहाची लोकसंख्या अधिक असते, त्या जातींची भू–धारणा अधिक असते. मात्र परप्रांतीय व ब्राह्मण जातींची भू–धारणा काही गावात अधिक असताना आणि स्थानिक राजकारणात त्यांना स्वारस्य नसल्याने, ज्या अन्य जातींकडे उल्लेखनीय प्रमाणात भू–धारणा असते, त्या जाती स्वबळावर किंवा अन्य जातींशी समझोता करून सत्ता संपादन करतात. कोण्याही एका जातीकडे मोठ्या

प्रमाणात भू–धारणा नसल्यास कमी–अधिक भू–धारणेच्या मालकीनुसार त्यांचा सत्तेतील सहभाग कमी–अधिक प्रमाणात दिसून येतो.

(३) दलित व आदिवासी समूदायांना केवळ आरक्षित जागा संपादन करता आल्या आहेत. स्थानिक राजकारणात त्या निष्प्रभ असल्याचे दिसून येते.

(४) ७३व्या घटनादुरुस्तीकडे महिला, दलित आणि आदिवासी या समाजातील कमकुवत घटकांना सत्तेचा वाटा प्राप्त झाला आहे.

(५) ७३व्या घटनादुरुस्तीनंतर प्रस्थापित जातींच्या नेतृत्वाची पिछेहाट झाली आहे. असे प्रथम दर्शनी वाटत असले तरी गावाच्या राजकारणावर त्यांचा प्रभाव कायम आहे.

**७.६ समारोप (Conciuding Observations) :**

१ मे १९६० रोजी महाराष्ट राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचे दूरगामी स्वरूपाचे परिणाम ग्रामीण भागाच्या राजकारणावर झाले.

वसंतराव नाईक समितीच्या शिफारसींवर आधारित महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायदा १९६१ साली पारीत करण्यात आला. १ मे १९६२ रोजी महाराष्ट्र राज्यात त्रिस्तरीय पंचायती राज्य व्यवस्था स्थापन करण्यात आली. तत्पूर्वी १९५८ साली सर्व मराठी भाषिक आणि गुजरात भाषिक विभागातील १९५६ पूर्वीचे विभिन्न कायदे १९५८ साली रद्द करण्यात येऊन, मुंबई ग्रामपंचायत कायद्याद्वारे समान तरतूदी असलेली ग्रामपंचायत व्यवस्था स्थापन करण्यात आली होती. १९६१ सालच्या कायद्यात ग्रामपंचायत विषयक नव्याने तरतुदी न करता, १९५८ च्या कायद्यानुसार ग्रामपंचायतींचा कारभार व्हावा अशी तरतुद होती. म्हणजेच ग्रामीण महाराष्ट्रात विकेंद्रीकरण लोकशाही १९६२ साली अस्तित्वात आली आणि त्याद्वारे ग्रामीण राजकारणाच्या प्रक्रियेला गती प्राप्त झाली. महाराष्ट्रातील पंचायत राज्य विषयक कायद्यात स्थानिक नेतृत्वास वाव देण्याच्या उद्देशाने स्थानिक आमदार आणि खासदारांना पंचायत समिती व जिल्हा परिषदांचे पदसिद्ध सदस्यत्व नाकारण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाणांची अशी धारणा होती की मोठ्या आकाराच्या वटवृक्षाच्या सावलीत ज्याप्रमाणे छोटी रोपे मूळ धरू शकत नाहीत, त्याचप्रमाणे जेष्ठ राजकारणांच्या उपस्थितीत स्थानिक नेतृत्व विकसित होणार नाही. या तरतुदीचा दृश्य स्वरूपात परिणाम म्हणजे आज महाराष्ट्रात गाव, तालुका आणि जिल्हा स्तरावर सक्षम स्थानिक नेतृत्व विकसित झाले आहे.

ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकांचा आणि नेतृत्वाचा सहभाग असावा या उदात्त उद्देशाने पंचायती राज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. लोकशाहीच्या तत्त्वानुसार गाव, तालुका आणि जिल्हा स्तरांवरील संस्था लोकप्रतिनिधिक असाव्यात, म्हणजेच लोकांची या लोकप्रतिनिधींची निवड करावी असे अपेक्षित होते. गाव तालुका आणि जिल्हा स्तरावरील संस्थांमध्ये नेतृत्वाचे गुण असलेल्या स्थानिक कार्यकर्त्यांना वाव देता येईल अशी राज्यकर्त्यांची धारणा होती. हा अपेक्षित असलेला कार्यभाग साध्य होत असतानाच ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदांतील अधिकारपदांची प्राप्ती करण्याची अपेक्षा बाळगणारे असंख्य कार्यकर्ते होते. त्याचा परिणाम म्हणजे पंचायती राजव्यवस्थेच्या पहिल्या तीन दशकात सत्तारूढ काँग्रेस पक्षाची उमेदवारी मिळावी यासाठी तीव्र स्वरूपाची स्पर्धा आणि त्यातून पक्षांतर्गत गटबाजीचे राजकारण सुरू झाले. टीकाकारांच्या मते पंचायती राज संस्था राजकारणाने व्यापल्या गेल्या आणि विकास प्रक्रियेचा पाईक होण्याऐवजी या सत्ता आणि राजकारण्यांचे आखाडे बनले.

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर बहुजन समाजाचा आणि त्यातील प्रभावी घटक असलेल्या मराठा जातीसमूहाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. जातीय राजकारणाच्या या प्रक्रियेचा प्रसार ग्राम भागात होऊन, जातीसमूह ग्रामीण राजकारणाचा निर्णायक घटक बनला. राज्य स्तरावर मराठा–कुणबी जातीसमूहाचे वर्चस्व प्रस्थापित झाले, त्याचप्रमाणे प्रत्येक गावाच्या राजकारणावर त्या गावात सांख्यिक बळ असलेल्या जाती समूहाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. त्यातूनच ग्रामीण समुदायात जातीय संघर्ष तीव्र झाला. मराठा–मराठेतर, सवर्ण–दलित, मराठा–इतर मागास या प्रकारचे संघर्ष जवळपास प्रत्येक गावात निर्माण झाले. लोकशाही प्रक्रियेचा आधारभूत घटक असलेल्या निवडणूकांमध्ये त्यांचे पडसाद उमटू लागले. जातीय राजकारणामुळे ग्रामीण भागातील वातावरण गढूळ झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेला याबाबत दोष देता येत नसला तरी जातीय राजकारण हे त्यांचे सहउत्पादन आहे. हे मान्य करावे लागेल.

ग्रामस्तरीय राजकारण हे राज्यस्तरीय राजकारणाची छोटी प्रतिकृती असते हे मान्य करत असताना, सुक्ष्म स्तरीय राजकारणाची स्वत:ची काही वैशिष्ट्ये असतात. महाराष्ट्राच्या राजकारणावर दीर्घ काळ काँग्रेस पक्षाने आणि मराठा नेतृत्वाने वर्चस्व गाजवले. महाराष्ट्रातील ग्रामीण क्षेत्रात सुमारे तीस हजारापेक्षा अधिक गावे आहेत.

स्थानिक परिस्थितीनुरूप गावातील प्रभावी जातीसमूह मराठा असेलच असे नाही. रायगड जिल्ह्यातील पनवेल आणि कर्जत तालुक्याती बहुसंख्य गावांत आगरी जातीसमूहाकडे संख्याबळ आणि त्याला पूरक भू–धारणा असल्याने, जिल्ह्याच्या राजकारणावर आगरी अभिजनांच्या शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व आहे. संपूर्ण महाराष्ट्राच्या संदर्भात नगण्य असलेल्या या जातीसमूहाचे आणि त्यांची राजकीय निष्ठा ज्या राजकीय पक्षाशी निगडित आहे, त्या शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणावर वर्चस्व आहे. याचाच अर्थ जातीचे प्रभुत्व हे जरी राजकीय वास्तव्य असले, तरी विशिष्ट जातीचे सार्वत्रिक प्रभुत्व ही परिस्थिती सूक्ष्म स्तरावर आढळून येत नाही. गावपरत्वे ही परिस्थिती भिन्न असल्याचे दिसून येते.

राज्य स्तरावरील निवडणुका राजकीय पक्ष आणि त्यांच्या आघाड्या लढवतात. मात्र ग्रामपंचार्तीच्या निवडणुकांत राजकीय पक्षांचा प्रत्यक्ष सहभाग नसतो. या निवडणुका स्थानिक आघाड्या लढवतात आणि या आघाड्या व्यक्तिगत संबंधावर आधारित असतात. याचा अर्थ एकाच राजकीय पक्षाचे कार्यकर्ते एकाच स्थानिक आघाडीत असतीलच असे नाही, कारण त्यांच्यात वैयक्तिक वैमन्यस्य असेल तर ते प्रतिस्पर्धी आघाडीत सहभागी होऊन, एकमेकांना नामोहरम करण्याचा प्रयत्न करतात. जिल्हा किंवा राज्य स्तरावर जो पक्ष प्रभावी असेल तो पक्ष ग्रामपंचायतीवर आपले अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित करतो. म्हणजेच रायगड जिलह्यातील ग्रामस्तरीय राजकारणावर शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व असले, तरी काही भागात अन्य पक्षांचा प्रभाव आहे.

ग्रामपंचायतीचे राजकारण पक्ष निरपेक्ष असल्याने त्याचा केंद्रबिंदू गावातील प्रभावी राजकीय घराणे किंवा घराणी असतात. अशा प्रभावी व्यक्तिचे समर्थन एकत्र येतात आणि त्यांची आघाडी ग्रामंपाचयतीच्या निवडणुकांमध्ये सहभागी होत असते. गावाच्या अर्थकारणावर ज्या व्यक्ती किंवा घराण्यांचा प्रभाव असतो, ती व्यक्ती किंवा त्यांच्याद्वारा पुरस्कृत उमेदवार ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये यशस्वी होतात. ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर औपचारिक अर्थाने प्रस्थापित नेतृत्वाची पिछेहाट झाली असली तरी स्थानिक राजकारणावर त्याचा प्रभाव कायम आहे.

ज्या गावांमध्ये एका विशिष्ट जार्तीचे लोक बहुसंख्य नसतील आणि तुल्यबळ जाती असतील तेव्हा जातीनिहाय गट किंवा आघाड्या स्थापन होतात. त्यांच्या दरम्यान

होणाऱ्या सत्तासंघर्षाला गटबाजीचे राजकारण म्हणतात. अधिकार पदाची प्राप्ती करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या व्यक्तिची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली असल्याने गटबाजीचे राजकारण उत्तरोत्तर तिव्र होत चालले आहे. गटबाजीचे हे राजकारण व्यक्ती आणि जातीनिष्ठ आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाहीची प्रक्रिया सुरू झाली आणि त्यातूनच ग्रामीण राजकारण व ग्रामीण श्रेष्ठजन किंवा अभिजन वर्गाची निर्मिती झाली. या अभिजन वर्गाचे ग्रामीण राजकारणावर प्रदीर्घ काळ वर्चस्व होते. १९९२ साली ७३ वी घटनादुरुस्ती झाल्यानंतर महिलांसाठी ३३% जागांच्या आरक्षणाची तरतुद आणि चक्राकार पद्धतीने अधिकारपदे संपादन करण्याची संधी त्यांना उपलब्ध झाली. ग्रामपंचायतींच्या कारभारात महिलांचा सहभाग वाढत असला, तरी प्रस्थापित नेतृत्वाचे ग्रामपंचायतींवर अप्रत्यक्ष नियंत्रण कायम आहे. मात्र २० वर्षाच्या सत्ता सहभागामुळे महिला नेतृत्वाच्या राजकीय जाणीवा विकसित झाल्या आहेत आणि त्या स्वतंत्रपणे गावाचा कारभार करत असल्याचेही दिसून येते. हे करत असताना प्रस्थापित नेतृत्वाचे हितसंबंध दुखावले जाणार नाहीत याची दक्षता त्यांना घ्यावी लागते.

ग्रामीण राजकारणात गुणात्मक बदल घडून येण्याची प्रक्रिया सुरू झाली असली तरी, ग्रामीण राजकारण आणि त्यातील सत्ता समीकरणे जाती आणि भू–धारणेवरच आधारित आहेत. जोपर्यंत ग्रामीण अर्थकारणाचा आकृतीबंध कृषीप्रधान असेल, तोपर्यंत या परिस्थितीत बदल होण्याची अपेक्षा बाळगता येणार नाही, या वास्तवाची जाणीव सदर संशोधन उपक्रम पूर्ण करताना संशोधकाला झाली आहे. म्हणजेच ग्रामस्तरीय राजकारण भू–धारणा, जाती आणि सत्ता यांच्या आंतर–संबंधावर आधारित आहे याची पुष्ठी या अभ्यासाच्या निमित्ताने झाली आहे.

* * *

# संदर्भसूची (SELECT BIBLIOGRAPHY):

१. इंग्रजी ग्रंथसूची :


- **Carter Anthony** – Elite Plitics in Rural India, Political stratification and political aliances in western Maharashtra. Vikas Publishing House Pvt. Ltd. Delhi 1975.
- **Goverment of Maharashtra**, District Census, Raigad District, 2001
- J**ohari J. C.**, Comparative Politics, Sterlony Publishers pvt. Ltd., New Delhi, 1986 Ed.
- **Kothari Rajni** (Ed) "Caste in India Politics" Orients Longman Ltd., New Delhi, 1970
- **Lele Jayant** – Elite Pluralism and Class Rule, Political Development in Maharashtra. Popular Prakashan Mumbai-1982.
- **Pathan K and Mangande S.,** Maharashtra state and Districts at a glance, Vol.1., Intellectnal Sandarbh, Pune, 2001
- **Sirsikar V. M.,** – The Rural Elite in a Developing Society, Orient Longman, New Delhi, 1970.
- **Weber, Max,** – Essays in Sociology translated and edited by H. H. Gerth and C. Wright Mills, London, 1984.
- **Goverment of India**, Report of the stnaye teanl on Community Development, 1957 (Balnantrai Menta Committee Report)
- **Goverment of Maharashtra**, Report of the Committee on Democrate Decentralization, 1961 **(Naik Committee Report)**
- Bombay Village Panchayat Act, 1958
- Maharashtra, Zilla Patishad and Panchayat Samiti Act, 1961.


२. **मराठी ग्रंथसूची :**



- **जैन अशोक,** महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, शेठ पब्लिशर्स, मुंबई, १९९८.
- **दास्ताने संतोष,** महाराष्ट्र-२०१०, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २०११.
- **पळशीकर सुहास आणि बिरमल नितीन** (संपादक), महाराष्ट्राचे राजकारण : राजकीय प्रक्रियेचे स्थानिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.
- **पळशीकर सुहास,** समकालीन भारतीय राजकारण : काँग्रेस वर्चस्व ते हिंदू जमातवाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४.
- **पळशीकर सुहास,** जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगाया प्रकाशन, पुणे, २००३.
- **सुमंत यशवंत आणि पुंडे दत्तात्रय** (संपादक), महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९८.
- **घैसास श्रीनिवास,** माहिती घेऊ या सातबाराची आणि कुळ कायद्याची, मनोरमा प्रकाशन, मुंबई २००५.
- **जोशी लक्ष्मण शास्त्री** (संपादक), विश्वकोष खंड-६-जमीन.
- **साळुंखे दत्ताजीराव आणि पवार जगन्नाथराव,** महाराष्ट्राची कृषी अर्थव्यवस्था, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८२.
- **काळदाते सुधा,** भारतीय समाज रचना, भारत मुद्रक आणि प्रकाशक, औरंगाबाद, १९८२.
- **भोळे भास्कर,** महात्मा जोतिराव फुले : वारसा आणि वसा, साभेत प्रकाशन, औरंगाबाद, २००१.
- **भोळे भास्कर,** राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळपुरे, नागपूर, २००२.
- **लांजेकर ज्योती,** भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन, पुणे. २००५.
- **ठोंबरे तानाजी,** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या राजकीय व सामाजिक चळवळी, १९९९.
- **पानसरे गोविंद,** राजर्षी शाहू : सत्ता आणि वारसा, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९७.
- **कोकण कृषी विद्यापीठ,** दृष्टिक्षेपात कोकण विभाग, दापोली, २००१.


- **गद्रे दि. का. आणि बाचल वि. म.**, आधुनिक राजकीय विश्लेषण, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७८.
- **समाज प्रबोधन संस्था**, जातिसंस्थेचे बदलते आधार, सुगावा प्रकाशन, पुणे, २००२.
- **सूर्यवंशी कृ. गो.**, वेदोक्त, सुगावा प्रकाश, पुणे, २००४
- **सन्न ज. गो.** (संपादक), डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात–असा मी जगलो, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९७.
- **भुस्कुटे रा. वि.**, सात–बारा, मुकुंद प्रकाशन, ंणे, १९७७.
- **पंडित ग. शा.**, पंचायत राज आणि ग्रामीण महिला, सुगावा प्रकाशन, पुणे, १९९९.
- **देशपांडे विजय आणि बर्दापुरकर मोरेश्वर**, भारतीय सामाजिक संरचना, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९९८.
- **विभुते भालबा**, पंचायती राज व्यवस्था, मनोविकास प्रकाशन, मुंबई, २००४.
- **वाईकर अंनत वासुदेव**, भारतातील स्थानिक स्वराज संस्था, निराली, पुणे, १९९९.
- **पाटील पी. बी.**, पंचायत राज्यातून लोक स्वराज्याकडे, प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९८.
- **बंग के. आर.**, भारतीय स्थानिक स्वशासन, महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात, मंगेश प्रकाशन, नागपूर, २००५.

**३. अप्रकाशित साहित्य :**


- **बिरमल नितीन**, जमीन मालकी, जात, राजकीय स्थान, 'मराठवाडा' विभागाचा अभ्यास–पीएच.डी. शोधप्रबंध.
- **चव्हाण अशोक**, पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका–एक अभ्यास एम्. फिल. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.
- **सावळकर अविनाश**, पुणे जिल्ह्यातील बारामती तालुका–एक अभ्यास एम्. फिल्. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.
- **जगझाप हर्ष**, जळगाव जिल्हा–एक अभ्यास एम्. फिल्. शोधप्रबंध, पुणे विद्यापीठ.
- **काजळे विजय**,सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जमीन जात आणि सत्ता यांच्या आंतर संबंधाचा अभ्यास–पीएच.डी., शोधप्रबंध, मुंबई विद्यापीठ.



सूची
राष्ट्रीय महामार्ग
प्रमुख रस्ते
लोहमार्ग
जिल्हा मुख्य ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
गांव
घाट
तळोजे
पनवेल
नेरळ
माथेरान
भिवपुरी
कर्जत
पळसदरी
चौक
आपटे
खालापूर
महड
खोपोली
बोरघाट
पेण
वडखळ
धरमतर
जांभूळपाडा
रेवदंडा
नागोठणे
पाली
ताम्हीणी घाट
पुण्याकडे
कोलाड
रोहे
भिरा
विळे
नांदगाव
मुरुड
राजपुरी
तळे
इदमूर
निजामपूर
रायगड
पाचाड
दिघी
माणगाव
बोर्लीपंचतन
म्हसळे
गोरेगाव
वरंधा घाट
भोरकडे
दासगाव
पाळे
महाड
श्रीवर्धन
करंजाडी
पोलादपूर
विन्हेरे
महाबळेश्वरकडे
खेडकडे
गोव्याकडे
० १० २०
किलोमीटर
उ



मुंबई
तळोजे
पनवेल
पातळगंगा
रसायनी
खालपूर
खोपोली
थळ वायशेत
अलिबाग
पोयनाड
पेण
नागोठणे
पाली
रोहे
महाड
उत्तर
0
20 किमी
सूची
पेट्रोकेमिकल्स
रसायने
खते
औषधे
कागद/पुठ्ठे
भांडी
विटा
मूर्ती
औद्योगिक वसाहती



मुंबई
पनवेल
घारापुरी
उरण
कर्जत
खालापूर
उदेरी
खांदेरी
अलिबाग
पेण
पाली
पुणे जिल्हा
उत्तर
0
20 किमी
रोहे
मुरूड
जंजिरा
तळे
माणगांव
श्रीवर्धन
म्हसळे
महाड
पोलादपूर
बाणकोटची खाडी
सातारा जिल्हा


# Administrative Stucture of Raigad District




KONKAN
कोंकण
ठाणे
रायगड
रत्नागिरी
सिंधुदुर्ग
सूची
ठाणे
रायगड
रत्नागिरी
सिंधुदुर्ग
N


ठाणे जिल्हा
मुंबई
पनवेल
कर्जत
उरण
रायगड
जिल्हा
खालापूर
पेण
अलिबाग
सुधागड
(पाली)
सह्याद्री
पर्वतरांग
उत्तर
रोहा
मुरुड
तळे
माणगाव
अरबी
समुद्र
श्रीवर्धन
म्हसळे
महाड
रत्नागिरी जिल्हा
पोलादपूर
0
20




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India.


The territorial waters of India extend into the sea to a distance of twelve nautical miles measured from the appropriate base line.

© Government of India Copyright, 1984.

MAHARASHTRA

# TAHSIL KARJAT

DISTRICT RAIGARH





BOUNDARY: DISTRICT
TAHS.
VILLAGE WITH LOCATION CODE NUMBER
HEADQUARTERS: TAHSIL
VILLAGES WITH POPULATION SIZE: BELOW 200, 200-499, 500-999, 1000-4999, 5000 AND ABOVE
URBAN AREA WITH LOCATION CODE
STATE HIGHWAY
IMPORTANT METALLED ROAD
UNMETALLED AND OTHER ROADS
RAILWAY LINE WITH STATION: BROAD GAUGE
" " " NARROW GAUGE
RIVER AND STREAM
POST OFFICE EXCLUDING E.M.S.
HIGHER SECONDARY SCHOOL
HOSPITAL, PRIMARY HEALTH CENTRE, DISPENSARY, MATERNITY AND CHILD WELFARE CENTRE
IMPORTANT VILLAGE MARKET/HAT

Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India.

© Government of India Copyright 1986.



रायगड जिल्हा
प्रमाण १ सेंमी. = ६ किमी.
क्षेत्रफळ : ७१५२ चौ.कि.मी.
लोकसंख्या : २२,०५,९७२
लोकसंख्येची घनता : ३०८ प्रति चौ. किमी.
हवामान : उष्ण व दमट
पर्जन्यमान : ३०० सेमी.
नद्या : उल्हास, काळू, पाताळगंगा, भोगावती, अंबा, कुंडलिका, सावित्री, घोड, गांधार.
पर्वत : सह्याद्री
औद्योगिक ठिकाणे : पेण, महाड, पाली, तळे, थळवायशेत, रसायनी, खोपोली, रोहा, नागोठणे, महाड.
किल्ले : अलिबाग, कनाळा, खांदेरी-उंदेरी, रेवदंडा, कोर्लई, जंजिरा. रायगड, घेरा सुधागड, सरसगड, सुरगड, लिंगाणा.
ऐतिहासिक ठिकाणे : रायगड, अलिबाग, महाड, मुरुड जंजिरा.
धार्मिक ठिकाणे : कनकेश्वर, महाड, पाली, जांभूळपाडा, शिवथरघळ, हरिहरेश्वर, उद्धर.
लेण्या : घारापुरी, तळे, कुडा, आंबिवली, कोंडाणे, खडसांबळे, ठाणाळे, पाले, कोल, रामधरण.
तालुके (१५) : अलिबाग, उरण, कर्जत, खालापूर, तळे, पनवेल, पेण, पोलादपूर, महाड, माणगाव, मुरुड, म्हसळा, रोहा, सुधागड(पाली), श्रीवर्धन.
मुख्यालय : अलिबाग
ठा णे जि ल्हा
पु णे जि ल्हा
मुंबई उपनगर जिल्हा
र त्ना गि री जि ल्हा
सा ता रा जि ल्हा
अलिबाग (रायगड)
पेण
पाली (सुधागड)
रोहा
मुरुड
तळे
म्हसळा
श्रीवर्धन
माणगाव
तळा
महाड
पोलादपूर
खालापूर
कर्जत
पनवेल
उरण
अंबरनाथ
बदलापूर
उल्हास नदी
पाताळगंगा
अंबा नदी
कुंडलिका
सावित्री
घोड
गांधार
बाणगंगा
गणपती घाट
ताम्हणी घाट
आंबेनळी घाट
कशेडी घाट
शाहपुरी लेणी
घारापुरी लेणी
छ. शिवाजी टर्मिनस
वांद्रे पू.
पंढरपूरकडे
पुणेकडे
महाबळेश्वरकडे
समर्थ उद्योग


मुंबई उपनगर जिल्हा
मुंबई शहर जिल्हा
ठा णे जि ल्हा
रा य ग ड जि ल्हा
र त्ना गि री जि ल्हा
सा ता रा जि ल्हा
मलंगगड
भीमाशंकर घाट
तुंगी
कोटलीगड
सावळा घाट
पनवेल
माथेरान
पेवेलची खाडी
घारापुरी
उरण
कर्नाळा
कर्जत
ढाक
कुसूर घाट
धरमतरची खाडी
पाताळगंगा नदी
खालापूर
बोरघाट
उंदेरी बेट
खांदेरी बेट
अलिबाग
भोगावती नदी
पेण
अंबा नदी
रोह्याची खाडी
चौल
पाली (सुधागड)
सरसगड
सुधागड
अवचितगड
सरसगड
ताम्हीणी घाट
कुंडलिका नदी
रोहे
लिंगा घाट
मुरुड
घोसाळगड
कुंभा घाट
जंजिरा
तळे
माणगड
कुडपण घाट
तळेगड
माणगाव
रायगड
लिंगाणा
शिवथरची खाडी
शिवथर घाट
गांधारपाले नदी
सावित्री नदी
म्हसळे
सोनगड
वरंधा घाट
श्रीवर्धन
महाड
मेघलगड
चंद्रगड
ढवळा घाट
बाणकोटची खाडी
सावित्री नदी
पोलादपूर
शिरघाट
प्रतापगड
उंची मीटरमध्ये
६०० पेक्षा अधिक
३०० ते ६००
० ते ३००
सूची
जिल्हा सीमा
तालुका सीमा
जिल्हा मुख्य ठिकाण
तालुका मुख्य ठिकाण
किल्ला
घाट
शिखर
टेकडी/डोंगर
० १० २० ३०
किलोमीटर
उत्तर

MAHARASHTRA

# TAHSIL KARJAT

DISTRICT RAIGARH




MSH–MAJOR STATE HIGHWAY

Kms 2 0 2 4 6 8 10 Kms

Miles 1 0 1 2 3 4 5 Miles

| | |
|---|---|
| BOUNDARY, DISTRICT | |
| " TAHSIL | |
| " VILLAGE WITH LOCATION CODE NUMBER | 55 |
| HEADQUARTERS: TAHSIL | |
| VILLAGES WITH POPULATION SIZE: BELOW 200, 200-499, 500-999, 1000-4999, 5000 AND ABOVE | |
| URBAN AREA WITH LOCATION CODE. | VI |
| STATE HIGHWAY. | SH8 |
| IMPORTANT METALLED ROAD | |
| UNMETALLED AND OTHER ROADS | |
| RAILWAY LINE WITH STATION, BROAD GAUGE | RS |
| " " " " NARROW GAUGE | RS |
| RIVER AND STREAM | |
| POST OFFICE EXCLUDING R.M.S. | PO |
| HIGHER SECONDARY SCHOOL | S |
| HOSPITAL, PRIMARY HEALTH CENTRE, DISPENSARY, MATERNITY AND CHILD WELFARE CENTRE. | |
| IMPORTANT VILLAGE MARKET/HAT | |